Selections from the Peshwa Daftar

27

Balajirao Peshwa and events in the North (Supplementary) 1742-1761

Editor—G. S. SARDESAI, B.A.

Government Central Press, Bombay
1933—Price Rs. 5 As. 8 or 9s.

(Government do not assume any responsibility for the comments and views expressed by the editor.)

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

२७

बाळाजी बाजीराव : उत्तरहिंद (पुरवणी)

१७४२—१७६१

[किंमत—९ रुपये ८ आणे किंवा ९ शिलिंग]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३३

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 27.

BALAJIRAO PESHWA AND EVENTS IN THE NORTH, 1741-61: SUPPLEMENTARY.

Since completing selections 2 and 21, important additional papers dealing with the same topics were discovered and it was thought necessary to present them in a separate selection of their own. It is therefore unnecessary to supplement what has already been said in this connection in the introduction to the two previous selections. The fateful battle of Panipat is a theme of peculiar interest to the student of Maratha history as it involves innumerable questions and controversies which, in the absence of full and authentic data, cannot be adequately discussed and settled. On this account the papers here printed will, it is hoped, be found to shed further light upon the successive stages of the Maratha invasion of the North, antecedent to the final action of January 14, 1761.

Although the Peshwa obtained from the Emperor a formal grant of the Subhas of Malwa and Bundelkhand as early as 1743, it took him full five years to consolidate his possessions and regularise his administration. Several earlier letters of this volume illustrate this particular phase of Maratha operations in which no small part was played by Raghuji Bhonsle whose main ambition appears to have been to thwart the Peshwa's policy.

The death of Nizam-ul-mulk in 1748, followed by that of Shahu in the next year, created fresh difficulties for the Peshwa in the South, and for a time diverted his attention from Northern affairs. The lost ground was quickly regained later by Raghunathrao who was deputed by the Peshwa in 1753 to undertake, a grand expedition, supported by his ablest commanders and most experienced generals. Raghunathrao's capture of Ahmedabad, his subsequent advance against Kumbher and the dispositions he made in the territory round about Delhi and of the Doab are here minutely described in the numerous letters of Vithal Shivdeo. Much of this achievement was however soon undone by the Abdali who entered India in the cold weather of 1756 and carried all before him, devastating cities, shrines, and the country as far south as Agra. To meet this fresh onslaught, Raghunathrao was again despatched in 1756, on a second and equally memorable expedition, the events of which are here minutely described. These documents disclose the names of many individuals hitherto unknown who took part in them. It is noteworthy that many persons such as Krishnarao Kale, Ganesh Vithal Vaghmare, Hari Bhide, Ramchandra Ganesh Kanade and others who rose into prominence during the post-Panipat period, are found to have received their first lessons in war and diplomacy during these days.

Letter No. 257 is a very valuable document in the handwriting of Nana Fadanis with the concluding portion by Sadashivrao Bhau. It gives a graphic account of the financial difficulties in which the Bhau was


placed long before he entered Delhi. This shows how the continued presence of the large Afgan army had disorganised the Maratha dispositions from the Chambal to Attock.

Curiously enough no papers are forthcoming for the two important months preceding the final battle; one can now safely declare that such letters were intercepted by the astute Abdali. The accounts of events subsequent to the Maratha disaster are however full and clearly set forth the immediate consequences of the reverse. These post-Panipat papers also will, it is hoped, be found full of interest.


The following genealogical table[1] of the Bundella chiefs taken from the Nagari Pracharini Magazine will be found helpful by students who wish to follow the Maratha compaigns in that region, described in letters Nos. 16, 164, 179, 189, 227 etc.

---


[1]वंशावळ.




No. 52



Facsimile of the handwriting of Govind Ballal Kher. *(Died on 22-12-1760)*



Facsimile of the handwriting of Ramaji Anant Dabholker. *(Died on 15-1-1761)*



Facsimile of a letter in the handwriting of Nana Fadnis, concluded by Sadashivrao Bhau.

No. 1] [1-1-1742

श्री

गणती दिा विठल सिवदेव सुा इसनै
आर्बैन मया आलफ छ ४ जिलकाद
मुा आसी उबरें

३९२ बा खडे हजरी
२७ कोतवाले गणतीस धरिले.
२९ आबाजी घाटगे कणधरास निरोप घेऊन गेले.
२९ रवाना पैका आणावयास.
८ पागेचे बारगीर घोडी घेऊन घरास गेले.
१ पोळाचा घोडा आजारी म्हणौन मागे राहिला आहे.

४३८
१४ आहेरकर १९ पैकी

४९२

¶*The paper gives the actual strength of a contingent led by Vithal Shivdev.*

No. 2] [12-4-1742?

श्री

राजश्री पंतप्रधान साहेबांचे सेवेसी

ॐ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये स्नेहांकित मलारजी होलकर व राणोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील कुशल चैत्र वद्य ३ त्रितीया मुकाम काळागुणा प्रा मेडते साहेबांचा प्रताप येथास्थित जाणून श्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर स्वामीनी दोनच्यार पत्रें कृपा करून पाठविली ते उतम समयी प्रविष्ट होऊन परम समाधान जाले. त्यास येथूनहि सेवेसी येकदोन पत्रें पाठविली तें पावलीच असतील विशेष. अभेसिंगाचे मैत्रिकीची ममता सर्वार्थी न धरता जोतपुरावर शह देऊन दोनच्यार जागे मातबर जरबेखाले आणून द्रव्य साध्य होये तो अर्थ करणें, तुम्हीं त्यासी निष्ठुर्ता केलियाखेरिज ते राजकारणावर येऊन पव्याचे व सध्याचे कार्ये करून देत

नाहींत. त्याजकडील वकील येथें आले आहेत, परंतु ते कामावर येत नाहींत. तुम्हाकडिल अवलंब धरितात, तरी राठोड बेईमान, यांची माया किमपि न धरता साफ उतर लिहिणें म्हणून किते(क) प्रकारें लिहिलें; त्यास, स्वामींचे नाव आमचे पदरी; याजमुळेंच या रजपुतांसी श्नेह अगर कोण्हासी विरूध; त्यांस हे रजपूत ज्याजपासून निर्मान जालें अथवा साक्षात बंधू ते परस्परें येकाचे येक नव्हेत तेथें आमचे कोठून होणार! आम्हीं यांचा भरवसा कोठें धरणार! अभेसिंगाणें आपणांवर कधीं कधीं क्रुतोपकारहि केला नाहीं, अथवा लालचेचा प्रसंगहि आहे नाहीं. श्वामींच्या चितांत साक्ष येत असेल. मग कोणे गोष्टीं निमित्य स्वामी सेवेसी चुकावें! त्यास कायावाचामनेंकरून येकनिष्टा स्वामींचे पायी आहे. येविसी लिहावे यैसे नाहीं. परंतु साहेबीं दोन च्यार पत्रीं राठोडाच्या मैत्रकीची गोष्ट लेखन केली म्हणून सेवेसी विस्तारपूर्वक परिहार लिहिणे अगत्य. तदनंतरें जोतपूर शहरांविसीं नूतन आज्ञा कीं, तेथील निर्गम जाला असिला तरी उतम, नाही तर रा। नंदराम आले आहेत हे बोलीचाली करितील. न करीत तऱ्ही रखवाली तेथील मात्र करणें. वरकड जाग्यांची खंडणीदंडणी घेणें म्हणून आज्ञा, त्यास अद्यापि जोतपूरचे कांही अनुसंधान आले नाहीं. तेथील आज्ञेप्रमाणे वर्तनूक करू. व सोजत व रायेपूर व जैतारण येथील थोडीबहुत बोलीचाली केली आहे. वोलीं[1]हि आहेत, परंतु त्यास वाकीफ कोण्ही नाहींत. गावावरी वस्ती नाही. याजकरता वसूल दिरंगाखालें पडला आहे येईल तो खरा. सेपनांस किरकोळ वसूल कोठील कोठील येतो. वरकड खेडींझोंपडी[2] रखवालीस कोण्ही कोण्ही येऊन रूजू होते, तेथील जिवनप्रमाणे से दोनसें चुकतांत. बोली मात्र कागदी होते यैसें आहे. रेजेंगी कांही वसूल येतो. फारकरून मुळूक गावाची आशा सोडून गेला. ते गाव तमाम कबिलें जळोन जातात यैसें आहे पुढें प्रस्तुत जोड त्यासनिध आलो आहे. पधरा कोस पुढे आहे तेथें भंडारी व रजपूत सडें आहेत. त्या स्थलास जातच आहोंत. जैसा उतम प्रसंग दिसेल तैसा करून घेऊं. तदनरूप सेवसी लेहून पाठऊ. वरकड शहरे आहेत नाहींत सेवेसी विदितच आहे. जेथवरी कस्त करायाची तेथवरी करितच आहोंत. ये राणीं गुरेंहि कोठे टिको पावले नाही. मैदान राण दूर दूर लोक वोस होऊन गेले. यास्तव लुगा[3]रहि लस्करास काही फावली नाही. पूर्वी लोक कोण्ही जोतपूरानजीक गेले होते त्याजकडे थोडी बहु(त) आली. विशेष पुढें अँगोटी[4] दीड महिना राहिली; आणखीकडे जागा जायाजोगी दिसत नाही. यास्तव

---

१ ओलीस, जामीन. येथें होळकराचा शिका.

२ किरकोळ. ३ लूट. ४ पावसाळ्याचा आरंभ.

3502

ये प्रांती आज्ञेप्रमाणें क्रमणा करितो. नूतन वर्तमान होईल ते सेवेसी लेहून पाठऊ व राणाजीचे संरदेस पूर्वी लुगारीस लोक गेले होतें त्याच्या यादी पाठविल्या आहेत त्यावरून विदित होईल. सेवसी श्रुत होये हे विज्ञापनी.[1]

¶*Ranoji Sindia and Malharji Holkar to the Peshwa, complaining about the scanty recovery of tribute from the Rajput territories of Jodhpur and others. The impressions of the writers are significant.*

No. 3] [*1-9-1742*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
साहेबांचे शेवेसी

आज्ञाधारक महिपतराव कवडे दंडवत विज्ञापना. येथील सेवक लोकांचे वर्तमान ता। भाद्रपद शुध १३ मुकाम प्रां। देवरी साहेबांच्या कृपावलोकनेकरून येथास्तित आसे. तीर्थरूप साहेबांची आज्ञा घेऊन स्वार जाले. खानदेश प्रांते आले. तेथील वर्तमान मनास आणितां मुलकांत दोन वरसे दाभाडियांची छावणी जाली त्याजमुले परगणे खराबींत आले. मातबर दोन्ही परगणे नंदूरबार, सुलतानपूर बांडियाकडे गेले. राहिले परगणे येथील जमिदार बोलाऊन हालमाल पाहून चुकोत्या केल्या. सुभे मजकूरचा यैवज पाहतां वराता नेमणुकेखाले गेला. रोजमुरियासी जागा नाही. कर्जवाम घेऊन रोजमुरे फौजेस देऊन मजल दरमजल देवरी प्रांतास आले. येथील वर्तमान ध्यानास आणिले तों दुरगसिंगाचा पुत्र अजितसिंग मवरेत बैसोन देवरीची कुले नेऊन रुपये घेत होता. मग मवर येथें मुकाम करून गढी पाडून कूच करून गढे प्रांते रेवातीरी मुकाम करून राजियासी पत्रें लिहिली. त्याजकडील पांच आले. हकीकत मनास आणितां तिगस्ता कमाविसदार यांजपासून रसद घेतली होती ते वसुलात न आली. पांचासी रदबदली होत आहे तों सिवराजशाहा राजा यासी देवआज्ञा जाली. पांच उठोन मंडलियासी गेले. मग काजकाम बंद जाले. इतकियांत गौरझांबरे येथें दुरगसिंगाचा भाऊ भारथशाहा होता, त्याने देवरी प्रांते गोंडी करून गाव लुटून गांवास आगी देत होता, तदोतर गौरझांबरियावर येऊन मोरचे लाविले. पंधरावे दिवसी साहेबांच्या पुण्यप्रतापे गढी हस्तगत करून ठाणे ठेविले. रयेतीस कौलपत्र

---

१ पुढें मोर्तबसुद्चा वाटोळा लहान शिक्का.

देऊन उपरांतिक कूच करून गढे प्रांते रेवातीरी मुकाम केला. सिवराजशा याचा पुत्र दुर्जनशा राजी बैसला. त्यास पत्रें पाठऊन त्यांजकडील पांच आले. त्यांचा याचा तह बैसला नाही. तीन वरशाची मामलत तैशीच राहिली. छावणी करणें जरूर जाली. श्रावणमासी सिवराजशा याचा भाऊ निज्यामशा याने दुर्जनशा यासी मारून आपण राजी बैसलिया उपरांतिक त्याने आपले पांच राजश्री गोविंद बलाल यांजकडे पाठविले. त्यांच्या विद्यमानें मामलत विल्हेस लाविली. पैसा द्यावयासी नाही तेव्हा जागा दिल्ही. फत्तेपूर, बारे व मेडली प्रांत पनागर व गराक्ष दरोबस्त दिल्ही. त्याच्या सनदापत्रा आणावयासी पांच व राजश्री गोविंदपंत यांचे कारकून गेले ते अद्यापवर आले नाहींत. इतकियांत तीर्थरूपास वेथा जाली. चवथें दिवसी भाद्रपद शुध ११ सोमवारी देवआज्ञा जाली. इस्वरे आम्हांवर मोठा क्षोभ केला तो पत्रीं कोठवर ल्याहावा. साहेब धणी छत्र आहेत. आम्हास काये चिंता आहे. गढियाकडील सनदा चौ रोजा येणार. त्या आलियावर मुलकाचा बंदोबस्त करून सेवेसी लौकरीच येतो. सेवेस श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahipatrao Kavde reports the disturbed state of affairs in the Devri province owing to the mutual differences between Ajitsing, son of Duragsing, and Durajansha, son of Sivrajsha.*

No. 4] *[1742?*

श्रीराम

सेवेसी विज्ञापना. निरंजनशाहा राजे प्रांत कालीभित मकडाई विनंती ऐसी जे. धाडशाहा, पालक लेक माझ्या बापाचा, त्याणे माझे कबिले आटकाऊन ठेविले आहेत. राज्य हिरून घेतले. मी च्यार महिने येथे आलो आहे. आता पोटास नाही. येविषई विनती ऐसी जे चोराने माझे राज्य घेतले आहे ते सरकारात घेऊन मजला हात उचलून देतील तितकेच मी घेईन. माझे कबिले सोडाविले पाहिजेत हे विज्ञापना. माझे राज्य मजला द्यावे अथवा सरकारांत ठेवावे. नाही तरी माहाराजाचे मर्जीस जे येईल ते करावे. माझा कबिला सोडून द्यावा. मी नवकरी माहाराजाजवल नवकरी करीन हे विज्ञापना.

¶*This is a complaint of one Niranjanshah against one Dhadshah who had stolen his estates and imprisoned his family.*

No. 5] [13-5-1743

श्रीमोरया

राजश्री पंत प्रधान

साहेबांचे शेवेसी

ꣻ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नेहांकित मलारजी होलकर कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील कुशल जेष्ट शुध १ प्रतिपदा मुकाम नजीक कुवराई स्वामीचा प्रताप जाणून श्वकीये लेखन करावयासी आज्ञा करीत असिले पाहिजे. यानंतरं साहेबाचें आज्ञापत्र छ २९ रबिलावलचे मुकाम मजकुरीं येऊन प्रविष्ट जालें. "चंदेरीची खंडणी आद्यापि जाली नाहीं. याउपरी येतील. दतियेकर आले आहेत. विचारानरूप कार्य विल्हे लागेल. रजवाडेकर ढालढकलेची गोष्ट सांगतात. प्रजन्यहि इकडे फार आहे. तुम्ही कोठपर्यंत गेला आहां? तुम्हाकडे पाऊस कैसा आहे? हे लिहिणे" म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञा घेऊन श्वार जालियाउपरी मजल दरमजल खेमलासियासी येऊन तेथील कार्यानिमित्य दोन तीन मुकाम करून बोल काहडून घेतली व येक तोफ किल्यावरून उतरून घेतली व हती त्याणी घावासा केला आहे. तेथून रविवारी कूच करून मुकाम मजकुरास आलों. आजीचा मुकाम पुढे होणार. मजल दरमजल माळवे प्रांतात जात आहो. [शिक्का] इकडील जे कार्य कर्तव्य तो करून घेतच आहो. प्रजन्य थोडा बहुत इकडे आहे. विशेष तिकडील कार्ये अथःपर लौकरच उरकून स्वामीनी घ्यावी. प्रजन्यकालाचे दिवस आहेत. त्वरा करावी यामधे उत्तम आहे. परंतु जेष्टमास निघाला. वर्षाप्रमाणें पंधरा वीस रोज आवकास आहे. दम धरून रजवाडे वगैरे झाडबाकीचा निर्वाह करून घेऊन चलावे. स्वामी आगोधर नर्मदापार जालियावर मग आम्ही येऊन. सेवेसी श्रुत होये. ये प्रांतीचे कामकाज जैसे होईल तैसे वरचेवरी सेवेसी विनंती लिहीत जाऊन. हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar communicates to the Peshwa his activities in the vicinity of Malwa.*

No. 6] [5-7-1743?

श्री

राजश्री पंत प्रधान

स्वामी गोसावी यासी

ꣻ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो यशवंतराऊ पवार कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल ता। छ २३

जमादिलावल मुा गाते पा आगर प्रांत मालवा. स्वामीच्या आसीर्वादेकरून संतोश असो विशेष. स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी यैसें न करावें. सदैव आलिया वार्तिकासमागमे पत्र पाठऊन सांभाल करीत गेले पाहिजे. यानंतर वेदमूर्ति राजश्री माहादेवभट हस्तनापुरीहून ज्या कार्यास गेले होते ते कार्य करून परवाने घेऊन आले. त्याचें सावंत वृत राजश्री मल्हारबा व राजश्री राणबा याणी लिहिले आहे त्याजवरून श्रुत होईल. लोभ आसो द्यावा हे विनंती. [शिक्का]

(मोर्तब सूद)

¶*Yeshvantrao Pawar writes to the Peshwa that Mahadevbhat has returned from Hastinapur with his object accomplished and the necessary permits obtained.*

No. 7] [*19-12-1743 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोविंद बलाल कृतानेक सा विनंती. ता पौश सुध १९ पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेश. इकडील वर्तमान तर इतके दिवस दोनी राजे येकत्र होते. आता निराले आपले आपले तालुकियात मुलकगिरीस गेले. रा सभासिंग राजे कनार प्रांते गेले. प्रस्तुत जिगणीजवल आहेत. जगतराजजी सुखे चरखारी येथे आहेत. वोडसेयाचे जमीदारानी दगा केला. येंदाचा आमल त्याणी भक्षिला गाव जागा त्याणी मारली. त्यास इजतखान कुरवाईहून गेले त्यामागून रा दादोपंतहि गेले. काही नवी सिबंदी प्यादेहि रा नारोपंती ठेविले. पथके जी होती ते आहेत. ऐसे सर्व येकत्र मिलोन तुरखरू वोडसेवाले याचे भाऊबंद राहात होते त्याजवर गेले. जुज जाले. दोहीकडील माणसे पडली. गावास गडी नव्हती. त्याजवर ते येऊन भेटले. परस्परे सला जाली. येथून कूच करून ठहरोलीस लागले आहेत. मोर्चे लाविले आहेत. सारांश मातबर फौज आलियाने पारपत्य उतम रीतीने त्याचे होऊन तह जो होणे तो होईल. रा रघोजी भोसले याचे वर्तमान श्रीस कासीद पाठविले होते. खबर आजीच आली. तेथे वर्तमान या प्रकारचे आहे. नवाब इलावर्दीखान मकसुदाबादेहून पटणेयासी आले. रा रघोजी भो येक मास

---

१ हिंगणें.

छावणी करून रामगडे रानात होते. भाद्रपद मासी गयेस आले. ते गयेवर सवा महिना होते. तेथून भोजपुरियावर आले. लाख रुपये मामला भोजपूरवाले याणी केला. काही वसूल जाला. काही व्हावा तो नवाब आले. ते वर्तमान भोजपुरियासी कललियावर पैसा द्यावयासी अनमान केला. नवाब आले ते पटणेयाहून दोन मजली ज्या रोखे रघोजी भोसले होते त्या रोखे आले. त्यास तमाम मुलूक रघोजी भो याणी दोन महिने प्रांतात राहिले त्यानी येक गाव राहो दिल्हा नव्हता त्याजमुळे नवाबाचे लस्करी रसद न पोहेचेसी जाली. दाहा हजार फौज रघोजी भो याची आहे. मुस्तफाखानाचा पुत्र दोन हजार आहे. यासिवाये जमीदार पठाण दोन हजार आहेत. नवाबासभोवते रात दिवस होते त्यास मुलूक वोस त्याहीवर हे सभोवते याजमुळे रसद बंद जाली. दोन शो सेर नवाबाचे लस्करी जाला त्याजकरिता नवाबानी कूच करून पटणेयासी गेले. हेहि मागे त्याचे गेले. आरब बहुत नवाबाजवळ आहे. या प्रकारचे वर्तमान. मागती जोडी श्रीस पाठविली आहे. वरचेवर वर्तमान येईल ते सेवेसी लिहीत जाईन. काली स्वामीचे आज्ञापत्र व कासीदजोडी आली त्यास इतराजी आली जे तुम्हावर हुंडीदाखल वराता केल्या आणि वराता मावरा टाकिता. मावमासी, फाल्गून मासी रुपये देऊन म्हणून तुम्ही म्हणतां. सावकारापासून रुपये घेऊन हुंडीदाखल वरात केली त्यास या प्रकारे तुम्ही बोलता म्हणून सावकारानी विदित केले म्हणून आज्ञापत्र सादर जाले. त्यास मजपासी त्याचे माणूस आगर गुमस्ता आगर स्वामीची वरात येकहि आली आसेल, मी त्यासी तिलमात्र भाशण केले आसेल तर इतराजी लायेखच जालो. मी गढेयासी होतो. ज्वर मजला दीड महिना आला. बहुत श्रमी जालो. स्वामीचे कृपेकरून आता आराम लागो लागला. बरे ते वराता घेऊन आले त्याणी मजकडे माणूस पाठवावे, मजला लिहून पाठवावे जे वराता घेऊन आलो शो देणे. हे तो केले नाही आणि उगाच गिला स्वामीजवळ केला. हे तो हवले याचे रुपये, स्वामीनी मोठी निकडीत आज्ञा केली तेव्हा आनमान न करिता कार्य केले. आता कसा (?) उजूर करून ? जो वरात घेऊन मजपासी आला त्याचे पदरी यैवज घालून कबजे घेतली. लिंगोजी नाईक तांबवे-कर व बाजी नाईक काबरस याचा माणूस, कासीद, गुमस्ता कोणी मजपासी न आला. मजला कशावरून कलावे ? जेव्हा वरात आगर कासीद, गुमस्ता कोणी येता मी उजूर त्यासी करितो तर त्याणी स्वामीजवळ नालीस करावी. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Govind Ballal to the Peshwa, describing the attitude of Sabhasing and Jagatraj and their mutual ill-will and then giving details of the movements of Raghoji Bhonsle near Ramgad. The writer further denies the charge that he refused to accept the drafts of the Peshwa but explains that the payment was delayed on account of his illness.*

No. 8] [1744

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सो

सो विज्ञापना. या प्रांती दतियेकरानी मोठी फिसाद मांडली आहे. कराराचा किला त्याणी ज्या दिवसापासून घेतला त्या दिवसापासून सोख होऊन बादमामलीस आले. रा नारोपंताकडे पैसा वसूल देत नाही. तमाम पैसा मुलकाचा घेऊन आपले सिपाई ताजे करितात. किलेयावर जकिरा करितात. सिस्टाचारे बोलतात. पैसा द्यावा हे चिंती नाही. नव लाख रुपये साल गुा बाकी, पांच लाख हाल साल. चौदा लाख रुपये त्याजकडे येणे. पैसा सुरलीतपणे देत नाही आणि आमचे जागियांत चोर पाठऊन उपसर्ग देतात तो लिहिता विस्ता(र) * * * * * चे येणे या प्रांती जालियावर त्याचे पारपत्य जालियावर तेहि देहावर येतील. सर्व बुंदेलेयाचे पारपत्य जाले आणि याचे न जाले. ईस्वराला नमा * * * * ता बुध याची विपर्यास जाली. राजे जगतरा(ज) राजे सभासिंग आद्याप देहावरच आहेत. कोठे कजिया बादमामली तिलमात्र करीत नाही. रुपये द्यावयासी सुस्त. त्यास त्याच (सं)देह पडलाच आहे परंतु त्याची कुबुध श्रीमंत राजश्री उभयेता सरदारानी उतम प्रकारे दूर केली. राजश्री रामचंद्रबावानी त्याची बुध शुध करून ठेविली. याजउपरी कुबुध त्यास तूर्त येणार नाही. आहे वर्तमान ते सेवेसी लिहीले आहे. जे वर्तमान होईल ते वरचेवर लिहीत जाऊन. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*A complaint is carried to the Peshwa against the Raja of Datia who constantly evaded the payment of dues on one excuse or another. The writer further states that Jagatraj and Sabhasing still continue to be on good terms.*

No. 9] [12-2-1745

श्री

राजश्री आपाजी जिवाजी सुभेदार
प्रां देवगड गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत. सुा खमस अर्बेन मया व अलफ. पाा रामटेकचे येवजी राजश्री विस्वनाथ भट वैद्य यासी रुपये

१००० वर्शासन
५०० धर्मदाये

१५००

येकून दीड हजार रुपये देविले होते त्यास अद्यापि पैका पावला नाही तरी यैवज मारनिलेस आधी पावता करणे. जाणिजे छ २० माहे मोहरम. बहुत[1] काये लिहिणे

रघोजीचा शिक्का.

मोर्तब सुद.

¶*Raghuji Bhonsle instructs Apaji Jivaji, Subhedar of Deogad, to pay 1,500 rupees to Vishvanathbhat Vaidya, father of Baburao Vaidya of later fame.*

No. 10] [*After April 1745*

श्री[+]

श्रीमंत भाउसाहेबाचे सेवस : सेवक भीकाजी काळे दोन्ही हात तीसर मस्तक जोडुनी रामराम वीनंती. अता येथील वरतमान : रघोजीबावाचा : अला श्रीदीचा दीवाण जानकीराम त्याचा लेक दुलबराम कटकच्या ठान्यात होता तो धरूनी अनीला. नागपुरास त्याचा खंड झाला तीन लाख. ती लाखाचा हावाला घेतला. रामाजी नावीक[2] नागपुरचा त्याच्या हावाला केला दुलबराम. मग नागपुराहुन कुच केल. दरमजल सालबरडीवर अला. तेथ मोरचे लाविले. मग तेथ रायाजी भोसला अला. सालबरडीवर भेटी झाल्या. त्याचा याचा अद्याप ताळ बसला नाही. याउपर सालबरडी घेतली. सडे दांडगे पळोनी गेले. अनीक तेथ कोन्ही नवत. पंचवीस दांडगा होता. त्यांनी अठ रोज झुधवील. मग सालबरडी घेतली. वाडा खानुनी टाकीला. तेथ फउज (ज) मा जाली. मग तेथुनी दाहावे रोजी कुच केला. दरमजल अमरावतीवर अला. तेथ सताजी भोसला होता. त्याचा याचा बिघाड अहे. म्हनउनी सीवार चारीला. मग अमरावतीहुनी कुच केल. थुबगावावर मुकाम जाला. परगाने अळजपुर. तेथ अळजपुरचा मोगल अला. तेथ भेटी झाल्या. येक हाती रघोजीबाबाला दीधला. येक घोडा रायाजी भोसल्याला दीधला. अनीक दोघाला दोन दुशाला पाघरवील्या. अनीक रघोजीबावान येक हाती येक घोडा मोगलासी दीधला. मोगलान अडीच लाख रुपये कबुल केले. काही वराता दीधल्या. काही वावीदे[3] केले. अनीक फउज जमा झाली. सीवजी धालोडा, पदमाजी जाचक, मानाजी सीरगीरा, म्हसवाजी सीरगीरा,

---

१ येथून अक्षर खुद्द रघोजीचें. + अस्सल पत्र बालबोधींत आहे. २ नाईक. ३ वायदे.

बीबाजी वांजाळ, अनंदराव वाघ, रघोजी चोपडा, हारजी सींदा, रघोजी गावीकवाड. सीवनी सुपारेचा रोहीलाही अला अहे. मस्तुबाखानाच लोकही अहे. बुंरानजी मोहीता, नारायेनजीभट तेथची आले. सा हाजार फउज अहे. तीन वार दोन दीस मुकाम होता. मग तेथुनी कुच केल. फीरूनी मागुता अमरावतीहुनी ती कोसावर मुकाम केला. दारव्यावर जात अहे. जानुजी भोसला वनीहुनी बोलावीला. दोघाची भेट जाल्यावर फउज बंगाल्यात पाठवावी असी बोली अहे. लोक तो दीलगीर अहेत. रोजमराही देत नाही. असा वरतमान अहे. याउपर साहेबानी लेहील, वीसाजी भिकाजीचा वरतमान कसा अहे? परगान्याच्या सनदा दिधल्या. कमासदार गावगावाप्रती बसले. अनीक सारा वरतमान वीसाजी भीकाजीन लेहीला अहे. साहेबास कळल. अनीक अरज, खरचायाची अपदा अहे. तर साहेबानी रोजमरे पाठवीले पाहीजेत. अनीक जोड्या पाठवाव्या. येथ येक जोडी राहीली अहे. दोन्ही हात जोडुनी वीनती.

¶Bhikaji Kale, writing to Bhausaheb, gives news about the activities of Raghuji Bhonsle in the region round about Nagpur and Amaravati. The writer also alludes to Raghuji's intention of sending his forces into Bengal.

No. 11] [*After April 1745*

श्री+

अनिक साहेबासी अरज. साहेबानी अज्ञ केली होती जी बंगाल्याच वरतमान कैसा झाला तो तकीक करूनी पाठवन. तरी साहेबाची आज्ञा घेऊनी निघालो सोळावे दिवसीं नागपुरासी अलो. दो दिसामधी कुल वरतमान तहकिक केला. मग तिसरे दिवसी लेहूनी पाठविला तो साहेबासी नाही पावला. ते जासूद जोत्याजी नाविकाचे[१] होते. त्याच्या मागुनी भिकाजी नाविकाची जोडी पाठविली. पंधरा दिवसा मागुनी पाठविली ते जोडी येऊनी दाखल झाली. पहेली जोडी मागून आली मग नाविकानी बातनी मधीच ठेविली. साहेबानी आज्ञापत्र पाठविले ते आपन्यास पावल तेव्हा त्या जासूदानी सागितल जी पहिली बातनी मधीच ठेविली म्हनऊन बंगाल्याचा वरतमान थोडा मात्र आनिक लेहिला. तो काना मात्र संभाळुनी साहेबानी वाचावा. रघोजीबावा बंगाल्यामाजी गेला. जाऊनी कटकच्या ठान्याला मोरचे लाविले. आलाब्रिदीचा दिवान जानकीराम त्याचा लेक दुलबराम कटकच्या ठान्यात होता. ती महिन्यात कटक घेतल. दुलबराम धरिला. ही खबर आलाब्रिदीस कळली. अनिक जानकीरामास. मग त्यानी येक पठान पाठविला, अनिक यांचा निळोपंत गेला. सात लाख कबूल केले. त्रितकी रदबदल होती.

+ मूळपत्र बालबोधींत आहे. १ नाईक.

पठान यांच्या डेऱ्यात होता तो यांनी दोनेसे मानूस धरूनी अनील त्याचे नाक कान कापिले ते त्य मोगलान देखिले. मग मोगल बोलला. मी रदबदल करितो मजदेखता मानसाची नाक कापिली ही गोस्ट बरी नव्हें बर असो. मी अलाब्रिदिला वरतमान सागोतो. फिरून अनीक येतो मग तो मोगल गेला: अलाब्रिदीला भेटला त्यान वरतमान सांगितला सात लाख कबूल केले परी मज देखता दोशा मानसाची नाक कापिली. मग अलाब्रिदी बोलला हा बाम्हन मारूनी ठाका. मग दीलीचा मोगल बोलिला म्या यासी विमान दिधला हा सोडुनी देवा. मग निळोपंत सोडुनी दिधला. सला बिवडला : मग निळोपंत रघोजीबावाप आला त्यान वरतमान सांगितला जी मोगल बधत नाही. मग मीर हबीब कटकच्या ठान्यात ठेविला मग तेथूनी कूच केल बडदवनावर अला तेथ सात लाख खजिना निवाला. मग तेथूनी कूच केल गया-वरूनी सोनभद्रावर अला. तो विकुनी (हिकून=हिकडून) अलाब्रिदी अला. पहिल जुध सोनभद्रावर झाल. तेथ गोळी निवाली (जिवाळी) लागली. येक दात पडला रघोजी-बावाचा. मग सोनभद्रच्याकडून मोगल पठन्यात गेला. यानी भवता येडा दिधला. परी तेथ लाग काही चालना. मग सडे फउजेसी रघोजीबावा निघाला. बुनग टाकिल माग. रातदिवस चालून मग्सुजाबाजवर (इकडून) गेला. अरध्य रात्री पावले. बाहेरील पुरे लूठले. तो विकुन भागीरथीच्याकडन पाहाठ मोगल दाखल झाला. मग दुसर जुध तेथ झाल. मग रघोजीबावा तेथूनी निवाला. बडदवनावर अला. मग अलाब्रिदी किलसरमस्तखा फउज घेऊनी अला. तिसर जुध जाल. रघोजीबावास पिठुनी काढील. तेथ मस्तुभाखानाजीचा लोक भेठला. मग देसा येत होते. ज्या बारीत अपुन लुठल तेथ दाडग्यानी अरध बुनग लुठिल. मग नागपुरासी अले. हा वरतमाना मागच पहिल्यान पाठविला. परी साहेबासी नाही पावला. आनिकहि कितीक मजकूर होता तो साहेबासी ना पावला. म्हनउनी थोडं बहूत अनिक लेहिल.

¶[*News-letter from Nagpur reporting news of Raghuji Bhonsle's invasion of Bengal and his encounters with the Moguls. The letter is a typical specimen of the writing and language of the lower classes in those days.*

No. 12] [*1745* ?

+श्रीमोरया

विनंती उपरी. आपण चिठी पाठविली ते मंगळवारी प्रहरा रात्रीं पावली. लिहिलें की "बिनी पुढें गेली. आम्ही मागाहून जेऊन निघालों त्यामुळें बिनी

+ पत्र होळकराकडील.

अटोपीत आलों तो तिसरा प्रहर जाला. पाणी अडीच कोस न मिलालें त्यामुळें माणसें कितेक हैराण जाली. कितेक मेली. त्यामुलें सोमवारी मुकाम केला. मंगळवारी उरईवर वोढियाच्या पाणियांवर आलो परंतु नासकी डबके आहेत. आपला तिकडील विचार कैसा जाला" म्हणून कितेक तपसिलें लिहिलें सर्व कळों आलें. यैसीयासी आजी अगोधर आपणाकडे चिठी पाठविलीच आहे. त्यास येथील विचार चुरखीवाल्याचा कारभारी माखणजी भेटीस आला. त्याणें बोलीचाली लाविली कीं चुरखी खाली करून देतो. यैसा विचार आहे. त्यास इकडे लस्कर हेलपटावे यैसें कायें आहे? तेथच विहरे करून पाण्याची तजवीज करून उदईक मुकाम तेथच करावा तो उद्याच्या दिवसांत जे होईल वर्तमान ते आपल्यास लेहून पाठवितो. उद्या बुधवारी तेथेच मुकाम करावा. माखणजी करारमदार करून गांवात गेला आहे. कराराप्रमाणे कायें जाहालें तरी उगेच लस्कर श्रमी करावेंसे कायें आहे? आम्ही येथील तहरह करून तिकडेच येउन. कदाचित चुरखीवाल्याने काही विलंब लाविला तरी लस्कर येमुनानजिक यावें लागेल. श्रीइछेनें इतके होत नाहीं. परंतु काम होय तोंवर शह राखावा लागतो. उदई(क) जे तत्वता सिधांत होईल तो तावडतोब लेहून पाठवितों. बहुत कायें लिहिणें हे विनंती.

¶*Letter from Holkar's camp referring to the occupation of Churkhi by the Marathas.*

No. 13] *[1745?*

श्री

अपत्यें जयाजी शिंदे साष्टांग दंडवत विनंती उपरी. चुरखीवाल्यांची सात आठ ठाणी घेतलीं. गोविंदपंताचे स्वाधीन जाहालीं. च्यार गढ्या राहिल्या आहेत. तेथे आजी ठाणी बसतील. उदैक कूच करून येतो. कळावे म्हणौन लिहिले असे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Jayaji Sindia reports the capture of several fortified posts from the chief of Churkhi.*

No. 14] [1745 ?

श्री

आपल्ये जयाजी सिंदे दंडवत विनंती उपरी. आजी गुरुवारी संध्याकाळीं चुरखीचे गढीवर निशान चढलें. वडिलांच्या आसीर्वादे फते जाहाली. हे वृत कळावें म्हणौन लिहीले असे. उद्यांचा दिवस येथे मुकाम आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Jayaji Sindia reports the capture of Churkhi.*

No. 15] [1745 ?

श्री

अपल्ये जयाजी सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील वर्तमान चुरखीकर हरिसाहा याची बाईको व मुलें गावांतून आलीं होती. बोलीचा तहरह जाहाला. चुरखी वगैर ठाणीं अवघीं घेऊन मौजे बोता व अटरिया व मौजे मुसमरीया यैसे तिन्ही गाऊ त्यांस दिल्हे. कागदपत्र करारमाफक तयार जाहाले. या उपरी गढीतून कबिले माणसे वस्तभाऊ बाहीर निघतील. उपरांतीक उदैक संध्याकाळीं निशान चढावें यैसा सिधांत जाहाला. तीन गाऊं त्यांस दिल्हे. त्यामध्यें यैवजमाफीक स्वार व प्यादे येऊन चाकरी सरकारची करावी यैसा करार केला आहे. • येथे पाण्याचा दुष्काल आहे; तरी पाणी पाहून मुकाम तेथेंच असावा. बहुत काय लिहिणे हे विनंती. बुधवार चतुर्थ प्रहर.

¶*Jayaji Sindia writes probably to his father of the occupation of Churkhi and of the hoisting of the Maratha standard over the citadel.*

No. 16] [18-4-1746 ?

श्री

तीर्थरूप राजश्री बापूजीबावा
वडिलांचे सेवेसी

आपत्यसमान जिवाजी वासुदेव सा॥ नमस्कार विनंती. येथील क्षेम ता॥ छ ७ रबिलाखर मु॥ कालिंजर[१] जाणून स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. आसीर्वादें पत्र पाठविले ते उतम समई पावले. लिहिले वर्तमान आवगत जाले. येथील दरबारचे वर्तमान तर सभासिंगाची मामलत पंचवीस

---

१ बुंदेलखंडांत काल्पीच्या पश्चिमेस वीस पंचवीस मैलांवर.

3513

लक्षास चुकली. सिवाय तीन हती द्यावे यैसा करार जा(ला). परतु प्रीतिसिंगाचा मजकूर पाडिला आहे तो अद्याप चुकला नाही. घालमेल पडली आहे. याउपर जाले वर्तमान सेवेसी लिहून पाठऊ. हिरकाणिया ८६ स्याहीसी पाठविल्या त्यात कमी येक जाली बाकी पच्यासी भरल्या. त्याचा लाखोटा राजश्री सुभेदारानीच आपल्या हाते फोडिला. त्याचाहि जाब घेऊन बजिनस पाठविला आहे त्यावरून विदित होईल. राजश्री अंताजी माणकेस्वर याचेहि पत्र राजश्री सुभेदारास होते. तेथे वर्तमान लिहिले होते जे दोन तीन झुंजे जाली. अंताजीपंताकडील घोडी दाहा पंधरा व माणसेहि वीस पंचवीस पडली. गढाकोटब्यास मोर्चे लाविले आहेत. नित्य दांडगे रात्री दोन च्यारसे गोटावर येतात. आपणास कलावे म्हणून लिहीले आहे. राजश्री आमृतराव देशास जात होते त्यास श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीची पत्रे मनाई आली जे, तुम्ही माघारे बंगालीत जाऊन पंधरा लक्षाचा मामला चुकऊन येणे त्यावरून सुरंजेस राहिले म्हणून वर्तमान आहे. घाटगियाचे राऊत येथे आले ते रोजमरा मागतात. त्यास येथे काही यैवज नाही आणि आपली चिठीहि नाही. ते तो रोज उठोन मागावयासी येतात. त्यासी कोण यैवजी द्यावे ते लिहून पाठवणे. विशेष काये लिहीणे हे विज्ञाप्ती.

¶*Jivaji Vasudeo to Bapuji Baba, communicates details about a monetary settlement with Sabhasing and Pritising and the purport of a letter from Antaji Mankeshwar to Malharrao Holkar describing a skirmish.*

No. 17] [*7-6-1746*

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री सदासिव दामोधर गोसावी यासी

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा सबा आर्बैन मया व अलफ. जैतपुरावर मोर्चे व सुरंग चालऊन दोन सुरंग उडविले. त्या दहशतीने जैतपूरवाले कौलास येऊन जागा खाली करून देऊन गेले. जैतपूर फते केले म्हणोन राजश्री मल्हारबा व जयापा यानी लिहिले याजवरून संतोष जाहाला. जागा बाका होता. तथापि तुम्ही सर्वांनी श्रमसाहास करून जागा हस्तगत केली. शाबास

तुमची व लोकाची. सदैव तिकडील संतोषाचे वर्तमान लिहीत जाणे. जाणिजे छ २८ जमादिलोवल बहुत काये लिहिणे.

¶*The Peshwa bestows eulogies on Sindia and Holkar for their splendid victory at Jaitpur.*

No. 18] [*August 1746 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री राणाजीनी कनीराम आपणापासी पाठविला होता. माधोसिंगाचे राजकारण आपण नेमस्त केले की चोविसाची जागीर त्यासी द्यावी. पंधरा त्याजपासून घ्यावे. येविसी राजश्री रामचंद्रबावास आपण लिहिलें होते. त्यासी तर आपल्या केलियाची ममता. स्वामीकार्ये बुडिले तरी बुडो परतु आपला आभिमान सिधीस न्यावा. याजमुळे कितेक परियाये की द्रव्य साध्य होणे हे असत्येंकरून खरे नाही यैसे वारापाणी करून जैतपूरच्या मुकामीहून आपणा(कडे) पत्रे लिहिली आहेत. दुसरे ईश्वरसिंगाकडील मामला भारी दर्शऊन लटिकी दिलीकडील मातबरी उपराळा दाखऊन शेवेसी लिहीले असेल तरी राजश्री राणाजीनी आम्हासी करार केला आहे की पंचविसा लक्षाचा माधोसिंगाचा पटा करून द्यावा. वीस नजर घ्यावी येविसी तिळतुल्य असत्ये नाही. निसंदेहरूप करार आहे. आणखीहि येक अरधा साधेल तेथवर साधूनच. परंतु हा निश्चये इत्यर्थ जालियाउपरी हडे व राठोड येक त्यासी आम्ही सामील जालिया तेव्हा ईश्वरसिंग सहजच सला करून विल्हे लावतील. काडीचा कलह होत नाही. जाला तर आपला नफाच आहे. दिलीकडील अनुसंधान तर सर्व आमीर तुम्हासी काडीमात्र दुसरा आर्थ धरीत नाहीत. आपले आज्ञेवरून मनसूरआलीखान व आमिरखान माधोसिंगाचे साहित्यावरच आहेत. येविसी त्याची पत्रे आम्हास येतात. ईश्वरसिंगाचे कलहामुळे कोणी आमीर आदिकरून पातशाह बिघाड करितो यैसे नाही हा निश्चये असो द्यावा. बुंदीचा मजकूर गुदस्ता जाला जो करार केला त्याप्रमाणे आपला पैका न आला आणि कलहहि न तुटला. बुधसिंगाचा पुत्र उमेदसिंग बुंदी प्रांते धामधूम करून कजिया करीत आहे. त्यासी त्याची समजावीस करावी यैसे ईश्वरसिंगाचे मानस आहे. यैस्यास हेंहि राजकारण

आपले हाते विल्हे लावलियाने कार्यसिधी चांगलीच होऊन सर्व राजकारण बाज खा (?) त्यांत आवचे राजे राजश्री बावाचा कारभार येकवोढी, मूल तर अज्ञान, न अयेकत. त्यांची माणसे पोटानिमित्ये लस्करात येत त्याची विपत्ये होये. जागा जागा लुटीत. आम्ही आग्रह करून करावें तरी कार्य मोठे. निमित्यास भ्यावे. करार जालियाउपरी त्याची त्रिपत्ये होऊ लागली. मामला निर्गमास पंधरा रोज पाहिजेत. त्यासी परिछिन सांगून पाठविले की कुली गुंता उरकलियावर मग अनाची मोकलीक करून. दुसरे यैसेहि कोणी भये दाखविले की वोडसियाच्या राज्याप्रमाणे करणार. बरकंदाज भिऊ तमाम पळो लागली तेव्हा त्याजलाहि विश्वास पुरेनासा जाला. तेव्हा पलोन गेले. पाठी लागून उंटे, घोडी, हती काही लूट जाली. पळोन अजयागडी कालिजरावर गेले. मग सहजच राहणे जाले. छावणी करावीसी जाली. मग जागा फौजा पथके रवाना करून मुलकास कौल देऊन लावणी करून तहसील चाली लावावीसि केले आहे परंतु पैका मातबर येणे. छेतीस हे व हालीसाल यैसे मिळून कमजादासाठी येणे अमल बसणे. बुधेले तों कालिंजरापासी प्रस्तुत आहेत. प्रस्तुत हतवीर्य जालें. पुढें कैसे करतील ते पाहावे. फिरून पूर्ववतप्रा विल्हेस लावावे या लागी आहेत परतु आमची वासना जाजती करावे. होता होऊन येईल ते करून. शेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

(मोर्तब सुद)

¶*A Letter from Holkar reporting the capture of Jaitpur and giving details of the tactical movements which were in a great measure responsible for the achievement. The scarcity of supplies caused by the very effective blockade left the Bundelas no other course but to surrender. It also refers to the negotiations started by the Rana of Udaipur in behalf of Madhosing.*

No. 19] [*August 1746*

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री राणाजीनी कनीराम अपणापासी पाठविला होता. माधोसिंगाचे राजकारण आपण नेमस्त केले की चोविसाची जागीर त्यासी द्यावी, पंधरा त्याजपासून घ्यावे, येविसी रा रामचंद्रबावास आपण लिहिले होते. त्यासी तर आपल्या केलियाची ममता. स्वामिकार्य बुडाले तरी बुडो परंतु आपला अभिमान सिधीस न्यावा याजमुळे कितेक परियाये की द्रव्य साध्य होणें हे असत्येकरून खरें नाही; ऐसे वारा पाणी करून जैतपूरच्या मुकामीहून आपणास पत्रे लिहिली आहेत. दुसरे ईश्वरसिंगाकडील मामला भारी दर्शऊन लटिकी दिलीकडील

+ पत्र होळकराकडील.

मातबरी उपराळा दाखऊन शेवसी लिहिले असेल तरी राजश्री राणाजींनी आम्हासी करार केला आहे की पंचवीस लक्षाचा माधोसिंगाचा पटा करून द्यावा, वीस नजर घ्यावी, येविसी तिळतुल्य असत्य नाहीं. निसंदेहरूप करार आहे. आणखीहि येक अरथा साधेल तेथवर साधूनच परंतु हा निश्चये इत्यर्थ जालिया उपरी. हाडे व राठोड येक. त्यासी आम्ही सामील जालिया तेव्हा ईश्वरसिंग सहजच सला करून विल्हे लावतील. काडीचा कलह होत नाहीं. जाला तर आपला नफाच आहे. दिलीकडील अनुसंधान तर सर्व अमीर तुम्हासी काडीमात्र दुसरा अर्थ धरीत नाहीत. आपले आज्ञेवरून मनसूरअलीखान व अमीरखान माधोसिंगाचे साहित्यावरच आहेत. येविसी त्यांची पत्रें आम्हांस येतात. ईश्वरसिंगाचे कलहामुळे कोणी अमीर आदिकरून पातशाहा बिघाड करितो येसे नाही हा निश्चये असो द्यावा. बुंदीचा मजकूर गुदस्ता जाला जो करार केला त्याप्रमाणे आपला पैका न आला आणि कलहहि न तुटिला. बुधसिंगाचा पुत्र उमेदसिंग बुंदी प्रांते धामधूम करून कजिया करीत आहे. त्यासी त्याची समजाविस करावी येसे ईश्वरसिंगाचे मानस आहे. येश्यास हेहि राजकारण आपले हाते विल्हे लावलियाने कार्यसिधि चांगलीच होऊन सर्व राजकारण बाज खात्यात; अवघे राजे पदरी पडून द्रव्य साध्य होऊन लोकीक उत्तम होतो. सेवटी आपल्या आपल्यामधे समजोन राजकारणे विल्हे लागतील; परंतु आपले कार्ये ये गोष्टीने साधत नाही यास्तव आपले हाते स्थापित केलिया आपली कार्यसिधी होऊन येईल आण सर्व राजे अंकित होतात. ईश्वरसिंगाची व माधोसिंगाची यथास्थित भाऊपणे स्थापना होती. काडीमात्र नाश होऊ देत नाही हेहि प्रतिज्ञापूर्वकच शेवेसी लिहितो; परंतु इतके होऊन येक रा रामचंद्रबाबाच्या मात्र अभिमानास अंतर पडते त्यामुळे ते तडफड करून अन्योन उपाये करून खरे लटके दर्शऊन लिहितील त्यावर न जावे. केवळ लिहिल्यावरच मदार आहे येसेहि नाही. सर्व परीक्षा स्वामी जाणतात. कोण कैसा वर्तनूक करितो हे सर्व अवगत आहे. शेवसी[+] श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter from Holkar to the Peshwa advising him how greatly beneficial it would be to support Madhosing in his claims. Amirkhan and Mansur Ali being well disposed towards Madhosing, any probable opposition from the Emperor would be eliminated. Moreover the Rana of Udepur on behalf of Madhosing assures the Marathas a sum of twenty lakhs, should they agree to uphold Madhosing's claim to a jagir of twenty-four lakhs.*

+पत्र होळकराकडील.

No. 20] [*16-9-1746*

श्री

श्रीमंत राजश्री बाबा स्वामीचे

शेवेसी

विनंती. सेवक राघो पुरुषोतम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल धर्म स्वामीचा जाणून ताा आश्विन शुध १३ मुा सिरोंज क्षेम असों. यानंतर ये प्रांतीचे राजकी वर्तमान व संस्थानिकांची वर्तनूक सविस्तर मुख्य विनंतीपत्री लिहिले आहे त्याजवरून सेवेसी निवेदन होईल. मुख्य अर्थ हाच की राजे जगतराज बुंधेले करारा प्रो वर्तत नाहीत. राजश्री लक्ष्मणपंतदादा त्याजपासीं जैतपुरी आहेत. अद्यापि येका कामाची वाट जाली नाही. देऊ दिलाऊ यैश्या लबाडीच्या गोष्टी बोलतात. त्याजपासी बसोन काही सार्थकता होतां दिसत नाही. फौजेचे आगमन या प्रांते होईल तेव्हांच पैक्याची वाट व मुलकाची होईल. सर्व प्रकारें पार पाडणार स्वामी समर्थ आहेत. तेथें विस्तारे ल्याहावें यैसे नाही. या उपरी ये प्रांती सालमजकुरी पर्जेन्याचेहि आवर्षण आहे. प्रथम येक दोन पाऊस जाले होते; तेणेकरून खरीफाची धान्ये उतम आली होती. प्रस्तुत दोन मास जाले, केवल उघाड दिल्ही आहे. त्याजमुले धान्य वालून गेली व रबीचे पेरणीसिहि भूमीस वोल नाही. यैसे आसोन ईश्वर उपाये करील ते पाहावे. वर्तमान सेवेसी कलावें यास्तव विज्ञाप्ति लिहिली असे विशेष. पूर्वी आपण कापड करविले होते ते दृष्टीस आवलोकन करून चंदेरीस धोवावयासी आज्ञा केली होती तेणेप्रा चंदेरीस पाठऊन उतम धुऊन, थैले व वेष्टने लाऊन व बैलावर घालून माणसे समागमे दिधली असेत. सेवेसी प्रविष्ट होतील. आठाणे सुमार बीस व पागोटी २ येकूण बावीस सनगे पावालियाचे उतर पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे, व आपल्या म्हसी सुमार १० दाहा आम्हापासी आहेत. रा नारो रघुनाथ याजपासी कालाबागास पोहचावयाची आज्ञा केली होती. प्रस्तुत मानिले देशास गेले. म्हसी उतम चांगल्या सिध आहेत. जेथे ठेवावयाची आज्ञा होईल तेथे पाठविल्या जातील. कालाबागास ठेवाव्या यैसी आज्ञा आसलिया तेथें ग्रहस्त आस्तील त्यास आपले पत्र सादर जालियां प्रविष्ट करून उतर सेवेसी पाठऊं देऊन हे विज्ञापना.

¶*Ragho Purushotam complains to Ramchandra Baba that Jagatraj Bundele is trying to evade compliance with the terms embodied in a certain treaty.*

3518

No. 21] [*1746?*

श्री

आशीर्वाद उपरी. जयापास व रामचंद्रबावास निरोप जाला. शेवटी दोघाच्या कानी बोलले की तुम्ही याचेठाई यथास्थित वृतीने राहावे व यानी तुमचेठाई योग्य वृतीने राहावे उचित असे. निरोप घेऊन गेल्यानंतर सखारामपंत, भाऊ, आम्ही, दादा, बाबा, नाना इतकेच होतों. नाना दादासी बोलले कीं, बादज खैर की ऐसे म्हटल्यानंतर खैरच आहें. तदनंतर सखाराम बोलले की दादा चांगला माजे गल्याइतका निवाला. बाबा बोलले की गला न निघावयाच्या औषधा आम्ही रदबदली करितों, परतु मसकरी खालीच जातें. नाना बोलले की बाबा फारचसी मसकरी करू लागल. ऐसे म्हटल्यानंतर बाबा बोलले कीं आपण मसकरीखालीच घालतात. आम्ही खरी म्हणूनच सागतों. ऐसे म्हटल्यानंतर दादासी नाना बोलले की च्यार गोष्टी बाबा खडसून बोलानात. ऐसे म्हटल्यानंतर दादा उगेच होते. भाव काय की दोघासहि समजत आसता येकाने मसकरी, येकाने खडसून बोलावेसा भा(व) ते दिवसी दिसून आला. तुम्हास कलावे. हा आसीर्वाद.

¶*This is a personal letter reporting the reconciliation of Jayappa and Ramchandra Bawa and their departure for Northern India.*

No. 22] [*24-1-1747?*

श्री

राजश्री मल्हारजी होळकर सुभेदार

व राजश्री जयाजी आपा सिंदे गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो विठल सिवदेव आसीर्वाद विनंती उपर. येथील वर्तमान तागाईत छ २३ मोहरमपरियेत येथास्तित जाणून स्वकीये कुशल वृत लिहीत गेले पाहिजे. यानंतर का आंत्रीस सवा महिनापरियेत मोर्चे लाविले. त्यास २१ मोहरमी सुरंग लाऊन गढीचे बुरूज उडविले. छ २२ रोजी गढी फते जाली. नरवरची मामालियेत आद्यापि विल्हेस लागली नाही. त्यांजकडील वकील आपणाकडे आले आसतील त्यांची मामलियेत आपल्या विचारास येईल त्याजप्रमाणे विल्हेस लावावी आणि आम्हास लेहून पाठवावें त्याप्रा येथे विल्हेस लागेल. सिकरवार तावरधार इकडील मामला होणे. त्यास इकडेच

---

१ पत्र बहुधा नानासाहेब पेशव्याचा भाऊ जनार्दनपंत यांचें पुरंदऱ्यास असावें.

दिसगत लागली. हंगामसीर त्या प्रांतास गेले पाहिजे. नरवर विल्हेस लागलि-यावांचून त्याजकडे जावे तर बनत नाहीं याजकरिता सेवेसी बाबूराऊ नरसिंह पाठविले आहेत. याजबाा उतर येईल आणि आम्हास आपली आज्ञा येईल त्याजप्रमाणें वर्तणूक करून कलले पाहिजे. लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Vithal Shivdev asks for instructions from Jayapa Sindia and Malharrao Holkar regarding Narawar and other places in Malwa.*

No. 23] [*22-1-1747?*

श्री

श्रीमंत् राजश्री बावा स्वामीचे
सेवेसी

पोष्ये विठल सिवदेव कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुषल लेखनाआज्ञा केली पाहिजे विशेष. येथील वर्तमान तरी छ २१ मोहरमी कसबे आतरीची गडी फते जाली. निशाण चढविले. गढी मातबर. तीन परीघ. त्यात माणूस जो होता तो राजावर्त राज्याच्या घऱ्याणातील. . हला जाली ते दिवसी त्यानी आपली इजत चांगली राखून घेतली. निदान सोसेना यैसे जाणून सलूख केला. सारांश खावंदाचे पुण्य दुर्धर यामुलें येश आलें. पुढे नरवरकर बाजात दुसाला सवा लाख देऊ वैसा दुराग्रह की साल तिगस्ता आमचा दाड जाला. मामलत आपण केली नाही. जैसा राणा व सिहारीया व (?) व बारई (?) याजवरी दाड केला त्याप्राा आम्हावरहि दाड जाला. लोकापासून सालमजकुरी काये घेतले आणि आम्हावरी दाडाचा दुराग्रह माडला आहे. बरे तुम्ही तो यैकत नाही तरीं आम्ही श्रीमत रा बावाचे सेवसी जाऊ. तेथे त्याचे वकील आले आसतील. स्वामीनी तेथे विल्हे लाविले म्हणजे उतमच जाले. नरवरचा निर्गम जाल्याखेरीज तुवरधरेंत जातां येत नाही. येविसी आज्ञा कर्तव्य ते करावी. लस्करचा कुचामुकामाचा स्वारीचा रोख ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी बाबूराऊ नरसी पाठविले आहेत हे विनंती करणे तें करितिल. सेवेसी विदित जाले पाहिजे हे विज्ञप्ती.

¶*Vithal Shivdev announces the fall of Antri and asks for instructions regarding the course to be adopted towards the Chief of Narwar.*

No. 24] [16-2-1747

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री बाबा स्वामीचे
सेवेसी

पोष्य लक्षमण नारायेण साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील वर्तमान छ १७ सफरपरियेंत स्वामीच्या कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों ते कछवाहधरेत गोपालपुरास आलों. सात आठ दिवस मुकाम तेथे केला. मातबर कछवाह चौव पाचजण होते त्याच्या मात्र करार करून कबुलायती घेतल्या आहेत. वरकड घेणे राहिल्या आहेत त्याहि स्वामीच्या प्रतापे करून होतील, परंतु वसूल, विना राजश्री नारोपंत आल्याखेरीज होत नाही. त्यासहि पत्रे लिहिलीच आहेत की सत्वर येणें दुरखूर (?) व ठहरोलीचे काम पडिले आहे. तिकडे इजतखां व रा। चिमणाजीपंत यासी पाठविले आहेत. तो निर्गम जालियाउपर इकडे येतील. लवकरीच येतील. भदावरचे कामकाज होते याजमुले राज्याची पत्र लस्करांत आसता येक दोन आली होती व आलीकडे आलियाउपरहि आली कीं लवकर येणे. त्याजवरून यावे लागले. आठा चौ दिवसांत येथील कामकाज जालियाउपर मागती तिकडे जाऊ. सेवेसी कलावे म्हणून लिहिले आसे. राजा मलजीस फालगुण शुध १० सोमवारीं देवआज्ञा जाली म्हणून वर्तमान आले आहे. स्वामीकडेहि वर्तमान आलेच आसेल. मलजी चांगला मोहरा होता. ईश्वरास जे गोस्ट मानली ते खरी. सेवसी कलावे म्हणून लिहिले आसे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Laxman Narayan to Ramchandra Baba saying that he has proceeded to Kachhvadhar and secured promises of payment and requesting the addressee to depute Naropant to collect the dues at once. The writer further refers to the death of Raja Malji (Divan of Ishwarsing) which took place on 9th February 1747.*

No. 25] [17-12-1747

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे
सेवेसी

विनंती. सेवक गोविंद बलाळ कृतानेक सां। नमस्कार विनंती. ता। मार्गसीर वद्य पंचमीपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे विशेष.

गुलाबसिंग या प्रांती फौजेनसी आला. त्याजला तमाम जमीदार जाऊन मिळाले. मोठीसी फिसाद केली. तें वर्तमान पेशजींचे पत्रीं स्वामीस लिहिलेंच आहे त्याजवरून विदित जालेंच आसेल. हलीं वर्तमान गुलाबसिंग इंदूरखीस होता. त्यासी आम्हासी थोडेंसे जुजहि जालें. घोडी माणसे आम्हाकडील पडलीं. गुलाबसिंग इंदूरखी धरून राहिला. त्याजला कोंडून आसपास कोशाचे तफावतीने पंधरा रोज मुकाम करून आम्ही राहिलो तो राजश्री नारो शंकर रो इंद्रोजी कदम व रो लक्ष्मण शंकर रा दादो माहादेव व मीरखान राणोजी जगदले हे सर्व येऊन पोंहचले. येकत्र होऊन कूच केले. इंदूरखीपासून पाऊण कोश सिंद नदीवर जाऊन मुकाम करून राहिलो. गुलाबसिंगाकडील स्वार पुढें इंदूरखी सोडून थोडसे आले होते. पुढें हरोलीस दादोपंत होते त्यासी थोडेसे जुज जाले. दादोपंताकडील घोडीं माणसें पडलीं. गुलाबसिंगाकडील माणसें पडलीं. दुसरे दिवसी गुलाबसिंगानें वकिलीस मनसाराम पुरोहित पाठविला. सलूक केला. सर्वांसी भेट जाली. लक्ष्मणपंत, दादोपंत कूच करून कालपीस गेले. गुलाबसिंग समागमे घेऊन आम्ही व नारोपंत लायेरस येऊन मोर्चे लाविले. सवाईवर मोर्चे पोंहचले. पाचा साता रोजानी हे गढी घेऊन आम्ही आपले तालुकियाकडे जाऊ. नारोपंत इकडे राहतील. आपले कामकाज करितलि. आहे वर्तमान ते सेवेसी लिहिले आहे. जे वर्तमान होत जाईल ते वरचेवर लिहीत जाऊन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govind Ballal to Bhausaheb describing his success in a skirmish with Gulabsing at Indrukhi.*

No. 26] [*7-1-1747*

श्री

+विनंती उपरी. ईश्वरसिंग माधवसिंग याचे मजकुराचे उतर उदासीनता दाखऊन निराली टाकून लिहिले. ऐशियास तुम्ही या प्रकारे ल्याहावे ऐसे नाही. ज्यात अती दुर्निमित्य नाही वर घरकलह वृध न होये ऐसे हरप्रकारे करणे अखेर तुम्हासच पडेल. राणाजीहि तुमचे व तेहि तुमचे. विचारे करून तुम्ही तोडमोड दबावाने केलियाने होईल ऐसे दिसते. छ ६ मोहरम हे विनंती.

¶*The Peshwa suggests how the mutual differences between the Rajputs may be amicably adjusted.*

+ चिठी नानासाहेबाची.

No. 27] [11-2-1746

पौ छ १० जमादिलोवल

श्री

श्रीकृष्ण

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री बाळाजी बाजीराऊ प्रधान यांसी. श्रीविश्वेश्वरनगरीहून नारायेण दीक्षित कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील क्षेम ता। फाल्गुण सुध २ परियंत श्रीक्षेत्रीं समस्त सुखरूप जाणून स्वकीये लिहीत असिले पाहिजे. यानंतर आम्ही येंदा श्रीप्रयागास गेलो होतो. काहीं अनुष्ठान व ब्राह्मणसंतर्पण करणे होते यास्तव पूर्वीच राजश्री यादवराव प्रल्हाद यांसी लिहिलें होते त्यावरून त्याणी मीरजा महमद इसाक मीरबाबर याची माणसे व दस्तक मार्गींचे पाठविले. मग आम्ही स्वार जाहालो. समागमे श्रीचे दाहा सहस्त्र मनुष्य आले. तमाम माघ मास मकरस्नाने जाली. देशचीहि यात्रा बहुत आली. मीरझा महमद इसाक याणी आमचा सन्मान उतम प्रकारें केला. बिऱ्हाडास येऊन भेटला. सेवेत बहुत तत्पर राहून सर्व यात्रेचें संरक्षण उतम प्रकारें केलें. प्रयागवळाचा व आणखी कोणाचा उपद्रव लागो न दिल्हा. आम्ही सांगितले त्याप्रमाणे वर्तणूक केली. आम्हास बहुत राजी ठेविले. यैसियासी आपण येक पत्र थैली नवाब आमीरखाजीस पाठवणे कीं दीक्षित यात्रेसह प्रयागास गेले होते. मीरबाबराने बहुत राजी * * * * त्यावरून आम्ही समाधान मानि * * * * * सिष्टाचाराचें पत्र थैलीसमेत पाठविजे व दुसरे येक पत्र मिरजा महमद इसाक यांसी आपण समाधानाचें ल्याहावें कीं, दीक्षित राजी आहेत तेणेकरून आम्ही संतोषी आहो. याप्रमाणे पत्रें अगत्य पाठविजे. रघुराम नामे वकील तुम्हाकडून बंगालियास जावयास आले ते प्रयागास आले. त्याणी येथे लबाडी बहुत केली. प्रयागवळास व यात्रकरास ध्यानास लाऊन दक्षणा चुकवितों म्हणून दुकान माजिवला. बाबुराऊ नामे बापूजी श्रीपतीकडील फडनीस यात्रेस आले ते व हे मिळोन यात्रेकराजवळून चितास येईल ते रुा घेतले. सेवटीं प्रयागवळाचीहि समजाविश न निघाली. रघूरामजीने यैवज मुबदला प्रयागवळाचे रुा भक्षिले. मीर बाबराने यात्रा उतरून कासीस वाटे लाविली, परंतु मागें प्रयागवळाचा राडा पडला. रडतात, डोई फोडितात, या प्रकारचे वर्तमान आहे. तुम्हासहि परस्परें कळेल. बहुत काय लिहिणे? कृपा असो दीजे.

¶Narayan Dikshit Patankar informs the Peshwa of his (the writer's) having performed the pilgrimage of Prayag with a following of ten thousand. The whole affair was satisfactorily arranged by Mir Babar, probably the police officer of the place. The letter is interesting in that it shows how anxious the Peshwa was for the safety of Hindu pilgrims to these holy places.

No. 28] [3-2-1747

श्री

श्रीमत् राजश्री बाबा
स्वामीचे सेवेसी

पोष्य अमृतराव शंकर दिनकरराऊ साष्टांग दंडवत् विनंती उपरी. येथील कुशल फाल्गुन शुध पंचमी भो(म)वार मुकाम लस्कर स्वामीचे कृपेकरून येथा(स्थित) (असो) विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहा(लो). (लस्क)रात माघ शुध पंचमीस पावलो. खावंदाचे आज्ञेप्रमाणे सरदारास सांगितले. त्यास माधोसिंग व ईश्वरसिंग याजकडील मनसबियाचा घोर मोठासा पडला होता. त्यास तिकडील कार्यानिमित्य राजश्री रामचंद्रबावाचे व राजश्री मल्हारबावाचे मनोधारण करणे लागले. बहुता प्रकारे स्तव करून मरजी ठिकाणास आलियावरी येथेच सिधांत होणे तो जाहाला. तो विस्तार सरदाराही आपणांस लिहिलाच असेल. मुख्य गोष्ट (अपूर्ण)—

¶*Amritrao Shankar informs Janardanbaba Fadnis how matters regarding the Rajputs had been adjusted.*

No. 29] [Recd. 25-4-1748

छ ७ जमादिलौवल

श्री

पुा तीर्थरूप राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती. दिलीकडील दुसरी पत्रें बरानपुरास तेरावे रविलाखरीं आली. खबर दुणावली. वजीर व याजकडील तोफखानियाने खासा पठाण मेला. नवाबानी नजरन्याज[1] केली, याप्राा लिहिले आले. तीर्थरूप जाऊन पोहचले नाहीत. पुढे येईल वर्तमान ते लेहून पाठऊ म्हणून लिहिले ते कलो आले. सारांष सार्वभोमाची फते जाहाली. थोर गोष्ट जाहली. गोविंदराव याजकडील मजकुराविसी तीर्थरूपाची पत्रे आली, त्यावरून गोविंदराव यास पत्र पाठविले. अत:पर त्याचे कार्य तेथे नाही. तोंडची वाफ गमाऊ नये. त्याणी यावे यैसे आहे म्हणून आपण साद्यंत वर्तमान लिहिले ते कलले. आपण गोविंदराव यास लेहून पाठविले.

१ देणगी, नजर.

युक्तच केलें. तीर्थरूपाचे लिहिल्यावरून मनसब्याच्या वाटेने पाहता विचार स्वामीनी ध्यानात आणला तो प्रमाणच आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer, probably Nana Purandare, writes from Satara to the Bhau at Poona news of the defeat of the Abdali by the artillery of the Emperor, as received at Satara. This happened before the Peshwa could reinforce the Emperor.*

No. 30] [*11-5-1748*

छ २२ जावल

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना कीं श्रीमंताकडून या दिवसांत कांहीं पत्र आले नाही. तथाप नवाबाचेथे वर्तमान बातमीचे येत असतें. कासीद जुबानी व आजम आनवर-खानजीहि सांगत होते कीं, श्रीमंत जयेनगर प्रांतीच आहेत. माधवसिंग वगैरे संपूर्ण येऊन भेटले फौज मातबर जाली आहे. ईश्वरसिंग पठाणाचे जुंजातून पळून आला तो जयेनगरात दडून बसिला आहे. आजपावेतो फौजेच्यायोगें मुलुकाची खराबी होणार ते जाली. केसोदास राज्यामळाचा पुत्र श्रीमंताकडे आला आहे. इकडूनहि दोघे भले मनुष्य जयेनगरास गेले. हे पनास मागतात ते पंचवीस कबूल करितात. निमेनिम राज्य माधवसिंगास वांटून द्यावे आसी बोली लागली आहे. पाहावे तेथील कार्यभागाचा निकाल कसकसा होईल. ईश्वरकृपेने सार्वभौमाकडूनहि श्रीमंतावर विशिष्ट कृपा आहे. ईश्वरसिंगावर पादशाहा इतराज की याच्या भरवासियावर पादशाहजादा पाठविला आणि हा यैन लडाईतून पळून गेला म्हणून इतराजी जाली आहे. प्रस्तुत बखतसिंग हजूर दिलीस आहे. त्याणी याजविषई आर्ज विनंती करून बहुमानार्थ वस्त्रे घोडा पाठवावयास केला आहे. तथाप पादशाहाचा आग्रह कीं याणी जयेनगरीं न राहतां आलीमाहमद रोहिल्यावर मोहिमेस जावे आसी हजूरची ताकीद आहे. ईश्वरसिंगास गतवर्षी गर्व विशिष्ट जाहाला होता. तसाच येंदा त्याच्या शतगुणें परिहार जाला. पादशाहापासीं प्रतिष्टा राहिली नाहीं. युध्यातून पळाला म्हणून लौकीक फटकाळ जाला. पुढें श्रीमंतासी विनीत होऊन सुरळीत वर्तावें लागलें. हा सर्व पुण्यप्रताप श्रीमंताचा आहे. जो यांसी प्रतिकूळ जाला त्याजवर ईश्वरी क्षोभ या प्रकारींचा जाला. सरकारचे खिदमतगार दोघे व कासीद दोघे श्रीमंताकडे स्वामीपासून

रवाना जाले होते त्यापैकी येक खिदमतगार औरंगाबादेपलीकडे दुखण्या पडला. राणू खिदमतगार व दोघे कासीद येथून पुढें गेले. सेवेसी विदित व्हावें. कृपा विशिष्ट असावी हे विज्ञापना.

¶*News-letter to Bhausaheb from Hyderabad giving a report of events in the North. The Peshwa, according to the letter, is encamped at Jainagar with a view to reconciling Ishwarsing and his rival Madhosing. The Peshwa desires Ishwarsing to recognise Madhosing's claim to half the state and to agree to a tribute of fifty lacs. Ishwarsing has forfeited the sympathy even of the Emperor owing to his cowardly action in leaving the field precipitately when fighting the Abdali.*

No. 31] [*9-7-1748?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २३ रजब मुकाम भदोरे प्राा खुटावद जाणून स्वामींचे कृपादृष्टीकरून सुखरूप आसों. यानंतर जासुदासमागमे पत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं हानवार व अमरालेविसी आज्ञा. त्याजवरून दलेलसिंग यासी बोलाऊन आणून ताकीद केली. त्याणे सांगितले कीं आपणापासून खर्च राा आंताजी माणकेस्वर याणी घेऊन आमराळचे ठाणे माझे स्वाधीन केले. यैसे आसोन आपण ताकीद करितात तर ते महिनाभर येतील. हिसेब मनास आणून त्यांचे स्वाधीन करीन याजप्राा ठरावले आहे. हानवारच्या चोपदाराविसी लिहिलें. त्यास चौदा हजार रुापैकी निमे सात हजार रुाचा पटा आहे त्याजप्राा देतात. त्यांतहि पांचसे रुा त्यास दिल्हे. जाजती घेत नाहीं. पूर्वी नरवरकराकडे त्याचा गाव परोटी होती ते सांप्रत सुटली. त्यांचा अमलमात्र रुा घेतला. त्यासिवाये त्यांस उपसर्ग लागत नाही. त्याचा हरयेकविसी गौर करीतच आहों. प्रस्तुत भदोरेवाले सिसोदे यानी राा गोविंद सामराज याजकडील कमाविसदारासी बदमा(म)ली करून ठाणे घेतले. येक दोन माणसे मारली; सबब कमाविसदार पुढे येऊन येथे घेऊन आले. तूर्त शहास गुंतलो. स्वामीच्या पुणेकरून कार्य करून सेवेसी येतो. विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdeo reports his doings to the Peshwa from Bundelkhand.*

3526

No. 32] [9-7-1748

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री गोविंदराऊ राम स्वामी
गोसावी यासी

सेवक विठल सिवदेऊ सा। नमस्कार विनंती उपर. श्रीमंत राजश्री पंत प्रधान यानी तुम्हावर वरात दिल्ही. रुपये ४५७०० पंचेतालीस हजार सातसे याची वरात तुम्हास दिल्ही. वरात बमोजीब रुपये ता। भिकाजी महिपतराऊ कारकून याचे पदरी घातले ते आपण भरून पावलो. ता।

२५७०० पैठणी रोख दिल्हे

२०००० हुंड्या पुण्याच्या मारफत लक्षुमण नाईक चाबूकस्वार

१०००० गोपाल केश (व)

१०००० रामाजी नाईक भिडे

२००००

४५७००

सदरहू पंचेतालीस हजार सातसे भरून पावलो. हे कबज लेहून दिल्हे सही. शके १६७० विभवनाम सवछर आशाढ वद्य १० तरीख छ २३ रजब.

¶*Vithal Shivdeo acknowledges the receipt of a sum of Rs. 45,700 from Govindrao Ram.*

No. 33] [1748?

श्री

सेवसी विनंती उपरी. आजी चिरंजीव साबाजी सिंदे यांची रवानगी न जाहाली. उदईक होईल. त्या लस्करे आटोपणार नाही, यास्तव उद्याचा मुकाम ती चौ कोसाचा केला पाहिजे. लस्करे नालशास गेले तरी हे पोहोचत नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापि.

¶*This is probably Jayappa Sindia's letter to the Peshwa imploring the latter not to make a forced march to Nalchha.*

No. 34] [1748?

विले की हरिपंतासी कजिया करिता; राजश्री जयाजी सिंदे याजकडे न गेलेत. यैसियासी ये वर्षी हरिपंतानी कृतोपकार केला तो विस्तार सेवेसी काये लिहावा? ते गगराडच्या गढीच्या आसऱ्यास जाऊन राहिल्यावर आम्ही कूच करून मजल दरमजल आज्ञेप्रमाणे बुंधेलखंड प्रांतास आलो. हे सविस्तर वर्तमान कन्हेरागड या मुकामीहून सेवसी विनंतीपत्री लिहीले आहे त्याजवरोन श्रुत जाले आसल. साप्रत स्वामीच्या प्रतापेकरून राजश्री रामचंद्रबावा यासमागमे जाटाच्या प्रांतास आलो. जाटाचा बंदोबस्त जाला. मथुरा वृंद्रावन यात्रा करून मावारे चमेल उतरून कुवार नदीवर आलो. पुढे मजल दरमजल देशास येतो. आमचा विचार तर कुली दरोबस्त मामलतीचा बखेडा हरिपंतानी बासवाडा वगैरा केला. येक पैसा हातास आला नाही. जागा जागा आमल बंद केला. आम्ही या प्रांतास आलियावर मागे हरिपंत बापनावरी येऊन राहिले. तेव्हडे ठिकाण पागा व मुले माणसे ठेवावयास जागा होती तेहि त्याणी आटोपली. याउपर कोठे विसावा घ्यावयास ठिकाण नाही. कोणता विचार करावा? स्वारी खर्चेचे कर्ज जाले, नित्य खर्चाची आबाल, मागील देणेदाराचे तगादे. देशास यावयास (अपूर्ण)

श्री
भवानी शंकरचरण * *
* * * * आनंदराव
सुत यशवंतराव पवार
निरंतर शके १७९२+

¶*Yashvantrao Pawar informs the Peshwa that the Jat has been humbled and that the writer was proceeding to the Deccan by regular marches.*

No. 35] [1748?

श्री

राजश्री माहांदाजीपंत बाबा गोसावी

यासी

ℰ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो मलारजी होळकर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीयें कुशल लिहीत असावें विशेष. बहुत दिवस जाले. पत्र येत नाही. तरी यैसे न करावे. सदैव कुशलार्थ लिहून संतोशावृधी होये ते करावे. इकडील वृत श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी लिहिले आहे त्यावरून कळू येईल. सारौश गोस्टी की आम्ही या प्रांतास आलिया दोन मास जाले. आपल्याकडून अंतर होऊ दिल्हे नाही, परंतु राजे ईस्वरसिंग

(शिक्का)

+ हा संवत आहे.

याची बुधि क्षणभंगूर. सख्ये करून कराराप्रमाणे निर्गम करून द्यावा यैसे नाही. फौज जमा करून बाहेर निघून युधप्रसंग करणार. त्याजकडूनच उदेग आरंभ आहे. खावंदाच्या प्रतापेकरून त्यांचा गर्वपरिहार करून कार्य करून घेतले जाईल. फिकीर नाही. सदैव कृपा करणार आपण समर्थ आहेत. लोभाची वृधि करावी हे विनंती

मोर्तब
सुद.

¶*Malharrao Holkar to Mahadoba Purandare informing him of the hostile attitude of Ishwarsingh.*

No. 36] [*1748?*

श्री

सेवेसी विनंती.

मालवीवाण्याकडील पाऊणसे रुा येणे ते माहादसेट यांणी येथे द्यावयाविसी आम्हास सागितले असतां मोरसेट देत नाही तरी आपण माहादसेट पासून ध्यावे. याचा वादी सराफ नासीककर याणे श्रीमंताजवल सांगितले की माझे रुपयाची चौथाई कमाविसदारानी घेतली आणि मालवीयाचे सा हजार रुा त्याची चौथाई न घेता त्याचे जामीनकतबे रामाजी बावानी देविले त्याजवरून श्रीमंत भाऊसाहेबी रामाजी कासी यांस सागोन आम्हास विचारविले. आम्ही सांगितले की वनसेटकडे इनसाफ सागितला. त्याची दोवाचा करून हुजूर विनंती केली त्याजवरून जामीनकतबे पुण्याहून द्यावयाविसी विनंती करून पत्र घेऊन

आपाजी कानदेव आज उभाउभी भेटले. मेहकर वगैरे गावास अंताजी माणकेश्वर याचे कारकून मुजाहीम होतात तरी त्यास पत्र द्यावे म्हणोन बोलिले. त्यास आम्ही साफ सांगितले की बाबानी सांगितले की जागीरदाराचा करार मदार करून पत्र घेणे, यैसे असतां अद्याप न घेतले तरी गावचा कारभार सोडून देणे. दरबारी आमचा बोभाट होईल तो कामास येणार नाही. त्यास आज उद्या काये विचार आपाजीपंताचे मते होईल तो लेहून पाठऊन.

तीर्थस्वरूप काकाचे राउताची हाजिरी मात्र काल जाली. वरकड काही नाहीं. चिरंजीव कृष्णोबा व शंकरोबा आज उद्या जातील.

दिल्हे. चौथाई आम्हास काये ठावकी म्हणौन बोलिलो. होईल ते मागाहून लेहून पाठऊन.

कुलाबातर्फेस धामधूम आहे तीच आहे. निवल जाले नाही. अंताजी माणकेश्वर यास अद्याप निरोप दिल्हा नाही.

पुण्याहून पत्रे आली ती सेवेसी पाठविली आहेत. त्याजवरून सर्व कलेल.

बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

दिनकरपंताबाा फौज देऊन तुलाजी आंगरे याजकडे राा करितात दो चौ दिवसी जातील.

कृष्णावत घोडी सबर आम्हाबरोबर होती त्यास श्रीमत् त्रिंबकास जातात. उन्हाले दिवस खराब होईल याजकरिता पुण्यास घोडी पाठविली.

¶*News-letter from Satara mentioning several items under discussion, one of which was the account of moneys due from the province of Malwa.*

No. 37] [*25-1-1749* ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री (कोरी जागा)

पोष्य रामचंद्र मल्हार नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत आसले पाहिजे विशेष. राजश्री पांडुरगपंत पुरंधरे यांस प्रांत नरवर येथील कमाविस घासदाणा व नजरेची सालगुदस्तां श्रीमंतानी सांगितली आहे. मारनिले प्राा मजकुरी गेले परंतु फौजेचा शह पोहचला नाहीं. याकरितां रुपया वसुलांत आला नाहीं व साल मजकुरींहि काही दिल्हे नाहीं. श्रीमंतानीहि याविशीं आज्ञा केलीच आहे कीं त्या प्रांते गेलियावरी प्राा मजकुरास शह पोहचाऊन त्याचा अमल चाले तें करणें. येविशी राजश्री मल्हारबा यास पत्र लिहिले आहे तरी तुमचे आगोधर जाणे नरवर प्रांते जाहालें तरी मारनिले तुम्हाकडे येतील, वर्तमान सांगतील, ते मनास आणून नरवरकरास उतमप्रकारें शह पोहचे आणि याचा दुसाला पैका वसूल होये तें करावें. आम्हीहि लौकरीच येतो. अत:पर आमच्या येण्यास विलंब नाही. तुमचे अगोधर त्या प्रांते आगमन होईल म्हणून लिहिले असे (पुढें कोरी जागा)

¶*Ramchandra Malhar asks some Sardars in Bundelkhand at once to proceed to Narwar and succour Pandurangpant Purandare who had been ordered by the Peshwa to collect the tribute from that place.*

No. 38] [25-1-1749 ?

श्री

श्रीमंत राजश्री बावा[1] स्वामीचे सेवेसी

पोष्य पांडरंग सिवदेऊ[2] मुकाम नरवर सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा माघ वद्य त्रितीया जाणऊन स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर स्वामीची फौज जे समई लटेरीवरून गेली ते वेलेस आम्ही येथून स्वार होऊन आपनाकडे येत होतों. चंदेरीपावेतो आलों तों आपली स्वारी त्वरेणे कूच दरकूच धामनीवरून तेजगडावर गेली. आमची गांठ न पडली. मग वर्तमान यैकिले की राजश्री बकसीरामजी वकील लस्करातून आपला निरोप घेऊन फिरले ते शाहाबादेस आले. हे वर्तमान यैकून स्वामीकडे पत्रे देऊन जासुदाची रवाना केली. त्यास जासूद धामनीपावेतो आले. तेथून मार्ग पुढे चालेना म्हणून फिरून आम्हाकडे आले. ते पत्रे हाली बजिनस लाखोटे पाठविले आहेत. त्यांत सविस्तर वर्तमान लिहीले आहे त्याजवरून नरवरकराचे वर्तमान कलल. त्यास राजश्री बकसीरामजीहि मागती कागदपत्र यांसी पाठविले होते परंतु हे ग्रहस्तपने विलेस लावीत नाहीत. त्यास आम्हास तों स्वामीच्या आगमनाचा निजध्यास श्रावणमासापासून होता की आपण येऊन आमच्या चितानरूप नरवरकराचे पारपत्य करून सरकारचा मामला उगवितील हा भरवसा पूर्ण धरून इतके दिवस बसलों होतों. त्यास आता तों आपले लस्कर बुंदेलखंडात गेली. आता आशा खुटलीसी जाली. त्यास पुढे आम्हास काये आज्ञा ते उतर त्याहावे. तदुनसार वर्तणूक करूं. उतराची मार्गप्रतीक्ष्या करीत बैसले आहोत. हे तो विना फौजेवेगले काही यैकत नाहीत. जरीकरिता आपले येणे जवलपास होते तर आपनास पनास हाजार रुपयेपावेतो नजरहि देते आणि सरकारची मामलियेतहि चुकविते. त्यास आपले येणे दतिया ग्वालेर प्रांती होईल तर उतम आहे. श्रीमंत राजश्री बाबास[3] पत्रे आम्ही उजेनीच्या मुकामीहून लिहिली होती त्यांचे उतर आले कीं तुम्हाविसी आम्ही राजश्री बावास लिहिले आहे आण समक्षहि सांगितले आहे. ते कार्य करतील. तुम्ही काही चिंता न करणे यैसे लिहीले आहे. बहुत काये लिहिणे. फार त्याहावे तर आम्ही सेवक पदरचे आसो. लोभाची वृधी करीत आसावे हे विनंती.

¶*Pandurang Shivdev Purandare to Ramchandra Bawa (?) reporting the situation in Bundelkhand.*

---

१ रामचंद्रबावा ? २ पुरंदरे ? ३ महादोबा पुरंदरे ?

No. 39] [28-1-1749

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। छ १९ माहे सफर मुकाम हांडे नरमदातीरपर्येत श्वामीचे कृपेकरून येथास्तित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालियास गंगातीरी चादारी प्रा। नासिक येथे पंधरा दिवस राहिलो. तेथील कार्ये केले आणि लोकाचा मार्ग पाहिला. कितेक लोक न आले. दिमत व निसबतपर्येत आडीच हजार पर्येत फौज जमा जाली. मग दरकूच चालिलो. खानदेशात आलियांवर चारसेपर्येत आले. येकूण तीन हजार फौज जमा जाली. हजार स्वाराची पतके आद्याप आली नाहीत. मार्गी येत असतील परंतु तेथून शोध मनास आणावा. पतके येणेप्रा। मागे आहेत.

कानडे प्रांतीचे

३० तुळजोजी घाटगे १०० पैकी आले ७० बाकी फाजीलशा सुधा
७९ जिवाजी थोरात
४० आनदोजी थोरात
१०० माहादजी सितोले
७० सदासिव चिंतामण

आलीकडील पतके

१९९ काकडे जदीद व कदीम
२९० रामचेंद्र कृष्णराऊ
१२० जिवाजी गायेकवाड १९० पैकी येथे आले ३० बाकी
९० भगवंतराऊ माने
९० भगवंतराऊ भोसले
२९ सताजी देवकाते
२० सताजी सर *
१० आनंदराऊ धुमाल
१० माहादजी थोरात
२९ विठोजी घुले ९० पैकी २९ बाकी येणे देखील खास

७१९

—येकूण दाहासे तीस येणे. बहुतेक राजश्री रामचेंद्रपंतासमागमे येतील परंतु स्वामीनी शोध करावा. राजश्री मल्हारबा आजमेरीस आहेत. राजश्री जायाजी सिंदे व राजश्री बाबा येसे बुधेलखंडात जाऊन तेजगडवाले यानी हटे वगैरे प्रांती गोविंदपंताच्या जिल्ह्यात धामधूम केली होती. याकरिता फौज दरकूच जाऊन तेज

मारून ठाणे बसविले. लोक फार पडले. मानाजी पायेगुडे याचा पुत्र लाळजी पडला आणि पंचवीस तीस आसामी मातबर पडली परंतु चढे घोडे जागा घेऊन ठाणे बसऊन दतियाच्या रोखे येणार ऐसे वर्तमान आहे. आम्ही सिऊर येथे येक दोन मुकाम लोकासाठी करून दरकूच जाऊ. हे विज्ञप्ति.

¶*Vithal Shivdev to the Peshwa giving the strength of his army which he mobilised with great difficulty while proceeding to the North from Nasik. Further the writer describes a successful encounter of the combined forces of Sindia and Holkar in Bundelkhand.*

No. 40] [*29-1-1749?*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवा

विनंती. सेवक गोविंद बलाल कृतानेक सा। नमस्कार विनंती. ता। माघ वद्य ७ मु॥ तेजगड येथे स्वामींचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे. यानंतर या प्रांतीचे वर्तमान तर आम्ही कोंच कनार प्रांते गेलो होतो. तो धामोणी प्रांतातील जमीदार याणी धूम अतिशये केली. गाव जालिले. खंडणी घेतली. लुटिले. त्याजवर आम्ही दर मजलीनी आलो. उभयेता राजे यास वर्तमान कळलियावर तेहि आले. त्याजवर त्याची आमची भेट मल्हारियावर जाली. उभयेता समागमे आलो आम्ही सडे धावने आलो. तो ते पलोन तेजगड प्रांते सर्व फौज पर्वतात आले. त्याचे मागे मागे आम्ही आलो. त्याचे आमचे जूज जाले. ते सर्व तेजगडी जमा जाले, हे वर्तमान रा। जया(पा) सिंदे व रा। रामचंद्रबावास लिहिले, त्याजवरून ते उजनीस होते. तेथून बारा बारा कोसाची मजली करून येऊन पावले. तेजगडास मोरचे दिल्हे. आठ रोज जूज जाले. गाव जेर जाला. येका दोन रोजात फडशा होईल. रा। मल्हार होळकर सुभेदार अजमेरीकडे आहेत. वरकड वर्तमान आहे तेच आहे. वरचेवर सेवेसी लिहीत जाईन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govind Ballal to Bhausaheb writing from Tejgad (in Kunch) to inform the addressee of the Bundela Zamindars who opposed him at Tejgad. Jayappa Sindia is reported to have marched immediately to help the writer. This paper describes a hitherto unknown campaign, while Malharrao Holkar was at Ajmere. Ramchandra Baba was in the North at this time.*

No. 41] [4-3-1749

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान स्वामीच्या कृपावलोकेकडून ताा छ २९ रबिलोवल मुाा सालबाई पाा पवावा (?) सेवकाचे वृत येथास्थित असे * * * * * व राा नारो शंकर याची फौज मिलोन सिकरी सुसारच्या गढ्या सर करून वरकड तिकडील कछवाधार वगैरे बंदोबस्त करून अखेर पौष्य मासी ग्वालेरीस आलो तो सोंधेकर जमीदारानी लबाडी केली. सबब त्याचा तालुका होता तेथे * * वगैरे गढ्या होत्या त्या सोडविल्या. उपरांतिक कूच करून छ २० रबिलोवली सालबाई लोहणडास मोर्चे लाविले. दोन्ही ठाणी फते जाली म्हणजे कुल नरवर पंच माहालच्या गढ्या सुटल्या. स्वामींनी अखेर माघ मास पावेतो * * * बेगमी करून पाठविली. त्या उपरांतिक * * * नवते. त्यास राा अंताजी माणकेस्वर * * * सुदा समागमे पत्र स्वामीचे आले त * * * * कीं आंताजी माणकेस्वर याजकडे राणा भीमसिंग याचा तालुका दरोबस्त दिल्हा आहे. त्याच्या तालुक्यात आथवा राण्यासी हर्शामर्ष केलिया सरकारात * * * * करणे येईल त्यासी आम्हास स्वामीची आज्ञा प्रमाण. सन सितांत सनद करून दिल्ही तेव्हां आखेर खमस पावेतो जगो व राणाकड हवेली वगैरे असतील ते तालुकदाराकड ज्याजकड तालुका लागेल त्याजकडे अमल घ्या * * * * * याउपर गाव दाबले असतील अथवा पैका घेऊन दिल्हे असतील त्याची बाजपूस करावी. तेव्हां प्रसंगी आम्ही नसतां स्वामीपासी मनमानेसी विनंती करून ताकीदपत्र घेऊन पाठविलें. स्वामी खावंद ये प्रांतीचे साद्यंत वृत निवेदन होईल तेव्हा ध्यानास मजकूर येईल. स्वामीच्या ताकीदपत्रासमागमे आंताजीपंताची पत्रे राा बाबूराव शामराज यासी पत्रे कीं श्रीमंतापासी साद्यंत वृत निवेदन केले आणि मातबर मातबरानी साक्ष दिल्ही की विठलपंत जाहाला * * * * * * आंताजी माणकेस्वर याजकडील तालुक्यांत कथला करून अमल बुडवितात येशा कितेक गोष्टी सांगितल्या आणि गोविंदराऊ सखाजी व बालाजी शामराज याणीहि साक्ष दिल्ही. त्याजवरून श्रीमंतानी ताकीदपत्र दिल्हे तर तुम्ही त्यास बरेवजेने च्यार गोष्टी सांगोन मुलकाचा जाब पुसणे. येसियासी त्याणी मामलेदारांस लिहिले हे उतम केले. मामलेदारानी अंताजीपंतास पत्रे वरचेवर लिहिलीच असतील. तीच समक्ष अणऊन पाहावी * * * * * मामला करीत होते तेव्हा पछोरकर

व गोहदकर वैरण अथवा फाटे देत नवते. राणांतून गोवऱ्या वेचून आणाव्या ये रीतीचा मोकदमा होता. प्रस्तुत मामलेदारास वैरण फाटे मिळते. सन खमसा आलीकडे पांसष्ठ गाव हवेलीचे दाबले. ये गोष्टीस चौधरी कानगो व जमीदारांचे दाखले सेवेसी येऊन पोहोचतील व श्रीमंत राजश्री बाबास आदिअंत मजकूर विदित आहे. ये प्रांती होते तेव्हांच ते या गोष्टीत माहीत. आम्हास आज्ञा केली असती आणि अंताजीपंत सांगतात हे खरेच असते तरी मान्य करितो. त्याणी ही गोष्ट अमा * * * आणि प्रस्तुत आज्ञापत्र आले. येसिया स्वामीची सेवा आर्जीपावेतो केली. परंतु स्वामीकार्ये होऊन आपल्यावर शब्द न येसीच वर्तणूक केली. पुढेहि स्वामीच्या पायांसीं निस्चये हाच आहे. आपरोक्ष मन मानेसे हरकोण्ही येऊन सांगतात हे अनभवाखेरीज चितावर न घ्यावें आणिक मामलेदारास व राण्यास कितेक भातेने अंताजीपंतानी लिहिले कीं विठलपंत तुम्हासी कजिया करीतात तरी तुम्ही जमियेत करून त्यास मुल्कांतून काढून देणे. येक विठलपंतास तुमच्याने राख * * तेव्हा * * * * * सुभा आला तर त्यासी कसे झुंझाल? येशा इरेस घालून मनमानेसे लिहिले. त्यास स्वामींनी अम्हांस ये प्रांती ठेविले. निमित्य कीं पातशाहीत फितुर व मुलकचा बंदबस्त राहिला पाहिजे. जेथवर हात पोहचेल तेथवर मामलेदारांची कुमक करावी. येसे असोन कछवाधरित चाकरी केली. बाबाजीचा अमल थोडाबहुत जाला तो बसऊन दिल्हा. येहनोची मामलियेत त्याच्या मामलेदारास चुकवून दिल्ही. सिकारवारची मामलियेत सरकतीर्चाहि थोडी बहुत करून दिल्ही. चेनासु, गादली दोन ठाणी घेतली. तेथे दाहावीस माणूस जखमी व पाचसात मयेत जाले. किंचेन्याचे ठाणे वाटणीप्रा त्याचे स्वाधीन केले. राण्याकडील मजकूर आलीकड गाव दाबले याजकरितां त्यांस कठीण वाटले. आणि स्वामीपासीं विनंती केली. उत्तम केले. सावंत देहझाडे वगैरे कागदपत्र सेवेसी येतील तेव्हा साक्ष मनास आणून कागदपत्र पाहून विल्हे लाऊन देणार स्वामी धणी आहेत. आज्ञा करितील त्याजप्रमाणे वर्तणूक करून अखेर माघमासपावेतो रोजमरियाची बेगमी जाली. पेस्तर पोटास पाहिजे यासिवाये रवानगी पाहिजे. बेगमी करून द्यावयाची आज्ञा वैशाखमासपावेतो कार्ये सेवकास उपस्थित करून आज्ञा करावी. फौज या प्रांतास आद्यापि आली नाहीं. फौजेविना मुलुकाचा बंद राहणार नाहीं. सर्व चिंता स्वामीस आहे. आम्ही आज्ञांकित जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. हा कालपर्यंत ये प्रांतीचा बंदोबस्त मातबर फौजेप्रमाणे राहिला असे. विशेष. अंताजीपंती तमाम ये प्रांतीच्या लोकास पत्रे लिहिली की राण्याचा गावाविसी श्रीमंतानी विठलपंतावर

इत्राजी केली आहे. सरंजाम काढितात. आम्ही करून येतो. हारकोण्ही * * * * ब्राह्मणास तो उठऊन लावणे. सरदारानी स्वामजिवल * * * विठलपंत अंताजीपंतास कजिया * * * विठलपंत आप्रमाण माजले आहेत * * जाला. येसे मातबरानी आम्हास * * * आमची स्थित स्वामीपासी काये राहिली बरे. राणाने गाव सनद जाली तेव्हा बदले असतील येसे खरे करून देऊ तेव्हाच स्वामीची निशा होईल मग सेवा सांगणे ते सांगावी. बालाजी सामराज गोविंद सखाजी याचा साक्ष तर ते वरसी याची त्याची सरकत जे कर्म केले ते उभयतानी केले. नजरनजराणा घेतला तो उभयेताचा यामुले त्यास साक्ष द्यावीच लागली आणि अंताजीपंती बालाजीपंतास येक घोडी हजार रुपयाची व काही नख्त देऊन जवल चार वर्ष साक्षीसाठी ठेविले आहेत. * * * त्यानी साक्ष द्यावी त्यास येंदा प्रसंग बनला. आम्ही प्रसंगी नसता साक्ष दिल्ही यावरून स्वामीनी रागे भरून लिहिले. जमिदाराच्या मोहरानिसी पत्रे घेऊन येतो तेव्हा खरे खोटे कळेल. बालाजी सामराज ना। बाळाजी माहादेव याजकडून ग्वालेरीस होते व अंताजीपंती सरकती तेव्हां वसूल जाला तो त्यासच विदित असेल. झडतीस दाखला असेल तोहि पाहावा. आम्हास सरंजाम दिल्ह्यावर ग्वालरीचा आमल कैसा बसला व पहिले कैसा देता हेहि ध्यानास येईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shivdev reports to the Peshwa the efforts that he made in humbling some of the chiefs in the province of Kachhvadhar, Gwalior and Sodhe (Sevandhe ?). He further mentions the differences between himself and Antaji Mankeshwar regarding the mamlat of the province, and answers all the charges brought against him by Antajipant. The writer finally requests the addressee to send more money and men for the defence of the province.*

No. 42] [*28-3-1749*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल ता। छ २१ जमादिलोवल मु॥ ढवलपूर जाणून स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. फौजसुधा दतियाचे मुकामी येऊन सामील जालो. तेथील प्रसंग विल्हेस लागला ते वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले आहे.

साकल्य राजश्री उभयेता सरदारानी लिहिले असेल. सांप्रत दतियाहून कूच करून ग्वालेर प्रांतातून फौज आली परंतु बंदोबस्त मनोद्यानरूप न जाला. दर कुचाने जे भेटले ते विल्हे लागले. मुख्य आम्हाकडील मातबर मामलत नरवरची ती काही मुद्याप्रा न जाली. त्रिसष्ट हजार विल्हे लागली. गुदस्ता मामलेकरानी साठ हजार चुकविले होते. त्यात काही वसूल जाला काही बाकी राहिली. मागील बाकी पुढे मुल्हक घ्यावा आथवा पैका भारी व्यावा ते न जाले. पुढे जाटाच्या मनसब्यामुले वेलावर द्रिष्टी देऊन जे जाले तेंच केले परंतु त्याचा वसूल आद्याप नाही. तुवरधार व सिकरवार हे परगणे सेहाखेरीज राहिले. हवेली वगैरे किरकोल मामलती मामलेकरानी विल्हे लागल्या. प्रस्तुत लस्कर कूच होऊन चमेल उतरोन आले. देशास यावयाचा मनसबा आम्हास आज्ञेप्रमाणे राहावे लागते. झासीचा सेह राखून ग्वालेरीचा बंदोबस्त करणे तो करू. विशेष नेमणुकेची पतकापैकी पिराजी आहेरराऊ, आनंदराऊ धुमाल आले नाहीत. जदीद परसराम देवकाते व नरहर जिवाजीचे स्वार दीडसे येकूण पावणेदोंशा स्वाराची नेमणूक नाही. त्याचा हिसेब रोजमन्याची नेमणूक खानगी पुढील नालबंदीची नेमणूक करून पाठवावयास आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shivdev to the Peshwa saying that though he successfully negotiated affairs at Datia, he is not satisfied with the settlement of money matters effected at Gwalior and Narwar.*

No. 43] [*13-4-1749*

श्री

श्रीमंत राजश्री दादा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान स्वामीचे कृपे करून ता। छ ७ माहे जमादिलोवल परियेत स्वस्ति क्षेम आसो. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते दतियाचे मुकामी लस्करास दाखल जालो. दतियाचा कामाकाजाचा गुंता उरकलियाउपर मजल दर मजल लस्कर जाटाच्या प्रांतास चमेल उतरून आले. सुरजमल जाट याजकडील वकीलहि आले आहेत. त्यांच्या यांच्या मुदेमाफीक घडोन येईल तेव्हा तहरह होणे तो होईल. सारांश जाटानी ठाणेबंदी केली आहे. बाहेर मैदानांत येत नाहीत. जाले वर्तमान विदित व्हावे याजकरिता लिहिले असे. वरकड कितेक मजकूर श्रीमंताचे

पत्री लिहिला आहे त्यावरून विदित होईल. जाटाकडे राजश्री दामोदर माहादेव गेले आहेत. दो चौ रोजानी तहरह होणे तो होईल. सदैव पत्रद्वारे परामृष करावयास आज्ञा करीत आसावे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ती.

¶*Vithal Shivdev finishes affairs at Datia and proceeds to the territory of the Jats.*

No. 44] [*13-4-1749*

श्री

श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान स्वामीचे कृपाद्रिष्टीकडून तागाईत छ ७ माहे जमादिलोवल परियेत मुकाम पार्वती नदी नजीक आगरे स्वस्तिक्षेम आसो. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों ते दतीयाच्या मुकामी लस्करास सामील जालो तो मजकूर पूर्वी सेवसी लिहिला आहे. दतीयाचें काम सर जालियाउपर उभयेता सरदार याणी लस्कर कूच करून जाटाच्या मुलकांत चमेल उतरून जावयाचा ठराव करून मजल दरमजल आगऱ्यानजीक मुा केले. सुरजमल जाट याजकडील वकील भेटीस आले. तेथीलहि तहरह होणे तो स्वामीच्या प्रतापें होऊन येईल. येते वेळेस नरवरच्या सरदेने आले. नरवरकराकडील वकील येऊन राजश्री बावानी मामलीयेत चुकविली. पूर्वी आलापूर सोमावलीची मामलीयेत राजश्री मल्हारजी होलकर याणीं चुकविली. गुजरोले तों पछोरानजीक लस्करचें मुकामे गुजरोले नजीक दोन जाली त्यामुले भोवताली खेडी होतीं ती लुटलीं गेली आणि पेशजीची बाकी त्याजकडे बेमोबलग हाली पायेमालीखाली गेले. याजमुले तेथील काही रुा येतां दिसत नाहीं. आलीकडे तुवरधार जतावर दडरोली यांजकडील तिगस्तांच्या वोला बाकीच्या आहेत त्याचीच वाट होत नाहीं. हाली मामला त्यानी करावा तर मातबर फौज दहशतीनेंच मुलूक [पुढील पान गाहाळ झालेलें दिसते. या पानाच्या पाठीवरील मजकूर] राजश्री बापूजी बाजीराऊ, संताजी मोरे वशाख शुध प्रतिपदेस दाखल जाले. फौजेचा भरणा बराच आहे. राजश्री रामचंद्र हरी रा गोविंद बलाल याजकडे रवाना जाले व राजश्री नारो शंकर याजकडे जी पतके रा अंताजी माणकेस्वर व नेहमी जी होती ती त्यासमागमे गेली. उभयेता सरदार यांच्या भेटी दतीयावर जाली. यास येकरूप आहेत. पूर्ववत

प्रा यैक्यभावे चालतात. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति. जाटाकडे राजश्री दामोदर माहादेव गेले आहेत. दो चौ दिवसानी तहरह होईल. उपरांतिक कोठ्यावरून फौजा येतील. आम्हास जैसी आज्ञा आसेल त्याप्रा वर्तनुक होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶Vithal Shivdev reports the movements and the activities of his own contingents and of those under the other Sardars.

No. 45] [*9-6-1749*

श्री

श्रीमंत् राजश्री बाबा
श्वामीचे शेवेसी

पोष्ये विठल सिवदेव्र कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा आषाढ शुध ५ पंचमी मुाा भिंड प्रांत भदावर जाणून येथास्तित असे विशेष. बहुत दिवस जाले स्मरण करून पत्र पाठऊन परामृष न केला तर यैसे न करावे. सेवेसी येक दोन पत्रे पाठविली ती पावली असतील. सांप्रत छावणीस राहाणे जाले यामुले च्यार पांचसे स्वार उठून गेले. आटोले वगैरे उदाजीराव सोमाजीराव कांकडे व किरकोली कांकडे त्याची याद आलाहिदा श्रीमंताचे पत्री लिहिली आहे त्यावरून विदित होईल. वरकड पतके येथास्तित आहेत. येतेसमई छावणीस राहिलो तर बारमाही रोजमरा व खानगी यैसी नेमणूक करून दिल्ही त्यापैकी लुटीचे दोन महिने राजश्री बावानी वजा केले आहेत व आधिक मासची बेगमी नाही. येकूण तीन माही लक्ष रुो तोटा आहे. याखेरीज किरकोल बाकी निघेल. पाचसे लोक गेले त्याचे येवजी पांचसे स्वार या प्रांती मऱ्हाठे राहिले आहेत त्याची बोली करून त्याची नांवनिसी याद आलाहिदा पाठविली आहे. आज्ञा जाली तर देऊ. नारो शंकर गेलियावर झांसी, दतिये, भदावर, कछवाधारपर्यंत बंदोबस्त जाला पाहिजे याकरिता फौजेखेरीज होत नाही. आस्विनमास आला नाही तो नालबंदीचा यैवज लोकास पावला पाहिजे. त्याची बेगमी करणार आपणच आहेत. आमच्या पतकापैकी मुरारजी जखथाप, हयेबतराऊ यैसे अंताजीपंताकडे गेले व अमाजी पाटील गुदस्ता छावणीस राऊत ग्वालेरीत होते त्यापैकी चालीस पनास गेले. वरकड येक राऊत जाऊ दिल्हा नाही. ज्या लोकावर इमारत ते येक आसामी जाऊ दिल्ही नाही. कोण्हास बकसीस, कोण्हास काही जाजती येकूण सवाईचा हिसेब जाजती बसेल. ग्वालेर प्रांतीचा मजकूर सर्व राजश्री रामचेंद्रबावा विदित करितील. मुख्य मातबर नरवर तेथील चिवडा

3539

जाला. गुदस्ता थोडे बहुत दिल्हे ते माहालचे कर्ज व राउताचा व ठाण्याचा खर्च सालमजकुरी मामलत पासष्ट हजार जाली परंतु पैका न आला. माग दोन च्यार ठाणी घेतली यामुळे यैवज उभा होईल. सेवेसी विदित होय हे विनंती.

¶*Vithal Shivdev writes that he is encamping in the North for the monsoon and asks for funds to meet the expenses of his force.*

No. 46] [*9-6-1749*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा आषाढ शुध ५ पंचमी मुाा भिंड जाणून स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालियावर दतियाचे मुकामी राजश्री जयाजी सिंदे व राजश्री बावाजवल येऊन सामील जालो. लोक जमा जाले होते. मागून दोन च्यार पतके येऊ पावली. तेथे सेवा घडोन येणे ते आली. राजश्री म्हलारबा आलियावर दतियाचा तहरह होऊन करेरा घेऊन उरल्या मुलकाची वाटणी करून जाटवाडियांत गेलो. ग्वालेरीचा मुल्क सोडवावा म्हणून सरदारास विनंती केली परंतु जाटाकडील काम मातबर याकरिता आनकूल न पडले. जाटाचा कार्यभाग होऊन श्रीमथुरा करून याच मार्गे लस्कर आलें. जातेसमई नरवरकरानी मामलत सासष्ट हजार चुकवली परंतु जेष्टपर्येत वसूल न दिल्हा. याकरिता दोन ठाणी पन्ह्यार, धुटा घेतला. मग लस्करात येऊन राजश्री मल्हारबास इरेस घालून रदबदली करू लागले की आपण मामलत चुकविली असतां ठाणी घेतली हे कोण गोष्ट ? पैका घ्यावा आणि ठाणी सोडावी. उभयेतानी आम्हास आज्ञा केली कीं, दोन महिने ठाणी सोडणे आणि पैका घेणे. दो महिन्यानंतर चितास येईल ते करणे. आम्ही त्यांची आज्ञा पाळून पैका घेऊन पन्ह्यारबावाचे आज्ञेप्राा ठेऊन धुटा येथील ठाणे सोडावे, आरुणास मोर्चे लाविले होते ते उठवीत होतो त्यास पैक्याचा निकाल न होये याकरितां दिसगत लागली (अपूर्ण).

¶*Vithal Shivdev as instructed by the Peshwa joins Sindia and Holkar and proceeds to set matters right in the Jatwada. He had to release—he says—Panhyar and Dhuta owing to the intercession of Holkar on behalf of the Jats.*

3540

No. 47] [9-6-1749

श्री

श्रीमंत राजश्री रघुनाथपंत दादा
श्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनती विज्ञापना. येथील कुशल ता। आषाढ शुध ५ पंचमी मु॥ भिंड प्रांत भदावर जाणून स्वामीचे कृपेकरून येथास्तित असे विशेष. उभयेता सरदार आम्हास छावणीस ठेऊन गेले. राजश्री नारो शेंकर याचा जिल्हा भदावर व कछवाधारे ती ठाणीठुणी घेणे आहेत याकरिता या प्रांतास आलो. सविस्तर आर्थ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे पत्री लिहिला आहे त्यावरून विदित होईल. सेवकाचा सदोदित पत्रद्वारे परामृष करीत असिले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाती.

¶*Vithal Shivdev reports to Dadasaheb his arrival at Bhadavar for the purpose of recovering the posts belonging to Naro Shankar.*

No. 48] [July 1749

श्री

+पु॥ श्रीमंत स्वामीचे
सेवेसी.

विज्ञापना. कानडे वलनची प(थ)के थोरात, सितोले, सदासिव चिंतामण व शाहाजी बागूल निंबालकराकडील मल्हारराऊ या लोकानी बरा दम धरून आपले लोक राखून येथास्तित मर्जी रक्षून स्वामीकार्यावर द्रिष्टी देऊन गवगवा न करिता राहिले. रा। हयेबतराऊ धापटे व लक्ष्मण धापटे यांचे पुत्र हरजी निंबाजी धापटे यास आटोल्यानी भर देऊन न्यावे यैसे केले होते परंतु हयेबतराऊ धापटा शाहाणा माणूस त्याचे बोलीस न लागता स्वामीच्या पायावर द्रिष्टी देऊन येक राऊत जाऊ न देता राहिले परंतु आमचे वचन घेतले कीं श्रीमंताजवल गेलियास आपले ऊर्जित करावे. दोशा स्वाराची बोली व हती घात्रा व कर्जासाठी छावणीमुले काही रयात करावी यैसे वचनास गोऊन राहिले आहेत. त्याचा आभिमान सर्वप्रकारे स्वामीस आसावा. राजश्री वागचवरे यास त्याच्या पुत्रास आतिषये वेथा जाली. मग त्यानी आपला जमाव व तावजी वागचवरे यास ठेऊन समाधानाने निरोप घेऊन गेले. त्यानी घरास गेलियावर चंदरराऊ वागचवरे याची रवानगी

+ पत्र विठ्ठल शिवदेव याचें.

करावी. दसऱ्यास आम्हाजवळ यावे याप्रा करार करून गेले आहेत. रा जिवाजी गायकवाड याजकडील पनास स्वार उठोन गेले ते नवे ठेवी तव त्यास दो महिन्याची मुदत दिल्ही असे. राजश्री रामचेंद्र कृष्णराऊ यांच्या पतका(स) सरदार रा कोनरराऊ होते ते मृत्यु पावले. अता तेथे कोण्ही शाहाणा माणूस नाही यामुळे बेबंद कारभार फार आहे. चालऊन नेतच आहों. राजश्री पद्माकर कृष्ण याचे सामान उतम शाहाणा माणूस चाकरीस बेउजूर तूर्त काही मुदाहि नाही परंतु सोबतीयोग्य मनुष्य आहे. वरकड किरकोल पथके विसापंचविसाची आहेत ते आहेत. आपले गरीबीने चाकरी करितात. राजश्री नरहर जिवाजी याजकडील सरदार येशवंतराऊ तावरे अखेर वैशाखात आले. आम्हाबरा(बर) चालीस राऊत पूर्वी खोमणे वगैरे वरापासून होते ते आहेत. आलाहिदा चाकर ठेविले. वरकड त्यांचे पतक उठोन गेले. त्यांचा लांझ्या काही राहिला नाही [पुढें कोरी जागा असून पत्र पुरे केले नाही]

¶*Vithal Shivdev recommends to the Peshwa's favour those persons who adhered to his cause in spite of the advice of the Atoles and others to the contrary.*

No. 49] [*July 1749*

श्री ३

पुा श्रीमंत स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. पतके उठोन गेली. त्यांचे पारपत्य केल्याखेरीज कैद राहात नाही. कांकडे हुजूर चाकर न ठेवावे आणि पतकासहि ताकीद करावी की कोण्ही चाकर न ठेविते. कांकडे याचे बहुत प्रकारे समाधान केले. स्वामीचे आज्ञेखेरीज बकसीस रुा हजार, गेले आले राऊत याचे दोन महिने मनास न आणावे, कार्तिकमासपर्यंत राऊत जमा करावें, समजावीस नालबंदी द्यावी, परंतु त्यानी येकच साफ सागितले की आपण घरी शेफत वाहून आलो की छावणीस राहात नाही. पेशव्ये काये करणे ते करोत. बहुत बाजिद जालों परंतु न यैकिले उठोन गेले. यांचे राऊत पूर्वीच थोरले फौजेबराबर गेले होते. सडेमात्र राहिले. थोडा बहुत यैवज हाताखाले घेऊन वाटखर्चीची बेगमी करून आपण मागून गेले. बाजी आटोले याजवळ घोडीमात्र गणतीस होती. थोरले लस्कर जातां सर्व राऊत गेले; येक हती आणि आपण राहिले. त्यासहि बहुत प्रकारे सागितले की तुमचे स्वार

+ पत्र विठ्ठल शिवदेव याचें.

ठेऊन देतो परंतु शाहाजी आटोले त्यानी त्यास पुढे घालून घेऊन गेले. शाहाजी आटोले यानी फार बेकैदी करू(न) गेले आहेत. सेवेसी सूचना मात्र लिहिली असे. नव्या लोकाचे चालवावयास अंतर न केले. नालबंदीचे समई बाजी आटोले यास पांचसे रुपये कर्ज शेकरावा नाईकापासून देविले. त्याप्रा शाहाजी आटोले. त्याखेरीज स्वामीचे नेमणुकेखेरीज रोजमरा जाजती पालखीस व हतीचे खर्चास आर्जबाब द्यावी. उंटे घेतली त्यास पैका दिल्हा व डेरेदांडे, श्रांधे, जे समई ज्याने ते थोड्या बहुताने समाधान करीतच गेलो परंतु त्यानी येकीकडे ठेऊन आपल्या वेलास चुकले नाहीत. आटोल्यास येणेप्रा सर्व आहे. तुंग-भद्रेवर सरदारास टाकून जावे. त्याची खोड स्वामीनी मोडली तर मोडेल नाहीतर मोडत नाही. फौज भारी जथल्यास यैवज हाती असावा. पैसा नसला म्हणजे वोढ होती ती पत्री लिहिता पुरवत नाही. स्वामीनी दरमाही नेमणूक करून दिल्ही त्यापैकी तुटीचे दोन महिने राजश्री बावानी वजा केले त्यामुले सतर हजार रुपये तुटीस आले व आधीक महिना नेमणुकेत नाही यामुले लाख रुपये तोटा आला. आश्विनमासपर्यंत दोन लक्ष रुपये नेमणूक बावानी करून दिल्ही त्या-सिवाये पाहिजे तेव्हा लोकाची दिलदारी राहाती. याकरिता यैवज मुबदला करावा लागेल. जाजती स्वार पांचसे ठेवावयाची आज्ञा जाली तर ठेऊ नांहीतर निरोप देऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shivdev to the Peshwa complaining against Kakde and Atole for leaving the camp without permission and thus breaking the rules of discipline of the army. The writer further describes his monetary difficulties and asks for more funds to pay off the soldiers.*

No. 50] [*July 1749*

श्री

+पुरवणी श्रीमंत स्वामी
चे शेवेशी

विज्ञापना. पा सिऊरदुराब येथील रसदेचा यैवज आम्हाकडील नालबंदीचे यैवजी वरात आम्हावर देविली पाहिजे. देसी यैवजाची वोढ आहे याकरिता विनंती लिहीले असे. आम्ही छावणीस कछवाधारेत आलों. हे राण छावणी लायख नाहीं. तृणकाष्ट याचे मानसिक. मैदान मुल्लक. महिना दोन महिने पाऊस लागली तर लस्करची हैराणगत आहे. गवत नाही. निवारा नाही. गैरहंगामी

+ पत्र विठ्ठल शिवदेवाचें.

मचारे येऊन कार्य करावे ? यैसा हगांम नवता परंतु जे गोष्टीने स्वामीकार्यं होये तें करणे. रा नारोपंत देशास गेले. त्यांचा बंदोबस्त होता. ते जाताच दुरील मुल्लक तेथे कितेक जमिदारानी सिरोपस्ताई केली याकरिता मुल्लक पोटेसी घेऊन राहावें आणि रामपुरा स्थल भारी तेहि सोडवावे यैसे जरूर जाणून या प्रांती राहावेंसे जालें. समजावीस नालबंदीचा यैवज दसऱ्यास पावल्यास आमची पत लोकांत राहील यैसे करणार स्वामी समर्थ आहेत. विशेष ग्वालेर प्रांतीचा मागील दुसाला हिसेब येथील सर्व वर्तमान राजश्री बावानी ध्यानास आणिले. जतावर, दंडरोलीत तो महिनाभर मुकाम होता. तेथील आर्थ उभयताच्या ध्यानांत आला. नवलसिंगाची दुसाला बोली रा मल्हारबानी केली. त्यात आम्ही दोघे मोकासी. वसूल होईल तो उभयेताकडे येईल. हवेली गुा मोग-लाच्या दंग्याने खराब जाली. साल मजकूर फौज आमची जाणे येणे त्या मार्गेच जाले. गुजरोल्यावर तीन च्यार मुकाम करून मुलूक तमाम लुटून जालून टाकिला. नरवरकरानी गुा थोडा बहुत वसूल दिल्हा. त्यास माहाली तीनसे स्वार व ठाणी कमाविसदाराचे पाऊण लक्ष रुो कर्ज हे समजाविसीस विनंती केली होती. स्वामीनी आज्ञा सखारामपंताचे हाते सांगितली आहे. सालमजकुरी पुढे बंदोबस्त व आकार होणे तो होईल येकूण ती साला हिसेब सेवीसी दिल्हा जाईल. विनंती करणे ते पायापासी होईल परंतु रुपयास आंतर न पडेल ये गोष्टाची निशा आसो द्यावी. कचे वर्तमान सेवेसी निवेदन करीन. मागील कर्जाची वोढ वगैरे सर्व परिहार करणार स्वामी मायेबाप असेत. आम्ही चिंता करावीसे नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ती.

¶*Vithal Shivdev reports to the Peshwa his activities in the province of Narwar and Gwalior for the collection of the revenue dues.*

No. 51] [*July 1749*

श्री

पुरवणी श्रीमंत स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. कछवाधार प्रांते दोन तीन ठाणी मातबर घेणे. रामपुरा व इद्रखी व काहार यैसी घेणे. यामुले गैरहंगामी इकडे आलों. त्यास रा नारोपंताकडील चौक्या दोन महिने ठाण्यास होते. आम्ही सरदेस येताच इंदरखी तो हस्तगत जाली. पुढे रामपुऱ्यास जातो. तेहि स्थल सत्वरच सुटेल. राजश्री नारो शंकर

यांची स्वाधीन संस्थाने भारीच आहेत आणि बंदोबस्तहि उतमच आहे. त्यांची रवानगी ये प्रांते सत्वर जालियावर कर्तव्ये कार्ये ते करून. नूतन कार्ये कितेक होणार याकरिता विनंती लिहिली असे. ग्वालेरीत स्वार होते त्याचा आदा व ग्वालेरीचा हिसेब दोन्ही राजश्री बावानी मनास आणिली नाहीत. ग्वालेरीस स्वार तीनसे. नेमैणूकपकी दोनसे व जाजतीं सेंभर येसे तीनसे. नेमणुकचे दोनसे आकराशात न धरता नवशार्चीच नेमणूक करून दिल्ही. वरकड दुसाला तीशा स्वाराचा खर्च माहाली पडतो. विशेष पागेचे सामान घोडे माणूस उतम प्रकारे जथले आहे. पागेचा खर्च व पागेचा सेरा स्वामीच्या ध्यानांत आहे. पागेचा गुतका (?) केल्याने स्थित राहत नाही. ग्वालेर प्रांतीचा सरंजाम निमे निमे वाटणी केली तें गोष्टीस आम्ही माहीत नवतों. नरवरचा मुलूक व राणाचा मुलूक बरोबर. त्यास नरवरकरास तिवे मोकासी रा। सुभेदार राई राजगड येथील कमाविस आलाहिदा शाहाबाजेच्या कमाविसदाराकडे आहे. तिसऱ्या हिशात आम्ही आहो. इतके आसोन त्याजवर घासदाणियाची रकम बसवली यामुळे तेथील चिवडाच आहे. घासदाणियाचे कमाविसदार रा। पांडुरंगपंत त्यानी आम्हासच तगादा करितात. जाधव व राई राजगडकर यास न बोलता इकडे वसवस करितात. घांसदाणा राज्याजवल मागावा यैसे आसोन आम्हाकडे चिवडा होतो तर घासदाणियाची सनद आम्हाकडे पाठवावयाची आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ती. आमच्या खासगत पतकापैकी मुरारजी जखताप रा। आताजीपंताकडे गेले व हयेबतराऊ येकूण स्वार सात गुा। छावणीस होते त्यापैकी शेंभर स्वार जाजती होते त्यास निरोप दिल्हा. वरकड ज्या लोकावर भिस्त त्यापैकी येक आसामी जाऊ न दिल्ही. त्याचा शोध परस्पर मनास आणावा. हे विज्ञप्ती.

¶*Vithal Shivdev goes to the province of Kachhvadhar, captures Indrukhi and other posts and expresses to the Peshwa his difference of opinion regarding the allotment of the Saranjam of Gwalior and Narwar.*

No. 52] [*13-8-1750*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोविंद बलाल कृतानेक सां नमस्कार विनंती. ता। श्रावण वद्य सतमीपावेतों स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालों ते अजी भेलशानजीक आलों तों कोचकनार

दंगा तीराकडील ठाणेदारांची पत्रें आलीं जे, तमाम जमीदार येकत्र होऊन मोठासा यमुनोकलो आहे. दोन तीन ठाणी घेतली. साठ सतर गांव जालिले लुटले. दोघे ब्राह्मण जिवें मारले. गढ्यांस मोर्चे लाविले आहेत. जागा सर्व खराब जाली. फौज पाठऊन उपराला जाला तर जागा राहिली ते वांचेल म्हणौन जरुरीची पत्रे आली. त्यास रो विठलपंत फौजेनसी होते तेहि देशास गेले. फौज त्या प्रांती नाही यैसें पाहून जमिदारानी दंगा करून जागा खराब केली. आषाढ मास रयतेची निशा करून पुढील लावणी व्हावी तीं यैसा प्रसंग जाला. स्वामीस विनंती पुणियात केली जे फौज आधीं मातबर त्या प्रांती पाठवावी तेव्हा तिकडील फौज आणवावी ते विनंती मान्य न केली. आज फौज त्या प्रांती आसती तर सर्व दबते. कजिया न होता. रजवाडियाच्या नजरा फिरल्या आहेत तेच अंतस्तें जमीदारांस सागोन दंगा करवितात. या मुलकांत हमेशा फौज असावी तेव्हा भये मानितात. राजश्रीचा वाका जाला. फौजा या प्रांती नाहीत. मनमाने तैसा हूल उठऊन दंगा केला आहे. मुलकाची खराबी जाली. पुढे फौज पाठऊन जमिदारांची पारपत्यें करणार स्वामी धणी आहेत. चैत्र+ मासी विनंती केली तेसमई फौज येती तर आग (ज) जागा राहाती. हे फौज देशास जाती. ते न आले. हे फौज देशास गेलियावर मागे फौज नाहीसी पाहोन त्याणी कजिया केला. आम्ही यासमई कसे करावे ? उपाये नाही. पाउसाला दिवस. फौज नाही. नदी भरली. जागा बहुत खराब जाली. दिवसेदिवस ते भारी होतात इलाज नाही. आहे वर्तमान ते सेवेसी लिहिले आहे. याची तरतूद सत्वर करावी. नाहीतर मुलक गेला. आमचा इलाज नाही. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govind Ballal writes in strong terms to the Bhau that the absence of an adequate force in his province has encouraged risings among the zemindars, and asks for succour to cope with the situation.*

No. 53] [*27-8-1749*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २३ साबान मुकाम काहार पा कछवाघार येथास्तित आसे विशेश. स्वामीनी आमची रवानगी केली. याउपरी दतियाचे व जाटाचे कामकाज जाली

+ अक्षर निराळें.

नंतर लस्कर ग्वालेर प्रांतास आले. राजश्री बावानी आमची नेमणूक रा नारो शंकर यांच्या जिल्ह्यांत केली. आपण देशास गेले. आम्ही ग्वालेर प्रांतीहून फौजनसी कछवाधारेंत येऊन काहरेस मोर्चे लाविले. झांसीकडे दतियेकरीकडे बाकीसाकी येणे याजनिमित्य चिमणाजी वामन यांजकडे हजार फौज खंडो मोरेश्वर याजसमागमे देऊन पाठविले. नरवरचा मुल्क ठाणीठुणी काही सुटली काही सुटतात याजकरितां पाचसे राऊत रा बावांचे आज्ञेवरून ठेविले. बाकी फौजसुधा कहारेस मोर्चे लाऊन बसलो आहो. थैसे असोन रा बावापासी वर्तमान सांगणारानी सांगितले की दोन हजार फौज उठोन देसास गेली हे थैकोन त्याचें पत्र राजश्री नारो शंकर यासी आले कीं फौज गेली याजकरिता गणती चौकसीने घेऊन मग रोजमरा व रवानगी देणे. त्यास खावंदाची आज्ञा प्रमाण. गणती द्यावी त्यास तयार होऊन जाऊन झांसीच्या किल्याच्या दरवाज्यात गणती द्यावी हा विचार कोण? पूर्वीहि हे गोष्ट जाली नाहीं. आम्ही स्वामीसेवा करितो ते स्वामीच्या पायासी इतबारे वर्ततो. पहिले श्रीमंत राजश्री आपा कैलासवासी याणी आम्हास आबरूस चढविले ते कसोटी सर्वा गोष्टीची पाहूनच वाढविले. आपण पांच हजार फौज करून चाकरीस पाठविले ते स्वामीच्या पायांपासी सचोटी आहे याजकरितांच पाठविले आणि मामलेदार याजकडील कारकुनापुढें उभे राहून गणती द्यावी तेव्हा आबरू राहती कीं काये? स्वामीसंनिधच राहिल्याने सेरभर आन्न स्वामी देतील आणि चाकरी घेतील. लोक निसबतीचे कम पांचसे गेले त्याची नावनिसी व कबजाचा हिसेब आलाहिदा लेहून पाठविला आहे. त्याची नेमणूकपैकी अदाबाकी मनास आणावी ते थैवजी तीनसे राऊत जाजती नवे ठेविले आहेत. चाकरी करितात. सार्यंत विदित व्हावे याजकरिता लिहीले असे. स्वामीचे प्रतापे लाहार छ २० सवाली सुटली. कछवाधारेची दोन ठाणी मवासी राहिली आहेत तीहि सर होतील. सारांश छावणीचा पेच भारी आणि आपण नेमणूक करून दिल्ही होती पौ राजश्री बावानी लुटीचा थैवज वगैरे सवा लाख रुा वजा केले बाकी थैवज देविला तो आधिक मास खेरीजकरून आखेर आश्विन बेगमी केली. तेव्हा आधिकमासी पोटास पाहिजे व रवानगीस थैवज थोडका. समजावीस नालबंदी पेस्तर पाहिजे. याची सर्वश्वे बेहबुदी करून पाठवणार स्वामी धणी आहेत. लोकाच्या छावणीमुळे देण्याघेण्याचा पेच भारी हे स्वामी जाणतच आहेत तेथे विस्तार काये लिहीणे. नरवरचा मुल्क दरोबस्त सोडवितो. येक हिसा सुटला दोन हिसे राहिले तेहि सोडवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

¶*Vithal Shivdev reports to Sadashivrao Bhau his activities in the province of Kachhvadhar, especially his siege of Kaher. Further he regrets that his honesty was questioned by the Peshwa who instructed Naro Shankar to sanction the wages of the Army only after counting its actual strength.*

3547

No. 54] [27-8-1749

श्री

श्रीमंत राजश्री दादा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेव सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ २३ सावान पावेतो मो लाहार प्रा कछवाघार येथास्तित जाणून स्वामीनी कुशल वृत ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन या प्रांतास आलो. जाटाकडील वगैरे कामकाज जालियानंतर ग्वालेर प्रांतास रा बावानीं रवाना केले. आपण देसास गेले. आम्ही नरवरकराची येक दोन ठाणी घेऊन कछवाघारेत आलो. रा नारो शंकर यांच्या जिल्ह्यांत कितेक कामेकाजे आहेत ती करीत आहो. वरकड साद्यंत श्रीमंताचे पत्री लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी शृत होये हे विज्ञापी.

¶*Vithal Shivdev writes to Dada that he is busy settling Naro Shankar's Districts.*

No. 55] [1749 ?

श्री

पुा+ श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती विज्ञापना. सन सलासांत ते समई हवेलीचे गावराणाकडे जाऊन उतरले. त्याची वाटणीच्या यादी त्यांची आम्हाजवल आमची त्याजवल परस्परे सिके करून दिल्हे. ती याद स्वामीस दाखविली असेल की वाटणी होऊन चुकली आतां लटका कजिया करितात म्हणून स्वामीस तिराहितानीहि समजाविले आसेल परंतु त्याचा मजकूर येणेप्रमाणे आहे. वरकड मुल्क जमिदारा होता. हवेलीच्या * * * (उभ)येता वाहातो. तेसमई हांत्रीस मोर्चे लाविले. आंताजीपंतहि सामील होते. मोर्चे लागून आठ रोज जाले. तेव्हा हवेलीचा वाटणीचा पडला तेव्हा राणाकडे गाव सनद जालियावर गेले म्हणून रदबदली पडली. त्यांत त्यांचे आंगी लागू लागले तेव्हां त्यानी आम्हासी हर्षामर्ष वाढऊन मोर्चे काढून चालिले

+ विठ्ठल शिवदेवाचें समग्र हस्ताक्षर.

कजियावर गोष्ट पडली. मग त्याजकडील बाबुराव सामराज येऊन तह केला कीं तूर्त रयेत माल खाऊन जाती. जे निर्वेध गांव आहेत त्याची वाटणी करावी. तूर्त मोर्च्याचे काम होऊ द्यावे. राणांत थडावे येसे नाही. आम्ही नरहर जि * * * कोनी सांवताची गत होईल * * * * (सा) क्षीस बाबुराऊ सामराज रा (गोविंद सा) मराज सुभेदार सिरवलकर ठेऊन वाटणी करून घेतली-पुढे देशास आलियावर विनंती करावी तों त्यांचे सरदारीचा बखेडा जाला होता-पेचात होते. आमचे दुर्नाम जाले होते की यानी(च) चाहाडी करून त्याजवर पेच आणिला म्हणून बोलिलो नाही. बासवाडियाजवळ राणाची मामलत जाली तेव्हा आम्ही प्रसंग केला तों स्वामींनी आज्ञा केली, त्या प्रांतास गेलियावर जमिदार बोलाऊन मनास आणू विल्हे लाऊ. तों स्वारी ये प्राती जाली नाही. गतवर्षी दतियावर उभयता सरदार होते तेव्हा मजकूर केला परंतु विल्हे लागले नाहीं. आम्ही छावणीस राहिलो ते समई चर्मेलीवर मथुरेकडे गेलो तेव्हा आंताजीपंती बाबुराऊ सामराज याचे साक्षीने करार केला की साल मजकुरी तुमचा कजिया घरातील घरातच वारू ये गोष्टीस साक्ष आहेत. पुढे ते देशास गेले तेव्हा मजकूर करावा तर आमचे फौजेने बखेडा केला. आम्हास आनकूल पडले नाही. मागें त्याच्या कमाविसदारानी दाहा हजार रुो करार करून गेले. अंताजी-पंताची पत्रे पाठऊन देतो. त्यास त्यानी स्वामीजवळ काये समजाऊन पत्रे फजीत पत्रे पाठविली. बरे आसो त्यास सर्व गोष्टी साधून आल्या आहेत. आम्ही * * * * * * जाले खरे होऊ तेव्हाच खरे. सेवेसी

¶*Vithal Shivdev reports a complaint to the Peshwa against Antaji Manakeshvar.*

No. 56] [*About 1750*

[पहिले चार बंद गाहाळ.]

९

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. व कमर्दीखानाच्या पुत्राच्या ज्यांच्या ज्यांच्या चाकरीस फौज पाठवीत असतात व त्यांची चाकरी रात्रदिवस बटकीचे काम पडिले तेहि करीतच

---

१ अंताजी माणकेश्वराचा हस्तक उपनांव अत्रे. + पत्र अंताजी माणकेश्वराचें.

असतो. त्यानी अंतरवेदीत च्यारसे स्वार मागितले तिकडेहि त्यांचा मामला भारी आहे. तिकडे च्यारसें स्वार पाठविले आहेत व दों चौ जागा उमरावाकडे हमेशा चाकरीस फौज पाठवीत असतात तिकडे जातो. येके दिवसीं घोड्यावरील जीन उतरत नाही. रात्रीहि चौकीची फौज जीन असतात. इतके गोस्टीचेहि प्रयोजन काये परंतु यानीं दीड हजार स्वार गैरसनदी ठेविलें आणि अद्याप त्याचा येक रुपया देत नाही. आम्हास कोठे परभारे कोणासी बोलोन फौजाच्या खर्चाची जागा करू देत नाही. चाकरी तरी सर्वांची आम्हापासून करवितात मग ते जाणत व त्यांचे कर्म जाणे. येवढी माहागाई खाऊन येवढी चाकरी पातशाहा वजीर व मीरबक्षी यांची करून आमचा पैका बुडतो यैसे नाही. स्वामी म्हणतील कीं यांजला दीड हजार फौजेच्या कबजापुरता पैका वजीर यापासी वगैरे मेळऊन घेतला नाही, आम्हापासीच रांडगाऱ्हाणे सांगावयास आले. तरी पैका दिडा हजारा फौजेच्या कबजापुरता येक वजीरच पहिल्या दिवसापासून आम्हास द्यावयास तयार परंतु आम्ही येकाचे आज्ञाधारक. ते चाकरीस सर्वांच्या पाठवितील परंतु कोणासी आम्हास बोलावयास पांचा रुपयांचा मात्र संमध नाही. याजकरिता उघडून लिहीतो. सरकारांतहि कवडी जमा होणार नाही. फौजेचा पैका मात्र स्वामीस देणे येईल. चाकरीस कांहीं कोताई नाही. रात्रंदिवस जेथें त्यांस पाठवणें असेल तेथे जाऊन चाकरी करितों. पुढे जैसी आज्ञा येईल तैसीच वर्तणूक करून अखेरसालपावेतो चाकरी करून. आम्हास कारभाराची आवड नाहीं. स्वामी म्हणतील कीं येवढी दिलींत पातशाहा वजीर तमाम आमीर यांची चाकरी करून पैका मागावयास पुणियास आले तरी पैका येणे तो ज्याच्या घरांत येणे त्यांच्या घरांत येतच असेल. आमचे कोणाचे दर्शनहि होऊ देत नाहीं. कोणाचे कारभारी आमच्या घरास आले काही खर्चास घेणे म्हणऊन बोलिले तरी ते दिवसीं कलागतीस येऊन फिर्यादी लिहावयास तयार व त्यांस सांगावे जे हे चाकर आमचे यासी तुम्हासी समंध काय आमचे आम्हासी बोलणे. फौज माझी आहे त्याजवरून आतां कोण्ही येत नाही. वजिरानी मात्र येवढी चाकरी सांगितली याचेहि काये होईल ते पाहावें. येवढी तऱ्ही आमची चाकरी खरी करून स्वामीनी दाखवावी आण वजिरास आमची मालुमात फारसी घालून येक पत्र पाठवावे व आम्हास येक पत्र साफ लिहिल्या मजकुराप्रा पाठवावे. हेहि न आले तरी आमची पत वारली आथवा कोणीहि सरदार लाहाण मोठा स्वामीनी येथे ठेविला तरी त्याची पत राहाणार नाही. तकलुपी गोस्टी दिसेल यात काही सरदाराचा वकिलाचा कोणाचाहि गिला नाही, वजिरास पत्र त्यास रक्षणेची सनद चितात असेल ते नाव ल्याहावे व वजिरास येक सेवकाचे मालुमातीचे पत्र ल्याहावे जे, अंताजीपती पाच सात वेला

तुमची तारीफ भाऊपणियाची ममतेची फारच लिहिली, येवढेमात्र ल्याहावे, वरकड काही कोणाचा काडीचा गुंता नाही. यातहि अंतर जाले तरी येथील पत सर्व वारलीसी जाणा (अपूर्ण)

¶*Antaji Manakeshvar to Bhausaheb complaining that he has not been remunerated in proportion to the service that he has to render when it is asked for by the Vazir and others in the Imperial court. He therefore requests Bhausaheb to recommend his services to the Vazir and to ask him to reward them properly. The first five sheets of the letter are not forthcoming.*

No. 57] [*16-1-1750*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
साहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ १८ माहे सफर मुकाम नजीक ग्वालरी जाणून स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. पूर्वी सेवेसी पत्र पाठविली होती. त्यात* * * * उतर छ ९ मोहरमची आली त्यांत माहाराज स्वामीचे वर्तमान लिहिले. आज्ञा केली की हे वर्तमान येकून लोक लबाडी करितील तर त्यांचे पारपत्य करून सलाबत राखून उतम प्रकारे राहाणे. आज्ञेप्रमाणे स्वामीचे पुण्य करून इकडे बंदोबस्त उतम आहे. वर्तमान त्या लोकाकडे आम्हापूर्वी तिकडील वर्तमान व पातशाहा बाहेर निघाले यामुले बहुताच्या चितात लबाडी करावी येसे होते परंतु फौज होती यामुलें लबाडी चालली नाही आणि पातशाहा छ २१ रोजी दिलीस दाखल जाले. ये प्रांतीचे वर्तमान सर्व श्रीमंत नाना स्वामीचे पत्री आहे त्या वरून कळो येईल. दिलीचे कचे वर्तमान फौजदारीच्या इजारियाकरिता कृष्णाप्रसाद कायेत राजश्री बापूजी माहादेव याजकडे पाठविला आहे. त्याने कचे वर्तमान पारसी पत्र पाठविले तेच सेवेसी (पाठ)विले आहे ते पावेल. रोजमरियाकरिता फार वोढ जाली आहे. मुलूक लुटावयास जागा नाही. ग्वालर प्रांतीचा येवज मुबदला जाला तो हिसेब आलाहिदा सेवेसी पाठविला आहे. याउपर बेगमी करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev to Bhausaheb saying that there was some apprehension of a rising in the province on receipt of the sad news of Shahu's death, but it was checked by his army. He further sends to the addressee a communication received by him from Delhi and asks for more money.*

3551

No. 58] [*28-1-1750*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ३० माहे सफर मुकाम नजीक ग्वालेर हवेली पावेतों येथास्तित आसे. यानंतर पूर्वी येक दोन वेला सेवेसी विनंतीपत्रें पाठविलीं त्यांत साद्यंत मजकूर लिहिला आहे तो ध्यानांत आला आसेल. लाहर सर जालियाउपर ते प्रांती प्रज्यन्य विशेष. चिखलाचे कामकाज चालेना याजकरिता मामलेदारांच्या मते कीं येके जागा दोन महिनें गुजरानी करावी. दसरा जालियाउपरी कामकाज करणें ते करावें. रिकामेच दोन महिने राहावें हे उतम नाही हा आर्थ ध्यानांत आणून झांसीस रा। चिमणाजी वामन याजपासी हजार फौज ठेऊन तिकडील बंदोबस्त करून आम्ही नरवर प्रांतास आलो. नरवर प्रांतीच्या गळ्या कुल सालवाई, लोहगड, चिनोर सिवाये घेऊन आलापूर, सोमावली, जतावर, दंडरोलीची मामलीयेत चुकऊन भदावरच्या सरदेस गेलो. नरवर प्रांती रा। गोविंदराऊ सिवदेव पांच सातसे स्वार व ये प्रांतीचे हरसल जमा करून चिनोरास मोर्चे लविले आहेत. दो चौ रोजानीं चिनोरची गढी फते होईल. हा मजकूर कार्तिके पोर्णिमेपरियेत केला. तो दसरा जालियानंतर रा। चिमणाजी वामन झांसीहून कूच करून त्याची फौज आमची हजार फौज होती ते यैसी घेऊन कछवावारेंत सुढारेस मोर्चे लाविले. आम्हांकडे पत्रें आलीं. आंम्ही कूच भदावरचे सरदेनें करून त्यास सामील जालों. पुसी पौर्णिमेपावेतों सिकरी, सुढार वगैरे पाच सात गळ्या घेतल्या. हरसिंगराऊ वगैरे तालुक्याच्या गळ्या कुल पाडितों. येक दोन गळ्या [पुढील एक नंबर २ चा बंद गहाळ] हवावें रा। चिमणाजी वामनहि येतील. यैसे जिकडे काम पडल तिकडे करून स्वामींच्या प्रतापें कामकाज होणे ते होईल. वीस पंचवीस हजार फौज आली तऱ्ही मोहला ध्यावयासी अगाडी पिछाडी मारून जिकिस्त (?) करावयाची ते व्हावयासी स्वामींचा प्रताप समर्थ आहे. ये प्रांती राहावें तेव्हा रोजमरा लस्करास दिल्हा पाहिजे. दरमाहा पोटास चालीस हजार रुा। पाहिजेत. पोटाची बेगमी व इकडील सार्वभौमाकडील राह तुटलियाउपर काम काये करावे याची तजवीज करणार स्वामी धणी आहेत. छ मारी दिलीची पत्रें आलीं. सैद सलाबतखां रजवाडियाकडे गेले होते ते पातशाहानीं बोलाविले याजकरितां जाटाचे सरदेने जात होता. जाटाचा मुलक मारला सबब जाटांचे त्याचे जुझ जालें. सैदाचें फौजेनें काही सिकस्त खादली. पुढें कूच करून गेले. बंगसाचा मुलूक

3552

दरोबस्त घेतला. वजिरानी नवलरायाचे स्वाधीन केला. येमुनपावेतों येमुनागंगामध्यें अमल त्यांचा बसला. पातशाहाचें कूच दोन कोस दिलीकडे जालें. पातशाहास पुत्र जाला. कोलजिलेसरावर चालीस मुकाम जाले. शादीदी उतम प्रकारें केली. दिलींत मोगल कमरदीखानाचें पुत्र वगैरे यानी फौजा ठेविल्या सबब किल्यांत फितूर येकोन पातशाहास जावेसे जालें. परंतु वजिराची जबरदस्ती पातशाहावर फार आहे. केवल लाच्यार आहेत. त्यानी द्यावे ते यार्णा भक्षावें. तेहि प्राप्त न जाले तर जोरा नाहीं. चितांत कष्टी आहेत. अंतर्यामी मोगलाकडे तुरानीकडे ममता आहे. होतां होईल तें पाहावें. पाताशाहास वजिरास आठादाहा कोसांचा तफावत आहे. पाताशाहा दिलीस गेले तर वजिरानीं पटण्याकडे जाऊन बंगल्याचा बंदोबस्त करावा येसे आहे. राण्याच्या मुलूकचाहि लक्षाप्रकारें बंदोवस्त करावी. विदित जाले पाहिजे. बहुत काये लिहिणें हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev explains to the Peshwa why he removed his forces to Jhansi and thence to Narvar. This move—he says—proved very opportune, as he was able to capture Chinore, Lahar and other minor posts. He further adds that Bangash has been deprived of his territory by the Vazir, who has posted Navalrai to administer the districts.*

No. 59] [*About 20-1-1750*

श्री

४ पुा राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसी

विज्ञापना. दिलीस पातशाही लस्करांत वकील कृष्णप्रसाद कायेत रा। बापूजी माहादेव यांजपासी पाठविला आहे. त्याणे साद्यंत दिलीकडील जाला मजकूर कचे वर्तमान लिहीले आहे त्याची नकल करून सेवेसी पाठविली आहे. च्यार घटिका आवकाश करून मनन केले पाहिजे. या वर्तमानास्तव आम्ही फौजेनसी कुवारीच्या काठी आहों. येथून सवलपूर पांच कोस आहे. जिकडे कामकाज पडेल तिकडे सर्व येकत्र होऊं. ये प्रांती फौजेची आवाई वीस हजार पावेतो आहे. स्वामीच्या प्रतापे फौजेचा दबा उतम प्रकारें आहे यामुळे बंदोवस्तास आंतर नाहीं. ताजाकलम चिनोरची गढी छ १९ सफरी घेतली. राहाता येक साल्बाई मात्र राहिली. तेहि विचारें हस्तगत होईल. फौजेस रोजमरियाची नेमणूक आस्विनआखेरापासून नाहीं. स्वामीच्या चितात आले आसेल कीं, ग्वालेरीचा यैवज आहे, त्यास नालबंदीस लक्षा रुाची बरात व खानगीस नेमणूक नवती व पहिले देणे येसे

दोन आडीच लाख पावेतो यैवज लागला. या खेरीज मुल्क सोडविला यामुळे सिबंदी वगैरे व तोफेचा खर्च यैसे लागले. येकसाला मामलत नरवरकराकडे राहिली. त्याचे कांही आले नाही यामुळे पोटास यैवज होत नाही हा अर्थ ध्यानास आणून बेगमी करून पाठवणार स्वामी धणी आहेत. [१]राजश्री बापूजी बाजीराव काल्पीस आहेत. राजश्री चिमणाजी वामन रा॥ नारो शंकर याजकडील कछवाधारेत दो हजारानसी बारा पंधरा कोसावर आहेत. राजश्री सिवरामपंत दि॥ गोविंद बलाल याजपासी राजश्री रामचंद्रपंताची फौज हजारपर्यंत आहे यैसे संनिध दाहा हजार फौज आहे. कार्य पडल्यास सर्वत्र येकत्र होऊन स्वामीचे पुण्य समर्थ आहे तों काही चिंता नाही. सतरुसीकडील वर्तमान येकून रांगडे लोक दाह करावयास पाहता (त) सर्वांचे वकील दिलीस गेले परंतु इकडे प्रस्तुत बंदोबस्त असे. सेवेसी शृत होये विज्ञाप्ती.

¶*Vithal Shivdev sends for the Peshwa's perusal a communication that he had received from Krishnaprasad Kayeth regarding the affairs at Delhi and moreover informs him of the capture of Chinore and other places. He asks for money for his army and incidentally mentions the movements of Bapuji Bajirao, Chimnaji Vaman, Shivrampant and others.*

No. 60] [*Jan. 1750*

श्री

पु॥[+] श्रीमंत स्वामीचे शेवेसी

आरूण येथे मोर्चे होते. तो आरुणाची गढी फते जाली. जागा मातबर. नरवरकराची येक दोन स्थले मातबर त्यातील आरूण गढी मातबर. खंदक रेवणी विचारे करून सुटली. फिरोन घ्यावयास गेलो तर महाप्रेत्न लागेल यैसे दिसोन आले. आणि तमाम रयेत येऊन रुजू जाली की ठाणी न सोडणे. मागील पैका व पेस्तर सालचा दुसाला पैका आम्ही पैदा करून देऊ परंतु आली स्थले न सोडणे. त्याखेरीज आणिख दोन तीन स्थले सुटली. पुढे सुटणार. आताच आवकाश असता तर झाडून मुल्क सोडविती परंतु या प्रांतास येणे जाले. परंतु ते प्रांती रा॥ गोविंदराऊ सिवदेव पांच सासे स्वार पांच सातसे बरकंदाजानसी त्या या प्रांती गढीस मोर्चे चिनोरास लाऊन बसले आहेत. मुलुक हाताखाले घेऊ रयेत लगामी लाविली. आम्ही दसरा जालियावर राहिल्या गढ्या घेऊ म्हणजे नरवरचा मुल्क सुटला. राजश्री मल्हारबाची आज्ञा मोडून ठाणी न दिल्ही ये गोष्टीचा त्यास विशाद आला असेल. कदाचित त्यांचे मनोधारण रक्षणेवर स्वामीनी

---

१ पत्र विठ्ठल शिवदेवाचें. + पत्र विठ्ठल शिवदेवाचें.

आज्ञा करावी. स्थलें सोडून देऊ. पैका वेऊ. परंतु जागे समयावर येतात याकरिता विनंती लिहिली असे. विशेष फौजेचा मजकूर स्वामींनी सालमजकुरी फौज निसबतीस दिल्ही व गुदस्ताची व खासगत पतकदेखील च्यार हजार स्वार गणतीस लागले परंतु आटोले वगैरे यानी आमचे दरबारी चाकरी फारसी न केली. बेकैदी आपण उठोन गेले. फौजेतील चाकर बारगीर माणसे कितेका लोकाचा गल्हाटा जाला. शाहाजी आटोले व बाजी आटोले, सिवाजी गाढवे याचे पारपत्ये जाले तर उतम. नाही तर छावणीचा बंद राहात नाही. कांकडे चाकर न ठेवावे. पतकात राहूं देऊ नयेत हे विज्ञापि.

¶*Vithal Shivdev reports to the Peshwa the capture of the fort of Arun near Narvar and mentions the efforts that he made to capture other posts. He further asks the Peshwa to punish the Atoles and Gadhaves for breaches of military discipline.*

No. 61] [*11-8-1750?*

श्रीमोरया

शेंवेसी मलारजी होळकर कृतानेक दंडवत विनंती विज्ञापना. आम्ही वाफगांवीहून श्रावण वदी ९ शुक्रवारी कूच केले ते वोडनदीवर मुकाम केला. मजल दरमजल माळवा प्रांती जावे लागते त्यासी राजश्री दामोदरपंताची भेट मुकाम मजकुरी जाहाली. यैसियासी स्वमीच्या आज्ञेस आले आहेत त्यासी मारनिलेस पुढें रवाना करावे लागते. कितेक कामकाज मनसुबियाची आहेत त्यासी साहेबी कृपाद्द होऊन येक दिवस गुंता न करिता रवानगी केली पाहिजे. शेंवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Malharrao Holkar leaves Vaphgaon and proceeds to Malwa.*

No. 62] [1751

श्री

राजश्री गंगा (पुढे जागा मोकळी)

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री जयाजी सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष.

राजश्री पांडुरंग सिवदेव पुरंधरे यांस नरवर प्रांतीची घासदाण्याची व नजरेची कमाविस साल गुदस्ता श्रीमंतानी सांगून पाठविले परंतु नरवरकारानी हरामजादगी करून गुदस्त व साल मजकुरी येक रुपया वसूल दिल्हा नाही. याकरितां श्रीमंतानीहि याजविशीं आज्ञा केली आहे कीं फौजेचा शह पोहचहून यांचा अमल चाले पैका वसूल होये ते करणे म्हणून केली आहे, येविशी राजश्री मल्हारजी होलकर काका यांस लिहिले आहे तरी तुमचे आगमन अगोदर नरवर प्रांते जाहाले तरी नरवर-करास शह पोहचे पैका वसुलांत दुसाला येई ते करिजे. आमचेहि येणे लौकरीच होईल. अत:पर विलंब नाही.

¶*Jayaji Sindia writes that the Raja of Narvar has not paid a single rupee of his dues and therefore asks the addressee (Gangoba Chandrachud) to proceed against his province and to force him to do so.*

No. 63] [*Jan. 1751*

श्री

श्रीसांबमूर्ती

सेवेसी विज्ञापना ऐसीजे. आज्ञापत्र सादर जालें ते पाऊन मस्तकी वंदिले. ऐसियास आज रविवारी लमकना नजीक सोनारीहून कूच करून नजीक झासी सिगऱ्याचे नाल्यावरी मुकाम जाला. बारा कोसाची मजल जाली. प्रहर रात्र-पावेतो झाडून लष्कर येईल याजकरितां आज रविवारी भेटीचा योग न घडला. उदईक सोमवारी सरदारासहवर्तमान सेवेसी येतो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer gives his route and proposed halting places. The letter is perhaps from Sindia's camp.*

No. 64] [*7-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक हरबाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापणा ऐसी जे. येथील कुषल तागायत छ २१ माहे रबिलावल स्वामीचे कृपाविलोकणेकरून येथास्थित असे. यानंतर राजकी वर्तमान तरी राजश्री मल्हाररावजी याणी राजश्री माधोसिंगास जेनगरांत स्तापिलें होतें. त्यास त्याणी मल्हाररावजीसी बदमामली केली. दीड

हजार माणूस मारले. आतां जेनगरापासोन बारा कोसावर राहिले आहेत. स्वामीचे पुण्यप्रतापेकरून माधोसिंगाचे पारपत्य होईल म्हणोन वर्तमान आले. विदित होय. दुसरे परगणे जैनाबाद वगैरे माहाल त्याचे जमीच्या जावसालास खैरखांजाणी राजश्री मानाजी निकम यांकडे पाठविले आहे. येका दो रोजाणी कार्य तह पडेल तो सेवेसी लिहून. राजश्री चंद्रभानजी ठाकूर याणी सेवेसीं विनंतीपत्र लिहिले आहे त्यावरून विदित होईल. विदित होय हे विज्ञप्ति.

¶*Harbaji Ram reports that Malhar Rao, who had helped Madhosing to the gadi of Jainagar, was surprised and lost nearly two thousand men.*

No. 65] [*12-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ साहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती. शेवक हरि विठल साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत माघ वद्य त्रयोदशी मुकाम प्रांत जयनगर स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. या प्रांतीचें वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिलें होतें. तदनंतर राजश्री जयाजी सिंदे पुस वद्य शष्टीस जयनगरचे मुकामी येऊन उभयेतां सरदार येकत्र जहाले. त्यास खंडणीचा कारभार पूर्वी चुकला होता. मुलुकापैकीं तिजाई अगर चवथाई वाटणी लिहून घ्यावी हा प्रसंग नूतन घातला, तन्मुळें रांगडे रजपूत लोक व राजा आजुरदा होतो. त्यास लष्करची अमदानी शाहारांत विशेष असे. राजा याचा स्थापित यास्तव बेवसवसा शाहार व देव पाहावयास व सवद्या सुतास उंटें घोडीं घ्यावयास मातबर लोक वगैरे जात असतां पुस वद्य दशमीस लष्करचे लोकांसी व शाहारचे लोकांसी कटकट होऊन पांच सासें माणूस मारले गेलें, सामानसुधां साहारांत गेलें होतें तितके विलेस लागले. याजकरितां याचा त्याचा बिघाड जाला. आठ दिवसपर्यंत विरोधांत गोष्ट होती, मागती वकील दरम्यान पडोन खंडणीचा निकाल मुदत करार पहिला जाला होता त्याप्रमाणें हवालेटवाले करून याचें कूच करविलें. परंतु किलाफ परस्परें चित्तांत वाढला आहे. प्रस्तुत प्रसंगानरूप सौरश्य जाहाले परंतु भेटी जाल्या नाहीं. तदनंतर वजिराकडून राजश्री राम नारायण दिवाण आलें. त्याची बोली पनास ठरली आहे. परंतु वजिराच्या यांच्या भेटी होऊन पठाणाचे पारपत्य होईल तेव्हां बोलीपैकीं हातास येणे तें येईल. वजीर हा कालवर दिलीस आहे. दुरानी व पातशाहा येक-विचारे आहेत. पठाणाचा वकील पातशाहा जवली बसला आहे. बहुधा वजिराचे

निवणे दिलीहून होणार नाहीं येसा प्रसंग बातमीवरून दिसतो. सरदार दरमजल आगऱ्यास जातात. समागमे वजिराचे दिवाण आहेत. पुढें होईल वर्तमान ते सेवेसी लिहू. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter from Jainagar to Bhausaheb informing him that the Raja (Madhosing) being exasperated with the ever-increasing demands of the Marathas took them unawares one morning and put about five hundred to the sword. Though later on an understanding was patched up the relations between the two have lost the old cordiality. The two sardars are reported to be proceeding to the North to the succour of the Vazir.*

No. 66] [*4-2-1749*

श्रीशंकर

राजश्री जयाजी सिंदे आपा

गोसांवी यासी

ॐ श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सदाशिव बलाल कृतानेक आसीर्वाद. येथील कुशल ताा माहो वदी १३ शिवरात्र येथास्थित असे. गोसावियाचे कृपेने येथे फरुखाबादेस आलो. नवाबाचे तरफेने दोन सरदार मातबर येमुनापावेतो दोशा राउतानसी सामोरे आले होते. आम्ही पनास साठ राऊत निशान नगारा करून येथें आलो. दो कोसावर प्रधानाचा भाऊ व व्याही आणिक सामोरे आले. नवाबाची भेटी बहुत उतमप्रकारे उठोन भेटले. सिष्टाचार गोष्टी परस्परे जाल्या. आता गोसावी यानी मागती थैली नवाबास व महदूदखान कुल अखतियारी आहे त्यास यैसी दोन पत्रे थैलीत घालून पाठविली पाहिजेत व गोसावी यानी तेजगड फते केलियावर आणिक दतिया वगैरे कार्य फैसल जाले व पुढे स्वारी कोण प्रांती जाणार हे लिहिले पाा. बहुत काये लिहिणे ? लोभ दुणाविला पाा हे आसीर्वाद.

¶*Sadashiv Ballal to Jayapa Sindia recounting how well he was received by the Nawab and his sardars.*

No. 67] [*9-2-175*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री भाऊसाहेब

स्वामीचे सेवेसी

(विनं)ती सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. सेवकाचें वर्तमान ताा माघ वद्य १० दशमी मुकाम चिन्होली टेकमपूर प्रांत ग्वालियेर

येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों. त्यास श्रावणमास भाद्रपदमास तों मार्गींच पर्जन्यकालचे लागले. आस्विनमासीं नवरात्रांत राजश्री लक्ष्मण शंकर यांजपासीं आलों. त्यास आस्विन, कार्तिक, मार्गेस्वर, पौष, माघमास पांच महिने रा लक्ष्मण शंकर यांजपासीं यांच्या मामलियाच्या बंदोबस्तात होतों. तों च्यार महिने राजश्री मल्हारजीबावा होलकर सुभेदार यांचीं पत्रें आम्हास तीन आलीं. त्यांत मजकूर हाच कीं श्रीमंताच्या मालवर कार्यास आम्ही जातों तरी तुम्ही आ * * * * * फौजेनसीं सत्वर येणे. याचप्रमाणे रा लक्षुमण शंकर * * * * पत्रें येत गेली कीं तुम्ही आपल्या घरसामानानसी * * * * * त्या मामलियांत राहून रा अंताजी माणकेश्वर यां(ची र)वानगी सत्वर करणें. त्याप्रमाणें आम्ही यासी निरोप (मागितला) परंतु यानीं न दिल्हा. मग यांच्याच मामल्यित फिरत फिरत कालपीस या समागमे पौष मासीं गेलों. तेथेंहि दीड महिना राहिलों. तेथें कोणे गोष्टीचा (लक्ष्मण)पंताच्या मामल्याचा बंदोबस्त व्हावयाचा (राहि)ला नाहीं. तो माघ मासी कालपीचे मुकामी राजश्री सुभेदार व जयाजी आपा सिंदे येकत्र होऊन पत्रें पाठविलीं (त्यात) साफ लिहिले कीं तुम्हांस तीन पत्रें पाठविलीं अ(सतां) तुम्ही न आलेस. प्रस्तुत जयनगरचा बंदोबस्त करून पठाणाचे लढाईस जातों तरी जयेनगरावरी सत्वर सामील होणे अथवा आम्ही इकडून दिलीस पातशाहाच्या भेटीस येऊं तेथें तुम्ही सामील होणे. खावंदानी तुमच्या सरदारिया वाढविल्या त्या कोणत्या कार्यासाठीं? आजी पठाणाची लढाई. भारी लाखों फौजेची लढाई. त्यांत श्रीमंतांचाहि कार्यभाग भारीच आहे. याउपरी तुम्ही आपले फौजेनिसी न आलेस तरी पुढें आम्ही समजोन घेऊन यैसे पत्र चौथें आले. व त्याच पत्रासमागमे श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचें आज्ञापत्र आलें तें सरदारानींच पाठऊन दिल्हें. त्यांतहि आज्ञा कीं राजश्री मल्हारजी होलकर (ज्या)प्रमाणे आज्ञा करितील त्याप्रमाणे वर्तणूक करणे * * श्रीमंतांचेंहि आज्ञापत्र आलें. दुसरें लक्ष्मणपंता * * पत्रें पाठविलीं कीं आम्ही पंनास हजार फौजेनशी या * * असतां पातशाहा वजीर सर्व येकत्र असतां * * * मामल्यांत फितूर कोण करितो त्याहि * * * चे खाजगत सामान तुम्हाजवल आहेच तरी सत्वर अंताजीपंताची बिदा करणे. तें (पत्र) आम्ही रा लक्ष्मण शंकर यांस दाखविलें कीं याउपरी श्रीमंतांचेंहि पत्र आलें दुसरें उभयता सरदाराचे आलें त्यांत त्यानी साफच लिहिले जे ये समई लढाईचा प्रसंग भारी असतां तुम्ही येत नाही तरी पुढें समजोन घेऊन. यैसीं पत्रें आलीं असतां आमची राहावयाची कुदरत काय? समर्थ सरदार यांचा दावा पदरी घेतां परवडत नाहीं. त्याहीमध्यें आम्ही गरीब माणूस पुढें लढाई भारी. आमचे पदरी फौज. आम्ही याउपरी

गेलियानें उतम आहे. राहिल्याने परिणा(म) उतम नाही. तेव्हां मागती रा लक्ष्मणपंतास विनंती केली की निरोप देणे. तें कांही लक्ष्मणपंताच्या चितास नयेसें जालें, तें माघ शुध १५ पौर्णिमा कालपीस पत्रे मागती सरदारांचीं आलीं कीं पुन्हा राजे माधो(सिं)ग हाडे व राणा येकत्र जाले. त्यांचा आमचा बिघाड * * * हजार पांचसें माणूस लस्करचें मेले. पुढे बिघा(डा)वरीच पडिला आहे तरी आधी स्वार होणे मग पत्र (वाचणें) याप्रमाणे पत्र आलें तेव्हा माघ वद्य १ साफ रा लक्ष्मणपंतास सांगोन पाठविलें कीं आपणास साफ राहवयासी बनत नाहीं आणि कूच केले. यांच्या * * यात कोठें काडी इतकें काम व्हावयाचे राहिले (नाही) कोठें काडी इतकी धामधूम साफ नाही तेव्हां * * साफच कूच करून चालिलों तेव्हां लक्ष्मणपं(त) * * हावयासी आले परंतु आम्हास राहावयासी * * पुरेना तेव्हां स्वामीशब्द लागेल याजकरितां आपले फौजेपैकी रा लक्ष्मणपंताच्या चाकरीवरी माहालो माहाल त्यांचे आज्ञेप्रमाणें स्वार येणेप्रमाणे ठेविले आणि आम्ही दरकूच इकडे आलों. स्वार तपसीलवार

२०० पागा रावो यशवंतराऊ व थोरात व रखमाजी जाधव स्वार दोनसे धामोणी प्रांते गोपाल केशव कमाविसदार यांजकडे दिल्हे

५० पा मोहबा खंडो पुरुषोत्तम कमाविसदार यांजपासी सोयरोजी थोरात वगैरे

२५ पा उचाड माधवराऊ वेंकटेश कमाविसदार यांजकडे शामराऊ रामचंद्र स्वार

२५ पा हमीरपूर कृष्णाजी गोपाल कमाविसदार यांजकडे शामराऊ सोमवंसी स्वार

२५ प्रयागास रा लक्ष्मणपंती काही कार्यानिमित्य किलेदाराकडे पाठविले लक्ष्मण सिवदेव स्वार

२५ पा गडबाई मल्हार आंबाजी कमाविसदार यांजकडे चिमाजी बावाजी व गोविंदराऊ बलाल स्वार

५० पा सिराज रावो पुरुषोत्तम कमाविसदार याजकडे येणेप्रो स्वार ठेविले

२५ माहादजी जाधव व सिवजी गायेकवाड

२५ बाबूराऊ शामराज यांजकडील पागेचे स्वार

५०

४००

येणेप्रमाणे च्यारसें स्वार आमचे फौजेपैकी (जा)गा जागा माहालोमाहल लक्ष्मणपंतानी मागितले त्याप्रमाणे स्वार ठेऊन त्यांचा रोचा रोजमरामात्र नेमून

दिल्हा. गणती कमाविसदारांस सर्वांनी देऊन कमाविसदारांच्या गणतीची कबजें वजिनस घेतलीं आहेत. याखेरीज त्यांचे खासगत सामान काये लोक असतील ते सुखरूप असोत. यैसे करून आम्ही कूच दरकूच थोर थोर म(जली) करून मुकाम मजकूर यास आलों. येथून दरकूच (क) रोलीपासीं अथवा ढवलपुरापासीं चंमेल नदीचा (घा)ट उतरोन सुरजमल जाटाच्या मुलुकांतून जयनगरास सरदारांस आजीपासून सातवे रोजी दाख(ल) होतों. याप्रमाणे वर्तमान आम्हाकडील जालें. आम्ही इ(क)डे कूच केले ते समई रा। लक्ष्मणपंती स्वामीकडे दो(न) जोड्या आमच्या फिर्यादेच्या रवाना आम्हादेखतांच केल्या. त्यात तुफाने पदरची जोडून नाना प्रकारे भारथें लिहिलीं ती सेवेसी पावलीच असतील. स्वामी त्याच्या तुफानाच्या गोष्टी यैकोन सेवकावरी इतराजी करितील याजकरिता जाले वर्तमान सेवेसी लिहिलें आहे जरीकरितां यांच्या मामलियांत काम काडीइतकें व्हावयाचें राहिलें असिलें तरी आम्ही गुन्हेगार व च्यारसें स्वार जागां जागां देऊन आलों. यात येक स्वार कमी असले तरी आम्ही सरकारचे गुन्हेगार परंतु इतक्या गोष्टी कांही लक्ष्मणपंत न लिहि(त)* * शंभर तुफाने घेऊन सेवेसी फिर्यादी लिहितील तरी श्रीमंतांचेंहि आज्ञापत्रहि होते व सरदारावरी (म)सलत भारी आहे व खुलून सरदारानी लिहिलें आहे, तेव्हां आम्ही कैसें राहावें. म्हणऊन गेलों. रा। धोंडो दत्तात्रय यास आम्ही बोलाविलें परंतु ते कांही न आले. (का)म तों तिळमात्र इकडे नाही. सेवेसी सर्व वर्तमान कळावें. सविस्तर उतराची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. साताराचे मुकामीं कसबे ग्वालियेरी येथील फौजदारीची सनद आम्हास विठलपंतास निमेनिम प्रमाण दिल्हीं आसतां येंदा विठल सिवदेव देशास येऊन श्रीमंतापासी भीड खर्च करून आपणच सत * * कसबियाची फौजदारीची सनद घेतली तेव्हा शहर * जमिनदारा दरोबस्त त्याचे लगामी लागला आमचा मुलुकात आपमान जाला. स्वामी त्यांचे आमचे मायबाप आहेत. थोर पुत्र लाहाण पुत्र मायेबापास सारखेच असता त्याची भीड भारी, त्याचे वसिले भारी, आमचा वसिला स्वामीचे पाये आहेत. माझा आपमान न करिता कसबे ग्वाली-येरीची फौजदारी जैसा मुकासा (निमे)निमे आहे तैसी निमे निमे फौजदारीहि असी द्यावी. स्वामीनी आभिमान सोडिला तरी सहजच आम्ही मरतो. आमचा विलाज काये आहे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Mankeshwar on his way to join Sindia and Holkar entreats the Bhau not to entertain complaints against him from Lakshman Shankar.*

3561

No. 68] [*Recd. 12-1-1753*

ळ ६ रविलोवल पौ

श्रीशंकर प्रा

श्रीसकलगुणालकर्ण अखंडितलक्ष्मीकमला-
अलंकृत राजमान्ये राजश्री भगवंतराव
अमात्य व तथा राजश्री शिवरा(म)पंत
स्वामीचे सेवेसी

पोष्ये जगंनाथराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशाळ वस्तव्य जयपूर जाणून स्वकीये कुशल लेख(न) करित गेले पाहिजे विशेष. आपण श्रीसवाईजीस व आम्हास पत्रे पाठविली ते पावली. आपले पत्र श्रीसवाईजीस पावते केले. उतर पाठविले आहे त्यावरून कळेल. राजकी प्रसंग तर दिलीहून वजिराचे तरफेने महमदअलीबेग मोगल श्रीसवाईजीस टिका घेऊन आला. पादशाहाची ताकीद आहे जे जलद कूच करून येणे. सवाईजी बखतसिंगाचे पुत्राची वाट पाहातात. तो अलियावर उभयेता मिळून हजर जातील. पादशाहास बाहीर काढावे अगर यास आलियावर सर्वत्र लाहाण थोर राज्यास बोलाऊ पाठवावे. मग मोठा मनसुबा करावा हा मनोरथ आहे वडोन येईल ते खरे. काबलेची पत्रे सवाईजीस आली जे नादरशाहाचा नातू शाहरुखमिर्जी लाख स्वारानसी कंधारेस पावला. पठाण नादरशाहाचा चाकर हरामखोरी करून कंधार व काबूल घेऊन बसला. त्यानी हे विचारले जे आमचा चाकर याजला मारून काढावे. सार्वभौमानी नादरशाहाचे नातास लिहिले आहे की तुम्ही तिकडून येणे. आमचे फौजा काबलचे रुखे येतील. हरामखोरास मारून घेणे. वजिराचा व नादरशाहाचे नाताचा जबाबसवाल असे बसलेबसल्याने वजीर मनसुबा वारतो. सार्वभौमाची माय मलकाजमानी वजिराचे वरास येऊन येक प्रहर येकांत केला. वजिरास साहेब येख्तीयार केले. वजिराचा व सवाईजीचा या दिवसांत घरोबा फारसा आहे. सुरजमल जाट दिलीत वजिराजवळ आहे. अंताजी माणकेश्वर दोन हजार स्वारानसी गड ग्वालेरचा कमाविसदार दिलीत आहे. पेशव्याचे वकिलाचे मारफतीने मुलाजमत केली. पठाणावर दबाव पडे मणून जवळ ठेवले असे. बखतसिंगाचा पुत्र बिजेसिंग चौ पांचा हजार स्वारानसी अजमेरचे आसपास आहे. तो आलियावर सवाईजी कूच करून दिलीस जातील. पादशाहाचे खास रुके वकिलाचे मारफतीने येतात. दक्षणेत सलाबतजंग व पेशवे या उभयेतामधे कलह जाहला तर दिलीस अगत्य जातील. गाजुदीखान सुबेदारी घेऊन गेले ते निवर्तले.

3562

मनसुबा तोंडघसी पडला. पुढे पेशवे काये मनसुबा करतात, (हे) न कळे. अणखी कितेक वर्तमान तीाा राजश्री बलवंतरावजींचे पत्रावरून विस्तार कळो येईल. भगवंतराव पिंगळे त्यांचा प्रसंग वारंवार लेखन (न?) करावा. होणार बलवतर. आपला उपाये काही नाही. बहुत काये लिहिणे कृपालोभ असू दीजे हे विनंती.

¶*Jaganath Krishna to Bhagvantrao and his brother Shivrampant, writing about the developments at Delhi in the Imperial court and the negotiations started by the Emperor with the grandson of Nadirshah in order to crush his (Nadirshah's) underling, Ahmedshah, who had turned traitor. The Emperor asks for help from Madhosing and Bakhatsing. (The Sawaiji referred to in this letter is Madhosing and not Ishwarsing.)*

No. 69] [*17-1-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक सिवराम भास्कर व रामचंद्र माहादेव मेहेंदळे साा नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ताा छ ११ माहे रबिलावल मुाा मळगा(व) प्राा निंबायेत आपल्या कृपावलोकनेकरून येथास्थित जाणून स्वकीये निजानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. तेणेकरून सेवकास संतोषाभिवृध होईल. यानंतर आज्ञा घेऊन स्वार जालो. ते पेमरास आलो. तेथे श्री मार्तंडकृपेन राजश्री दमाजीबावा समसेरबहादूर याच्या शरीरास भ्रम जाला होता तो निवारण जाला. तेथून कूच करून मजल दरमजल श्रीमंत राजश्री दादासाहेबांचा मुकाम कसबे खंदार येथे होता तेथे येऊन भेटी घेतली. राजश्री दमाजीबावास आरोग्यता जाली तेणेकरून श्रीमंत दादासाहेब बहुत संतोषी जाले. आपले पुणेकरून दमाजीबावास सावधता जाली. आपण त्याचे शरीरभावनेविसी काही चिंता सहसा न करावी. श्रीमंत दादासाहेबाचे आज्ञेत तत्तर आहेत. मळगावचा किला घेऊन ठाणे बसविले. पुढे गुजरात प्रांते जाऊन आमदाबादेचा उदेग करावा हा हेत श्रीमंताचा आहे. तोहि आपले पुण्यप्रतापतेजेकरून सिधीस जाईल. वरकड आम्ही सेवक येकनिष्ठ. सेवा करावी हेच जाणतो. स्वामीच्या चरणाव्यतिरिक्त आम्हास दुसरा आश्रये किमपि नाही. आमचे उर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. कृपावृधी निरंतर करावी हे विज्ञाप्ति.

¶*The news from Gujarat especially about Damaji's recovery from illness, the capture of the fort of Malgaon and his intention to capture Ahmedabad is communicated to the Peshwa.*

No. 70] [18-1-1753

श्री

श्रीमत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक विसाजी गोविंद साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ १२ रावल मुाा मलगाव प्राा निंबाइत कृपाद्रिष्टीकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विनंती. आज्ञा घेऊन आलो. त्यास राजश्री दमाजीबावा गाईकवाड समसेर-बाहादूर यासी श्रीपेमरास जाताच उतार पडला. त्याउपर श्रीमंत राजश्री दादा-साहेबाचे दर्शन जाल्यावर सर्व भ्रम दूर होऊन येकनिष्ठेने शेवेमध्ये रात्रंदिवस आहेत. साराऊश स्वामीच्या पुन्यप्रतापे सर्व उतम जाले. राजश्री दमाजी-बावाची येकनिष्ठता चरणारविंदीं निरंतर आहे. दुसरा पदार्थ किमपि जाणत नाही. शेवकाचे मनाची निशा पूर्ण आहे, आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा जे काहीच वर्तमान न लिहिले म्हणौन आज्ञा. त्यास दोन तीन पत्रे विस्तारे शेवेसी विनंती लिहिली आसे. त्यावरून श्रुत जालेच असेल. राा शिवराम भास्कर व राा रामचंद्रपंत येकनिष्ठपणें शेवेमध्ये आहेत. ऊर्जित करणार स्वामी धणी समर्थ आहेत. राजश्री दमाजीबावास चरणाखेरीज दुसरा उपाय नाही. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.

¶*Visaji Govind informs the Peshwa that Damaji Gaikwad has recovered from his sudden illness and is in full agreement with the Peshwa in all his undertakings.*

No. 71] [January 1753

श्रीम्हाळसाईश बंद ९

पुरवणी श्रीमंत स्वामीचे सेवेसी

विज्ञापना येसीजे. मजला आज्ञापत्र आले त्यांत आज्ञा केली की कारकुनासी रावता राखून दिनचर्येचे वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. तरी स्वामीच्या प्रतापे-कडून पूर्वीहि थोडाबहुत दंडक राजश्री मलारबासी व कारकुनासी होता. आता स्वामीच्या तेजप्रतापेकडून उतम जाला आहे. राजश्री मलारबा येकांती च्यार गोष्टी पु(स)णे ते पुसतात. आपल्या ममतेच्या गोष्टी सांगत आहेत. कारकून लोकाच्याहि मायेत सिरोन आहे. आणि जाले वर्तमान सेवेसी येकनिष्ठेने लिहितो. आम्ही येकनिष्ठेने वर्तनूक केली तर आमची आम्हास फलतकारास येईल. स्वामी श्री ईश्वराचा अवतार आहेत. आंतरसाक्ष आहेत. आम्हीही येकांती येकदोन वेला मकारपूरकास सांगितले. श्रीमंत ईस्वरी अवतार आहेत. यासी

येकनिष्ठेने जो कोण्ही वर्तला त्याचे कल्याण जाले. तुम्ही येकनिष्ठेकरून वर्तत आहे म्हणून तुम्हास येश येते. नाहीतर उदाजी पवार आहेत हे तुम्हादेखता कसे होते, आता कसे आहेत हे तुम्ही पाहातच आहे येसी उपमा दिल्ही. परंतु मकारपूरक येकनिष्ठेत आहे. त्यासी चयार लबाड सिकवितात याजकरिता बकवा मात्र करीत होता. आता पुणियाहून आल्यानंतर समाधानेच आहे. याचे मनात हेत आहे की दरशन घेऊन जावे. याजकरिता दिरंगकडून आहेत. बाहेर निवालियावर इबरत आहे आणि शेयहि दुतर्फा आहे याजकडे या प्रांतीचे किल्ले धोडप वगैरे बहुता किल्याचे आनुसंधान आली आहेत. सेवेसी श्रुत होये. राजश्री मलारजी होळकर यानी पत्र लिहिले आहे त्याजवरून अर्थ ध्यानात येईल. रा गंगाधरपंत व रामाजीपंत यानीहि सेवेसी पत्रे लिा आहेत. मी येथून वरचेवर पत्रे पुणियास लिहीत जातो. तेथून ते पत्रे लस्करात येत आसतील. त्यानी लिा होते की तुमची पत्रे येथे येतात ते लस्करात रवाना करितो. मजला आज्ञापत्र येत जाईल. त्यात सविस्तर वर्तमान लिहिणार स्वामी समर्थ आहेत. हे पुसतात की काये लिा आले, याजकरिता विनंती लिा आहे. वहुत काय लिहिणे ? कृपावृधि कीजे हे विज्ञापि. परंतु येथे वडीघडीचा विचार होतो. त्यात जे समई जैसे आढले तैसे सेवेसी लिा जाते हे विज्ञापि.

¶*Hari Narayan assures the Peshwa of Holkar's firm allegiance to him.*

No. 72] [*9-3-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान व राजश्री
भाऊसाहेब स्वामींचे शेवेसी

आज्ञाधारक विसाजी गोविंद साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती. ताा छ ३ जमादिलोवल मुाा आमदाबाद कृपादिष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विनंती. आज्ञा घेऊन आले त्यास श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे व राजश्री दमाजीबावा गाईकवाड समसेरबहादूर याची भेटी होऊन मजल दरमजल मलगावास येऊन मलगाव फते करून खानदेशांतून मजल दरमजल जगलेचे मार्गाने मुाा मारास आले. येथे मोर्चेबंदी केली आणि हला केली. त्यास दीडदोन हजार पर्यंत माणूस सिड्या लाऊन शहरात उतरले. परंतु दरवाजे मोकले न केले. शहर लुटिले जाईल म्हणौन अनमान केला सेवट हला नामोहरम जाली. कमालुदीखान बाबी जोर धरून शहरात आहे. सुरुंगाचे काम बाहीरून चालते. तो आतून

सुरुंग पाणी घालून येत्नास चुकत नाही. परंतु श्रीमंत राजश्री दादासाहेब याची तरतूद फार. तोफा व गरनाला हाई मार होत आहे. साराऊश स्वामीच्या पुन्य प्रतापे आविलंबच कार्यसिधी होईल. राजश्री पांडबाबावा व रा माहादाजी नारायेण फौजेनसी सोराट, काठेवाड, द्वारका प्रांते गेले आहेत. तिकडून मुलकाची बदोबस्ती करून लौकरच फिरणार आहेत. आमदाबाद शहर मोठ. कनिष्ट लक्ष फौज आसल तेव्हा सर्वत्र जागा मोरचेबंदी होईल. शेवकाने आल्या दिवसापासून पाच सात पत्रे शेवेसी तपसीलवार विनंतीपत्रे पाठविली. त्याचे प्रतिउतर आजतागाईत येकहि पत्राचे आले नाही. आमदाबाद हस्तगत होऊन ठाणेबंदीचा बंदोबस्त जाला म्हणजे द्वारकापर्यंत मुलूक सोटोन अमल बैसेल. स्वामीचे पुन्य थोर त्या योगेकडून सर्वांचे ऊर्जित व रयतीचे बरे होत आहे. राजश्री दमाजीबावा गाईकवाड समसेरबाहादूर येकनिष्टेने शेवेमध्ये आहेत. राजश्री सिवराम भास्कर व राजश्री रामचंद्र माहादेव निष्टापुरस्कर चरणारविंदी निरंतर आहेत. दुसरा पदार्थ किमपि जाणत नाही. ऊर्जित करणार साहेब धणी सर्वजाण आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Govind, writing from Ahmedabad, reports the progress of the siege to the Peshwa and the Bhausaheb.*

No. 73] [March 1753

श्री

सेवेसी विज्ञापना ऐसीजे. सांप्रत खासा स्वारी हिंदुस्तान प्रांते होणार म्हणोन * * आलें. ऐशास या गोष्टीचा निश्चय * * * स सेवकाचे विचारे स्वामींनी खामखा या प्रांते यावे. बाबीचा व रा दमाजी गायेकवाड यांचा कलह वाढला आहे. त्यास बाबीचे साहित्य करून गायेकवाड यास उठऊन लावावे. बाबीकडील च्यार हजार फौज समागमे घ्यावी * * * * गायेकवाड यांचा मनोदये स्वामीच्या पदरीं पडावें मही अलीक * * * दमाजीचा सरंजाम आहे, तो दरोबस्त आपल्यास द्यावा. आपले हाते सेवाचाकरी घ्यावी, मातबर कामे करून दाखवावी, आपलें उर्जित करून घ्यावें, च्यार मातबर सेवक स्वामीचे पदरीं आहेत, त्याप्रो वर्तणूक करावी याप्रो आहे. त्यास स्वामीचे येणे जाहाल्यास तेहि पदरी पडतील. च्यार रुपये सरकारांत या प्रांते मिलतील, मातबर कामकाजे होतील. तदोतर मेवाडांतून हिंदुस्तानात जावया * * इस येईल व खानदेश बागलाण महाल * * *

सरकारचा प्रांत यास फौजेचा उपसर्ग न लागतां बच्याव होईल ; याप्रा सेवकाचा मनोदये आहे. स्वामीचे मर्जीस आल्यास उतम आहे. येविसी आज्ञा ते सिरसा. उदेपूर येथोन सात मजली आहे. हिंदुस्तान प्रांते जावयास सोईचाच या * * * सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer is very glad to learn of Raghunathrao's march northwards and requests him to come to Gujarat and settle the differences between Damaji Gaikwad and Kamaluddin Khan Babi.*

No. 74] [*4-4-1753*

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
व राजश्री भाऊसाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक विसाजी गोविंद साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती. ताा चैत्र शुध १ मुाा अमदाबाद कृपाद्रिष्टीकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विनंती. अमदाबादकर कमालुदीखान बाबी याणी सलूख करून जाहागीर परगणे व देहे किरकोळी व सिबंदीखर्च थोडा बहुत घेऊन पुढे सरकारचे नौकरीस हजीर व्हावे ऐसा करार करून जाहागिरीचे परवाने करून घेतले आणि अमदाबाद श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे मर्जीप्रा सोडून पटणास जाऊन राहाणार. आद्यापि शहरात आपले हवेलीत आहे. भद्रामध्ये सरकारचे लोक गेले. स्वामीच्या पुन्यप्रतापे थोर कार्य श्रीमंत राजश्री दादासाहेबी केले. तैसेच मळगावचेहि जागा भारीच होती. साराऊश माहाराजाचे पुन्यप्रताप थोर त्यायोगे करून सर्व कार्यसिधी होत आहेत. वरकड आर्थ तर राजश्री दमाजीबावा गाईकवाड समसेरबाहादूर येकनिष्ट चरणापासी आहेत. दुसरा विचार किमपि जाणत नाही. रात्रंदिवस चरणाचा निजध्यास, श्रीमंत राजश्री दादासाहेबी विनंती लिहिली आहे त्यावरून श्रुत होईल. राा सिवराम भास्कर व रामचंद्र माहादेव शेवेमध्ये येकनिष्ट रात्रंदिवस आहेत. दुसरा पदार्थ किमपि जाणत नाही. सर्वांचे उर्जित करणार स्वामी धणी सर्वजाण आहेत. मागाहून सविस्तर वृत शेवेसी लिहून पाठवितो. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापी.

¶*Visaji Govind announces Raghunathrao's victory over Kamaluddin Khan Babi and the subsequent occupation of Ahmedabad.*

No. 75] [6-4-1753

छ ७ रजब

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
व राजश्री भाऊसाहेब स्वामी-
चे शेवेसी

विनंती. शेवक विसाजी गोविंद साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती. ता। चैत्र शुध ३ मु॥ आमदाबाद कृपाद्रिष्टीकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे. विनंतीपत्र आले ते पावोन बहुत संतोष पावला. हिकडील वर्तमान वरचेवर तपसीलवार शेवेसी विनंतीपत्र पाठवीत असतो. त्यास पत्र पावतात की नाही हा काहीच अर्थ कलत नाही. श्रीमंत राजश्री दादासाहेबी बहुत दीर्घ प्र(य)त्ने-करून स्वामीच्या पुन्यप्रतापे मलगाव व अमदाबाद फते केली. महद येश संपादिले. याउपर जिकडे स्वामी कृपा करून श्रीमंत राजश्री दादासाहेबाची रवानगी होईल तिकडील बंदोबस्त उतम प्रकारे होईल. फिकीर नाही. साराऊश पुन्यप्रताप थोर स्वामीचा त्या योगेकरून सर्व पादाक्रांत जाले. राजश्री दमाजी-बावा गाईकवाड समसेरबाहादूर याचा येकच निश्चये चरणारविंदी. दुसरे किमपि जाणत नाही. बहुत जन बहुत प्रकारचे परंतु गाईकवाड याचा दुसरा पदार्थ सर्वथा नाही. कमालुदीखान बाबी यास जाहागीर माहाल व फुटगाव देऊन चाकरीच्या नात्याने परवाने करून देऊन भद्रातून बाहीर काढून हवेलीत राहोन वस्तभाव कुली काढून पटणास जाणार. श्रीमत साहेबहि बाहीर गेल्यानंतर बिरमगाव व कडी वगैरा मवास जागाबजागा आहेत त्याचे पारपत्य करून अखेर चैत्रमास माघारे फिरणार ऐसा मनसबा आहे. येदाचेचे साली पुढे मुलूकगिरीस जावयास दिवस नाही. पुढे जैसी आज्ञा होईल आणि हंगामसीर फौजाची रवानगी जाल्या फार मुलूक सुटेल. रा। सिवराम भास्कर व रामचंद्र माहादेव येकनिष्ट सेवेमध्ये रात्रंदिवस आहेत. दुसरा विचार काही जाणत नाही. सर्वांचे ऊर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. येंदा जैसे देखावे तैसा कर्नाटकचा विचार संपादून यावे आणि सतरुसीचा बंदोबस्त करून देवाब्राह्मणाची स्थापना जैसी पूर्वी केली आहे त्याप्रा। सर्वास सुख देऊन प्रतिपाल करणार स्वामी समर्थ आहेत. वृधेचे विचारेच करून पारपत्य जाले पाहिजे म्हणजे सर्वाचे मनोदये पूर्ण सिधीस जातील. जाले वर्तमान क्षणक्षणा विनंती लिहून पाठवीत जातो. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

हे विज्ञापना.

¶*Visaji Govind to the Peshwa and Bhausaheb, informing them of the successes achieved by Raghunathrao in Gujarat and adding that Damaji Gaikwad was in complete agreement with him in the campaign.*

No. 76] [17-4-1753

श्री

राजेश्री मल्हारजी होळकर सुभेदार
व ता राजेश्री जयाजी सिंदे सुभे-
दार साहेब गोसावी यासी

॥ श्रीमंत अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रा॥ रामराऊ नरसिंह कृतानेक आशीर्वाद विनंती. येथील क्षेम चैत्र सुध १९ भुमवासर मु॥ रायेपूर साहेबाच पुण्य प्र(ता)प येथास्थित आसो. त्यास बाबू केसवरायाची बातमी राखोन बैसलो होता. त्यास ऐकिल की परभार फौज त्याकडे गेली. त्यास बाबूच व फौज वर्तमान हा कालपरियेंत ठीक नाही कीं बाबू कोठ गेला व फौज कोठवरी गेली हे काही कळत नाही. त्यास आम्ही काल स्वामीकडे येत होतो. त्यास माहाराज घाटाखाले आहे किवा घाट चढून वरी आले हे कळना यास्तव राहून सेवसी विनंती लिहिली आहे. लोवटी घेतलियावेगळ बाबूवरी दबाव बैसत नाही. स्वामीचे विचार येईल ते कराल. मीहि सेवसी येऊन पोहचतो. बहुत काये लिहिण हे विज्ञप्ति. त्यास बाबू केसवरायाचे कबिलास व बाबू केसव-रायाचे बातमीस मनुशे पाठविली आहेत त्यास माहाराजाची जेथ आज्ञा होईल तेथ सेवसी येऊन पोहचतो. हे विज्ञेप्ति.

¶*Ramrao Narasinh of Raipur writes he has no news of the whereabouts of the rebel Babu Keshavrai.*

No. 77] [September 1750

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारीक सेवक राघो नीलकंठ सा॥ नमस्कार विज्ञापना यैसी जे, पूर्वी विनंतीपत्र पाठविले आहे ते प्रविष्ट होऊन सविस्तर वर्तमान सेवेसी विदित जाहाले असेल. यानंतर विनंती यैसी जे बिंद्रावणसाद (दास ?) सांहुकाराची दुकाण वजीर मनसूरआलीखानाचे लस्करांत होती. त्याचे गुमास्ताचे लिहिले आले की, लस्कर कितीक गारत जाले. खुद वजीरमजकूर जखमी जाला. सत्यमिथ्या वर्तमान रा॥ बापूजी माहादेव वकील दिलीहून लिहिले आले असेल ते सत्य आहे. नवाब सलाबतखान बगसी का॥ नारनोल येथे पावला. पुढें दिलीस जानार.

राजा आपलाले स्थलास आहेत. मिरमनू लाहोरकर दिलीस आज्ञाप्रा येतो म्हणोन वंदती आहे. वरकड वर्तमान यथास्तित असे. बहुत काय लिहीने हे विज्ञप्ति.

¶*Ragho Nilkanth informs the Peshwa that Mansur Ali Khan, the Vazir, has been seriously wounded.*

No. 78] *[4-8-1753 ?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेऊ साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ६ जिलकादपरियेत येथास्तित आसे विशेष. सरकार ग्वालेरीस राा रामचंद्र शामराज यांची रवानगी करावी. त्याजसमागमे लोक दिल्हे पाहिजेत त्याची आज्ञा करावी. आज्ञा होईल त्याप्रमाणे बराबर लोक देऊन रवानगी करून. राजश्री जायेपा सिंदे याणी स्वारीस जावयास डेरे बाहेर दिल्हे म्हणून वर्तमान आहे तरी आम्हांस काये आज्ञा करणे ते करावे त्याजप्रमाणे वर्तणूक करून. राँ जायापा सिंदे यांचे घरचे लग्न जालियावर स्वारीची सिधता करितील. आम्हास आज्ञा कर्तव्य ते करणार स्वामी खावंद आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Vithal Shivdev informs Nanasaheb that Jayapa is starting for the North and asks for orders.*

No. 79] *[30-8-1753*

रघुनाथराव दादाचे मुकाम

अर्बा खमसैन मया व अलफ जिल्काद भाद्रपद

छ १—१२ ताा ३०-८-१७५३ थालनेर; डेरे अवसीचे पांच घटिका रात्रीस बाहेर दिल्हे. बरोबर सखारामबापू, जानकीबाई.

१३ ताा १३-९-१७५३ सांगवी थालनेर.
१४ ताा १४-९-५३ मौजे राई पाा सेंदवे.
१५ ताा १५-९-५३ मौ. नजीक सेंदवे.
१६ ताा १६-९-५३ सेगाव पाा नागलवाडी.

+ येथून अक्षर निराळे.

१७ ता १७-९-५३ खरगोण.

१८ ता १८-९-५३ जांबळी पा खरगोण.

१९ ता १९-९-५३ पेझर ,,

२०–२१ ता २०,२१-९-५३ सातइ रेवा दक्षणतीर.

२२–७ जिल्हेज ता २२-९ ते ५-१०-५३ } महेश्वर रेवाउत्तरतीर (९९५० कर्ज गुा लक्ष्मी नारायण नाईक)

जिल्हेज.

छ ८ ता ६-१०-५३ खेडली पा चोली.

१० ता ८-१०-५३ बलसाणे पा बागलूज.

११ ,, ९ ,, जांब घाटमाथा.

१२ ,, १० ,, हरसूल पा इंदोर.

१३ ,, ११ ,, इंदोर.

१४ ,, १२ ,, सावरे.

१५ ,, १३ ,, उज्जनी.

१६ ,, १४ ,, ,, (दत्ताजीचे घरी मेजवानी जयाजी सिंदे भेटले.)

१७ ,, १५ ,, बांडे.

१८ ,, १६ ,, दानाडी पा हवेली उज्जैन.

१९–२० ,, १७-१८,, पिंपळे पा महदपूर. (१५००० कर्ज गुा वानवले.)

२१ ,, १९ ,, पाटसी.

जिल्हेज

२२ ता २० ,, पा पिंपळे.

२३ ,, २१ ,, जांबळी पा आगर.

२४ ,, २२ ,, कडसाले पा बडोद.

२५ ,, २३ ,, लोहारे पा डग.

२६ ,, २४ ,, रुपखेडी पा पेढांव.

२७ ,, २५ ,, चोरखोडी पा खैरावाज.

ते ते

२९ ,, २७ ,,

मोहरम.

१ ,, २८ ,, जुलमी पा कोटे. खैराबाद.

२ ,, २९ ,, आकसली पा खैराबाज ना मुकुंदबारी.

३ ,, ३० ,, आहूं पा कोटे मुकुंदबारीपार

४ ता ३१-१०-९३ काटवर पा कोटे.

५-६ ,,	१-११-९३		सुलतानपुर पा कोटे.	३७५० कमावीस मेजवानी सा कोटे खासास्वारी याप्रा झाली हा बाळाजी यशवंत
७ ,,	३	,,	बाठाणे पा गणोरी प्रा बुंदी चमेलीतीर.	
८ ,,	४	,,	दुपटे ,, ,,	ना लाखेरी.
९-११ ,,	५	,,	देवदा ना इंद्रगज प्रा बुंदी.	इंद्रसिंग सोपारकर याणी हिमतराव वकील याजबराबर सनगे पाठविली.
१२ ,,	८	,,	खुजुरी पा रामपुरा.	३००० उमेदसिंग बुंदीराजा मेजवानी.
१३-१४ ,,	९	,,	चौडकें पा रामपुरा प्रा जयनगर.	२०० रतनसिंग राजा बाजवाडा
१५-१६ ,,	११	,,	गंजारे पा ,,	२५० उदतसिंग उसरळे सनगे सरदारसिंग उनेरीकर.
१७-१९ ,,	१३	,,	जलकुप प्रां ,,	
२०-२१ ,,	१६	,,	देवली पा सारसाहा वनास नदी उत्तरतीर.	गोपाळसिंग करोलीकर.
२२ ,,	१८	,,	सुरवाडे झिलाई प्रां जयनगर.	राजावंत अजीतसिंग व रतनसिंग.
२३ ,,	१९	,,	पिंपले पा बोहाल प्रां जयनगर.	५००० घासदाणा. कुसलसिंग ठाकर
२४-३० ,,	२०ते२६	,,	पडाणे पा टोंक ,,	जिलायाकर.

सफर.

१ ,,	२७	,,	नेवाई.	
२-७ ,,	२८	,,	गोडसी पा चाटसें प्रा जयनगर.	४९००० कर्ज गुा रामचंद्र सिवदेव प्रा रामाजी ना.
८ ,,	४-१२	,,	जैसिंगपुरा ,,	

९–१९ ता. ५-११-५३ चंप्राई „ „ छ १७ कमावीस भेट-बदल मनसूर अली यानी वकिलासमागमे वस्त्रें पाठविली.

२०–२९ „ १६ „ खुरोपाडा ना। जयनगर छ २० हरगोविंद दि। मथोसिंग कमाविस भेट.

३० „ २६-१२-५३ नायके „ „ छ २१ रामसिंग मारवाडकर भेट झाली कमाविस भेट.

ते रबिलावल छ २६ विष्णु महादेव गद्रे १०००००.

११ „ ६-१-१७५४ छ ७ गोविंद बलाल बुंदेले याचे डेऱ्यास गेले छ ९ मल्हारजी होळकर याचे डेऱ्यास गेले.

१२–१३ „ ७ „ चरणतोंड प्रां जयनगर.

१४ „ ९ „ पलसाण आगर प्रां जयनगर.

१५–१६ „ १०-११ „ वसई „ „ रंगोपंत वकील सेवढे.

१७ „ १२ „ तालकी पा। अकबरपूर मोहकमसिंग जाट.

१८ „ १३ „ नावी पा। अकबरपूर प्रा जयनगर.

१९ „ १४ „ चंदावड पा। बाजवाडा प्रां जयनगर.

२० „ १५ „ नस्वरी पा। खोरी प्रां जयनगर.

२१ „ १६ „ नगर पा। डीग.

२२–२४ „ १७-१९ „ जळूखर पा। डीग जाटवाडा.

२५ „ २० „ पिंगारे पा। कुंभेर

२९ रबिलाखर.

३० सर्व महिना.

जमादिलावल

४ „ २७-२-५४ पिंगारे पा। कुंभेर.

५ „ २८-२-१७५४ ९३० किले कुंभेर.

जमादिलावल, जमादिलाखर, रजबु.

२८ ता। २२-५-५४ कुंभेर.

२९ „ २३ „ „ मथुरा.

साबान.

१ ताा २४-५-५४	मथुरा.	
२ ,, २५ ,,	वृंदावन.	
३–४ ,, २६-२७ ,,	माट पाा माबहन.	येमुना उत्तरतीर अंतरवेद.
५ ,, २८ ,,	बरोट पाा नोक प्रांत अंतरवेद.	
६ ,, २९ ,,	उटाणी पाा तदल ,,	
७ ,, ३० ,,	करोली पाा जेऊर येमुना उत्तरतीर ,,	
८ ,, ३१ ,,	मोतीपूर जगनपूर पाा दंकारे अंतरवेद.	
९ ताा १-६-१७५४	पटपटगंज नजीक दिली कालिंदी उत्तर-तीर.	नवाब गाजदीखान यास वजीरी संध्याकाळीं वस्त्रें दिली.
१० ,, ,,	,,	इज़ुद्दिनशाहा पादशाहा दिलीचे तख्तावर नवा बसविला. अहमदशाहा कैद करून ठेविला.

खमसखमसैन.

११–२० ,, ३ ते १२-६-५४

२२–२३ ,, १३–१५ ,, जुना कोट दिली येमुना दक्षणतीर.

२४ ,, १६ ,, बसई नाा दिली शहर.

२५ ,, १७ ,, सालेमार बाग नाा दिल्ली शहर.

२६ ,, १८ ,, शहाबाज.

२७ ,, १९ ,, सालेमार बाग.

रमजान.

१ ते ९ ,, २३–६ ते १-७-५३ सालेमार बाग दिली.

१० २ ,, बासई नजीक दिली शहर,

ते सर्व सवाल

जिल्काद.

१० ताा २९-८-५४ पर्यंत मुकाम बासई

११–२८ ,, ३०-८ ते १६-९-५४ वजिराबाग.

२९ जिल्हेज १८ ताा. १७-९ ते ६-१०-५४ तुमकबाद.

१९ ते मोहरम. २९ ,, ७-१० ते १५-११-५४ इसलांपूर.

सफर.

१–३ ता। १६-११ ते १८-११-५४ मरोली कुतुपशा पातशाहाचा दरगा.

४–२४ ता। १९-११ ते ९-१२-५४ बारापुल.

२५ ते रबिलोवल ८ ता। १०-१२ ते २३-१२-५४ सेलिरे पा। कोठडे प्रा। आंतरवेद.

९ ,, २४ ,, रानपूर झील प्रां आंतरवेद.

१०–१२ ,, २५ ,, गाजदीनगर ,,

१३–१४ ,, २८,२९ ,, ढासणे पा। जलालाबाद प्रां आतरवेद.

१५–२९ ,, ३०-१२-५४ ते १३-१-५५ गणमुक्तेश्वर श्रीभागीरथीतीर आंतरवेद

३० ,, १४-१-५५ बलवाडा पा। जखेडे भागिरथीतीर आंतरवेद.

रबिलाखर.

१–५ ,, १४-१ ते १८-१-५५ बलवाडा गंगातीर.

६ ,, १९ ,, बासई गंगातीर प्रांत अंतरवेद.

७–१४ ,, २०-१ ते २७-१-५५ आहार ,, ,,

१५ ,, २८ ,, जेजोरगाबाद.

१६–१७ ,, २९,३० ,, लढाणे पा। आहार प्रांत आंतरवेद भागीरथी आठ कोस.

१८ ,, ३१ ,, उठसर पा। ढासले कालिंदी आंतरवेद.

१९ ,, १-२-५५ जेनागले पा। दंकारे प्रां आंतरवेद.

२०–२५ ,, २-२ ते ७-२-५५ मोतीपूर ,, येमुनातीर.

२६ ,, ८ ,, कलेंद्रपूर पा। फरिदाबाद.

जमादिलौवल.

छ १ ता। १३-२-५५ बादरपूरची सराई नजीक तुलाकबन.

२ ,, १४ ,, बदखेडे पा। झारसाझील.

३ ,, १५ ,, बादली बालोचा मुलुक.

४ ,, १६ ,, कनवाड पा। झाजर बालोचाचा मुलुक.

५ ,, १७ ,, कोसली पा। झरझर.

६ ,, १८ ,, कनीजे पा। कानवाड जयनगरचा मुलुक,

७ ,, १९ ,, निबाडा ,, ,, प्रा। जयनगर.

८ ,, २० ,, गहिला पा। नारनाले प्रां जयनगर.

९	ता. २१-२-९९	सेऊर पा सिंगाणे प्रां जयनगर.	
१०	,, २२ ,,	सरई पा उदापूर ,,	
११	,, २३ ,,	बारसीगफर पा खंडाळे.	
१२	,, २४ ,,	गोवर्धनपुरा ,, प्रा जयनगर	
१३	,, २९ ,,	भदोडा पा सवाई जयनगर.	
१४	,, २६ ,,	देवळे पा सांबर.	
१९–१६	,, २७ ,,	सांबर प्रां अजमेर.	
१७	,, १-३-९९	आपरे पा नारायेण प्रां अजमेर.	
१८	,, २ ,,	डाहणे पा हवेली अजमेर.	
१९–२१	,, ३ ते ९ ,,	पुष्कर.	
२२	,, ६ ,,	अरडगे पा अजमेर प्रां मारवाड.	
२३–२४	,, ७ ,,	करकेडी पा रूपनगर प्रां ,,	
२९–२६	,, ९ ,,	उटसर पा हवेली ,,	
२७ते३० जमाखर ७	ता १२-३ ते २१-३-९९.	सिलिमाबाद नजीक रुपनगर पा मारवाड.	

जमादिलाखर.

१–७	ता १९-३ ते २१-३-९९	सिलिमाबाद.
८	,, २२ ,,	ढाहणी पा हवेली अजमेर.
९	,, २३ ,,	श्रीनगर पा अजमेर.
१०	,, २४ ,,	फलादे पा भिडावे प्रा मारवाड.
११	,, २९ ,,	हिमथरे पा सुरवाड.
१२	,, २६ ,,	हिसनपूर पा तोडा बनास नदी.
१३	,, २७ ,,	कासीद ,, सुभे अजमेर.
१४–१९	,, २८,२९ ,,	
१६–१७	,, ३०,३१ ,,	उमरी प्रां बुंदी.
१८	ता १-४-९९	गोटा तोडा जयनगरचा मुलुख.
१९	,, २ ,,	नगर प्रां जयनगर.
२०	,, ३ ,,	झेडवे पा चौऱ्यायशी.
२१	,, ४ ,,	बावी पा बनवडे.
२२	,, ९ ,,	नानते पा इंद्रगड ना लाखेरी.

२३ ता. ६-४-५९ हैदपूर ,, चरणवती दक्षणतीर.

२४-२५ ,, ७,८ ,, नानते ,, ,,

२६ ,, ९ ,, अमलगे पा सोपार पाराशरनदी दक्षणतीर.

२७ ,, १० ,, बोरदे पा सोपार अहिल्यानदी उत्तरतीर.

२८-२९ ,, ११,१२ ,, रेणावद प्रां कोटे.

३० ,, १३ ,, खेदणे.

रज्जब.

छ १-२ ता १४,१५-४-५९ सिताबडी पा शहाबाद.

३ ,, १६ ,, कुशोर ,,

४-११ ,, १७ ते २४-४-५९ गांधली ,, शाहाबाज प्रां नरवर.

१२ ,, २५ ,, राखाणी पा राजगड प्रां नरवर.

१३ ,, २६-४ ते २३-५-५९ पोहरी प्रां नरवर.

सर्व रज्जब

साबान ११

१२ ,, २४ ,, बोरीपाहाड्या.

१३ ,, २५ ,, गुरीज्या पा गोपाळपूर.

१४ } ता २६-५ ते १५-६-५९ सहश्रावे पा नरवर.

२३

३० सीत खमसेन

रमजान ४

५ ,, १६ ,, अवजड पा नरवर.

६ ,, १७ ,, मुंढेरी ,,

७ ,, १८ ,, कालोरस ,,

८ ,, १९ ,, हिद्रोली पा रेणावद.

९-१० ,, २०,२१ ,, बारखेली पा नवीसराई.

११-१२ ,, २२,२३ ,, पिंपराले पा खेचीवाडा.

१३ ता २४-६-५५ रुसोली पा सिरोंज.
१५ ,, २६ ,, कोळु पा खेचीवाडा.
१६ ,, २७ ,, लखनवास पा राजगड.
१७ ,, २८ ,, जमुनीया पा राजगड.
१८ ,, २९ ,, बहिरवे पा सुजावलपूर.
१९ ,, ३० ,, अजनाई ,,
२० ,, १-७-५५ सुदरसी.
२२ ,, ३ ,, नागंबे पा देवासे.
२३ ,, ४ ,, तिलवाई पा इंदूर.
२५ते३० ,, ६-७ ते ११-७-५५ ओंकार रेवातीर.

सवाल.

१-२ ता ११-७-१७५५ घाट बडवे रेवातीर.
३ ,, १३ ,, रावेर रेवातीर.
४ ,, १४ ,, संतावडी पा खरगोण.
५ ,, १५ ,, खरगोण.
६-७ ,, १६ ,, खानवाडे पा जलालाबाद सरकार खरगोण.
८ ,, १८ ,, सांगवी.
९ ,, १९ ,, थालनेर तापीतीर.
१० ,, २० ,, मोडावद.
११ ,, २१ ,, चिमटाणे पा सोनगीर.
१२ ,, २२ ,, नेर.
१३ , २३ ,, नामपूर पा साडस.
१४ ,, २४ ,, सौंदाणे पा साडस प्रा बागलाण.
१५ ,, २५ ,, वाजेगाव पा लोहनेर.
१६ ,, २६ ,, ,, ,,
१७-१८ ,, २७,२८ ,, गोवर्धन पा नासीक.
१९-२३ ,, २९-७ ते २-८-५५ त्रिंबकेश्वर.
२४ ,, ३-८-५५ गोवर्धन.
२५ ,, ४ ,, भगूर पा नासीक.
२६ ,, ५ ,, गोपे पा संगमनेर.

२७ ता ६-८-५५ लिंगदेव पा अकोले.
२८ ,, ७ ,, वेडूर.
२९ ,, ८ ,, पेठ ता खेड प्रां जुन्नर.
३० ,, ९ ,, चऱ्हेली ता सांडस हवेली प्रां पुणें.
जिल्काद १ ता १०-८-१७५५ मुा पुणे.

¶*This paper gives the itinerary and the route adopted by Raghunathrao in his first important expedition into Northern India, starting from Thalner on 30th August 1753 and reaching Poona on his return journey on 10th August 1755, a period of exactly two years. It is hoped that these extracts from the Peshwas' Diaries will assist the student in following the movements referred to in other letters.*

No. 80] [*10-9-1753*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बापू सखारामपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य अंताजी माणकेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता भाद्रपद शुध १३ त्रयोदसी मुकाम इंद्रप्रस्थ जाणौन स्वकीयें (लेखन करीत) गेले पाहिजे विशेष. स्वामीकडून पत्रे बहुत दिवस येऊन परामृष न जाला. स्वारी श्रीमंताची आपली गुजरात प्रांतीहून देशास गेले इतकेच वर्तमान कलले त्यावरून श्रीमंताची व तुमची पत्रे पुणियाकडे जात गेली. आलीकडे (रा) मल्हारजीबावा सुभेदार याची पत्रे व श्रीमंताचे व स्वामीचें पत्रे आले. आपण थालनेरीच छावणी केली त्याजवरून चितास बाईट वाटलें कीं श्रीमंत खावंद असोन आपले कागदपत्र वर्तमान न गेले. परभारे सरदारासच पत्रें गेली. याउपरी श्रीमंताच्या चितास काये आले आसे(ल) न कले. आम्ही श्रीमंताच्या घ(राण्या)तील खानाजाद आहो दुसरा अर्थ जाणत नाही. आपण श्रीमंतास विनंती करणें ते करितीलच. श्रीमंताच्या पत्री मजकूर वरकड लिहिता येत नाही. राजश्री गंगाधरपंत तात्या व बापूजी माहादेव वकील काही दोन नाही. त्यानी यानी ऐके जागा अन्न उदक खादले आहे. त्याजला पत्रें कलवयास कामा नये याजकरिता विस्तार श्रीमंताच्या पत्री लिहिला नाही. लढाईची वगैरे च्यार वर्तमाने श्रीमंताचे पत्री लिहिली आहेत ती पत्रे रा सुभेदार व तात्यानी पाहिली तरी चिंता नाही. स्वामीचे पत्र श्रीमंतास वाचून दाखऊन दुसरीयासी न दाखवणे फाडून टाकणें. सारांश गोष्टी कीं पूर्वी स्वामीस न यावे हे त्याहावयाचे कारण

हेच की वकिलांनी पातशाहासी आमचे देखतां तुमच्या फौजेस खर्चास पैका व काही मुलुक नवा कबूल करून दस्तक करून दिल्हे असता वकील ते सा(रे)च पचऊन स्वामीस वरचेवरी साल गुदस्त * * * पैका मुल्लक दिल्हा त्या कामावरीच * लावीत गेले. आम्ही स्वामीस लिहित गेलो की याजला पस्ट लिहीणे की सरदारास देणे पातशाहानी दिल्हे ते आमच्या घरातच आहे. पुढे आमचेंच नवे देणे घेणे ठिकाण पकी करू लिहीणे सत्वरच येतो यैसे स्वामीस लिहीले त्याप्रो स्वामीनीहि वकिलास लिहिले. परतु यानी त्यानी त्याचे उतरच न लिहीले यैसी लबाडी केली. स्वामीची स्वारी बुडविली. पातशाहावर येहसान होते. असो जे झालें ते उतम. वकिलास येथे पंधरा सोला वर्षे मनमाने तैसे लबाडी करावयासी फा(वले) श्रीमत राजश्री पंत प्रधान श्रीमत राजश्री भाऊसाहेब याची आज्ञापत्रें आजी वर्ष येतात की वकिलाच्या तेथील आचरणात पुर्ती वाकिफगिरी करून आम्हास लिहीत जाणे. केवल चाकरीच करून न राहाणे. हमेशा दरमाहा पत्रें त्याची येत असतात त्याजवरून येक दोन कलमे याचे आगी लाऊन श्रीमंतास लिहून पाठविले. त्याची ताकीदपत्रे त्यास येऊन (ते) देणेयासी आले. त्याजवरून आता वकिलाचा आमचा दावा मोठासा अतिशयेसी चालिला आहे. त्यानी आम्हावरी प्रयोग केला तो ब्राह्मण धरिला. त्याचे आंगी लाविला. आमचा गिला आता सरदाराकडे श्रीमंताकडे सर्वाकडे ते मनमाने तैसा लिहितात. आसो. आम्ही फौजेत फरिदाबाजेवरी आहा. वकील आपल्या हवेलीत शहरात आहे. पातशाहीत कामकाज येखादे तयार करावें त्याची धूळमाती करावी. पुढेहि श्रीमंताचे आज्ञाप्रा आणखी वकिलाकडे कलमे बहुत आहेत. सर्व होतील परंतु त्याचे सरीक सागे आले आणि धूलमाती त्याची केली तरी कामाची नाही. आम्ही श्रमसाहास विसा हजार फौजाचा केला. थोड्या माणसाची सुडी घातली. खासा तरवारचे वार आहे. आजी ता। शंभर आसामी चांगली नामांकित ठार जाली. घोडे दीडसे ठार. जखमी यासी गणीतच नाही. शत्रूस धाक मोठा. पातशाहा तुमचा करून ठेविला की, हे पातशाही मऱ्हाठी यानी राखिली. रूमशामपरियेंत कीर्त येजमानाची लागली. आताहि आपण चितावरी घेऊन लौकरी कार्तिकमासी आले तरी काही मुल्लक पैका आद्यापहि पातशाहा देतील. आमच्या हाते साफ पातशाहाकडील जाबसाल करणे तरी करावा. सर्व तयार आहे. आम्हाकडे व वकिलाकडे दोन्हीकडूनहि जाबसाल कराल तरी सारेच बुडल. काम होणार नाही. नाहीतर वकिलाकडेच जाबसाल करणे ते सुखरूप करावा. मागे बहुत बुडविले पुढे बुडविती. श्रीमंताच्या मनास त्यास येथून आगदींच काढावे. जाबसाल आर्जी काही पुणियाहून आली तरी याप्रकारे येत आहे.

आम्ही वकील मिलोन जाबसाल काही येक नाही. आमचा जाबसाल पातशाहाचा निरालाच आहे. त्याचें आमचें दर्शन नाही. पाच सात लाख रुपये त्याच्या पोटातून सरकारात आम्ही वातले आणखी वालणेचे आहे. याजमुले श्रीमंताच्या चिताची खातरजमा त्याच्या लबाडीची जाली परतु आम्हासी मोठे वैर मांडिले. पातशाहास आर्ज केला की (याकडील) फौज थोडी आहे. पातशाहानी उतर की, पातशाही कोणे राखिली? मऱ्हाठे पाच महिने जुजत आ(हे)त. त्याप्रा पातशाहापासी लबाडी केली. यैसीच श्रीमंताकडे सरदाराकडे करितील. याज-करिता वकिलादेखता पातशाहास वजीर मीरबक्षी देखताच गणती दिल्ही तेव्हा काले तोंड जाले. सर्वाची दस्तके करून घेतली. यैस जेथे जावे तेथे भोग पाठी लागतो. चिरंजीव तात्या तुमचे थोर जावई यासी दिलीची फौजदारी पातशाहानी दिल्ही. बहुत सास * * * ला त्याने तरवार मारिली. चिरंजीव भाऊ पुतण्या त्यानेंहि तरवार मारिली. सारांश गोस्टी आम्ही, पात-शाहा राजी, आमीर राजी यैसे करून पंचवीस हजार फौजेची चाकरी केली आहे. पुढे ऊर्जीत करणार खावद समर्थ आहे. श्रीमंतानी जयाजी सिंदे यानी पुणियातून वरात वकिलावरी देविली तिचा पैका नाहीत. त्याची ताकीद पाठवणें. केवल आमचा लगाम सोडाल तरी सरकारनुकसान होईल. बहुत काय लिहिणे.

¶*Antaji Manakeshwar suspects Hingne of receiving bribes, and plainly states his suspicion to Sakharam Bapu.*

No. 81] [*31-10-1753*

आर्बा (खमसैन)

स. १७५३ नोव्हेंबरच्या रोजनिशींत खालील नांवाचे उल्लेख आहेत.

१ आखेराम वकील संस्थान कोटे.

१ मल्हार बलाल खिजमतराव दिा जानोजी निंबालकर.

१ देवीदास सिवराम दिा बालाजी येसवंत

१ रावो लक्ष्मण दिा रा मल्हारजी होलकर.

१ रामराजा उमेदसिंग संस्थान बुंदी

१ सरदारसिंग उनेरीकर

१ परशराम महादेव वकील

१ कणीराम दिंमत माधवसिंग

१ खंडो गोमाजी दिा बाबूराव सिंदे

छ ४ मोहरम जिनस खानापैकी

समसेरबाहादर याचे लग्नास सोयेऱ्याकडे विा रा बालाजी माहादेव मांडवगणे गुा बाबूराव कृष्ण बाा याद अलाहिदा झा छ १४ जिल्हेज ताा छ २९ मिनहू

दिा मानाजी पायगुडे

१००|. खासा

१६७|| आपाजी पाईगुडे

१४८||= कुसाजी पाईगुडे

छ ९ मोहरम खर्च पोतापैकी

६०० ताा रामाजी माणकेश्वर इमारत श्रीबनेश्वर येथील कामास कार्तिक मासचे बेगमीस रसानगी चिठी

छ १० मोहरम खर्च जिनसखानापैकी

देणे कृष्णसिंग समसेरबाहादर याजकडे डोले मिरवतात सा रसानगी व ताा हरी सिंदा पोर्गा

उदबत्या	सुमार	बुका वजन पके
	९०	८८|.

[रेणको अनाजी सिलेदार या साली पुण्यास आहे]

छ १९ माहे मोहरम

जमा जिराइतखाना

कमाविस जमा भेट बाा मिर फकरुला समसेरबहादर याचे सासरे याणी राजश्री नानाकडे नजर केली.

छ ३ सफर

जामदारखाना खर्च

गुलाम मोहिदीनखान निंबगिरीकर समसेरबाहादर याचे सासरे यासी रवानगीची वस्त्रे रसानगी चिठी यादी.

छ ७ माहे सफर

खर्च जामदारखानापैकी रा
रा समसेरबाहादर याच्या ल-
ग्नाबाा खर्च खैरात खर्च
छ १४ माहे जिल्हेज देणे लाल
कुवरबाई व मस्तानी इचे

नावे सवासिणी जेऊ घातल्या
त्यास पाा माहादाजी गोविंद
सनगे याो आख [तपशील]

मेहेमान खर्च सदरेस नेऊन दिल्ही पाा समसेरबाहादर दिाा राजे पेटकर यासी

१७२॥ अबदूल नबी अमदानगरकर साङ्गू
यास आख
९२॥ खासा [तपसील]
८० महमद इसाख मारनिले याचा पुत्र
१७२॥

५१ अबदूल कादर पुतणे.
२९ खासा [तपसील]
११ भला माणूस ,,
११ कारकून ,,

२२३॥ ५१

[7-12-1753

स्वारी राजश्री दादा

रोजकीर्दी
सुाा आर्बा (खमसैन मया व अलफ)

छ ११ सफर

रवासुदगी

देणे रावराजे उमेदसिंग बुंदीकर चाकरीस बाा आहेत त्यास रोजमरा येकमाही राा यादी

१५०० खासा जातीस सरदारी खर्च
४०० हती ४
१०० पालख्या २
१५०० प्यादे ४०० दर रोज ८=
७५०० स्वार ५०० दर रावती ।।।.
५०० जाजती खाशास

११५००

31-12-1753

तेरीख ९ रबिलावल

बाा कमावीस भेट सनगे

रु.

११३९ बाा नाथजी माहाराज उदेपूरकर यांचे डेन्यांस
गेले तेथे गुाा उदाजी कटका
३७५ बाा नाथजी माहाराज [तपशील]
२८९ बाा उमेदसिंग [तपशील]
२१९ बाा जसवंतसिंग ,,
२६० बाा मोहकमसिंग ,,

तेरीख छ ९ रावल

दफाते पत्रें

गोपालराव गणेश यास सनद की पाा अकबरपूर हिरबमचे प्रांा अतरवेद येथील कमाविस दरोबस्त तुम्हाकडे सांगितली आहे तरी इमानें इतबारे वर्तोन अंमल चौकसीने करून ऐवज जमा करून सरकारात पावता करणे म्हणौन सनद राा यादी १
येविसी जामीदारास सनद की १
रुजू होऊन अंमल सुरलीत देणे
२

3-1-1754

छ ८ रावल

दफाते पत्रे

पुरुषोत्त माहादेव उपनाम कानडे गोत्र वसिष्ट सूत्र आश्वलायन कुलकर्णी मौजे बोटी पाा अहीरवाडी सरकार सोलापूर हालीं वास्तव्य काा नासिक याचे नावे वतनपत्र की

5-1-1754

छ १० रावल

दफाते पत्रें

शंकराजी माहादेव काादार पाा हिरमगाव यास पत्र की कायमकुलीखान याचे स्वार सेख्याजी आईताले याचे ताबिनात आहेत

आर्बा (खमसैन)

छ १७ रावल खर्च

जामदारखानापैकी

देणे दताजी सिंदे दिंमत राजश्री जयाजी सिंदे यास आंगावरील ता। उदाजी कटका सनगे रुपे

[तपसील]

छ १८ रावल खर्च

जामदारखानापैकी

राजश्री मल्हारजी होळकर यांची जखम बरी जाली. पाणी घेऊन दर्शनास आले सा। ता। उदाजी कटका. सदरेस सनगे रुपे

[तपसील]

छ २० रावल (पं. प्र. रो.)

जिराईतखान्यापैकी

देणे बालकोजी राऊत जमातदार हशम याची तरवार राजपुरीचे लडाईत साल्गुदस्ता मोडली. सा। सरकारातून दिल्ही वि। राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ

29-1-1754

तेरीख ९ रबिलाखर

अंताजी माणकेस्वर याचे नावे सनद की पा। सोल्याची सराय येथील कमाविस जप्तीचा अंमल तुम्हाकडे सांगितला असे

13-2-1754

तेरीख २०

सिलकबंद पोते......

१२५००० जमा छ मजकूर बा। कमाविस नजर बा। माधवसिंग सं। जयनगर खासा स्वारी या प्रांते जाली सा। नजरेचा ऐवज करार केला तो जमा गु। गणेश माळी जमा पोता छ १६ रावल जमा रुपये १९९७२६ पैकी वज समाईक ऐवज पेशजीचा बाकी येणे त्यापो ७४७२६ बाकी जमा ऐवज जुना पंचभेल

14-2-1754

तेरीख २१ राखर

दफाते पत्रे

नवाब गाजदीखान यांची जागीर माहाल आहेत तेथील जप्ती मोकली करून नवाबाकडे आंमल देणे म्हणौन कमाविसदारास पत्रे

3585

26-2-1754

छ ३ जावल

[अंतरवेदीतील कमाविसदार]

कमा. चे नाव	महाल
१ नारो शंकर	१ पा सेवगनपूर १ पा नगदवाटी
१ दामोदर माहादेव	१ पा कनोज १ पा सिकंदरा १ पा सोरू १ पा पंचकणा १ पा गंगेरी १ पा जलाली
१ गोविंद बलाल	१ पा हिरबन १ बिलासपूर १ नानामऊ १ पा बलबारे १ मंगलपूर १ डेरापूर १ पा देवकली १ देव्हा लम०
१ विश्वासराऊ लक्ष्मण	१ पा शाहापूर अकबरपूर १ पा सिवली १ पा खेवराबरा ३
१ गोविंदराऊ सखाजी	१ पा सकीट १ अलीपूरखेरा १ सकतपूर
१ जगनाथ विस्वंभर	१ पा सारेख

4-3-1754

छ ९ जावल

रवासुदगी

१ अहमदखान पठाण रोहिले फरुकाबादकर	देणे रेणको आणाजी सिलेदार यास मथुरेचे मार्गी चौकीस ठेविले आहेत

छ १० जावल

दफाते पत्रे

राजश्री गंगाधर येशवत व अनंदराऊ राम दिा मल्हारजी होळकर यास पा बिठूर प्रा अंतरवेद हा परगणा बादशाहानी आम्हा उभयेतास व राजश्री रामाजी अनंत यास दिल्हा आहे त्याप्रमाणे सरकारातून करार करून द्यावा म्हणौन विनंती केली त्यावरून पा मारपैा निमे परगणा राजश्री रामाजी अनंत दिा जयाजी सिंदे याजकडे करार केला असे. बाकी निमे परगणा तुम्हा उभयेतस दिल्हा असे

रोजकीर्द
सुा आर्बा
3-3-1754

राजमंडळ

¶Govind Tamaji writes to the Peshwa that Dadasaheb and Holkar after levying tribute from the Doab and petty states in Rajputana have proceeded towards Nagore to the relief of Jayapa who owing to the occupation of Ajmere and Jalore by the Maratha arms feels confident of a decisive victory over Bijesing and has in consequence deflected their course to Rupnagar.

No. 108] [*13-5-1755*

रोजकीर्द

राजमंडल

स्वारी राजश्री दादा सुा खमस

छ १ माहे साबान

दफाते पत्रे

सिधश्री मुतसदी निसबत राजे सवाई माधोसिंगजी जोगो पंडित श्रीरघुनाथ बाजीरावको आसीर्वाद बेचने अपरंच समत १८१० सन आर्बा खमसैन मध्ये दिवाण हर गोविंदने करार कियो रुपिया

१५२५००० पहिले खरणिया रुपिया बाकी आवनेथे ते मध्ये तुरत देने किये.

१२५००० खासा अंबारी (स्वारी) आई सबब नजराणा करार किया.

१६५००००

सदरहू सोळा लाख पचास हजार मे वसूल सात लाख पचतीस हजार चवरा हातिखा जयाजी सिंधयाको दिलवहे तीन लाखवा हुंडिया दिया है. ते मध्ये कोई सकारी है काई सकारने कीं हें रुपिया आवने का हे छ लाख चवदे हजार नवसो छबीस येणे प्रमाणे भरणा जाहालियाचा जाब लेहून दिल्हा असे.

¶This paper is extracted from the Peshwas' Diaries. An agent of Sawai Madhosingh renders an account of a tribute of 16½ lacs due from the state. The paper is addressed to Raghunathrao.

No. 109] [June 1755

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीजीचे शेवेसी

विनंती आज्ञाधारक धर्मराव तमाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील कुशल तागाईत अधिक वद्ये मुकाम श्रीपाटण समीप संवस्थान कोटे स्वामीजीचे कृपाकटाक्षे आहे. स्वामी यानी लेखनआज्ञा करावयाकारणे लेखकास आज्ञा केली पाहिजे विशेष. ये प्रांतीचे वर्तमान तर राजश्री अच्युतराव गणेश दाहा हजार फौजेनिशी मारवाड प्रांताकडे गेले होते. त्यास अजमेर तालुका प्रथमता बापूजी ताकपीर याजकडे होता. त्याजकडून सरकार चाकरीत तफावत आडळला यामुळे राजश्री गोविंद कृष्ण यास येथापूर्व सांगोन किलेदारी गड बिटलीची देऊन बिजयेसिंग नागोरकर याचे मुलकांत जावे हा निरधार केला असता राजश्री संताजी वाबले याचे बंधू येशवंतराव वाबले यानी दरमियान पडून दरोबस्त मामलतेची जाजानी (?) धाराधरू लिहिली करून देऊन फडछा पाडला व फौज मारवाडे जाऊ न दिधली. इतकियात राजश्री माधोसिंग याचे मुलकात सिखानी * नाले व कानोड प्रांती हंगामा आरंभला; यामुले त्यानी रोजिना पाच हजार रुपये फौजेचा खरच अंगिकारून राजश्री अच्युतरावजीस भली मनुष्ये पाठऊन आपले मुलकांत मदतेस बोलाविले. ते जयेपुरानिकट पावले की शीख यानी दबाव सरकारचे फौजेचा मानून माघारे गेले. तेव्हा राजे माधोसिंगजीनी बहुमान सिष्टाच्यारयुक्त यासमागमे शामसिंगास देऊन चंबलतीरपावेतो प्रविष्ट केले. त्यास चंबलउतरल्यानंतर माहूराव गुमानसिंग कोटेकर याकडे बाकीस्तव भली मनुष्ये पाठविली, तेव्हा माहाराव गुमानसिंगजीनी आपले तरफेने मातबर मनुष्ये व्यास गोपाल रामजी व ठाकूर भोपतसिगजी व पंचोली रामकिस्न व लालाजी बलाल कमाविसदार या चौघास रदबदली निमित्य पाठविले. याच्या सर्वांच्या भेटी जाहल्या. रदबदल पैकियाची लागली होती तो अकस्मात ग्वाल्यार प्रातीहून येकेच रोजी तीन च्यार जोड्या जासुदांच्या प्रहरा प्रहराचे अंतरे राजश्री अच्युतराव यांस पावल्या जे पत्रदर्षणी कूच दरकूच येऊन पावणे. मामलतेचे लोभास न गुंतणे याप्रकारे सिद्याची ताकीद पावली. येणेमुले कोटेकराकडील मामलत सोडून कूच दरकूच सरदाराकडे गेले. व सरदाराचे फौजेचे वर्तमान साहुकारी याप्र (अपूर्ण).

¶*Dharmrao Tamaji to Raghunathrao, to the effect that Achutrao was requested by Madhosing to render him help against the Sikhs who had molested his territory, and that he (Achutrao) was well treated by Madhosing in return. The writer also mentions other details about Gumansing and others.*

3622

No. 110] [22-6-1755

श्री

तीर्थरूप राजश्री बाबा वडिलांचे

शेवेसी

आपत्येसमान गोपालराव गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ११ माहे रमजान पावेतो वडिलांचे आसीर्वादेकरून मुकाम ग्वालेर येथें सुखरूप असें. यानंतर झांसीचे मुकामीहून वडिलास पत्रे पाठविली होती परंतु उत्तर आलें नाही तरी यैसें न करावें. येणारा मनुश्यासमागमे आसीर्वादपत्र पाठऊन सांभाल करावा हे वडिलपणास उचित असे. विशेष आमचें वर्तमान तरी आपली आज्ञा घेऊन स्वार जालों ते नजीक पुष्कर प्रांत मारवाड येथे श्रीमंताची भेटी जाली. सनदापत्रा दाखविल्या, परंतु अगोदर मामलत श्रीमंतानी राजश्री गोविंदपंताचे स्वाधीन नवा लक्ष रुा घेऊन केली. साल जाले पाहिजे, यास्तव आम्हांस समागमें च्यार मासपर्यंत फिरणें लागले. पुढें मृगसाल जाले. छ २ रमजानी श्रीमंत कृपाळू होऊन मामलतीच्या सनदा व वस्त्रें दिलीं. ग्वालेर किला श्रीमंतानी घेतला तोहि आमचे स्वाधीन केला; मग आम्हांस आज्ञा देऊन आपण कूच करून दक्षणेस गेले. आम्ही किले मजकुरास आलों. येथील बंदोबस्तास च्यार दिवस लागतील; मग ज्याहानाबादेस जाऊं. वडिलास कलावें म्हणून लिहिले असे. किला मातबर आहे यास्तव येथे माणूस सर्व देसचे असावे. कनिष्ट पक्षी दोन हजारपर्यंत भरती पाहिजे यास्तव सातसे आठसे मावले हशम व काही खानदीशी यैसे पाठवावें. बहुत उपयोगी पडतील. सूचनार्थ लिाा असे. बहुत काये लिाा? कृपा लोभ कीजे हे विनंती. दरबारी आमचा कोणी वकील नाही. सर्व प्रकारें आश्रय वडिलाचा आहे. कलेल त्याप्रकारें दरबारचा बंदोबस्त राखोन आज्ञा करीत जावी त्याप्राा वर्तणूक करीत जाऊ हे विनंती.

राजश्री नानास नमस्कार विनंती उपरी. सदैव पत्रद्वारे संतोषवित जावे हे विनंती.

¶*Gopal Ganesh Barve informs Baba that the fortress of Gwalior has been assigned to him and makes suggestions how it should be guarded.*

No. 111] [Before July 1755

श्री

विनंती उपरी. गोविंद बलाल तुम्हाजवल तेथे आले आहेत. त्याजवल पैक्याचा मजकूर बोलोन ठीक करून गोविंदपंतास येथे पाठवणे. जरूर+ करणे. तुम्ही जयापाचे मोर्च्यात जाणार आसिला तरी जाणे. परंतु पैक्याचा मजकूर आधी करणे हे विनंती.

¶*Dada asks Govind Ballal to be sent to his presence.*

+ पत्र राघोबादादाचें.

No. 112] [18-7-1755

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीजीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान आशाढ शुध १० पर्यंत साहेबाचे पुण्यप्रतापे येथास्थित जाणोन स्वकीय स्वानंद लेखनआज्ञा करणार धणी समर्थ आहेत. विशष या प्रांतीचे वर्तमान राजश्री खानाजी जाधव जोतपूर नजीक गेले आहेत, म्हणोन पूर्वीच सेवेसी लिा आहे. त्याज अलिकडे वर्तमान बिजेसिंगाकडिल फौज जागा जागा होती ते येकवटूण येक वेळ आपले फौजेवर क्षेपनिक्षेप घालमेल करावी हा निश्चयेनिमीत्य सेवेसी विनंती लिहिली असे की माहाराज खावंद आहेत. तोटा नफा सर्व सरकारचा. न जाणो त्याणी खता खाली, तरी पुढे खावंदासच सुदरणे लागेल, याजकरिता सेवकाचेच मत असे की धणी समीप आहेत. हजार दोन हजार फौज पाठऊन उपराला करावा. येश खावंदासच असे. खानाजी जाधव सेवक येकनिष्ठच आहे. सरकारचे चाकरी अंतर करणार नाही. त्याचा आब ताब राखणार धणी समर्थ असेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*Govindrao Krishna informs Raghunathrao of the movements of Khanaji Jadhav and Bijaysingh of Jodhpur and asks for more troops.*

No. 113] [21-7-1755

पौ छ १८ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ साहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपालराव गणेश कृतानेक साा नमस्कार विनंती. ताा छ ११ सवाल पावेतो मुाा ग्वाल्हेर स्वामीचे कृपेकरून येथास्तित असे विशेष. पहिले विनंतीपत्र साद्यांत सेवेसी लिहिले आहे त्याजवरून श्रुत जाहालेच असेल. श्रीमंत राजश्री दादासाहेबाची आज्ञा घेऊन किले ग्वाल्हेरीस आलो. बलजू जाटासी करार ठराऊन दिल्हा होता कीं, त्यांचे (गाव) व गढ्या खाली करून द्याव्या व किल्यावरी तोफा व दारू गोली सिसे निमे द्यावे. त्याजप्राो आम्ही राजश्री अंताजीपंत व राा विठलपंत याजकडे गाव गढ्या जप्तीस होत्या त्या खाली करून

देविल्या. तोफा व रेहेकले वगैरे सुमारी दागिने येकूणचालीस पैकी जाटाचे वाव्याचे वजा होऊन बाकी सुमारी १९ येकूणीस दागिने बीतपा

अष्टधाती तोफा जायेबदी सुमार		बिडी दागिने
३	४	तोफा
	६	रेहकले
	२	धमाके
	४	लंबछडे
	१	गरनाल
	१६	

येकूण येकुणीस दागिने व दारूगोळी सिसे * * * * * * केला. आपले वाव्याचे वजन (क)रू तेव्हा सेवेसी लेहून पाठऊ. त्याचे हिशाचे तोफा व दारूगोळी राहिली व त्याणें सांगितले की गला पहिला नाही. माझाच आहे. यैसा त्याचा जिनस राहिला आहे. त्यापैकीं त्याणें काही नेला, काही राहिला तो उतरेल तेव्हा जाईन यैसे म्हणो लागला. मग सर्वांनी निकाल केला की सर्व जिनसाचा अदमास गला सतरा हजारांचा व तोफा दारू गोळे यैसे पंचवीस हजाराचे येकूण बेतालीस हजार; त्यास त्याचा गला आम्ही घ्यावा, माप घ्यावे. तोफा सर्व जिनस उतरून द्यावा यैसे करिता राहिलां तरी रुा द्यावे. ये गोष्टीस साऊकारी निशा द्यावी. त्या प्रस्तुत सतरा हजार रुपये द्यावे. बाकी राहिले त्याचे रुा सावकाराने त्यास द्यावे. त्यास पंधरा हजार रुपये रा विठल-पंतानी त्यास दिल्हे व दोन हजाराची निशा केली; तेव्हा आम्हास म्हणो लागले की तुम्ही सतरा हजार रुपये द्या. मग आम्ही उत्तर केले की जिनस गला इतका न भरला. जो भरेल तो मजुरा पडेल. बाकी रुा फिरोन देऊ. तेव्हा आम्हास यैवजाचे संकट. मग रा गोविंद सामराज यास खत लेहून दिल्हे. तुमचे रुा किल्याचा जकिरा खरिदी करावयासी सतरा हजार घेतले हे व्याजसुधा देऊ, यैसे खत लेहून दिल्हे. गला भरेल तेव्हां त्यांचे रुा व्याजसुधा देऊ. बाकीचे आम्ही कां द्यावे ? यैसे आहे. सतरा हजाराचा जिनस भरला तरी उतमच आहे. ये गोष्टीची निशा बलजू रा विठलपंता * * * * * * याच्या गुमस्त्यापासोन करून दिल्ही. जाटाने आपली सर्व कामे मुद्यापरो हस्तगत करून किला खाली करून गोहोदेस गेला. आम्ही किले मजकुरावर छ ७ सवाली ठाणे कायेम केले. किल्यावर गेलो. तेथे तहकिकात करितां जाटाने दारू गोळी रेहकले जेजाला चोरून नेले व दरवाजे आतले सर्व नेले. किल्याची मरामत बहुतां दिवसापासोन नाही. जागा जागा तट ढासलला आहे.

त्याची बंदीस्त करावी लागत्ये. याविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. किला फार अफाट आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबी तीनशे माणसाची नेमणूक करून दिल्ही आहे. त्याच्या चवक्या दरवाज्यावर व किल्याखाली बदल कोट आहे तेथील रखवालीस पुरत नाही. येथे माणूस तीन च्यार हजार असावे तेव्हा जागा जागा चौकी पाहारा अलंगनोबत बेहबुदी होईल. परंतु आम्हास आज्ञेप्रो वर्तणूक केली पाहिजे आणि येथील किल्याचा बंदोबस्त जरूर जाणून रा। अंताजीपंत व रा। विठलपंत व रा। लंबोधरपंत व सखोजी देशमूख याणीं आणखी माणसे बारा तेराशे ठेवावी म्हणून सांगितले. तेव्हा आज्ञेखेरीज ठेविली. त्यास मावले निमे यासी सेरा सरासरी दरमाहा दाहा रुपये प्रो पडला आहे व हिंदुस्थानी लोक निमे यासी साडेसात आठप्रो सेरा आहे. कमतैनाती ठेवावे. त्यासी ये प्रांती हा कालपावेतो प्रज्यन्य किमपि नाही याजमुळे महर्गता विशेष. हलके तैनातेन कोणी राहीना. याप्रो सेरा करार करून ठेविले आहेत. किल्याचे खर्चाची नेमणूक रा। हरी विठल याजकडे कालपीवर वरात दिल्ही आहे. त्याजकडे वरात व कारकून पाठविला त्यास येक महिना जाहाला. परंतु येवजाची तरतूद आद्याप होत नाही. अश्विन कार्तिक मासी देऊ दिलाऊ म्हणतात. येथील किल्याचे काम नाजू (क). सिबंदी पोटास दिल्हे पाहिजे. याच्या यैवजास विलंब लागला, तेव्हा सतरा हजाराचे खत दिल्हे आहे ; आणिक किल्यावर सामान तेल तूप तमाखू जरूर खरिदी करावयासी कर्ज घ्यावे लागले. त्यास साहूकार आहेत ते थोड्या व्याजाने रुा। देत नाही. जिनस तो घेतला पाहिजे. तेव्हा व्याज मनोती कबूल करून कर्ज घ्यावे लागले तर सदर्हू लोकाचे सऱ्याप्रो नेमणूक करून व जकिराचे खरिदीची यैसी नेमणूक करून यैवजाची बेगमी करावी. रा। हरीपंताचे चितात यैवज द्यावा न द्यावा हा अर्थ काये तो कलत नाही. येथील कामामुळे आम्हास गुता येक महिना जाहाला म्हणून पुढे कुरा ज्याहानाबादेस रा। बाबूराव भास्कर पाचशे स्वारानसी रवाना केले आहेत. त्यासी रा। गोविंद-पंतानी खटखट माडिली आहे. आम्हीहि येथे राजश्री लक्ष्मण दिगंबर दोनशे स्वारानसी किल्यास नेहमी ठेविले. येका दो दिवसी येथील बंदोबस्त करून कुराज्याहानाबादेस * * * तेथीलहि साहेबाच्या प्रतापेकरून * * * * * * बंदोबस्त उतम होईल. आम्हास तो खावंदाची आज्ञा प्रमाण. पंत मारनिले सोमोपच्यारेकरून कामकाज जाले तरी उतमच. नाहीं तरी आम्हास तो आदरास प्रतिआदर करावाच लागेल आमची येकनिष्ठा खावंदाचे पायासी आहे तरी परिणामहि उतमच आहे. प्रथमता हुजुरून सनदा घेऊन आलो तो श्रीमंत राजश्री दादासाहेबी त्याजकडे इजारा दिल्हा. मग हकनाहक त्यासी कजिया कां करावा म्हणून मारवाडात गेलो. च्यार महिने सेवा

केली. तव्हा अखेरसालीस कृपा करून स्वामींचे सनदेप्रों सनद व ताकीदपत्रे व वस्त्रे देऊन च्यार लक्ष येकूणीस हजार रुपये रसद घेतली ते रुपये सावकाराचे काढून भरणा केला. यैसे असता ते सनद न मानीत तरी आम्ही सिष्टाच्यार बहुत करून ठाणी सनदेच्या बळे घेऊ. परतु हे थोर मामलेदार याचा बदनक्ष जाहला तरी उतम नाही म्हणून आम्ही ढालढकल करितो; परंतु त्याचे चितात काही न ये. निदान जाहलियावरी आज्ञा आम्हास बज्याविली पाहिजे यास्तव त्यास ताकीदपत्र पाठवणार स्वाम समर्थ आहेत. किल्यावरी पातशाई नोबतखाना आहे. त्यासी आम्ही आज्ञा घेतली ते समई श्रीमंत राजश्री दादासाहेबास विनंती केली आहे. परंतु सनद घ्यावयासी फावले नाही तरी स्वामींनी नोबतखान्याची सनद पाठविली पाहिजे. येथे हमेश नौबत वाजत असत्ये. सेवेसी विनंती लिा आसे हे विज्ञापना.

¶*Gopal Ganesh Barve explains the arrangements made at Gwalior on the evacuation of the fort by the Jat. The present arrangements, he says, are quite inadequate and he advises an augmentation of the garrison to be stationed there.*

No. 114] [*15-8-1754*

छ १९ जिलकाद

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामींचे शेवेसी

विनती सेवक मल्हारजी होलकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम छ २९ माहे शवाल मुकाम गांगुर्णी येथास्थित असे विशेष. साहेबी हरी * * * * * * (स)मागमे पत्र परवा केले ते छ २३ माहे मिनहूस पावोन संतोषावाप्ति जाली. प्रयाग कासीविशी वारंवार लिहितो त्याचे उतरच येत नाही. गाजुदीखानास वजिरी जाली. तेहि दिल्लीदाखल जाले अस्तील. दोन्ही कार्ये जरूर करून सनदा घ्याव्या म्हणौन पत्री आज्ञा. यैसियासी स्वामीकडून हरि खिजमतगार परभारे राजश्री गंगाधरपंताकडे मथुरेसी गेला होता. ते स्थली गाजुदीखान व ठाकूर सुरजमल वगैरे सर्व असेत. प्रयाग कासीच्या कार्याविसी सर्वदा राजश्री गंगाधर येशवंत यासी पत्रे जातात. दिलीकडील बंदोबस्त जाल्यावर ते दोन्ही कामे करून घेतील. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malharji Holkar writes to the Peshwa that his instructions regarding the occupation of Benares and Prayag are not being overlooked and Gangadhar Yashwant has been despatched to negotiate a treaty for those places.*

No. 115] [*5-8-1755*

पौ छ २८ सवाल

श्री

तीर्थरूप राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

अपत्यें रघुनाथानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २६ सवालपावेतों येथास्तित असे विशेष. श्रावणमासचे उछाहास लौकर श्रावण शुध त्रितीयेस यावें म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें दरकूच येतो. छ २५ सवाली इंदुवारी दारणानदी भोगुरापासी उतरून मुकामासी आलों. पुढे आज्ञेप्रमाणें जलद येतों. विदित जालें पाहिजे. राा मंगलवार प्रात:काल साहा घटिका दिवस. आज्ञाप्रो लौकर मुहूर्तास येणार आहों. बहुत काये लिहिणे विज्ञापना.

¶*Raghunathrao writes to the Peshwa that as directed he will be shortly in Poona for the Shravan celebrations.*

No. 116] [*26-8-1755*

पौ छ २७ जिल्हेज सुा सित

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत
प्रधान साहेब स्वामीजीचे सेवेसी

विनती. आज्ञाधारक रामराव नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १७ माहे जिल्काद सुा नागोर प्रांत मारवाड स्वामीचे तेज-प्रतापेंकडून येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जालें. सिरसा वंदलें. आज्ञा फर्माविली कीं त्या प्रांतचें वृत सविस्तर आपा लिहीत नाहीत; तरी तेथील विशदार्थ वृतांत लेखन करून कार्यसिधि अंती आणखीहि कितेक कार्य अंतरवेद वगैरे प्रांतीं विशेष लाभोदये योजोन आला तरी जावें, साहस कर्मास न प्रवर्तावें म्हणोन कितेकप्रकारें आज्ञा केली. यैसियासी सर्व कार्य महाराजांच्या प्रतापें-करून सिधीस पावतात. परंतु सांप्रत आपासाहेबास दगा होऊन कैलासवास जाला. ईश्वरें अनुचित केलें. हें वृत तााावार पूर्वीच सेवेसी विनतीपत्रीं लिााच असे. त्यामुलें उर्वरित कार्यास कांही अवकाश जाला. तेंहि कार्य सर्वहि सिधीतें पावावयासी महाराजांच्या प्रतापप्रभावेंकरून करावयासी राजश्री दताजी पाटील सिंदे व राजश्री जनकोजी सिंदे योग्येच आहेत. हिंदुस्थानांत यांचा

पराक्रम साहेबांच्या असीर्वादेंच उत्कट आहे. स्वामीचे सेवेसी पूर्वापासून येकनिष्टच आहेत हेंहि महाराज जाणतच असेत. सेवकानें लेहावेंसें काये आहे! हा दगा व्हावयासी कारण हेंच जालें, कीं गोसावी बिजेभारथी व राजसिंग चव्हाण व जगनेस्वर माध्येस्तीस आले होते. नागोरांहूनहि येक दोन वेळा गोवर्धन खिची आला होता. तो योग घडोन न आला. मग या त्रिवर्गांनी रावत जैतसिंग राणावत घेऊन येथें आल्यावरीं कांही येक दिवस सलूखाच्या गोष्टींत रदबदलीस लागलियां गोसावी व चव्हाण यांच्या अंगभूतें मारेकरी माणसें होतीं, त्यांणीं संधि पाहून दगा केला. त्या योगेंकडून रावत जैतसिंग व गोसावी व व्हाण आपलाल्या समुदायें नाष पावले. अत:पर बंदोबस्त सर्वप्रकारें करून उतम नागोरावरीच मुकाम होऊन आहेत. पुढें त्याच कार्यावरी उद्दीत असेत. तो पूर्वसंकल्प साभिमानयुक्त सिधीस पाववणार महाराज स्वामी धणी समर्थ आहेत. येणेंकरून हिंदुस्थान प्रांतींचे कार्य पादाक्रांत होऊन मनोदयें समर्थांचे सिधीस पावतील. सर्वज्ञांप्रती विशेष विनंती लेख करावयासी असामर्थ्य आहें. चिरंजीव रा। यादवराव व बाबूराव सेवेसी चरणासनिध आहेत. त्यांचा सांभाल करणार धणी माहाराज श्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Ramrao Narayan writes to the Peshwa details of the murder of Jayappa Sindia at Nagor, and assures the latter of the successful termination of the campaign.*

No. 117] [*21-10-1755*

छ २० सफर

श्री

शेवेसी विज्ञापना. विनंतीपत्रें लिहिली रवाना करावी इतकियात ताजे कलम राजश्री नरासिंगराव सिंदे व खानाजी जाधव व राणोजी भोईटे याची पत्रें छ १० तारखेची छ १४ मोहरमी आली. अनरूधसिंग यानें छ ९ मोहरमी रामगडीहून कूच करून दात्यावर मुकाम केला. कछव्याची फौज पंचवीस तीस हजार त्याचे भोवती आपली फौज होती. त्यास व यास पंधरा सोळा कोसाचा तफावत होता. तेव्हा छमारी संध्याकाळीं आपली फौज सडे स्वारीनसी त्रिवर्ग मारनिलें व आणखी पतकें दूसर दिवसी छ १० मोहरमी अनरूधसिंग आपली हाद सोडोन मारवाडचे हादेंत आला. प्रहरदिवस प्रात:कालचा ते समयी चंडोलावर जाऊन आपलें फौजेनें गाठ घातली. कछव्याची फौज साहासात हजार व तोफखाना होता त्याचे व आपलें लोकाचे युध्ये बहुत उतमप्रकारें जालें.

त्याजपासी आग फार. परंतु लोकानी मोठा छातीचा कोट करून तोफखानियावर चालोन जाऊन पहिलेंच उठावणीस तोफखाना घेऊन तीन च्यार घटका पर्येंत तरवार चालली. सात आठसे माणूस कापून काढिले व त्याचे घोडे हाजार बारासे आपले लस्करात आलें व उंटे च्यालीस पन्नास आली. दोन तोफा व गंजिफाच्या गढ्या तीन व रहकलें गाड्या च्यार येणेंप्रो घेऊन त्यास मोडोन माघारे घातले. आपल्याकडिल कासिबा फालके ठार पडले व जखमी लोक जालें

१ मूर्तुजाभाई तरवारेची ज(खम)

१ नाईकजी जाधव गोली मांडीवर

१ कुसाजी जठार मांडीस गोली

५० किा असामी

५३

येणेप्रो लोक जखमी जाले. स्वामीचे तेजप्रतापें करून चंडोल बुडविला. फते जाली. राहिलें रांगडें त्याचेंहि पारपत्य स्वामीचे पुण्यप्रतापें येथायुक्त होऊन येईल. येका दो रोजामध्यें त्याचे व आपलें लोकाचे मातबर युध्य होईल. वर्तमान आल्यानंतर सेवेसी विनंतीपत्र लेहून पाठऊ. लोक जखमी आलें त्याची नावनिसी लेहून आली म्हणजें तपसीलवार सेवेसी लिहिले जाईल. अनरूधसिंग जवल आलियावर येथून त्याजवरी जावें लागेल. स्वामीच्या तेजप्रतापें त्याचे पारपत्य उतम प्रकारे होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Antaji Mankeshwar reports a great victory over Anirudhsing of Jaipur.*

No. 118] [*About June 1755*

श्री

+पुं॥ श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. फतेसिंग मारला बाहादुरपूरची जागा घेतली. सेरपूर घेतले. दोन जागे नामी सिवाये सात आठ गढ्या येकून दोन माहाल सुटले. वरकड भाऊबंद तमाम बदलले. आम्हासी पैगाम आले की आम्ही तुमचे जमीदार पैका घेणे. येक दोन गढ्या * सतील त्या घेऊन पाडून टाकणे. भाऊबंद * *

+ विठ्ठल शिवदेवाचें हस्ताक्षर.

* * आपल्या आपल्या गावानी गेले. जमि * * (उ)ठोन गेले. कितीक सिबंदी * * गेले. ग्वालेरीचे शेहर उज्याड जाले. तेणेकरून राण्याने सलाबत खाऊन किला द्यावा आपण गोहदेस जावे यैसे करावे, परतु पके होईल न होईल, याकरिता मातवर मध्यस्तीच्या विचारांत होता तो अंताजीपती त्यास खातरजमेची पत्रे पाठविली त्यावरून त्याने हिमत धरून किल्यावर मात्र आहे. मुलुकाचा आषा मोडली. जे ठाणेदार भांडणे ते आपले हिमतीने भांडतात. येथील मजकूर तो यैसा. तिकडील पत्रे यैसी येतात. याचा विचार करून आज्ञा कर्तव्य ते करणार स्वामी समर्थ असेत. आम्ही तो मुल्ह * * * करितो. रोजमरा देतो. गाव * * मदार देतो. रुपयाहि आकारावा मुल्हकहि सोडवावा येणेप्रा नरवरचे केले. त्याप्रााच हे भर्टी भरली आहे. मुल्हक सुटल्यास स्वामी अंताजीपंतास देतील, आगर सरकारांत ठेवतील. हा येखत्यार खावंदाचा आहे. आम्ही काही त्याची इछा धरीत नाही. मुलकाचा झाडाहि सेवेसी पाठविला आहे. याउपर आम्हास आज्ञा करणे ते निक्षूण करावी. नाही तर श्रम करून व्यर्थ होतील यैसे न करावे अंताजीपंताची चाल येक प्रकार * * * करून आम्हास प * * किला जाटाखाले राखतील * * ठाणी देवतील. त्याचे केले सिधीस जाईल. मग आम्ही फजीत पाऊ. याकरिता निक्षूण आज्ञा करावी म्हणजे उठोन स्वामीचे स्वामीकडे येऊं. आमच्या जाग्याचा बंदोबस्त ज्यास सोपणे असेल त्यास सांगावा. जाट काही ठाणीठुणी राहू देतो यैसे नाही. अंताजीपंतासी बोलणार नाही. आमची ठाणी घेतली तेव्हा त्याचे ठाणे पोटेसी टाकून आमच्या ठाण्यावर जावे. मोर्चे लाऊन घ्यावे. त्यासी न बोलावे. ते मग आम्ही यास टाकून आलियावर कैसी सोडील याकरिता सर्व त्याचेच स्वाधीन करावे. आम्ही स्वामीजवळ येऊ. * * होये हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shivdev informs Dadasaheb of the defeat of the Rana of Gohad and the fall of that fort.*

No. 119] [*1755 end*

सेवेसी विज्ञापना. झासीहून आजचे मुकामी पत्रें आली; तेथे मजकूर लिहिला आहे तो विदित व्हावयाबदल लिहिला असें. दिलीस बिजेसिंगाने वकील पाठऊन वजीराचे विद्यमाने पांच लाख रुपये पातशाहास नजराणा पाठविला

कीं आपण कूच करून अजमेरचे सुमारें यावें; आणि दररोज दरकूच दाहा हजार रुपये देत जाऊ यैसा इत्यर्थ ठराऊन दिलीहून वजीरानें पातशाहास अजमेरचे सुमारे यावें. अजमेरची यात्रा व बिजेसिंगाची कुमक यैसा मनसबा विचारून मनसूरअलीचे पुत्रास फौजसुधा बोलाविले; व पठाण रोहिले यासहि बोलाविले. * * * * * * * * * * सें येकत्र होऊन जाणार. तूर्त जाटाचा पुत्राजवल (नागर)मल व राजे गोपालसिंग करोलीवाले जयेनगरास गेले. राजे कोटेवाले व बुंदीवाले यासीहि पत्रें गेली व खर्चाची बेगमी राजें माधवसिंगानी पाठऊन तमाम मालवियांत फौजाबदल नालबंदीचे रुपये पाठऊन फौज जमा करितात. बुंदेले राजे याजकडेहि पत्रें गेली आहेत. यांचे जाणे तों कलतच आहें; परंतु फितुरी मात्र आहेत. याप्रमाणे वजीरानें व राजे माधवसिंग यानी बखेडा आरंभिला आहे. याखेरीज लाहोर प्रांती अबदाली पठाण याजकडेहि बिजेसिंगाचे वकील * * * * निमित्य खर्चवेच कबूल करून * * * * * * * * * * * राजश्री अंताजी * * * * * * * * मुलुक लुटून मारवाड प्रांते जाण्याबदल सोपारपावेत गेले आहेत पुढें जातील तेव्हा खरें. दरम्यान फौजा रांगड्याच्या रूपनगरवाले व शाहापूरवाले मिलोन पाचसात हजार मार्ग रोखून बैसले आहेत. याप्रमाणें प्रस्तुत झासीहून लिहिलें आले असें. पुढें गेल्यानंतर सर्व ध्यानास येईल. दोन सालें मामलतीचा पैका सरकारांत झाडून घेतला. मुलकांत बाकी मुबलग बुडाली आहे. ठिकाण नाहीं. पेस्तर इजारा सख्त जाला. त्याहिमध्यें रांगड्याचा फितूर. याप्रमाणे चहूंकडून संकटे प्राप्त जाहाली. आम्हास दीड हजार फौजेनसी जाण्याची आज्ञा. हुजुर विनंती फौजेविसी केली. * * * * जाण्यास तैनाती फौज दोन हजारपर्यंत द्यावी. थोडी बहुत मान्यहि केली; परंतु अनकूल न जालें. बरें आज्ञेंप्रमाणें येथून वीस रोज झासीस पोहचावयास लागतील. तदनंतर येक मास फौजेची समजावीश व मुलकाचा बंदबस्त करावयास जरूर पाहिजे. त्यानंतर स्वार होऊन जाऊ. तोपावेतों राजश्री समशरबहादर व येसवंतराव पवार येतील त्यास सामील होऊन आज्ञेप्रमाणें जाऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Shankar on his way to his district, writes to the Peshwa that Bijesing is attempting to form a general alliance of the Rajput princes, the Rohilla chiefs, and Shuja-ud-daula against the Marathas and has sent emissaries to the court of Delhi. The writer proposes to march towards Marwad after effecting a junction with Samsher Bahadar and Pawar.*

No. 120] [About Feb. 1756

[आरंभीचा मजकूर फाटला आहे.]

* करून तेथून दरमजली * येथेंपावेतों आलों. पुढें झासीस पोहचा-वयास लांबलांब मजली करून जाण्यास पंधरा वीस दिवस लागतील. मामलतीत दोन वर्षें राहिलो नाहीं. तिगस्तांचे साल कुंभरीकडे गेलों. तिकडून आल्यावर देशासच आलों. दीड वर्षपर्यंत देसीं येऊन जालें. गुदस्तांचा पैका तों दरबारीच असतां कर्जे घेऊन भरिला व सालमजकुरचा यवजहि झाडा करून दिल्हा. मुलुकातील रुपया उगवला नाही. बाकी मुबलग राहिली व कमीहि आली; याजमुळें रुपया वसूल न जाहाला. मामलतीचा बंदबस्त न जाला तरी लाखो रुपयास गला गुंतला तों उगवला पाहिजे. यास्तव झासीस जाऊन तेथें महिना पंधरा दिवस राहून थोडा बहुत बंदबस्त करून फौजेची तयारी करून मारवाड प्रांतास जातों. राजश्री अंताजीपंत व तुम्ही येकत्र होऊन जाणें म्हणून पत्रीं आज्ञापिलें. त्यास ते थोर सरदार, त्यांची फौज मातबर ते आजपावेतों राहिले नसतील; जाऊन पोहचले असतीलच. आम्हास स्वामींनी जाण्याची आज्ञा केली. मामल्याचा बखेडा या रीतीचा असोन, स्वामींचे आज्ञेप्रमाणें मान्य केले. समागमें फौज तैनाती दोन हजारपावेतों द्यावीसी केली; परंतु पांचसेहि स्वार रवाना न जालें. आजपावेतों हुजुरचे फौजे (ची मार्गप्र)तीक्षा (केली; परं)तु कोणी पथक आले नाहीं. * वाचून त्या प्रांतीं जाण्यास निभा होणार नाहीं. राजश्री येसवंतराऊ पवार व राजश्री समशेर-बहादर या उभयेतांची रवानगी त्या प्रांतास स्वामींनी केली; ते हिंदुस्थानांत येतील. आम्ही त्यांस सामील होऊन समागमें जावें म्हणून स्वामींनी समक्ष सेवकास आज्ञा केली आहे; त्याप्रमाणें उभयेतां सरदार फौजेसह वर्तमान आल्यानंतर धण्याचे आज्ञेप्रमाणें सामील होऊं. झांसीस लांबलांब मजलीन जाऊन तेथील फौजेची तयारी करून हे उभयेतां सरदार आले म्हणजें आम्हीहि सामील होऊन त्यांसमागमें जाऊ. दोन हजार फौज तैनातीस हुजुरून जाहाली असती, तरी इतक्याच सामानानिसी चाकरीस जाण्यास न चुकतों. पंधरासे स्वारानसीं त्या प्रांतीं निभाव होतां परम कठीण; मातबर फौजेवितरिक्त शत्रूसहि दबाव पडत नाही, या प्रकारचा विचार असे. पहिल्या मामलतीचा बंदबस्त दोन वर्षें नसतां सिंवसे याची मामलत स्वामींनी कृपा करून सांगितली. तेणेंप्रमाणेच सही कबूल करून रसदेचा यैवज पाठविला आहे; परंतु तेथील पैका झाडून अंताजीपंतानी नेला; पुढें मामल्याचा बंदबस्त होऊन यैवज उगवला

पाहिजे. मारवाडातहि जाणें जरूरच; मामल्याचाहि बंदबस्त करणें, अवकाश तों नाही थैसा अडचणीचा प्रसंग येऊन पडिला आहें. याजउपरी दरमजलीनें झासीस जाऊन तेथील थोडाबहुत बंदबस्त करून फौजेचीं तयारी करून उभयेतां सरदार आलें म्हणजें आम्ही सामील होऊन जातों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Shankar informs the Peshwa that he will proceed to Marwad after effecting a junction with the forces of Samsher Bahadar and Yeshwantrao Pawar.*

No. 121] [*1755?*

श्रीमोरया

दंडवर्ते[१] विनंती उपरी. आपणापासून स्वार जालो ते चुरखीस आलो. त्यासी लोक मागून येत होते. जितके होतो तितक्यानीच भगवंतगडवाला वगैरे पठाण मदतीस आणिले होते ते सर्व मोडून गावापासी घातले. काही घोडी व उंटे घेतली. आपणाकडील घोडी पांच सात पडली. काही जखमी आहेत. माणूसहि वीस पंचवीस चालीस माणूस दोही लस्करची आहेत. चुरखीपासी पाणी नाही, याजकरितां कोसा दिढावर मुकाम केला आहे. उदईक जे वर्तमान होईल ते लेहून पाठऊन. आपण वेत्रवतीवर सोमवारचा मुकाम केला. राऊत पाठविले. त्यानी वर्तमान सागितले की आलीकडे पाणी नाही, याकरितां वेत्रवतीवर मुकाम केला तरी उतम गोष्ट केली. याउपरी तेथेंच नदीवर मुकाम करावा. आम्ही येथील होय नव्हे करून वरचेवरी लिहीत जाऊन. बहुत काये लिहीणे? आपणहि पाणियाचा शोध पाहून लस्करास वोढा न पडे ते करावें आणि बेलदार हौसराज बकसीस ताकीद करून पाठवावे. कामाठी बेलदार दोहीकडील ताकीद करून पाठवावे हे विनंती. हे पत्र सोमवारी साईकाळीं पाठविले आसे हे विनंती.

¶*Malharrao Holkar to Raghunathrao (?) reporting his arrival at Churkhi and the defeat of a small Pathan force. He further advises the addressee to halt near the Vetravati.*

---

१ पत्र मल्हारराव होळकराचें.

No. 122] [15-1-1756?

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेऊ कृतानेक सा। नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। पौश शुध १३ त्रयोदसी जाणून सेवकाचे वर्तमान येस्थास्तित असे विशेष. स्वामींचे आज्ञापत्र सादर जाले होते की, पुढे झांसीस नारो शंकर याजकडे जाणे. त्यावरून लोकास पत्रे पाठविली. लोक जमा होतात. रोजमऱ्यास यैवज पाहिजे. स्वामीस विनंतीपत्र पाठविले होते. त्यास वरात दिल्ही आहे. वरात पुढे चैत्रमासी पावेल. परंतु रोजमऱ्यास यैवज रोख काही तरी देवावयास आज्ञा करावी. स्वामी म्हणतील, कर्ज घेऊन जावे. त्यास मागील कर्ज चक्रवाडीने हिसेब जाला. जाजती पैका समजाविसीस लागला. ग्वालेरीत राऊत पाठविले त्यास दीडमाही बेगमी करून दिल्ही. यैसी येकास सेंडी फुटली. पुढे कर्ज कोठवर ध्यावें? कर्जामुळे स्वामीच्या चितात विशाद येऊन काये म्हणतील हे न कळे. आपण काही माजोरपणे केले नाही. स्वामीच्या पायासी निष्टा असली तर ईस्वरे बाहेर काढील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shivdeo asks for funds in order to defray his expenses. The whole letter is an autograph.*

No. 123] [1755?

श्री

विनंती उपरी. रा। जनार्दनपंताचीं पत्रें आली तीच बजिनस आपणाकडे पाठविली आहेत. आपल्याकडील माणिकराव व निंबाजी खटके यैसी फौज गेली ते मार्गी मेली किंवा रोहिल्यानी लुटली हे काही कलत नाही. जनार्दनपंताचे कुमकेस जावयास त्यास येथून पत्रे पाठविली ती येकीचकडे राहिली. कुमक करावी, साहित्य करावे हे काहीच नाही. वाव्हापुरते मात्र हाजीर. कामकाजास नाही. बरें आसो. सर्वानी माहाला +अलीकडे घेतले. त्यास पलीकडे जावे लागले. फुकाची मदतहि न करीत हे ठावके आसो द्यावे हे विनंती.

¶*Sakharam Bapu reprimands an officer for failing to support Janardanpant.*

\+ पत्र सखाराम बापूचें असून यापुढील मजकूर खुद त्यांचे हातचा आहे.

No. 124] [26-1-1756 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक गोविंद बलाल कृतानेक सां नमस्कार विनंती. ता पौष वद्य दशमीपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आम्हाकडे सालास दोन तीन हजार फौज सरकारी ताबिनात असते. त्यास राजश्री गंगाधर बाजीराव यांचे पथक गेलियावर मोबदला फौज न आली. गाजीपुरीं फौजेचे प्रयोजन पडेल तेव्हा राजश्री हरीपंती च्यारसे स्वार आपले दिल्हे. च्यार महिने होते. त्यानंतर मारनिलेहि खासा कोडाजाहनाबाजेस आले होते. इतकियात मेणपुरीचा फितूर पडला तिकडे आम्ही गेले. तिकडेहि च्यारसे स्वार याचे नेले होते. आम्हास तिकडे महिना पंधरा दिवस गुंता पडला. पंत मारनिले कालपीहून स्वार होऊन राजे जगतराज याजकडे आले. कर्जपटी-निमित्त दबाव देऊन कर्जपटीची मामलत चुकविली. इतकियात आम्हीहि येथें दाखल जालो. उभयेताही कालिंजरास जाऊन मागील पैशाची वाट करून द्यावी पुढे कर्जपटीची टीपटाप करार करून द्यावा तों अंतरवेदीत फितूर जाला. सकुराबादेचे ठाणे उठले. तमाम आमल बंद जाहाला. जरूर जाणौन हरीपंत यासी फौजसुधां तिकडे घेऊन गेलो. अंतरवेदीत पांच हजार फौज जरूर आली पाहिजे. फौज न आली तर दस्त राहाणार नाही. येविसीची विनती दोन तीन पत्री लिहिलीच आहे. वजीर बेइमानीस आला. तमाम आंतरवेदची सनदे करून फितूर आरंभिला. त्यास चार हजार फौज बहुत ताबडतोब येते उपराला होतो तर आमल राहील. आम्ही विनंती चारे वेला लिहिली. हे जागा विनाफौज दस्त येकंदर राहात नाही. त्यास खावंद खबर न घेत तर आम्हा सेवकाचा उपाये काये? हाजार विनती हेच जाणावी. दुसरे पत्र यावयासी दोन महिने पाहिजे. मार्गहि दुर्घट जाले. माणूस पावेल न पावेल याजकरिता फौज तैनाती सत्वर पाठवावी. येथे फजिती जाली. ठाणी उठो लागली. आमचा जो इलाज तो करीत आहो. बेइलाजास उपाये नाही. रा हरीपंत आम्ही दरमजलीनी माघारे गेलो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govind Ballal to the Peshwa describing the disturbed condition of the Doab and requesting him to send reinforcements.*

3636

No. 125] *[14-2-1756*

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत प्र-
धान स्वामीचे सो

सो विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादा स्वामी दिलीत आसता चामले मडे(?)व चामडे मोरडा (?) इजारा पातशाहापासून रा बापूजी माहादेव व रा दामोदर माहादेव यानी करून आम्हाकडे दिल्हा. रुपये श्रीमंत राजश्री दादा स्वामीकडे देविले. आम्ही फौजसुधा परगणे मजकुरी आलो. त्यास येथे बकरुलाखान पाच हजार फौज व आठ हजार प्यादे, याजखेरीज बाण जेजाले तोफहि बहुत होती. येक सवा महिना त्याजला घेरिला. नित्य जुंजे होत. निदान माघ सुध १३ सनवारी त्याचे आमचे जुज मातबर जाले. तीनसे च्यार(से) मोगल कामास आले. आम्हासहि शभर माणूस ठार जाले. तीनसे चारसे माणूस जखमी जाले. दीड पावणे दोनसे घोडे ठार, दोनसे पावेतो जखमी जाले. मोगल लुटून पस्त केला. तोफखाना घेतला. रा गंगाधर बाजीराव याचे लोकानी मोठी शर्त केली. रा मानाजी पायेगुडे याणीहि आपले कुवतीप्रमाणे केली. साराश मोगल मातबर भारी होता. स्वामीचे कृपेने प्रतापेकरूनच आम्हास येश आले. नाही तर दिलीत फितवा, येथे फितवा, दोहीकडे दोनी जागा (?) निकड फार जाली. आम्हास मदत कोणी नाही. मोगलास सर्व रज(वा)डे जमिदार * नित्य मदत, परतु आम्हीहि निकड केली. जिवाकडे न पाहाता लाहान थोरानी मेहनत करून फते स्वामीची जाली. तोफा स्वामीचे घरी आली. हे येश स्वामीचेच कृपेने आणि प्रतापे आले. नाही तर आम्ही येऊन फसलो होतो. फौज सत्वर बुदेलखंडचे तैनातीची पाठवावी. ते येथे ठेऊन सेवेसी येऊन. पाये पाहून पाच वरसे जाली. स्वामीचे पाये पाहिलियाने सनाथ होऊन. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶ *Govind Ballal describes an encounter with Bakarulakhan in which the latter was vanquished. The writer was assisted by Gangadhar Bajirao and Manaji Paygude.*

No. 126] *[Recd. 11-3-1756*

पा छ ९ जमादिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊसो

विनंती ऐसीजे. राजश्री अंताजी माणकेश्वर इटावा वगैरे माहाल मळऊन द्यावयाचे येहसान दाखवितात. त्यासी सनदा व आमील श्रीमंत राजश्री

दादासाहेबाजवळ आम्ही पाठऊ आणि अंताजीपंताचा मुभा (?) सरकारांत मुतसदी करतील यास आमचा उपाये काये आहे. आसे. दुसरे हेहि हिंदुस्थान जाहेर करीत जे आम्ही सिंद्यापेक्षा होळकरापेक्षा थोर इजत राखितो. त्यासी सिंदे होळकराणी सफतरजेंगाचे साहित्य करून कोड रुपये सरकारात घातले. त्यानी आमची वकालतमात्र बेइतबार करून सरकारचा रुपया खाला. वीस लाख रुपये येऊन उभयपक्षी सल्लख होत होता तो होऊ न दिधला. पाचा लाखा रुपयावर नजर देऊन सरकारचे केल्याचे व वकालतीचे व सरदाराचे केल्याची इजत खोऊन हे सरदार जाले व आपल्या हातें सरदारीची इजत खोविली. त्या दिवसापासून आजपरियेंत जे काम केले ते मुजऱ्याचेंच केलें. असो सेवकास आज्ञा करायाची ते करावी. सेवेसी श्रुत होयें. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Hingne complains to Bhausaheb of the proceedings of Antaji Mankeshwar, which were harmful to the interests of the Peshwa.*

No. 127] [*25-3-1756*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायेत छ २३ जमादिलाखर मुकाम नदी धसाण नजीक जयेतपूर स्वामीचे कृपाद्रिष्टीकडून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. यानंतर स्वामीनी मारवाडची मोहीम सेवकास सागितली. त्याप्रमाणे फौजसुधा नरवरेपावेतों गेलों तों राजश्री समशरबाहादर यांचे पत्र आले जे आम्हीहि जलदीने येत असों. तुम्ही आम्हीं येकत्र होऊन पुढे दरमजलीने जाऊ. त्याजवरून पंधरा दिवस वाट पाहिली तों इतकियांत राजश्री जनकोजी सिंदे याजकडील पत्रें आली जे मारवाडचा सला जाहाला. इकडील गुता थोडियाच दिवसात उरकून आम्हीच त्या प्रांतास येत असों, तुम्ही मारवाडांत न येणे. अंतरवेद प्रांती जमिदारानी बखेडा आरंभिला आहे तिकडे जाऊन राजश्री गोविंदपंत व तुम्ही येकत्र होऊन सरकारचे मुलुकाचा बंदबस्त राखणे. त्याजवरू आम्ही नरवरचे मुकामीहून माघारे फिरलो. राजश्री गोविंदपंताकडून कारकून राजश्री मोरोपंत बोलावण्याकरितां आलेच आसेत. याजउपरी अंतरवेद प्रांती जाऊन राजश्री गोविंदपताची भेटी जाहालियावरी

+ पत्र हिंगणे वकिलाचें.

त्या प्रांतीचे सविस्तर सेवेसी लिहून पाठवूं. वरकड या प्रांतीचे वृत साद्यंत राजश्री रामाजी माहादेव सांगतां कळो येईल. मतलबाची यादी पंत मशारनिलेसमागमें पाठविली असें. ध्यानास आणून आज्ञा कर्तव्य ते कृपा करून उतर ल्याहावें. बहुत काये लिहिणें हे विज्ञापना.

¶*Naro Shankar deputed by the Peshwa to relieve Sindia in Marwad writes to the Peshwa saying that as he learnt from Jankoji himself that the Marwad affair has been successfully terminated he is proceeding to quell the disturbance in the Doab.*

No. 128] *[29-3-1756*

श्री

श्रीमत राजश्री सखारामपत बापू
स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २७ जमादिलाखर मुकाम श्रीपुष्कर स्वामींचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. आपण कृपा करून दोन पत्रे पाठविलीं तीं पावोन बहुत संतोष जाहाला. ऐसेच सदैव पत्र पाठऊन सांभाळ करीत आसिले पाहिजे. इकडील वर्तमान तरी नागोरचा सलूख जाहाला. जालोरचा किला व निमे मुलूक राजे रामसिंग यास द्यावा. सरकारची मामलत पंनास करार जाहाली. जालोरचा किला तो हस्तगत जाहाला. मुलकाची वाटणी होणे आहे तेहि आठा पंधरा दिवसात होईल. मारवाडचा गुता उरकला म्हणजे जैनगरच्या मुलकात जाणार. अनरुधसिंग समागमेच आहे. बोलीहून जो ठहराव होईल तो (मागऊन) सविस्तर लेहून पाठऊ. आपणाक(डे) * * * * येतात. येणेकरून बहुत * * * * * वरकड काही नवल विशेष ल्याहावे असे नाही. अलवलचा किला मेवाते * * ता त्याजवरी पातशाई किलेदार होता त्यास राजे माधोसिंग यानी पंनास हजार रुपये देऊन किला घेतला. हे वर्तमान सुरमजल जाटास कलताच पांच हजार फौज देऊन रूपराम कटाऱ्यास पाठविले. त्याणे किल्यास वेढा घालून बसला. मागून जवाहीरमल पाठविला. त्याचे मागून आपण खासा सुरजमल गेला आणि आलवलचा किला घेतला असे वर्तमान येथे आले आहे. किला बहुत उतम चागला पाहाडी आहे. किल्यावर पाणी जिवंत आहे. जागा चांगला हस्तगत जाहाला. आपणास कलावे म्हणौन लिहिले आहे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो द्यावा हे विनंती.

¶*Ramaji Anant Dabholkar writes to Sakharam Bapu about the successful termination of the Marwad campaign and the terms agreed upon. He further writes about the capture of the fort of Alwal by Surajmal and his son.*

No. 129] [1757

श्री

पुरवणी[1] श्रीमंत राजश्री भाऊसो

विनंती ऐसीजे. राजश्री अंताजी माणकेश्वर पहिले साताशा श्वाराचे सरदार. उभयेता सरदार गाजुदीखानास घेऊन आले ते वेळेस सिरोजेपासून यासी आमच्या तैनातीस पाठविले. त्यासी याचे श्वार सातसे असतां अडचा हाजाराची हाजरी हाजरी लेहून घेतली. सिंद्याजवळ गेले तेव्हां सातसे स्वार असतां याजप्रा त्याजपासूनहि लेहून घेतले. दिलींत पंधरा लाख रुा पाचा लाखाची जागीर सरकारची मुकारा (र) केली असतां ते बुडऊन सरकारचाच रुपया खाला. वजीर पातशाहास दोघास विशमन केले. कुंभेरीवर श्रीमंत रा दादासाहेब होते त्या समयापासून आमच्या नाहक चुगल्या खाऊन काये रुपया सरकारात घेतला तो पाहावा. असो. समुद्राचे जेळ समुद्रासच तर्पण समुद्रच तृप्यंतु. सरकारात—एक रुपया तोच मी ठिकाणी जाणतो परंतु इनसाफ करणार स्वामी स(म)र्थ आहेत. हा ग्रहस्त दोहीकडील तलबा घेत आला. त्याजला हिसेब कोण पुसत आहे ? जयेपुराजवल बिजेसिंगास काढून देऊन पाच पचेवीस घेतले. मामलतीस कोण होता ? आबदालीचे वेळेस वजिरापासून व जाटापासून काये घेतले व सरकारातून तलबा काये घेतली, सरंजाम काये होता, हाजरी गैरहाजरी काये, सखारामपंताचा कारभारापासून चालत आले त्याचा हिसेब दिखील कोन्ही पुसत नाही. आम्हास सरकारातून नेमणूक काये, हिसेब नसता काये रुपया घेतला. अद्यापवर अशा घोरात घातले जे प्राणच द्यावा आथवा काये करावे. नाशीकास तऱ्ही कोणें तोंडे जावे ? आज च्यार महिने जाले चौ महिनियात लाखां दिढा लाखा रुपयाखाले आलो. आतां स्वामीकडे (अपूर्ण)

¶*Hingne complains to the Peshwa against Antaji Mankeshwar and reports his fraudulent money dealings. This fragmentary paper precedes letter No. 126 and should be read along with it.*

No. 130] [March 1756

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती ऐसीजे. राजश्री अंताजी माणकेस्वर याजकडून दिलींत त्रिंबकपंत म्हणून ग्रहस्त आहेत. त्यानी श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे व राजश्री सखाराम-

---

१ पत्र हिंगणे वकिलाचें.

पंताचे पत्र वजिरास दाखविले जे मेरट वगैरे दोन माहाल अंताजीपंतास जागीर दिधली असेत. त्यावरून वजिरानी उतर दिधलें जे माझे घर श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे तसदूख[1] आहे परंतु हे माहाल सरंबाखास[2] पातशाहाचे. पातशाहास साडे बारा लाख रुपये द्यावयास दुस्तर याकरिता साडेबाराची तनखा या माहाला- वर जाली ऐसें असतां ते जागीर तुम्हास कैसे देतील ? बाकी हे माहाल कर्जाचे तर व जागीर तर साडेबाराचे हवालियाचे तर वकिलाचे आहेत याप्रा वजिरानी जाबसाल केला. सेवेसी श्रुत व्हावे म्हणून लिहिले असे. बहुत[+] काय लिा ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Hingne to Bhausaheb saying that the Vazir himself wonders how the Peshwa could assign to Antajipant the two mahals which belonged to the Emperor himself.*

No. 131] [*11-6-1755*

श्री

तीर्थरूप राजश्री नाना

स्वामी वडिलांचे सेवसी

आपत्ये रघुनाथाने सा। नमस्कार विनंती. किले ग्वालेर येथील बेगमीस रा। हरि विठल यांजकडून पा। शाहापूर आकबरपूर प्रांत अंतरवेद येथील सालमज- रचे रसदेपैकी रुपये ५०००० पंनास हजार देविले आहेत. राजश्री गोपाळराव गणेश याजकडे पावते करून कबज घेतील. स्वामीनी सदरहू पंनास हजार रुों रसदेच्या यैवजांत मजुरा द्यावे. रा। छ ३० साबान सुा। सीत खमसैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunathrao reports to the Peshwa an adjustment of certain money matters in the North.*

No. 132] [*Recd. 29-7-1756?*

पौ छ १ जिलकाद

श्री

विनंती यैसीजे. वजिरांची ताकीदपत्रें येथील राजेरजवाड्यास आली आहेत की मराठियांस अमल न देणे. त्यावरून दतियेकर याणी वाटणीचा कजिया

---

१ दान. २ जातखर्चाकरितां तोडून दिलेला मुलख. + पत्र हिंगणे वकिलाचें.

3641

उपस्थित करून सरकारात ज * * * ती शेवळ्यापैकी वाटणी गेली म्हणोन * * * * करून तालगाव वगैरे येथे जप्ति * * * * * आहे. आम्ही बाहेर विज्य * * * * * * निघालो आहो. * * * * * * * * त्यासारिखें मागाहून * * * * * * * * ज ठेवावी तरी सरकारची आज्ञा क * * * * सिवाय ज्याजती खर्च वाढऊ नये. येथे फौज न ठेविलियास अमल राहाणें कठीण; ठेविलियास भक्षावयाचे कठीण; याप्रो पेच येऊन पडला आहे. उपाय काही चालत नाही. जेणेकरून सरकारचा शब्द आम्हाकडे न येता आमचे येणे देसी होय तो आर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. आम्ही सर्वस्वे आपले म्हणवितों. आम्हाकडे येखादे गोष्टीने स्वामी आल्यास आपले आज्ञेचे फल काय याजकरितां फौजा लौकर रवाना होऊन इकडील बंदोबस्त होतो तरी उतम आहे. फाजील फार गुंतले आहे. याचा निर्गम येथील येथेच होईल हा अर्थ, मवास यांचे पारपत्य जाहाल्याखेरीज होतां दिसत नाही. ऋणानुबंध आपले आज्ञेचे लक्ष धरून आहों. दुसरा आर्थ जाणत नाही. सिबंदी गुदस्ता द * * * * * ज्याजती ठेविली आहे तैसीच * * * * * तत्रापि * हेया किजे हे विनंती.

¶*The Peshwa is requested to send troops to counteract the Vazir's intrigues against Maratha aggression.*

No. 133] *[1-6-1766*

पौ छ २८ जिल्हेज
सन सबा

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे
शेवेसी

विनंती सेवक पुरुषोतम माहादेव कृतानेक सां नमस्कार. विज्ञापि. येथील कुशल ताा छ २२ माहे जि * * स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. छ १७ जिल्हेजी नवाब वजीर फरूकाबादेचे नजीक * * * वर येऊन उभे राहिले. शेहरातून अहमदखान * * बाहीर निघोन दोन कोस सामोरा येऊन भेटले. * * * न करून वजिराचे हवेलीस आले. आम्हीहि बराबर होतो. येक घटका बसून तेथेच आम्हास रुकसत क * *

* गांत जागा दिल्ही. येथे राहिलो. तदोत्तर अहमदखानाच्या शरिरास सावकाश नव्हते यास्तव च्यार दिवस आपलाल्या स्थलीच होते. याउपरी छ २० मिनहूस शुक्रवारी संध्याकाली अहमदखानानी नवाब वजिरास व आम्हास बोलाऊ पाठविले. तेथे गेलो. सिष्टाचाराच्या स्वामीच्या पूर्वस्नेहाच्या गोष्टी बहुत सांगितल्या. स्तुत बहुत केली. कामाकाजाच्या गोष्टींचा ठराव करावया-निमित्य हाफीज रहमतखानास तेच वेलेस भले माणूस येक वजिराकडील व येक अहमदखानाकडील येसे उभयेताकडील गावास हाफिजास बोलाऊ पाठविले. तेहि सत्वरच येणार. येथे आल्यावर तहरह ठरेल ते सो विनंती लिहू. दुसरे दिलीकडील वर्तमान आले की सरंहदेच्या जिल्ह्यात आला जाटासी व सिखासी हर्शामर्शी * * * जाला आहे. सीख चढाई करून त्याचे गांवावर येणार * * नजीबखान आला जाटाचे कुमकेस कुरुक्षेत्राकडे मुस्तफाबाद आहे तेथे जाऊन पावला. पुढे (मजल दरमजल) चालला जातो. पुढे वृत येईल ते विनंती लिहू * * * प्रयागात आहेत. शुजाउदौले मुनिरदौले (समागम) घेऊन घेऊन साबतजंग फिरंगी पटणियास आहे त्याकडे जाणार. शृत होये. पुढे अमलात * * * विनंती लिहू. कृपा केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Purushottam Mahadev reports to Raghunathrao the results of certain negotiations between himself, Ahmadkhan Bangash, and the Vazir. Reference is made to differences which had arisen between Ala Jat and the Sikhs.*

No. 134] [*28-10-1754*

श्री

आपत्ये रघुनाथाने चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ११ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. राजश्री नारो शंकर यासी कुंभेरीचे कामाकाजानिमित्य फौजेसहित बोलाविले. फौजेनसी येऊन शेवा केली. कामाचे माणूस. पाहिलेपासून स्वामीचे पदरीचे आहेत. निष्ठपणें शेवा करितात. मामलतीचे हिसेबाकरितां सेवेसी आले आहेत. याजवरी कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao recommends Naro Shankar to the favour of the Peshwa for his services at Kumbher.*

No. 135] [*18-10-1756*

पौ छ १० मोहरम

श्री

श्रीमंत मातुश्री बाई
साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद बल्लाल कृतानेक सा। नमस्कार विनंती. ता। आस्विन वद्य दशमीपावेतो साहेबाचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे विशेष. इकडील वर्तमान तर आम्हास देशास जाणे जरूर यास्तव तयारी करून निघावयाचा विचार केला तो पातशाह व वजीर दिलीहून बाहीर निघाले, आंतरवेदींत येऊन बखेडा करावा, आमल उठवावा हा मनसबा केला, त्याजवरून तमाम जमिदारास वारे लागले. नजरा सर्वांच्या फिरल्या. कजियाचा प्रसंग येऊन पडला. डोलेझाक करून देशास गेले तर आगदी आमल उठेल यास्तव च्यार दिवस राहून वजिराकडील बंदोबस्त करून मग देशास जावे, यास्तव रहावे लागले. कजिया तो मोठा येऊन बाज (?) खादला होता. तशामधे राजश्री अंताजीपंतहि येऊन आगरियासी पोंहचले. आम्हासहि बोलाविले त्याजवरून आम्ही आपले जमावानसी आगरियाजवल आलो. वजिरासी रदबदली करणे ते करून वजिरासी सल्क केला. याजउपर कजियाचा विचार नाहीं. आपण काही इकडील फिकीर न करावी. वजिरासी सल्क जाला. याजउपर इकडील बंदोबस्त करून देशास जावयाचा विचार करूं. देशाकडील वर्तमान तर श्रीमंत स्वामी पुणियात आहेत. पुणियाहून जोडीहि सत्वरच येईल. वर्तमान आलियावर सेवेसी लिहून पाठऊ. वरचेवर वर्तमान लिहीत जाऊन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govind Ballal to Sagunabai explaining why he was delayed in the Doab and adding that he would soon proceed southwards.*

No. 136] [*1756?*

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री भाऊसा

विनंती ऐसीजे. कामबक्षाचा नातू मोहीयुसूना(फ?) त्याचा लेक करीमबक्षाचा पुतन्या ज्याचा शुका[१] राजश्री कृष्णराऊजीस आम्ही दाखविला होता. पहिले वजीर व मलकाजमानी याच्या विचारे करीमबक्ष मुकरर केला हो(ता). त्यानी

---

१ फर्मान.

आपली वृधआवस्था जाणून हा भावाचा पुत्र घेतला होता. त्यासी सलतनत मुकरर केली. त्यासी समयास पोहचणे जालिया मागले जावसालाची तोडजोड होईल. त्यासी येथून टिका पोहचलियाने ते जाणतील जे विज्यापूरच्या पातशाहाचे लेकीचा वौंश जाणून पूर्वस्नेह स्मरूण टिका पाठविला म्हणून खूशे होऊन सिलसिला कायेम करायास अंतर्बाहेये कार्यास येता. त्यास येथें मुतसदी म्हणतात जे श्रीमंत राजश्री नानासाहेब व श्रीमंत रा। भाऊसाहेब येकत्र जालियाखेरीज काम करून देणार नाही म्हणून राजश्री बाबुराव फडनीस म्हणतात. त्यासी आमची अबरू राहे तें करणार स्वामी समर्थ आहेत. +सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Hingne reports to Bhausaheb the plans made by the Vazir and Malkajamani for selecting a new candidate for the Imperial Throne.*

No. 137] [*1756*

श्री

शेवेसी विनंती. सां। वोडसे नि॥ बाबूराव दादाजी सु॥ सबा खमसैन मया आलफ.

मीरखान टोकें हें स्वामीकडें आले आसिलें तरी पाठवावें; नाही तरी त्यांस पत्र पाठऊन आम्हाकडे सत्वर येत तें करावे.

खर्चास नाही. येथे सावकारीत नारोशंकर याणी ताकीद केली. उपाये नाही. वस्तभाव मोडून खाली. नारो शंकर याजवल कर्ज दाहा हजार मागत होतों ते न दिल्हे. सर्वांस दूध पाजावे हे उतम नाहीं याप्रों उतर दिल्हें. आम्हीं पूर्वी पाच हजार सिरोंजेत कर्ज घेतलें. त्याणीहि निकड केली आहे; यास्तव नारोशंकर याजकडून आगर गोपालराव बापूजी

शाहाबाजखान मीरखान याचे पुत्र गोविंद बलाल याचे निसबतीस फौजसुधा आहेत. त्यांस सरकारची पत्रें गेली आहेत, त्याप्रों दुमाही बेगमी करून सत्वर पाठऊन देणे म्हणोन बालाजी गोविंद यांस पत्र पाठऊन सत्वर येऊन पोहचत तें केले पा।.

सावंतसिंगाचे वकील नारो शंकर समागमे घेऊन गेले आहेत. ते आम्हाकडें पाठऊन द्यावे, व त्यास ताकीद करावी कीं राजे मजकूर हुजुरचे आज्ञेप्रों दुसऱ्याचा आश्रये न कारिता वर्तावे म्हणोन ताकीद व राज्यास पत्र.

+ पत्र हिंगणे वकिलाचें.

कालपीकडून दोहीमध्ये दाहा हजार रुा घ्यावयाची वरांत पाठविली पाहिजे. पाच हजार कर्ज वारून पाच हजार बंदोबस्त होये तोपर्यंत खावयाची बेगमी पाहिजे.

सिबंदी समागमें आहे.

१५० राऊत

२५० प्यादे

———

४००

च्यारसे आहेत पैकी राऊताची बेगमी दुमाही हुजरून जाली होती. सांप्रत आलीकडे दुमाही ऐन पाच हजार कर्ज जाले आहे. शेवेसी श्रुत होये.

राजे सावंतसिंग वोडसेंकर याचे तर्फेने वकील कितेक प्रकारे सावकाराची व नजरेची विनंती करून विल्हे करून देऊ म्हणोन करितील ते न आइकावी. सर्व स्वामीकार्य घडोन येत आहे.

¶*This is probably addressed to Raghunathrao asking for orders on several definite points in connection with the campaign of Orchha.*

No. 138] [*March-April 1756*

४

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादासाहेबी जुनी फौजेची साडेच्यार हजार फौजेची नेमणूक करून गेले तेहि अखेर फालगुणपर्यंत गेले. जदीद फौज साडे पाच हजार राजश्री दताजी बावा जनकोजी बावा याचे आज्ञेवरून यैन मातबर चाकरी केली. फौज सरस, सामान चांगले माहागाई मोठी * * * * च्या बोल्या भ * * अणि द * * * * साडे पाच हजार फौजेची नेमणूकच नाही. राजश्री दताजी सिंदे व रा। जनकोजी सिंदे यासहि सरकारची पत्रे * * की अंताजीपंतास येक रुपया न पाववणे. त्याची बेगमी सर्व केली आहे. त्याजवरून त्यांनीं पत्रेच दाखविली; गणतीची संवशये तरी च्यार गणत्या दोन खड्या गणत्या व दोन गोटगणत्या फारसी निर्कश करून घेतल्या.

दाहा हजार फौज भरली. चाकरी समयास येऊन केली. त्यास या फौजेस आम्ही निराले मेलवावे तरी आम्ही संततर साहा महिने फिरतों, तर दाहा लाख रूपये हरयेक युक्तीने मेलवितों. आता सरदाराबाा आहों. ते जे चाकरी सांगतात तेच करितों. आम्ही याचे पदरी आलियाउपरी जे जमा आकारेल त्याची वाटणी गणतीप्राां सर्वेच आम्हास दिल्ही तरी सिबंदी वारून; परंतु आम्ही सिलकी चाकर आज्ञेचे; आम्हास गत्र म्हणावयास आधिकार काये आहे; तरी स्वामीनी कृपाळु होऊन नेमणूक करून साडेपाच हजार फौजेची पाठ * * * कर्जे या लस्करातच याचेच विद्यमाने वेऊन लोकास देतो; व येवढे श्रमसाहस करून आम * * * * ला मनुश मात्रानी दरबार * * * आमच्या वस्तुचे नाव ज्याच्या चितास येईल त्याने व्यावे. त्यास कोठे गणती तऱ्ही येका घोडियाची आजी तागाईत तफावत कोणी आगी लाविली आसावी आथवा चाकरीत तऱ्ही कोठे कमी आली आसावी तेव्हा तऱ्ही शब्द आसो. जिवापेक्षा आधिकोतर काम करून राा दताजीबाबा जनकोजीबाबाची बाजू सर्वस्वे राखिली. त्याचा सिरपाव होतो सेवेसी * *

¶*Antaji Mankeshwar complains about the distrust in him shown by the Peshwa in spite of the fact that he has been loyally carrying out his orders.*

No. 139] [*1756*

९

श्री

पुाा श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. स्वामी वारंवार पत्री लिहितात कीं तुमच्या बोलण्याचा व लिहिणियाचा विस्वास नाहीं यैसे च्यार वेलां स्वामीनी लिहिलें. त्यास जेव्हा दरबारी खावंदच बोलू लागले, कागदी लिहू लागलें, तेव्हा आमचा परिणाम उतम होणे कलतच आहे. आम्हापासून हरामखोरी कोणती जाली? यादीवरील * * र श्रीमंत राजश्री दादासाहेबाचेच खरें; ते विष्णूचा अवतार, धर्मात्मा आहे. त्याची आमची भेटी जाली; त्यानी स्मरणे चितात आणून आम्हांसी कबूल केले कीं तीर्थरूपास आम्ही चुकोन पत्र लिहून चुकलो. आता तीर्थरूपाचे आज्ञेप्राा पावणें दो लाखाचे खत मजपासी अमानत देणे. मी पुणियास जाऊन विनंती सविस्तर सेवेसी विनंती करून तुमचे खत तुम्हास देईन यैसे वचन प्रमाण करून अमानत म्हणून खत नेले तो दोश काही माझे माथा ठेवावासा नाहीं; व

माझें गरिबाचे खत ठेवावे यैसे नाही. दुसरे मा।र सुरजमल जाट यांजकडील वरात चुकोन लाख रुपयाची श्रीमंताची घेतली तरी स्मरण न राहाता घेतली; तरी येकहि रुपया जाटाकडील आला नाहीं; व सालगुदस्ताची हरि विठल याजकडील उलटी वरात सतर हजाराची स्वामीनी मना केली. यैसे आता येवढी आबरू स्वामीनीज वाढविली आसतां स्वामीच गैरआबरू करूं लागलें तरी सेवकांचा विलाज काये ? स्वामीनी आबरूस * * न मागती गैरआंब करणें, पत्री यैसे ल्याहावें, तोंडे वाईट बोलावें, तेव्हा तमाम दरबारात मनुशमात्र दावा करिते. हेच चितात आले असेल, तरी स्वामीस तोंड दाखवावयास कैशास यावे, सारीं हरामखोरीं आमच्याच माथा आली आहे. स्वामीनी कृपा केली म्हणून येवढे पदवीस पावलों. पुढे अवकृपाच करणे तरी गुप्तरूपेच ल्याहावें. स्वामीस तोंड कैशास दाखऊन ? सविस्तर उत्तराची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Mankeshwar, who has been reprimanded by the Peshwa for falsifying his accounts, submits an explanation.*

No. 140] [*20-1-1757*

पा। छ २८ जांवल

श्री

तीर्थस्वरूप राजश्री बावा स्वामी
वडिलांचे सेवेसी

आपत्य गोपालराव गणेश सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २९ रा।लखर मु।। प्रा। येकडक जाणून स्वकीये कुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशष. वडिलाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही तेणेकरून चित सापेक्षित असे, तरी यैसें न करावे. सदैव असीर्वादपत्री संतोश होये ते करावे. यानंतर आम्हाकडील वर्तमान तरी राजश्री गोविंद बलाल यांचा आमचा हर्षामर्ष होऊन जागा घेतली हे वर्तमान पूर्वी सविस्तर लि।च आहे. प्रथमता राजश्री हरि विठल यांच्या विद्यमाने ठराव जाहला की आम्हाकडे माहाल कडाकुरापैकी दाहा माहाल आम्हाकडे द्यावे. हवेली कुरा व तपे थर प्रा। बिदकी प्रा। कुवरपूर प्रा। जाजवाड प्रा। मोहसनपूर प्रा। फतेपूर प्रा। आयासा प्रा। रारी प्रा। हसबा येणेप्रमाणे दाहा माहाल आम्हास दिल्हे. नव माहाल त्याजकडे ठेवावे. याणी आम्हास फपुंद परगणा द्यावा. याप्रा। ठराव होऊन राजश्री हरिपंत काल्पीस गेले. मागे आम्ही सर्व माहालाच्या चिठ्या घेतल्या. फपुदची सनद मागावयासी लागलो, तेव्हां बदमामलीस

आले. फपूद नां देत; करार शपतास अंतर जाहलें. मग आम्ही त्यास अडऊन बसविल कीं फपूद आम्हास कराराप्रा द्यावे अगर त्याच्या मुबदला जागा च्यार लक्षाची या मामलतीत द्या. याजकरिता च्यार पांच उपोशणे केली. तेव्हां पंत मारनिलेनी च्यार परगणे दोन लक्षाचे आम्हास दिल्हे. तपसील प्रां कडा प्रा कराली प्रा अथर्बण प्रा कोटला याप्रमाणे आम्हास देऊन प्रा फपुंदचा करार जाल्याचा कागद होता तो घेतला. आज्ञेप्रा सर्व जागा घ्यावी पांच माहाल ठेवावयासी कारण न्हवते; परंतु मारनिले मातब्र यासी श्नेह रक्षिल्याने खावंद संतोष पावतील याजकारितां ठेविले. बाकी माहालांचा बंदोवस्त करून जमाबंदी करून खरिफाची किस्तबंदी करून बहुतेक वसूल घेतला. हली राजश्री गोविंद बलाल याणी पों कडा कराली कोटला अथर्वण व पाा रारी या पांच माहलास ताकीदपत्रें लिाा आहेत की माहल हुजरून आम्हाकडे जाहलें आहेत. तुम्हीं त्याकडे वसूल न देणे. आम्हाकडे सनदहि पाठविली नाहीं. त्यास आम्ही चाकर सनदेस उजूर काये? खावंदानी तों आम्हास सर्व मामलत दिल्ही होती. त्यांत त्रितीयांश त्याकडे राहून दोन हिसे आम्हाकडे होते. हाली त्याणी पांच परगणेची सनद आणिली, तेव्हा निमेस जागा त्यांजकडे जाजती होल्ये, याजकारिता वडिलांचे सेवेसी विस्तारे लिाा आहे. राहिले पाच माहाल तेहि आम्हाकडे देतील हा भरवसा राखीत होतो तो राहिला. मारनिलेचा आमचा करार होऊन समजलो. त्याप्रो करार राखोन आज्ञापत्र पाठवणार वडील आपण आहां. इतरांस आश्रये वसिले बहुत आहेत. मजला आपणाखेरीज दुसराश्रये नाहीं. पूर्वी येजमानाची आज्ञा असता येक माहाल न होतो परंतु वडिलाचीहि काही मर्जी पाहून त्याकडे पांच माहाल ठेविले. तेव्हा त्याणी करार करून घेतला की आता आम्ही देशास जातो. तुम्ही कारकून देणे. समक्ष येजमान जे आज्ञा करितील तेणेप्रमाणे उभयतानी वर्तावे, मधी कोणी सनद आणू नये, असे असता हे वर्तमान माडले आहे. सेवेसी विदित व्हावे म्हणून लिाा असे. शंक्रमणाचे तिल शर्करायुक्त पाठविले हे स्वीकारिले पाहिजे. बहुत काये लिाा? कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Gopalrao Ganesh lodges a complaint against Govind Ballal for his delay in making over the provinces to the writer to whom they were assigned.*

No. 141] [*January 1757?*

सुभेदारानीं राजश्री गंगाधरपंत तात्यास समागमे फौज देऊन पुढें आगाडीस पाठविले आहेत. आपण मागें आहेत. जर याची फौजेसी व राजाचे फौजेसी युद्ध जाले तर ईश्वर येश देता आहे. जर हे व जोतपूर वगैरे राजे मिळून युद्ध

करतील तर याजपुढें कोन्ही येऊ सकत नाही येसे प्रांतीचे वर्तमान आहे. * * * मरजी राजा बेणीबहादर ज्याबत वजीर दिा सुजावदवला याची ममताजउद्दोला व कदापा बक्षी * * * * याचा बेत स्वामीकडे सांप्रत कागदपत्रें पाठवून यासी राजकारणे राखोन ठेवणे उत्तम आहे. पुढें खासी स्वारी या प्रांती आलियावर सरदारासहि सलाह ब * * जे उत्तम असेल ते करनार स्वामी धनी समर्थ आहेत. राजश्री गोविंदराम महेता याणें सुका पातसाह (?) सिदीपूर्वी पाठविला आहे तो पावला असेल. त्यासी वकील व महेतामजकूर व सेवक * * यासी फार उद्योग करितो. त्यासी सर्व घाट सुभेदारांनीं बंद करून मार्ग खराब करून टाकिलेंत. त्यास गुजारतेंकडील मार्ग चालतो. त्यास एक दस्तक मार्गेची व राजश्री दामाजीबावा गायकवाड व पावागडचा कमाविसदार याचे नांवें पत्र कीं याजसमार्गमे मानसे देऊन बागलानचा घाट चढोन नाशिकास पोहचाऊन देणे, येसी पत्रे व दस्तक जरूर पाठविणार धनी समर्थ आहेत. दस्तक तिघांच्या नांवाचा पाहिजे. बतपशील–

हत्ती	पालखी	अफतागीर	
		१	
घोडी	डेन्याची	बैल	
४६	५	६	
उंटे	भरदारी	पायेची मानस	लग

येणेप्रमाणें दस्तक दस्त पाठविला स्वामी समर्थ आहेत. बाजारी वर्तमान * * * बाधून फौज उत्तर * * * कासीदास * * * * करार रुपये ९ केले असे. दविले पाहिजे. बहुत काय लिहिले हे विज्ञापना.

¶*This fragmentary letter refers to the activities of Malharrao Holkar in the North.*

No. 142] [*2-2-1757*

नकल.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री गोविंद बलाल स्वामी गो

पोष्य बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जाणे विशेष. राजश्री समसेरबाहादर पथकसहवर्तमान हिंदुस्थानात आहेत. त्यास नालबंदी समजावीस वगैरे ऐवजी रुपये १००००

येक लक्ष तुम्हाकडून देविले असेत. प्रांत बुंदेलखंड वगैरे माहालचे सालमजकूरचे ऐवजी पावते करून कबज घेणे. रा छ १२ जमादिलोवल सुा सबा खमसैन मया अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders Govindpant to pay Rs. 1,00,000 for expenses to Samsher Bahadar who is in camp in the North.*

No. 143] [*23-2-1757*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आंताजी माणकेस्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा फाल्गुण शुध ५ पंचमी मुकाम पलवल नजी(क) दिली सुखी (आ)सो. स्वामीचे आज्ञापत्र आले, तेथे (आ)ज्ञा की इटावे शुकोवावाद फ(पुद) येथे फौज तुमची गोविंद बलाल याचे तैनातीस आहे ते उठऊन * * * येक रुपया बालाजीपंताजवळून न घेणे. येक राऊत न ठेवणे. तेथे राा समसेर-बाहादराची फौज जाईल. * * * बालाजी गोविंद याचे आज्ञेप्राा वर्तणूक करून म्हणून आज्ञापत्रे राा गोविंद बलाल यानी सेवेसी विनंती करून आम्हाकडे पाठविली ती पावली. यैसियास आम्ही निवारसी, आम्हास कोणाचा आश्रा नाही. आमचे हिमाइत्य कोणी नाही. यैसे आगोधर समजून राा बालाजी गोविंदाचे पत्र आम्हा(स) कार्तिक मासीच आले की आम्हाकडे पैसा गोविंदपंती देविला तो कवडी द्यावयास मिलत नाही व तुमचा येक राऊत लागत नाही. फौज आपली घेऊन जाणे. यैसे पत्र येताच फौज कार्तिक मासी घेऊन आलो. येक पैसा त्याजकडील आम्ही जाणत नाही. जगमनपूरच्या घाटे आलो तरी त्या माहालचा येक रुपया भेटीचा जाणत नाही. मूठभर भाजी जाणत आहे. जरी आम्हास आश्रा हिमाइ(ती) आसती तरी जागीर आमची * * * स्वामीनी दिल्ही तेथे आम्ही काये हरामखोरी केली होती? प(रतु) निराश्रित, निवारसी जाणून आज्ञापत्र आजी आले. यापूर्वीच बालाजी गोविंदाचया आज्ञापत्रावरूनच याप्राा वर्तणूक केली. वरकड पुरवणी आलाहिदा सेवेसी लिहिली त्याजरून सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Mankeshwar informs the Peshwa that he has already removed his forces from the province of Govind Ballal.*

No. 144] [March 1757

[पहिला बंद गहाळ]

नाही. दिलीस येऊन कौल देऊन कतल करून घरें खाणून खालील माती वर केली व हवेलिया जालोन नास केला. लोक थोर वजीर व मुतसदी सर्व पलोन बमयकबिले सुरजमल जाटाचे आश्रयाने त्याचे किलियात राहिले आहे. अबदाली व नजीबखान वगैरे रोहिले जोवरी सरदारासी मुकाबिला होऊन येकदिले जाले नाही तोवरी कोणावरी जात नाही. मग ईश्वर न करो ते जाले तरी येकयेकास मोकळे करील. कोणास सोडणार नव्हे. आधीच अबदाली दुष्ट; त्यास मार्ग दाखवणार नजीबखान रोहिला वाकीफ सर्व हिंदुस्तानास आहे. माहाराजाचे पुण्यप्रतापेकरून उतमप्रकारे पारपत्य अबदालीचे येंदा जाले म्हणजे मोठे काम. मग नजीबखानचे पुरते पारपत्य करावे. सर्व अनर्थास मूल नजीबखान आहे. याची नजर मोठी कीं पठाणाचे व्हावे व आपण सर्व कारभार करावा. पातशाह नावास कोण्ही असो. केवल पतित चांडाल देवब्राह्मणद्रोही आहे. हा विस्तार आम्ही पूर्वीच वारंवार विनंती लिहिला असे. स्मरण असेल. या वर्षी माहाराजास दक्षण उतर दोहीकडील काम पुढे आले असे. पुण्यप्रतापेकरोन मनोगतानुरूपच होईल. मागाहून वरचावरी विनंतीपत्रे लेहोन पाठवीतच आहो. आम्ही झासीत माहाराजाचे आश्रयेकरोन माहाराजाचे आज्ञेने आहोत. चहूंकडील वर्तमान आणऊन वरचावरी लिहीत आहोत. रा येशवंतराऊ बाबूराव[1] मोकासदार झासीचे हे झासीस पावले व किला याचे स्वाधीन जाला व अमल जाला व राजश्री माहादाजी गोविंदाचा पुत्र दक्षणेस रा जाले. माहराजाचे आज्ञेप्रमाणे सर्व जाले हे विनंति.

¶*The second sheet of a letter addressed to the Peshwa from Delhi describing the havoc created by the Abdali with the active assistance of Najibkhan Rohilla.*

No. 145] [30-3-1757 ?

श्रीवरद

श्रीमंत राजश्री दादासाहेबा
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रेणको अनाजी सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ ९ रजब मुकाम भूपाल स्वामीच्या कृपावलोकनेकरून क्षेमरूप असो विशेष.

---

१ कोन्हेरराम कोल्हटकराचा मुलगा.

राजश्री मल्हारजी होलकर यांची आज्ञा घेऊन साहेबापासी यावयासी मुकाम मजकुरी येऊन राहिलों. येथील पठाण फौजमहमदखान यानी बहुत श्नेह करून आम्हास च्यार दिवस ठेऊन घेतले. त्यासी आम्हासी फौज मऱ्हाटे लोक सात आठसे राऊत आहेत. आणखीहि पाच सातसे राऊत लस्करात राहिले आहेत ते आज उद्या येऊन पोहचतील. येकूण मऱ्हाटी फौज हजार दीड हजार आहे. यासिवाये खीचीवाडे राजा बलभद्रसिंग यानी आम्हासी श्नेह करून दोन च्यार हजार फौज घेऊन आम्हासमागमे चालावे यैसा ठराव केला आहे. भूपालवाले पठाण यानी दोन तीन हजार फौज आम्हासमागमें द्यावी, यैसा जमाव पाच सात हजार होईल. त्यास मी समक्ष येऊन साहेबापासी विनंती करणार. येथे आल्याने फौजसमागमे हे देशास आल्यावरी चहूकडे जातील, याजकरिता येथे मुा करून साहेबास विनंतीपत्र लिहिले आहे. साहेबी कृपावंत होऊन गढेमंडले दरोबस्त मुलूक व बघेलखड दरोबस्त मुलूक त्यासमीप अरले वगैरे प्रयागसंनिध माहाल आहेत तेथे आपला आमल नाही. या मुलकाच्या सनदा मजला करून पाठवाव्या. सिवाये भेलसे प्रगणा भूपालवाल्याकडे आहे. त्याचीहि सनद पाठविल्या तेथील आमल साहेबाचा बसविला जाईल. चंदेरी प्रांतचे माहाल बालाबेट व सयेराई व ढाकोणी वगैरे प्रा इजतखानाचे मुलाने आमल बसविला आहे. तेथे आपला अमल नाही. साहेबाचे मर्जीस आल्या त्याचीहि सनद करून पाठविल्या तेथील आमल बसऊ. साहेबाचे मर्जीत जो मुलूख येईल, जेथील साहेबाच्या चितात जती करायाची तेथील आज्ञा लिहून सनदा करून पाठवाव्या. तेथील बंदोबस्त करून रुपये पैदा करून साहेबास दोन च्यार लक्ष पाठऊन देऊ. साहेबचाकरी घडोन येईल. आणि माझीहि उस्तवारी होईल. साहेब समर्थ आहेत. पूर्वी साहेबाचे वचनहि आहे की तुझे ऊर्जित करावे. त्यास या समयास मजपासी फौज आहे. इकडील भूमे जमीदार सामील जाले आहेत. सिवाये इकडील फौज चाकर ठेवल्याने बहुत जमा होईल यैसा प्रसंग आहे. यास्तव मुकाम करून उतराची मार्गप्रतीक्षा करीत बसलो आहो. मजपासी खर्चायास नाही. भूपालात कर्ज काहाडून थोडे बहू खर्चायास लोकास दिल्हे. पुढे संकट आहे. यासमई साहेब पृथ्वीपति समर्थ आहेत. माझा अभिमान धरून मर्जीस येईल तेथील सनदा करून पाठवाव्या की मी चाकरी करून दाखवीन. प्रयागासंनिध कुराज्याहानाबाद तेथेहि आमल नाही. साहेब कृपावंत होऊन तेथील सनदा पाठऊन देतील तर पातशाहा प्रयागच्या किल्यात आहेत त्यास भेटून साहेबाचे प्रतापे कुराज्याहानाबादेत अमल बसऊन साहेबचाकरी करून दाखऊ. मल्हारजी होलकर याजसमागमे दोन वर्षे राहून खराबीत आलो. खर्चायास न मिळे. रोजमरा द्यावयाचा त्यास दंडकच नाही. अति संकटात पडलो लाइलाज. त्याचा निरोप घेऊन साहेबापासी

येतो. तेथे अल्यावर साहेब खावंद माझा गौर करितीलच. येथे भूमिये, जमिदार सामील जाले आहेत. मुल्कहि खाली पडला आहे. साहेब कृपावत होऊन म्या विनती लिहिली आहे. चितात साहेबाच्या येईल तर हा मुल्क अथवा साहेबाचे मर्जीस येईल त्या मुलकाच्या सनदा करून पाठविल्या तर त्या मुलकाचा बंदोबस्त करून खायास मिळेल. साहेबचाकरी घडोन येईल ते केले पाहिजे. खर्चेयाची केवल अडचन आहे. लोक रोजमरासाठी श्रमी करितात. या समयात लाज राखणार साहेब धणी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हे विज्ञती.

¶*Renako Anaji having been ordered by Malharrao to join Raghunathrao, proceeds with his army and is accompanied by the Nawab of Bhopal and the Khechi King Balbhadra. The writer requests the addressee to grant him some saranjam or vatan for the services that he has been rendering.*

No. 146] [*Recd. 2-4-1757*

छ १२ रजब

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. सेवकाचें वर्तमान स्वामीचे कृपावलोकनेकरून कुषळ असे. कृपापत्र सादर जालें ते पावोन मस्तकीं वंदिलें. पत्री आज्ञापिलें कीं, यैवज खर्चास घेऊन येणे व रा। समसेर-बहादर व तुम्ही व राजश्री अंताजीपंत येक होऊन पठाणाचे मोहरेयावर राहून * * त्या रोख पडेसे करणे. त्यास * * * * * * शेवेसी दोन तीन पत्रे लिहिली आहेत. राजश्री अंताजीपंत करोली प्रांते होते. तेथूनहि स्वार घेऊन शेवेसी आले किंवा कोठे आहेत, सांप्रत वर्तमान तथ्य कलत नाही. यैवजाचा मजकूर तपसिले ल्याहावा तरी स्वामी क्रोध करितील, परिहार लिहितात म्हणतील. परंतु भदावर कछवाधार दरोबस्त उजाड होऊन गोंडवाणियात लोक गेले. काही शेष राहिले त्याची कंमबेश जमा ठराविली ते अबदालीच्या दंग्यामुलें दुंडी जाली. दतिया, वोडसे प्रांते प्रतापमिश्राचे दंग्यामुले रयत कुल बावरली आहे. पैसा देत नाही. माल खाऊन पलोन जातात. मार्ग चालो पावत नाही. साहुकार आफरातफरी जाले आहेत. रोजमुरियास यैवज जथत नाही, यैसा प्रसंग बार्ज खादला आहे. आबदालीकडील वर्तमान जाहानखान बकसी पंधरा हजार फौज आगरेयांत होता. त्यानी किलेयांत जावयाचा उपाय

बहुत केला. त्यास किलेदाराने तन न दिल्हे. शहरांत कोण्ही साहुकार खावलदास वगैरे त्याजपासून दाहाबारा लक्ष रुा नागवण घेतली. जाटाकडे संदर्भ लाऊन पैगाम बहुता प्रकारे केले. शेवटी वीस लक्ष रुा करार जाले म्हणून बाजारअवाई वर्तमान आहे, लिहिले नाही. जाहानखान छ २ रजब आगरेयाहून कूच करून मथुरेस गेला. आबदालीहि गरमीचा मोसम भारी. त्या लोकांस * * * हवा माफगत नाही. याकरितां व खा(सा) स्वारी समीप आली, शेह भारी जाणून मतलब पठाणाचा येश संपादिले राखून स्वदेशास जावयाचा विचार दिसतो. अशा समयांत खासा स्वारी या प्रांते आगमन होते तरी पठाण मारला गेला असता यांत संदेह नवता. मथुरेपासून पुढें जाटाकडील काही मेजमानी बतरीख द्रव्य हस्तगत करून गेल्याचें वर्तमान आलें नाही. आलमगीर पातशाहाचे शाहाजादे दोघे व गाजदीखां येह्याखांसाहेब येख्तीयार आकबराबादेस दोन हजार स्वार राजवाटावर डेरे करून असेत. रयत साहूकार लोक जे शहरात आहेत त्यांची खातरतसली[१] करून तेथेंच आहेत. किलेदाराने यांसहि किल्यांत येऊ दिल्हे नाही. पठाण लांब गेल्यावरी किला हवाला करीलसे दिसते. दुहीमुळे तहसील बंद जाली. ठाणियाचा बंदोबस्त राहणे कठीण जाला. त्याहिमधें प्रतापसाच्या हगामियामुळे अतिशय जाला तो कोठवर ल्याहावा ? आम्ही आज्ञेप्रमाणें या प्रांतचा बंदोबस्त करून काही साहुकारियांस येक दुसरे स्थली तजवीज करून शेवेसी येतां. चरण दृष्टीस पाहूं तो सुदीन असे. बहुत काये लिहिणें हे विज्ञापना.

¶*[Naro Shankar to Raghunathrao, describing the general situation in the Doab subsequent to the invasion of the Abdali. The writer also describes the movements of Ghaziuddin and the Emperor's sons.*

No. 147] *[5-4-1757*

छ २० रजब

श्री

श्रीमंत राजश्री दादा

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बापूजी माहादेव कृतानेक सां नस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १९ रजब मुकाम भरतपूर स्वामीचे कृपावलोकेकरून येथास्थित असो विशेष. कृपा करून पत्र पाा ते उतम समई पाऊन आनंद जाला. पत्री आज्ञा जे वरचेवर वर्तमान लिहीत जाणे. त्यास सेवेसी विनंती हेच की जिकडून जोखम

---

१ समजूत; समाधान.

न ये, नाव थांर होये, यैसे आमलात येते की करोलीचे मागे आकबराबादेस आलिया जो खू विशेष नाव म्हटल्यास चंगबाजखान मारून दिल्हा त्याजसमागमे सारी आब्दालीची फौज मारली तरी चंगबाजखान मारला म्हणतील. दुसरे राजश्री आंताजीपंत व नारोपंत यांचा फौजेचा नाव यैकताच जाहनखान दोशा कोसावर आसला तर येऊन पोहचल. त्याचे नावावर गालब आहेत. आकबराबाद वगैरे इकडील किले न आडले आसते तर आज झासीस मुसकील पडती. कितीक साम दान दंड भेद केले ते ईस्वर जाणे. स्वामी खावंद आहेत. विलायेतपरियेंत हलऊन (पुढील काही ओळी मजकूर फाटण्यांत गेला.) सेटियाजी खरा(डे) यैसे जरिदी फरा * * गराजवल पाठवावे म्हणजे जाहनखान झिलेजवल बलोचासी मामलियाचा जाबसाल करितो, आन बलोच साफ जाबसाल करितो. यैशास आपल्याकडील फौज गेलियावर बलोचच हुसकाऊन देईल. आब्दाली खुद बारापुल्यावर आहे तो पार रोहिल्याचे आसऱ्यानें जातो. पुढे पोकल पाहिल्याणे सोनपत पाणिपताकडे व्हावे. नाही तर चौ दिवसानी जाहानखान सहरंदजवल पावलिया मग जावे परंतु आपला पळविलासा होईल. हे कर्तव्य नसल तर आब्दालीवर येतो येतो म्हणावे. आज रजपुतानियावर लागावे. मोगल तिकडे येत नाही. सकुराबाद, इटावा वगैरे आंतरवेदीतील माहाल चंगबाजखानाणे तसरूफ[१] केले आहेत. त्यास आब्दालीची ताकीदपत्रे आनविली आहेत. ते आलियावर कोन्ही मुजाहीम होणार नाही, आब्दाली बेइमान या दिवसात आमचे नावे रकम आली जे तुम्ही नाहक हिरास खाऊन गेलेत. वीस लाख रुपये हिंदुस्थानच्या पातशाहास कर्ज (अपूर्ण)

¶*Bapuji Mahadev to Raghunathrao, detailing the plans of the Abdali and describing his journey from Delhi to Sirhind.*

No. 148] *[5-4-1757*

होता तुमची खबर व्यावयास जाह * * * * वगैरे सरदार पाा होते. यात तुमची तसनस जाली आसल त्यापैकी सनद सोनपत, पानिपत, करनाल व साहरनपूर वगैरे करून दिल्ही आसे. याचा शुका तुम्ही बज्याऊन आणा आण आपले नावकलाची (?) खातरजमा करून कौल हत पाठवा म्हणजे जे जे मतालब म्हणाल ते हिंदुस्थानच्या पातशाकडून आम्हाकडून सरफराज केले जातील. याप्रो खुशामत करावयाचे कारण हे जे तीन वरशात विलायेतीत आब्दालीचे नाव राहू देणार नाही यैसा राा मल्हारबानी वगैरे सरदारानी स्वामीपासी विडा विचलला आहे. सुभेदार व दताजी सिंदे यैसे सरदार

---

१ स्वाधीन.

जरिदे होऊन मजल दरमजल चालले. हे शोहरत सिहरंदपरियेत जाली. याकरिता त्या प्रांती सीख व आला जाट येकत्र होऊन आब्दालीचे पुत्रास लुटून घेतले. जखमी केले म्हणून यास दिली जवळ करणे आली. इकडे कोन्ही न पाहिले म्हणून बालोचासी जाबसाल लाविला आहे. त्यास बलोच बहुत मजबूत आहे. खातरत आणीत नाही. लोक बोलतात. दिलीजवल गेला. तेथे * * * * भेटावयास आला नाही. त्याजवरून तथ्य दिसते. तथ्य वर्तमान आलियावर सेवेसी लिहून पाठऊ सेवेसी श्रुत होये. बहुत+ काय लिहिा ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*A mutilated letter of Bapuji Mahadev Hingne to Dada describing the situation at the time of the Abdali's advance against Delhi.*

No. 149] [*9-4-1757?*

श्रीपांडुरंग

श्रीमंत् राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माहादाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायेत छ १९ रजब पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर आज्ञापत्र सादर केले तेथे आज्ञा जे येकनिष्टे सेवा केलियाने उत्तमच आहे. यैसियास येथाज्ञाने बारागिरीप्रमाणे सेवा करू. वरातप्रमाणे यैवज मोबदले घालमेली कराव्या तरी इस्तकबील जकाती जरिबे तागाईत फौज मामलती केल्या परंतु व्याज, बटा, कापडाचा उदीम व शाकभाजी विकून रुपये आगर धण्याच्या कामात रुषवत खाणे आणि चोरी करणे इतके ठावके नाही. धणी पांच रुपये वेतन करितील त्यात संसार करावा, या पद्धतीने गायकवाडाच्या घरी चाकरी केली. सेवट दमाजीने अन्याये कर्मास प्रवर्तोन तुफान केले तेव्हा कुटुंबसहवर्तमान पलालो. त्यास तो आपल्या संग्रही आहे. ज्ञान विदित जाले आसेल. पवाराच्या घरी पांच सात वर्षे चाकरी केली. मन्हाव्यानी कोणा ब्राह्मणाचा परिणाम लाविला यैसे नाही. पस्तीस वर्षे मन्हाव्याचे सेवेत दिक जालो म्हणोन स्वामीचे चरण धरिले. म्हातारपण जाले. बहुता ब्राह्मणाचे पालग्रहण करिता त्यात मी येक आज्ञान आहे. वरकड सिंदे होलकर वगैरे बुंदलखंड जगतराजकडील आज्ञा केली. यैसियास आम्हांकडे रागाचा येककलीपणाचा आरोप आहे खरा.

+ पत्र हिंगणें वकिलाचें.

तथापि ये गोष्टीचा आग्रह करितों तरी राजद्वारी सेनापती व अन्यत्र दरबारी कसा निभावतो. देहस्वभावास लटके मानत नाहीं. धण्याचे काम होत असतां सेवटच्या जासुदाने सांगितले कार्य होईसें असले तरी सिरच्या जोरे करू. मग राजश्री गोविंदपंत व राजश्री गोपालराव याचे यैकोपांत आपूर्व कार्ये. आव्यवस्तित कारभारात पडावें यांत जीव नाही. विदित होये विज्ञापना.

¶*Mahadaji Govind (Kakde) lodges a strcng complaint to Bhausaheb against the harsh treatment given to him by both the Gaikwad and the Pawar whom he says he served faithfully for a long time and asks for redress.*

No. 150] [*11-4-1758*

श्री

श्रीमंत राजश्री दादा

साहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक पुरुषोतम माहादेव कृतानेक सां नमस्कार विज्ञाप्ति. येथील कुशल ताा छ २ माहे साबान मुा फरुकाबाद श्रीगंगातीर स्वामीचे कृपावलोकने-करून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान सविस्तर पूर्वी विनंतीपत्र सो पाठविली आहेत त्यावरून श्रुत होईल. हाली वर्तमान तरी नवाब वजीर व या उभयेताच्या फौजा व सरदार ऐसे छ ३० रजबी फरुकाबादेहून कूच करून बाहीर डेरे दाखल जाले. येथून दो चौ दिवसात कूच होऊन मजल दरमजल जगमनपूरचे घाटी येमुना उतरावयासी येतील. त्यास तेथे नावा पाहिजेत तर कृपा करून रा बालाजी गोविंद यांस येक पत्र पाठवावे की नावा पंचवीस जगमनपूरचे घाटास पाठवीत म्हणजे लस्कर लौकर उतरून सो हाजर होये ते करणार स्वामी समर्थ आहेत. वजिरानी सागितले आम्ही कोणे स्थली येऊन पोहचावे. उतरी सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पो हे विज्ञाप्ति.

¶*Purushottam Mahadeo informs Raghunathrao that the Vazir along with the two Rohilla Chiefs has proceeded to Farukabad and requests him to write to Balaji Govind to supply them with boats to cross the river at Jagamanpur.*

No. 151] [*15-5-1758*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. नजीबखान बुढाणियापावेतो आला. मुलकांतील ठाणीठुणी उठऊं लागला म्हणू(न) वजिराने रा विठलपंत यासी स्नेह करून सारंगपूरची

फौजदारी कबूल करून रा सुबेदार व बंगाल्यापैकी दोन लक्ष मेवराजाची निशा करीत होते. कबूल करीना; तेव्हा येकूण पाच लक्ष हेहि त्याच मुलकात घ्यावे आणि नजीबखानाचे पारपत्य करावें त्याप्रा करार ठहरून रो विठलपंत याणी कबूल केले. रो अंताजीपंतासी व विठलपंत यासी हर्षामर्ष पूर्वीपासून चालत आला. प्रस्तुत नजीबखानाचे मनसव्याकरितां वजिराचे चित्तांत आले की आंताजीपंत विठलपंत यांचा श्नेह करून द्यावा. त्यावरून वजिरासी उभयेतानी कबूल केले. वैशाख सुध ८ वजिराचे येथे सर्व येकत्र होऊन रा आंताजीपंत विठलपंत याणी परस्परे कागद शपतपूर्वक लिहून दिल्हे की इतकियाउपरी मागील गोष्टी ज्या जाहाल्या त्या जाहाल्या. इतकियाउपर तुमचे आमचे चित येक. येके विचारे चाकरी करून धण्यांची मर्जी राहे ते करूं. याप्रा करार होऊन रो विठलराव व वजिराची फौज बलोच वगैरे व रो आंताजीपंत यांची फौज परगणेयात आहे ते सर्व मिलोन नजीबखानावर चाले. जर नजीबखान सापडला तर उतम. नाहीतर मुलकात अमल बसवावा, हजार वाटे नजीबखान गंगा उतरून जाईल आसें दिसतें. यानंतर बलगोविंद याजकडील चौकडे पेशजीचे किमतीप्रा घेणे म्हणौन आज्ञा. त्यासी बल गोविंद यासी बलाऊन रो आताजीपंत याजकडून यैवजाची निशा करविली. चौकडे घेऊन येतो. बलगोविंद याचा कारभार सर्व लबाड आहे. पुढे लौकरीच दिवाले निघते यैसे दिसते. पंचवी(स) * * * * * आगरे याची फिरली. त्या हुंडीचा वाद येक मासपर्यंत सांगितला. जर समती करावी तर बदनामी येते याजकरितां न केली. तदनंतर बजिनसा हुंडी सत्कारलेली दाखविली तेव्हा शरमिंदा होऊन हुंडी कबूल केली. रो कोठे तेव्हा रा आंताजीपंत यांसी दिढा महिनियाचे वाईद्याने रोखा लिहून दिला. माारनिलेनी रो पनास हजार रोख दिल्हे तेव्हा चौकडे हातास आले. याचा किसा फारच आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dadasaheb is informed of the reconciliation effected by Ghaziuddin between Antajipant and Vithalpant (Vinchurkar) and of the project undertaken by them all of carrying on an aggressive campaign against Najibkhan, who had grown very troublesome.*

No. 152] [*April 1757*

सेवेसी विनती. दिलीकडील मजकूर तरी आबदाली पठान यान दिलीत मातबराची वर खानिली. त्यात बारा क्रोडची मालेत निघाली. तितकी मालेत घेऊन मागारा जात होता. त्यास पातशाहा वगैरे सरदार यानी विनती केली की सर्व मालेत घेऊन जाता मागाहून दखनी येतील ते आमची पातशाई घेतील

तरी आपण साहा च्यार महिने राहून आमचा बंदोबस्त करून द्यावा व जाटाचे पारपत्ये करून द्याव येणेप्रमान त्यास विनती केली. त्याजवरून त्यान सर्व पैका आपल्या पुत्राबरोबर देऊन लाहोरास रवाना केला. आपण सडे फौजेनसी जाटाच्या पारपत्यास गेला ते जाऊन मतुरा मारली. दोन हजार बैरागी, दोन हाजार मारल गेल व गावातील मानस दोन हजार मारली गेली. राहिलीं त्याजपासी च्यार लाख रुपये खंडनी करून त्यास ताकीददार देऊन ताकीद केली. तेथोन अगरियासी गेल तीच गत तेथहि जाऊन केली. दोन च्यार हाजार माणूस मारले व किल्यास मोर्चे लाविले. पंदरा दिवस मोर्चे होत. त्यास किल्यान जुमस[1] खादला नाही. अनिकी आठे पंदरा दिवस मोर्चे राहू द्याव तो आमची फौज जयेनगरच्या मुलेकात आली याची खबर त्यास लागली. त्याजवरून त्यान मोर्चे उठऊन कूच करून मतुरेस आला. तेथे दोन मुकाम करून गाजुदीखानास वजिरी दिली व नजीबखान रोहिला यासी बक्षिगिरी दिली आनी उभयतास अंतरवेदीत रवान केल. आपण दरमजल दिलीस गेला. तेथ येक मुकाम करून पातशाहाचा गौर करून आपण मजल दरमजल आपल्या देशास गेला. आज लाहुरास पावला. याप्रमान मजकूर त्याचा जाहाला. प्रस्तुत गाजुदीखान व नजीबखान हे जाऊन समसाबादेवाल्या पठानस भेटल. त्रिवर्ग येक होऊन जाटाची ठानी अंतरवेदीतील उठवितात व समसाबादेवाल्या पठानाने आमची हि ठानी दोन च्यार उठविली आहेत. याजकरिता श्रीमंत राजश्री विठलपंत तात्या व रा। गंगाधर येशवंत यासमागम दाहा हजार स्वार देऊन रवाना करनार आहेत व जाटाची फौजहि त्याजबरोबर दोन च्यार हजार देवितील. दिलीत येक पैसा राहिला नाही. खानखानाचे घरी च्यार क्रोडीची मालेत निघाली व गाजुदीखानाचे घरी येक क्रोडची व सर्व दिलीत सावकारदेखील सात क्रोडीची येकोन बारा क्रोड रुपये घेऊन गेला. सेवेसी श्रुत होय हे विनती.

¶*The writer describes the sack of Delhi and Muttra by the Abdali and says that he returned to Afghanistan after appointing Ghaziuddin and Najibkhan as Vazir and Baxi respectively.*

No. 152a] *[April 1757*

सेवसी विनती. जयेनगरचा मजकूर तरी ते म्हनतात तुम्ही गुदस्ताप्रमान रुपये घेण. त्यास श्रीमंत ऐकत नाहीत. चालीस पनास लक्ष रुपये रोख घेऊ व तिघस्ता पातशाहानी रनथबरची सनद चौदा लाख रुपयाचे जागिरीची दिली आहे ती जागीर तुम्ही सोडोन द्यावी व रामपुरा भानपुरा व टोक तोडा व

---

[1] दाद दिली नाही.

हिंगलाजगड यणप्रमान निकालस सोडो द्यावी म्हणोन त्यास सांगितल. त्याच प्रमान कनिराम यान जयेनगरास राज्यास पत्र लिहिल आहे. त्याच उतर आद्यापिवर आल नाही. याप्रमान त्यान माने केल तरी सल्लक होत आहे. नाही तरी त्याचा मुल्लक जप्त करून ठानी बैसवावी. तूर्त पुडहि कामकाज नाही. च्यार महिन यथच राहून चालसा पनासा लक्षा रुपयेचा मुल्क सोडवावा याप्रमान मजकूर आहे. माधवसिंगान सर्व ऐकोन सल्लक केला तरी छावनीस रोहिल्याच्या मुलकात जाव ऐसा विचार आहे. त्यास जो मजकूर होईल तो मागाहून सविस्तर लिहून पाठवितो. अंताजी मानकेस्वर तो येऊन श्रीमतास भेटला. समसरबाहादर येका दोन रोजी येईल. नारो शंकरहि येणार आहे. तोहि आठा पधरा दिवसी येईल. प्रस्तुत फौज तीस हजार मल्हारबासुधा जमावली आहे. सेवसी कलाव म्हणून लिहिले आहे. सेवसी श्रुत होये हे विनंती.

¶*The writer (Raghoba?) discusses the measures to be taken against Madhosing in case he does not pay the tribute demanded from him and informs that Antaji Mankeshwar has joined the main army while Naro Shankar and Samsher Bahadar are expected to join soon.*

No. 153] *[9-9-1757*

॥ श्रीः ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री सखारामपंत

बाप याप्रति

रामचंद्रभट कृतानेक आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागाईत भाद्रपद वद्य एकादशी पावेतो यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहिणे विशेष. आपली आज्ञा घेऊन श्रीस आलो तें कार्य सिद्धीस पावलें. शरीरहि स्वस्थ जालें. इंद्रप्रस्थीहून आपण कूच करून अन्यत्र गेलेस असे वर्तमान आयकतो तर कोणते रोखाने यावें हें लिहोन पाठवावें. सालेमारबागेचा सुमार अशिला तर वजिराचे अमलातूनच या वेळा गेल तर वजिराची तकीद व दोन माणसे त्याचे अमलदारास पाठविलास सुरक्षित येणे होईल. अन्यथा मार्ग श्रम होतील. वजिराचे अमलदारास पूर्वी आपण ताकीदपत्रें दिली नाहीत याकरिता सांप्रत पाठवावी. विशेष अंताजी मल्हार आपणाकडोन श्रीमध्ये आहेत यानी विनंती केली ते विनंतीपत्र आपणाकडे पाठविले आहे तर त्याप्रमाणे ताकीदपत्रे वाजवी अशिली तर या उत्तरासमागमे द्यावी. बहुत सर्वज्ञाप्रति काय लिहिणे? कृपा कीजे हे आशीर्वाद.

¶*Ramchandrabhat to Sakharampant, enquiring about his whereabouts and requesting him to send letters to the officers of the Vazir regarding Benares and other holy places.*

No. 154] [June 1757

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री राघोपंत स्वामी गो॥

पो॥ सखाराम भगवंत नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. सुज्याअतदौलेयाचे वर्तणुकीचा व तुम्हास काही खर्चास देत नाही व दोन हजार फौज बळाविली त्यांचाहि जाबसाल येथास्थित बोलत नाहीं वगैरे कितेक रांडबाजी रात्रंदिवस करितात, कारभार चालत नाहीं व मातबर माणूसहि याजपासी नाहीं म्हणोन विस्तारें लिहिले ते अवगत जाले. येशास तुमचे ठाई सुज्याअतदौलेयाची मर्जी ठीक नसिली आणि तुम्ही त्याजपासी राहावे हे मानस त्याचे नसिले तरी तुम्ही येथे निघोन येणे म्हणोन पेशजी तुम्हास (अपूर्ण)

¶*Sakharam Bhagwant advises Raghopant to leave Shah Shuja's camp immediately.*

No. 155] [April 1757

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
साहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ता * * * * * * * * तीया मुकाम कसबे स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. पूर्वी पांच सात वेळा दिलीकडील वर्तमान सविस्तर सेवेसी विनंती लिहिलीच आहे. अलीकडील श्रीमंत राजश्री दादासाहेब जयेनगर प्रांती आहेत व राजश्री मल्हारजी होलकर आहेत. बारवाडा म्हणून जयेनगरचा गांव भूमिया आहे. तेथे मोर्चे लाविले आहेत. उदैक आम्ही लस्करांत दाखल होऊं. उदैक श्रीमंताच्या दर्शनास मुहूर्त आहे. राजश्री समसेरबाहादर ग्वालेरप्रांते आहेत. त्यासहि * * ची आज्ञापत्रें गेलीं आहेत. तेहि येतील. तमाम फौजा जमा जाल्या आहेत व काही होणे त्या लौकरीच होतील. आबदाली पठाणाचा मजकूर तरी मथुरा आगरे येथपरियेंत फौज आली होती. खासा मथुरेपलीकडेच होता. जाहानखानमात्र दाहा पंधरा हजार फौजेनिसी आगरे यास आला होता. किला आगरेयाचा झुंजत होता. जाटाचा मुलूकमात्र खराब जाला. किल्यास

काही जाटाच्या मोर्चे लागले नाहीत व जाटाने येक कवडी दिल्ही नाही. श्रीमंताची स्वारी जयेनगर प्रांते येताच आवदालीने कूच करून दिलीस दर-मजल गेला. याउपरी आवदाली माघारा चालिला. श्रीमंताचा प्रताप थोर आहे. आवदालीसारिखा शत्रू दहशती(च) माघारा गेला. इतरांचा केवा[१] थोडा आहे. वरकड तपसीलवार वृत श्रीमंतांचे पत्रीं लिहीले आहे त्यावरून सेवेसी विदित होईल. पत्राचे उतर खावंद आहेत. आमचे सरदारीची

सेवटपरियेत होये

हे विज्ञापना.

¶*Antaji Mankeshwar to Bhausaheb, saying that the Abdali had advanced as far as Agra and Muttra but retraced his steps on hearing of the arrival of Raghunathrao from the South.*

No. 156] *[5-5-1758*

श्रीमार्तंड

सेवेसी राजाराम गोविंद विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २६ माहे सावान पावेतो मु॥ विटावे येमुना उतरतीर येथें सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विशेष. छ मजकुरी स्वामीचे पत्र सादर जाले की, नऊ दाहा महिने जाले आद्याप फौज न आली. (आता) आली तरी कामाची काये? तुम्ही व वजीर येमुना दक्षेण-तीरास आला आ(हा), तरी दरकूच जलद येणे. उतरतीरी आसलियासी वजिराहीहि न यावे. तुम्ही व पुरुषोतम माहादेव याही वजिरापासून निरोप मागून हुजूर येणे. वजिरासहि सरकारतर्फेचे पत्र होते ते त्याजला दिल्हे. त्याणी वाचून बहुत कष्टी जाले आणि म्हणाले की आठ नऊ महिने मेहेनत केली ती वेर्थ जाती. आसी कितीका प्रकारचे भाषेण जाले. ते विस्तारपूर्वक पुरुषोतमपंती लिहिले आहे, त्याजवरून श्रुत होईल. साराऊश उदईक कूच करून वजीर दरमजल स्वामीकडे येतो. आम्ही त्याजला निरोप मागितला. त्याणे निरोप न दिल्हा. आपण सडा होऊन बाहीरबाजार व कबिले वगैरे आपलामागे ठेऊन जरारी येऊन स्वामी पोहोचतो, यास्तव आम्हास निरोप न दिल्हा. उदईक येमुना उतरून ते व आम्ही बरोबर जलद येतो. वजिरानी विसा लाखाची टीप लिहून पाठविली आहे, ती सेवेसी पाठविली आहे. यमुना उतरलियावर आहमदखानाकडील व हफेजाकडील फौज आम्हाबरोबर किती

---

१ महत्व. + From the South.

येती तों सेवेसी लिहून पाठऊ. येमुना उतरेल तेव्हा आम्हास भरंवसा येईल. जर कदाचित उदईक येमुना न उतरले तरी आम्ही वजिरापासून निरोप मागून हुजूर येतों. सेवेसी श्रुत होये. राजश्री पुरुषोतम माहादेव याणी तप(सी)-लवार इकडील वर्तमान लिहिले आहे हे विज्ञापना.

¶*Rajaram Govind, deputed to the Vazir to secure his co-operation, is advised to return as the mission on which he has been dispatched does not appear ta bear fruit.*

No. 157] *[23-5-1757*

श्री

श्रीमंत राजश्री बावा स्वामींचे सेवेसी

पोष्यें विठल सिवदेव कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान तागाईत जेष्ठ शुध पंचमी सोमवार मुकाम सराये कोटें नजीक ग्वालेर जाणून वृत येथास्थित असे. यानंतर आपली स्वारी त्या प्रांतास पूर्वेकडे गेलियादारभ्य काहीं वर्तमान कळले नाहीं. प्रस्तुत फौजा सैदाच्या कोठड्याच्या रोखें अल्या म्हणून कळले. त्यास आपले येणें दतिये प्रांते होणार की काय हे आज्ञ करावी, त्याजप्रमाणे आम्हीहि भेटीस येऊ. आगर जेथे आज्ञा होईल तेथें येऊन सामील होऊ. भेटीनंतर सर्व वृत सेवेसी निवेदन होईल. शृत जाले पाहिजे. विशेष काये लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Vithal Shivdeo inquires of (Mahipatrao ?) Bawa whether the latter is proceeding via Datia.*

No. 158] *[27-5-1757*

पौ छ १७ रमजान सन
समान

श्री

श्रीमंत राजश्री दादा साहेबाचे
सेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ८ माहे रमजान भृगुवासरपर्येत मु॥ भुसावर येथे स्वस्तिक्षेम

असो विशेष. श्वामींनी अगऱ्याच्या सुभ्याच्या सनदा आम्हास दिल्ह्या आहेत. यैसियास प्रस्तुत रुपराम कटारे येथे आले आहेत. त्यासी काही मामलतीचा मजकूर बोलावा किंवा न बोलावा अथवा बोलीचा आर्थ सरकारातूनच होईल या आशयाची आज्ञा जाली पाहिजे. आम्हाकडे सुभा तो निश्चयात्मक दिल्हाच आहे. परंतु खावंदाचे मर्जीस कार्य येत यास्तव विज्ञाप्ति लिहिली असे. स्वामीचे मरजीस नसले तर सनदा स्वामींच्या स्वामीकडे पाठऊ. प्रस्तुत स्वामीचे मरजीस त्याची मामलतच करावी यैसे असेल तर ती मामल(त) करून वसूल आमचे स्वाधीन करावा. आमचा वलवटा त्यासी राहील. कमाविसदार त्याजवल राहातील. जे समई स्वामीचे चिती जागा सोडवणे तेव्हा आमचा आमल बसऊन देवावा. वाजवी गोष्ट जैसिंगाकडे सुभा होता त्याप्रा आगरे हवेली वगैरे हवेलीचे माहाल असतील त्यात आमल सुभ्याचा आसावा. मसूरद (?) देखील हे येक करावे. नाही तर सुभाहि न द्यावा. आमलहि न द्यावा. पैका थोडा दाहापावेतो कमबेश मामलत करून. सर्व मुलूक क्रोडीचा खावा यैसे असेल तर तो जे देईल त्याची निशा सावकारी आमची घ्यावी. आम्हास सिबंदी न द्यावी. स्वामीचा रुपया व सिबंदी यैसी वारून सरकारचा नक्ष राखू. यात जे मरजीस येईल त्याप्रा रा सखारामपंत बापूस यास ल्याहावे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev inquires of Dadasaheb whether he may carry on negotiations with the Jat about the administration of the province of Agra.*

No. 159] *[27-5-1757?*

श्री

सेवेसी जयवंतराव येशवंत साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षम ता छ ८ रमजानपर्यंत यथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले की मकडाईची वाट फुटेल तेथे सारा कारखाना ठेवणे. दाहा तोफा मात्र नेणे. त्यावरून आज्ञेप्रमाणे सारा कारखाना मकडाईचे आलीकडे ती कोसावरी मुकाम केला. दाहा तोफा मात्र मकडाईस नेल्या. आज सोय पडली तर मकडाईस तोफा लागू करितो; नाही तर उदईक तोफा लागू करू. नारोपंत सांगतात त्याप्रमाणे वर्तणूक करितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Jayawantrao Yashwant plans an attack on Makdai.*

No. 160] [31-5-1757

पौ छ १८ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक गोपाळराव बापूजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। जेष्ट शुध त्रयोदसी मुकाम कालपी स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पूर्वी सविस्तर लेहून पाठविलेच होते. त्यावर गाजदीखान आंतरवेदीत आल्यावरी गंगासिग वगैरे चंदेले व फरुकाबादवाल्याचा चेला जाहानखान पठाण दोन हजारा फौज व तीन हजार प्यादा, च्यार तोफा, जेजाला व बाण याप्रा। येऊन सिवलीचें ठाणे घेतले. आकबरपुरास येऊन शह द्यावा हे मानस त्याचे, त्यावरून सेवकाने पुढे जाऊन त्यास घेरले. आडचणीची जागा गावाचा आश्रये धरून राहिले होते. गाठ घालावयाची काबू बनली नाही. भोंवताले सर्व बंद करून सिकंदा केले. त्यावरून घनशामसिंग चव्हाण मध्यस्तीस पडोन फरुकाबादेस लाऊन दिल्हे. सिवली वगैरे ठाणी घेतली होती ती खाली करून दिल्ही. या वर्सी या प्रांतीचे वर्तमान ल्याहेवेसे नाही. खरिफात आनावृष्टि, दुसरे टोळधाड पडोन काही ताळ राहिला नाही. रबीत पर्जिन्य पुर्ता नव्हता. थोडबिहुत कोठे होती त्यास आबदल आलीची पहिली गडबड. दुसऱ्याने गाजदीखान आले यामुले चंदेले व जाहनखान याचा शह यामुले रयेत माल खाऊन गेली. फितुरामुले तहसील बंद जाली हा आर्थ कोठवर ल्याहवा? सेवकाचे मामलतीत मातबर जागा सा लक्ष साडे सा लक्षपर्येंत आकबरपूर, शाहपूर येथील येवज यावा तेथे दोन लक्षास ठिकाणा नाही. केवळ कमाविशदारीपण सेवकाकडे नाहीं. बारगिरीचा प्रकार परंतु कचे वर्तमान सेवेसी निवेदन व्हावे यास्तव लिहिले असे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Gopalrao Bapuji writes to Raghunathrao about a skirmish with the Chandeles and Jahankhan Pathan and mentions the posts that he captured from them.*

No. 161] [31-5-1757

पौ छ १६ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीजीचे
सेवेसी

पोष्य नारो केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १२ रमजानपरियेंत आपले कृपावलोकनेकडून मुकाम आवले येथे सुखरूप

जाणून स्वकीयानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर पूरवी येक दो वेळा श्रीमंतास पत्री इकडील वर्तमान निवेदिलेच आहे त्याजवरून साद्यंत ध्यानास आलेच असेल. सांप्रतचे वर्तमान वजीर गाजुदीखान व आहमदखान पठाण फरकाबादेनजीक आसेत. रोहिले हाफीजखान दुंदेखान वगैरे फौज जलाला-बादेवर असेत. वजिराची व सुज्यातदवलाची भेटी हाफीजचे हाते होणार. सुज्यातदवलाहि कूच करून बागरमोहूवर आला असे. भेटी होऊन काही द्रव्य त्यासी सुज्यातदवलाकडून देऊन वजिरासी आईक्यता होआवी निमित्ये मेहदीचा घाट वजिराचे तर्फेन पूल तयार होत आहे. त्याची व याची भेटी हाफिजेखान याचे विद्येमाने होणार. रोहिल्याकडील यैवजाचा मजकूर तर हे मतलबी आहेत. हा काल परियेत यानी हावा पाहिली. विनाफौजा आलियावाचून यैवज देत नाहीं. सांप्रत आपलेहि आगमन आंतरवेद प्रांती जालियाचे वर्तमान यैकिले. येणेकडून परम संतोष जाहाला. ज्या दिवसाची इछा करीत होतो ते सुदीन इश्वरे आणिले. रोहिल्याचे सिष्टकृत्ये जालिया करोडोचा मुल्क स्वाधीन होईल आणि हिं(दु)स्तानचा बदोबस्त स्वराज्यादाखल होईल. हाफिजेखान याजला आम्ही पत्रें लिहिली आहेत की यैवज तुम्हास देणे; नाही तर आम्हा येऊन कासीपासी घेता संमद आले आहेत त्यांजकडे जाऊ यैसी लिहिली आहेत. त्याचे प्रतिउतर काये येतें. जर यैवज देऊन आहिक्य राखावयाचे असिले तर पाहून. नाहीतर आपले चरणासनिध येऊन भेटीआंती सर्व निवेदिले जाईल. बहुत काये लिहिणें ? कृपा निरंतर आसो दीजे हे विनंती.

¶*Naro Keshav reports to Sakharam Bapu the negotiations started by Ghaziuddin and Ahmadkhan Pathan with Shuja-ud-daula.*

No. 162] [*31-5-1757*

श्री

श्रीमंत राजश्री सखारामपंत
बापू स्वामीचे सेवेशी

पो गोपाळराव बापूजी सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता जेष्ट शुध त्रयोदसीपर्यंत मुकाम कालपी येथास्थित जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. येथील सविस्तर वर्तमान पूर्वील पत्री सविस्तर लेहून पाठविले होते त्यावरून विदित जाहाले आसेल. फरुकाबादवाल्याचा चेला जाहन-खान व गंगासिग वगैरे चंदेले जमाव करून दोन हजार फौज व तीन हजार प्यादा व च्यार तोफा व जेजाला व बाण जमाव करून सिवलीचे ठाणे येऊन घेतले. आकबरपुरास येऊन शह द्यावा हे त्याचे मानस होते त्यावरून त्यासी

गाठ घाकून पंधरा दिवस भोवताले घेरून सिकंदा केला त्यावरून सलुखाचा विचार करून घनशामसिंग चव्हाण मध्यस्तीस पडोन त्यास फरुकाबादेस लाऊन दिल्हे. या प्रांतात खरिफाचे हांगामी आवर्षण पडिले. कोठे थोडे बहुत काही होते त्यावरी ताडी पडोन केवळ नाहतून केले. त्यावर रबीचे समई पर्जिन्य पुर्ता जाला नाही. थोडा बहुत जाला. यामुले रबी कोठे जाली कोठे बीज देखील उगवले नाही. त्यामध्ये हांगामी दंगा जाहाला. थोडा बहुत माल होता तो रयेत खाऊन गेली. रुपया यावयासी जागा राहिला नाही. केवळ कमाविशदारीप्रमाणे वर्तमान लिहिले नाही. कचे वर्तमान जे आसेल ते आपल्यास कलावें म्हणून लिहिले आसे. या वर्सी आंतरवेदीतील मजकूर काही राहिला नाही. परस्परे विदित जाला आसेल. राजश्री जानकोजी सिंदे यानी राजश्री समसेरबहादर यासी दोन लक्ष रुपयाची वरात दिल्ही होती. हे वर्तमान हुजूर पुणियाचे मुकामी निवेदन केलें त्यावरून वरात तकूब केली. हे वर्तमान सेवेसी लिहिले होते त्यावरून मना चिठी समसेर-बाहादर यासी आली. ते पत्र त्याजकडील स्वार यास दिल्हे; परंतु ते येथून जात नाहीत. नित्य गर्गशा करितात की समसेरबाहादर याचे पत्र आणून देणे किंवा रुा देणें. त्यास येविसी त्यास लिहिले परतु पत्र पाठवीत नाहीत. स्वार येथून जात नाहीत. नित्य कजिया करितात; यास्तव त्याचे पत्र श्वारास येऊन येथून जात ते गोष्टी केली पाहिजे. सांगितले यैकत नाहीत. सरकारचे पत्र आपण पाठविले ते मानीत नाहीत. आपल्या खावंदाचे पत्र आणा म्हणतात. असा प्रकार आहे. येविसीची आज्ञा कर्तव्य ते करून स्वार जात ते गोष्ट केली पाहिजे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*A second letter on the same subject as in No. 160. The destruction of the crop and the plight of the ryots are described at the end.*

No. 163] [*31-5-1757?*

पौ छ १३ रमजान

श्री

श्रीमंत् राजश्री बापूसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी सखदेव सां नमस्कार विनंती. येथील कुशल वर्तमान जेष्ट शुध त्रयोदसी मुकाम शकुराबाद येथास्थित असे विशेष. श्रीमंताची दोन पत्रे सेवकास आली ते रा बालाजी गोविंद याजपासी पोहचलियावर अजितमलचे सराईवर पावली. तेसमई यावर पठाणाची भारी इभरत होती जे सांजेस सकाळ येमुना उतरावी. हाच प्रकार येथील होता परंतु धण्याचे पुण्यप्रतापे यैसे जालें

जे पठाण गाजुदीखान फरुकाबादेस पोहचले. ठाणी बैसविली. कुल त्यानी आपली उठऊन घेतली. इटावे, शकुवाबाद वगैरे येथे कमाविसदार बैसले. भिवगाव मात्र मेणपुरीचे राहिले आहे. तिकडे बाळाजीपंत फौज घेऊन गेले आहेत. ठाणे बैसले असेल. याचा सुभेता जाला. मार्गाचाहि सुभेता जाला. उठोन यावे तो स्वामीचे अगमन मथुरेस जाले म्हणौन पत्रे यापासी आली आहेत. फरुकाबादेकडे येणार म्हणौन येथे मार्गाचिवर बैसलो आहो. जैसी धण्याची आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करू. वरकड वर्तमान नाजुक कामास पाठविले होते तो विचार राहाविला हा प्रकार पत्रे आलियावर दिसोन आला. परंतु खबर वर्तमान आणविले आहे. त्याचे पत्र निराळे आहे ते स्वामीनी ध्यानास आणावे. त्याप्रा। सेवक वर्तेल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Sakhadeo (probably a clerk of the Hingnes) reports to Sakharam Bapu the recapture of several outposts which had been taken possession of by the Abdali.*

No. 164] [*1759*

मसुदा

श्री

राजश्री गोपाळराव बापूजी यास पत्र तुम्ही गुमानसिंग कुमानसिंग याचा पक्ष करीत होते. तरी राजे पाहाडसिंग याची मामलत चिरंजीव राजश्री समसेरबाहादर याचे मारफतीने विल्हेस लागली. तुमचे बंधू सदासिव बापूजी याणी हमी दिल्ही. येथून चिरंजिवाकडील फौज व तुमचे बंधू ऐसे टिकीयाचे साहित्य घेऊन येतील तोंपावेतो तुम्ही गुमानसिंग व खुमानसिंग यांचा व पाहाडसिंग याचा स्नेह आणि हातात हात होये तरी उतम आहे. आणि त्याणी ती गोष्ट मान्य न केली तरी ते जेथे जातील तेथे त्यास वाटेस लाऊन देणे आणि तुम्ही आपले मामलतीचे कामास लागणे. या कामाचा बखेडा मिटोन बदोबस्त लौकर होऊन येथे पैकास तुम्हास द्यावा लागेल तो सावकारी निशा जाहाली आहे.

¶*Gopalrao Bapuji is ordered to settle the affair of the Bundelas Gumansing and Khumansing in co-operation with Samsher Bahadar and to go back to his usual duty of collecting the revenue. This is a draft letter, not formally completed and dispatched.*

No. 165] [About 1-5-1757

श्री

श्रीमंत राजश्री दादा सा-
हेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बलवंत बाबुराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना ऐसीजे. नवाब वजीर याही बहुत भाशणे केली आणि स्वामीचा आपला श्नेह आकृत्रिम घडावा व स्वामींही व आपण येकत्र होऊन महदकार्यें करावी व स्वामीची खासा स्वारी येमुणा उतरून ब्रह्मावर्ती येणार म्हणून नवाबास बातमी. त्यावरून नवाब श्रीप्रयागीहून कूच करून लखणौस आले की स्वाम ब्रह्मावर्ती येताच नवाबहि श्रीभागिर्थीस जाजमहूच्या घाटास पावें. तेथे स्वामीच्या व याच्या भेटी घडाव्या या आर्थी छ २१ रजबी आम्हास निरोप दिल्हा व राजश्री राये त्रिंबकदास यासमागमे दिल्हे. पाच सात दिवस लस्करात बराबरच होतो. तदनंतर निराले होऊन छ ३ साबाणी कानपुरापासी श्रीगंगा उतरून कसबे चिचेंडी येथे पोहचलो. पुढे कालपीपासी येमुणा उतरून सत्वरच सेवेसी पोहचतो. पोहचल्यानतर कितेक रहश सेवेसी निवेदिले जाईल. हली येकिले की जयेनगरचे सुमारे खासा स्वारीचा रोहक जाहला. करवलीवर मुकाम होता म्हणून वर्तमान आले. त्यास मार्ग कठीन, कोणत्या वाटेणे यावे ? जैसी आज्ञा होईल त्या सुमारे येऊ. राये मजकूर पहिलेपासोन सरकार ममतेचे आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Balwant Baburao writes to Dadasaheb that the Nabab Vazir is making friendly overtures.*

No. 166] [April 1757

(वरील मजकूर गहाळ)

चलषालच्या येथवर आली हे वर्तमान येकून फिरंगी फौज देऊन मुसाकश व शुक्रुलाखान हे सरदार बमयफौज पाठविले व तमाम राजे वीस हजार प्यादा त्याचे तैनात केले. बंदरीहून पाचसे फिरंगी व दोन हाजार गाडदीहि तैनात केले. फौज मातबर. येकून गिरमाजी खंडेराव व रामगीर प्रांतीच खंडनियाकरिता फिरतात. मऱ्हाठिया फौजेचा पायबंद. दुसरे वर्तमान दिलीकडील पैदरपै की आबदाली आला. याने अलमगीर पातशा नजरबंद करून फेरोजंग वजिरास कैद करून खानखानास खिलत वजारतचा जाला. बंदोबस्त अबदाली करून

3670

पुढे अकबराबादेस छावनीस येणार यामुले शाहनवाजखानाची पत्रे तेथल्या बातमीची व तालुकियाचा बंदोबस्त करून सत्वर येण म्हणोन नवाब सलाबतजंगाची पत्रे पैदरपै आली म्हणोन तयारी सरंजाम तोफखाना छकडे वगैरे तमाम राजबंदरीस व सिकाकोली व मछलीबंदरी गरनाला व गोले व फुलचेरीस गोरोंदोजाची आज्ञा बमयेसरंजाम दारूगोला गरनाल व फिरंगी अनिक हाजार व गार्दी हे अनविले. येसी गडबड जाली म्हणोन पूर्वी सेवकाने विनंतीपत्रे रवाना केली की दिलीवर तो अबदाली येऊन बंदोबस्त करितो. पुढे श्रीमंत काये तजवीज करून फिरंगी फौजेस काये आज्ञा करितात ? आवई वरून कलत होत की आबदाली अकबराबादेची छावनी करून शह मालवियासी देणार व शाहनवाजखानाचे लिहिल्यावरून कलले की श्रीमंत रा। दादासाहेबास व सुभेदारास आज्ञा गेली की सरहद मालवियाचे असने. पुढे न जाणे. यावरून येसे भासले की श्रीमंत स्वामी आपणहि नरबदेपावतो जातील. फिरंगी फौजेस बोलावितील म्हणोन याचे तोफखानियाची तयारी करून बैलास खरिदी करने. पनास हाजार रुपये पाठऊन अनविले असेत. पुढे सिकाकोलाहून जाऊन न दिधले की तिकडे गेलिया पेच, मार्ग कठीन, पावने कठीण, यासत्व (यास्तव) मार्ग लक्षीत नेत्र साक्षेपित तो आज्ञापत्र छ २० जमादिलावलचे ते छ २४ जमादिलाखरी पावले. यात आज्ञा की पंढरपुराहून मजल दरमजल स्वारी कृस्णातिराहून विजापूर प्रांती आली. यापूर्वी सरदारानी सिरहटीचे व हरपनहालीचे पारपत्ये व खंडनिया घेऊन कोपलचा किला घेतला. पुढे बिदरूरच्या तालुकियाकडे शह गेला असे. श्रीमंताचे प्रतापापुढे सर्व शरण पादाक्रांत जे स्वामी चिती धरतील ते तातकाल अनकूल व खलितियामधे आज्ञा मुसा भुसी व हैदरजंग बहादुरास यैसीजे. आबदाली आलियाचे वर्तमान व श्रीमंत रा। दादासाहेब व मलारराव होलकर पुढे दिलीकडे रवाना जाले. तुम्ही पातशाही बंदे आहा. कुमक करने उचित. तर लौकर फौज घेऊन उभयेतामधून येक सरदार फौज घेऊन श्रीमंत रा। दादासाहेबाजवल जावे हे पत्रे अक्षरशाह वाचून दाखविली व त्यानी वाचली. त्याचे उतरे खलिते सविस्तर लेहून आपले हरकारे देऊन सेवसी पाठविले असे. सारांश जर करीता अबदाली दिलीस आला तर दिलीचा बंदोबस्त या दोन महिनियात करील व पुढेले साली जेव्हा जोर धरून इकडे दक्षेणेस यात्रयाचा मजकूर करील तेव्हा मोगलाई फौजा दक्षणेच्या जाऊन पारपत्ये करनेचे तर कधी जाले नाही. परंतु फिरंगी सरंजाम मातबर स्वामीचा अंकित. त्यास मुसा भुसीनी व हैदरजंग बाहादुर यानी तजवीज यैसी केली की थोडा सरंजाम फिरंगी वगैरे जर करिता पाठविला तर यासी वर्तवनार कोण व येखादी वेल मातबर पडली तर जुज

सरंजामाने काय होणार ? नाव व सलाबत बुडेल म्हणोन जुज सरंजाम पाठविने व त्या जुज सरंजामाने काये तरतूद होईल उचित नाही. पोख्त सरंजाम तयार करून फिरंगी दोन हजार अगर पंधरासे व गाडदी पाच हजार व तोफखाना व गरनाला दारू बंदरची, फिरंगी गोले वगैरे मातबर घेऊन जाऊन श्रीमंताचे रुबरू आपली सुजयायेत व तरतूद लढाईचा व लढाई फिरंगियाची व लोकिक श्रीमंताचा अधिकोतर दिवसेंदिवस उर्जितच आहे. आपली रिफाकतेची[1] व येखलासाची शर्त करून दाखवावी या विचारात होते. तो दिलीकडील वर्तमान आले की सर्व फिसाद खानखानानी व जाटानी वजिरास कैद करावयासी आबदालीसी दोन करोड रुपये कबूल करून घेऊन आले, त्यास आलमगीर पातशाहासच आबदालीने तख्ती बसविले. वजीर खानखाना जाले. वजीर कैद केला व जाटाची मातबरी फार जाली. दोन करोडाची तफरीक[2] येसी केली की पनास लक्ष रुपये खानखाना व पनास लक्ष रुपये जाट व पनास लक्ष रुपये इतर अमीर व पनास लक्ष रुपये शहरची रयेत उमरपटी येकून दोन करोड रुपये करून देऊन आबदालीस खानखाना रवाना करनार. आपले मुल्कात जातो, आबदालीस दाईया[3] (?) पातशाहबाचा नाही, अनियासे अरिष्ट टलले, परंतु जाट भारी पडला. त्याचे पारपत्ये स्वामीस करने उतम प्रकारे उचित, पातशाहत फार जिलिलै[4] जाली. सलाबतजंगाचा मोकदमा तर आज्ञाधारक स्वामी राखतील तर आबरू त्याची राहील नाही तर येक चाकर (?) याचे पारपत्य करावयासी निर्मान होता, ईश्वर इछा, पूर्वी सावनूरच्या[5] मुकामी कारारमदार, तैनातजाबता श्रीमंताचे हस्तअक्षरेकडून बीद न बनली म्हणोन सुभेदारानी आज्ञेप्रमाने लेहून दिल्हा. दोन लक्ष रुपये दरमाहा व साहा लक्ष रुपे नालबंदी घ्यावी, त्यास याचे सरंजामास दिलीची मोहीम मातबर सरंजाम मातबर लोक इजाफ[6] बेश मागतात, यासी च्यार लक्ष रुपये दरमाहा पाहिजे, श्रीमंताचे रुबरू सरंजाम आलिया द्रिष्टीस गुजरलिया श्रीमंत कृपावंत होऊन अधिक काही वाढवितील, फार मातबर सरंजाम त्यास पुढले साली अगत्येरूप हा सरंजाम घेऊन दोन तीन संस्थानाचे पारपत्ये रुबरू करावे हे उचित. श्रीमंत मुलकगिरी करून जेस्ठ मास पुनियासी आलियावर नेमस्त दाईया दिलीचा करार पडेल तर सेवकास आज्ञापत्रे आलिया रा। नागोराव यासी घेऊन येतो, पुढे नालबंदीचा वगैरे याचा दरमाह करार करून हे फौज समागमे घेऊन चालतो. हे सरदार सर्व प्रकारे आज्ञांकित स्वामीचे आहेत यात सवशये नाही. शह आबदालीचा वारला. श्रीमंतानी

---

१ मैत्री, स्नेह. २ वाटणी. ३ लोभ, इच्छा.
४ त्रास, जलाली. ५ बेत न बसला. ६ तनखा, नेमणूक.

मुलुकगिरी त्या प्रांती बरीच दोन महिने राहून करावी. तोवर हेहि इछापूर व आसके वगैर धुमसरचा बंदोबस्त करून मावारे छावनी बाजवाडा अगर राजबंदरीस करतील. श्रुत होये.

¶*News-letter from the Nizam's camp, mentioning the doings of the Abdali and his future plans. The plans and movements of the Nizam are also described.*

No. 167] [*June 1757*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री राघोपंत व खुबचंद गो

पौ सखाराम भगवंत नमस्कार व आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्हा उभयेतास व राजश्री सुभेदार याजकडील ग्रहस्थ सुज्याअतदौले बाहादर याजकडे पाठविले. त्यास तुम्ही तेथे गेलियावरी सुज्याअतदौले याचे पत्र श्रीमंतास घेऊन पाठविलेत त्यात अलकाबाच्या[1] खाली मुकातिबे मोहबतीज म्हणून अलकाब लिहिला. त्यास यैशा (अपूर्ण)

¶*Sakharampant acknowledges the receipt of a communication from Raghopant and Khubchand who had been deputed to Shuja-ud-daula.*

No. 168] [*1-6-1757*

पौ छ १२ रमजान

श्री

सेवेसी विनंती विज्ञापना. किलेदारास सरकारचे पत्र होते ते काही पाठविले नाही. आपल्या नावाचे पत्र सिष्टाचाराचे लेहून कारकुनाबरोबर पाठविले. त्यासी पत्र आल्याचे यैकोन कारकुनास आंत घेऊन गेले. पत्र वाचोन बहुत समाधान पावले. बोलिले जे त्यानी येथे नदीपलीकडे येऊन उभे राहावे. आम्ही आपल्या नावा पाठऊन देऊन उतरून घेऊन येऊ. किल्याजवळ जागा देऊं. दोन च्यार कामे तूर्त मातबर शहरातील करून घेणे आहेत ते घेऊ. पैसा टका मातबर हातास येईल त्यातून आम्हास काही ग्राल घेऊ. न दिल्हा तरी काही आम्हास मागणे नाही; परंतु तुम्ही येक वेळ येथे येणे. कोण्हे गोष्टीचा आमचा

---

१ मायना.

वसवास तुम्हास असिला तरी आम्ही तुम्हासी कुराण करितो; तुम्ही आम्हासी देवधर्म आपला करणे. तुम्ही आम्ही येकत्र होऊ. बंदोबस्त जिथवर जैसा बनेल तैसा करू परंतु आधी येणे म्हणौन त्याचा भला माणूस पत्रे येथे आली आहेत. रूबरू कारकुनाच्या सांगितले आहे जे कुल तोफा किल्यातील हजार नवसे आहेत ह्या त्याच्या. स्थळ त्याचे. त्यानी आम्ही येका विचारे आसावे. बाहेर घरात दुसरा प्रकारे आम्ही धरीत नाहीत. ते वचनाचे धर्माचे खरे आहेत आम्हास सर्वप्रकारे भरंवसा आहे. येथे जरूर त्यासी घेऊन येणे म्हणौन वरचेवर पत्रे येताती. जरी हे गोष्ट केली तेथे राहावा पडलियाने सर्व मनोदये होऊन येईल. आपले पदरी बेमानी घेऊ, परंतु धण्याचे कार्य होईल हा समये आहे. याउपरी जे मर्जीस येईल तेच सेवकास केले पाहिजे. जाले वर्तमान सेवेसी ल्याहावे म्हणौन लिहिले आहे. पत्र दुसऱ्यापासी न द्यावे. वाचून फाडून टाकावे हे विज्ञापना.

¶*The writer refers to the negotiations with the custodian of a fort (Agra?).*

No. 169] [*Recd. 1-6-1757?*

पौ छ १२ रमजान

श्री

सेवेसी विनंती विज्ञापना. येथे शकुराबादेस आलियावर किलेदाराकडे आपल्या नावाचे पत्र सिष्टाचाराचे लेहून जिवाजीपंत कारकून तेथे पाठविला होता. साहेबाचे पत्र पूर्वी घेतले होते ते काही पाठविले नाही. त्यासी पत्र पावताच बहुत त्याने संतोष मानिला. कारकुनास किल्यात घेऊन गेले. कितेक आमचे वर्तमान पुसिले ते यैकोन बहुत समाधान त्यासी जाले. तमाम त्याचे कारभारी व फाजलखान किलेदार याचा पुत्र यैसे येकत्र बसोन कारकुनासी जाबसाल केले जे, ते या समयात या देशात येऊन पोहचले. आम्हास बहुत तवका जाला. दुसरे आमच्या बापाचा त्याचा अत्यंत भाऊपणा चालिला आहे त्याप्रमाणे आम्हास चालविला पाहिजे. हे घर जागा त्याची आहे. हजार दोन हजार आम्हापासी बरकंदाज आहेत व नवसे ऱ्याहतर तोफा आहे व जे सामान आम्हापासी आहे ते त्याचे. आम्ही जिवाजाम्यानसी त्याचे आहो. आधिरात पिछला पहर जे काम आम्हास सांगतील ते बज्यावणे. येथे त्यासी आम्हासी दुसरे नाही. शहरचे कामकाज करून आले असतील तरी उतम नाही रिकामे या प्रांतास आले असतील तऱ्ही उतम, जे त्याच्या मनात करणे असेल त्यातून विशेष आम्हास करणे आहे. त्यानी सुखे कूच करून येथे किल्याचे रुबरू पलीकडे येऊन उभे राहावे आम्ही येथून नावा किल्याच्या सोडून देऊन त्यासी पार घेऊन येऊ,

खाईजवळ दरवाज्यानिकट हवेली आहे तेथे त्यानी येऊन राहावे. पैदा करून देणार आम्ही बैसलो आहो. दोन च्यार आसामी मातबर शहरात आहेत ज्याकडे वाजबी निंब(?) आहे. तूर्त पैका लोकाचा त्याच्या घरात ठेव ठेविली आहे ते आमचेच लोक जाऊन घेऊन येतील ते खजना दाखल करावा. आम्हास जे उचल्या हात देतील घेऊ; न दिले तरी आम्हापासी जे आहे ते आवघे त्याचे आहे; ते आम्ही येकत्र जालियावरी पैदा पुस्कळ करू. बहुत त्याजवर भारीच पडिले तरी जागा किल्यात त्याजला देऊ. त्यानी आम्ही सुखे येके गादीवर बसोन गुदराण करू; परंतु त्यानी तिकडील लक्ष कामे टाकून आधी येथे यावे. तूर्त येथील सिकार जाती. लस्करे जवळ आलियावर अफरातफरीत ते उडोन जातील हे जलदी आहे. दुसरे आणखी कितेक कामे आहेत. लौकर त्यासी घेऊन येणे म्हणौन येक आपला भला माणूस कारकुनाबरोबर दिल्हा आणि उभयेता येथे आम्हाकडे पाठविले आहेत. दुसरे त्याच्या मनात आमचे तरफेने वसवास असिला तरी आम्ही कुराण आपले करितो. त्यानी आपला देव असेल तो दरम्यान द्यावा आणि सुखे किल्यात येऊन बसावे यैसे ठराऊन उभयेता येथे आले आहेत आणि वरचेवर पत्राचा हरिंदा लागला आहे जे सत्वर येणे. त्यासी आम्हास खावंदाचे आज्ञापत्रे दोन आली आहेत. हा उपद्वाप करावा तरी धण्याचे मर्जीस काये येईल कळेना, करिता विनंती लिहिली आहे. जरी ते काम साहेबास करवणे आहे तरी अनयासे हे आपेआप उद्भवले आहे. केल्याने सर्व काम घडोन माहाराजाचे पुणेप्रतापे येतील. गुंता नाही. परंतु मर्जी दरकार जे आज्ञा होईल त्यासी सिध सेवक असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. माहाराजाच्या आगमनाची आवाई मातबर याप्रांते जाली आहे; यामुळे कुल जाटाची ठाणी आगरे वगैरे अंतरवेदीतील परगणे उठोन रोजीचे रोजीं किल्यात दाखल होताती. निवेदन व्हावे म्हणून लिहिले आहे हे विज्ञापना.

¶*The writer mentions the treaty effected between the Marathas and the custodian of the fort mentioned in the last letter. It is not clear which particular fort is referred to.*

No. 170] *[1-6-1757*

पौ छ १६ रमजान

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी

पो बाळाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १३ रमजानपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्तित असे विशेष.

येथील वर्तमान आजीपावेती नबाब अहंमदखान याणे सर्व जागां अमल केला. हाली फौजेची खबर यैकोन ठाणी आपली बसविली ते सोडिली. कनोज वगैरे दोन तीन जागा न सोडिली. त्यास हाली फरकाबादेस गाजदीखान व दोघे शाहाजादे व जंगबाजखान अबदालीकडील व अहंमदखान यैसे आहेत. रोहि-ल्यासी सलूक करून पुढे काही मनसब्यावर आहेत. गाजदीखानाचे चितात आपली गौरसी करितील. आपले केले सर्व प्रतिपादन करितील तरी उतम आहे. न केले तरी इकडेस हे बंड उभे करून असावे. याजमुळें जे होईल ते होऊं. पुढे अबदालीसहि आणावा. त्यासीहि अनुसंधान राखिले आहे. पष्ट बोलतो कीं सर्वस्व खाऊन पातशाहीची आबरू गेली. आमची सर्वाची खराबी जाहाली. याणीं येऊन साहे करावे तें न जाले. आपण सर्वस्वास बुडालो. बेहुरमत जाहालो यैसे कितेक बोलतो यैसे वर्तमान आहे. अहंमदखानास नतिजा न पोहोचे तरी त्याणें आजी च्यार महिने मुलूक जबरदस्तीने घेऊन अमल केला तो त्यास फावले. सरकारी फौज येक वेल असत्ये नसत्ये याणें असेच करावे. याची नजर ठिकाणीं नाहीं. हे वर्तमान परस्परेहि निवेदन जालेंच असेल. तमाम हिकडील राजे मेणपुरी व रूरू व चंदेले व गौर व बाघेले व बैस याणी तमाम गढ्या पहिल्या होत्या त्या घेतल्या आणि नव्या बांधल्या. दोन हजार गढी तयार जाहाली. येक पठाणाने मात्र आपले अमलदार बोलाविले परतु जमिदार व राजे याणी तमाम जागा गढ्या बांधोन राहिले आहेत. पा। फफुंद व तालगाव हे दोनी परगणे रुरूच्या राजाने घेऊन गढ्या बांधल्या. येक गाव गढीविना नाहीं. पा। बिठूर चंदेले याणी घेतले आणि चचेडी वगैरे ठाणी पहिली आमची होती ते घेतली. त्यासिवाये गढ्या बांधलया. नवाब अहंमद-खानास व राजेयासी तमाम येक वेल नतिजा न पोहोचे तरी हे केले ते फावले. यैसे जाहाले म्हणजे जेव्हा संधि पाहातील तेव्हा हेंच करितील यैसे वरचेवर वर्तमान लिहितो. दररोज जोडी कासदाची रवाना करितो वर्तमान लेहून. आगऱ्यास फोज आली. नजीक वर्तमान येईल तेव्हा कारकून पाठवितो. कासद जोडी वरचेवरी पाठवितो. रांगड्याचे व अहंमदखानाचे पारपत्य जाल्या-विना हिकडील बंदोबस्त कैसा राहील हें सर्व ध्यानास आणावे. बहुत काय लिहिणे ? कृपा लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Balaji Govind reports to Sakharam Bapu the movements and plans of Ahmadkhan Bangash and Ghaziuddin.*

3676

No. 171] [4-6-1757

पौ २९ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे
शेवेसी

सेवक धोंडो दतात्रय कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १६ माहे रमजान मुकाम मेणपुरी स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून वर्तमान येथास्थित आसे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावले. पत्री लिहिले की सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे, त्यास इकडील वर्तमान तरी गाजदीखान व आहमदखान पठाण यैसे फर्काबादेस आहेत. वरकड वृत भेटीनंतर निवेदन होईल. भेट होईल तों सुदीन आसे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ करीत आसिले पाहिजे हे विनंती.

¶*Dhondo Dattatraya writes to Sakharam Bapu that both Ghaziuddin and Ahmadkhan are encamped at Farukabad.*

No. 172] [4-6-1757

पौ छ १९ रमजान

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापू
स्वामीचे शेवेसी

पौा बाळाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १६ रमजानपावेतों मुकाम मेणपुरी वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावलें. फौजेसहवर्तमान येवनानी लबाडी केली त्याचे पारपत्याकरितां आलो म्हणून लिहिले. तिकडील वर्तमान लिहून पाठवणे म्हणून त्यास इकडील वर्तमान सविस्तर वरचेवरी लिहीत गेलों. त्यांस इकडील बदनक्षी हरामखोरी सर्वानी केली आहे. त्यांची पारपत्ये जाहल्याविना इकडेस तमाम अंतरवेदीत बंदोबस्त राहात नाहीं आणि दोन हजार गढीबंद जाहाले त्यास त्या गढ्या खाली करावयासी प्रेत्न कितेक पाहिजे. मातबर फौजेविना कैसें होईल आणि गाजदीखान व अहमदखान वगैरे मिलाले आहेत त्याची गुंज कैसी फुटेल येसे आहे. थोडक आहेत आणि याणी बंद बांधला नाहीं तो याप्रांती स्वारी येऊन जिकडील तिकडेस वारापाणी होऊन गेले म्हणजे पुढे राजे अथवा जमीदार वगैरे सर्वास दबाव बसेल आणि पुढे कोणी येसे करणार नाहीत. सुजावतदौलाहि जाजमऊ बराबर आला आहे. त्यांचे यांचे अद्यापि ठीक पडले नाही. त्यासहि दबावणी

याणी दिली आहे की आपण मराठे यांसी आणून तुमचे पारपत्य करून येसे दबाऊन लिहितात. अफवा उठवितात. त्यास दबाऊन त्याजपासून पैका घ्यावा आणि आपला सामील करावा येसे करितात. त्यास स्वारी आलियावरी पैकाहि मिळणे तो आपणासच मिळेल आणि याचेहि पारपत्य होईल. यासिवाये अंतरवेदीत जाटाचा मुलुक बहुत आहे. जाटहि दबतील येसे आहे. तोफांच्या गोल्याविसी लिहिले. त्यास सांचे पाठविले ते गुरसराईस रवाना केले आहेत. गोले तयार होतील ते पाठवीत जाऊ. वरकड जेजाला वगैरे आणविले त्यास तूर्त मेणपुरीवरी आहो. जागा घेतली आहे. सरकारी * * * * सोडीत नाही आणि मामलतहि देत नाही येसे आहे. कलावे वरचेवरी वर्तमान लिहीत जाऊ. येक दिवसाआड जोडी रवाना करितो. कलावे गाजदीखान व अहमदखान व सहजादे येसे श्रीगंगापार उतरोन रोहिले यांसी सलुक करून मामलत जाहली म्हणून वर्तमान आहे. रोहिल्याचे मारफातीने सुजावतदौले यांसीही सलुख व मामला कर्णार येसे वर्तमान आहे. बहुत काये लिहिणे. कृपालोभ असो दीजे हे विनंति.

¶*Balaji Govind requests Sakharam Bapu to despatch troops to the Doab to facilitate his efforts for realizing revenue from the province.*

No. 173] [*6-6-1757*

पौ छ १८ रमजान

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना राजश्री जनकोजी सिंदे या प्रांतीहून देशास गेले ते समई राजश्री समसेर बाहादर यासी दोन लक्षाची वरात दिल्ही. त्यास हुजूर हिसेबाचा फडशा जाला ते वेलेस त्याकडील वरात मना केली. हे वर्तमान सेवेसी लेहून पाठविले त्यावरून समसेरबाहादर यासी मनाईचे पत्र पाठविले. यैसियासी मारनिलेकडील तीनसे स्वार कालपीस येऊन रा कृष्णाजी आनंत यासी कजिया फारच केला. काही आर्थ राहिला नाही. तशामध्ये आबदल आलीची गडबड होती आणि त्याणी फारच तगादा केला त्यावरून वीस हजार रुा काढून सावकाराचे दिल्हे; मनाईचे पत्र दिल्हे. त्यास म्हणतात की आम्हास आमच्या खावंदाचे पत्र आणिल्याखेरीज यैकणार नाही. सरकारचे पत्र आले तेच त्याकडे पाठऊन दिल्हे परंतु जाबसाल तोहि दिल्हा नाही. त्याकडील स्वार येथें आहेत तसे आहेत, जात नाहीत. समसेरबाहादर याचे पत्र आले तर जाऊ म्हणतात यास्तव सेवेसी विनंती लिहिली आसे. आधी याची वरात हुजरून मना केली

दुसरे या प्रांती गडबड या प्रकारची आणि याचा कजिया आसा. रुपया याव-यास जागा नाही याकारितां समसेरबाहादर याचे पत्र स्वारास येऊन येथून जात ते गोष्टी करणार स्वामी समर्थ आहेत. तीन महिने इकडील गडबड बहुत याची गडबड पुरवली. सांप्रत गाजदीखान व अहमदखान फरुकाबादेस तीस हजार फौज जमा करून बसले आहेत. याचे फितुरामुळे रयेत सर्व तजावजा जाहाली आहे. पैसा देत नाही आण मृगसाल आले. पुढे लावणीचेहि दिवस आले. कितेक गाव उज्याड आहेत. पुढील लावणीची तऱ्हा काही दिसत नाही. फरुकाबादेतील फितूर तुटल्याविना मुलकाची वस्ती होऊन पुढील लावणी होत नाही. अंतरवेदीत मातबर फौज आल्याखेरीज बंदोबस्त होत नाही. गाजदी-खान याणी फरुकाबादेस फौज जमा करून अंतरवेदीची हे गत केली. गंगापारहि सुजातदौला याजवर शह दिल्हा आहे. त्याजकडून गोसावी याजबरोबर दाहा पधरा हजार फौज याचे मोहल्यावर आली आहे. पूल बांधोन पार यासी जाऊ देत नाही. गाजदीखान खंडणी मागत आहेत. सुजातदौला याचाहि जोरा भारीच दिसतो. पुढे काये होईल पाहावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

¶*The distress of the ryots in the Doab caused by the invasion of the Abdali and the presence of Ghaziuddin and Ahmadkhan with their forces is described in this letter.*

No. 174] [*6-6-1757*

पौ छ ८ शौवाल

श्री

राजश्री सखारामपंत बापू
गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो जोत्याजी मोरे दंडवत विनती उपरी. येथील कुषल जेष्ट बहुल ९ जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. बहुत दिवस जाले. गोसावियाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी सविस्तर कुषल वृत लेहून संतोश केला पाहिजे. इकडील वर्तमान तरी गुदस्ता सन सितामध्ये श्रीमंतानी राजश्री समसेरबाहादर याजबरा-बरी दिल्हे होते. त्यास त्याबराबरी मारवाड प्रांते जाऊन फिरोन माघारे खेची-वाडापरियेंत होतो. त्यासमई राजश्री गोविंदपंत बुंधले यानी बाबास पत्रे पाठविली कीं काही पथके या प्रांतास पाठवणे; त्यावरून कार्तिक मासीं राजश्री बाबानी च्यार पथके राजश्री त्र्यंबकराऊ सिवदेऊ व राजश्री धोंडो दतात्रेय व राजश्री गोविंद

माहादेऊ व आमचे पथक ऐसे च्यार पथके राजश्री गोविंदपंत फडनीस समागमे देऊन व नेमणुकेच्या सनदा देऊन रवाना केली. त्यापैकी राजश्री गोविंदपंत बुंधेले यानी तीन पथके अंतरवेदीत पाठविली. आमचे पथक डंवाईत व अमान-सिंग व हिंदुपत हे उभयेता भांडो लागले, त्यामुळे वसूल तटला म्हणून त्याजवरी आमच्या पथकास ठेविले आसतां ते उभयेता झुझले. त्यामुळे आमायेनसिंग यासी गोल्या लागोन पडले. त्यामुळे मुलकांत खतरा बहुतच जाला. जागा जागा पुंडाई जाली त्यामुळे वसुलास खलेल जाली. त्यास ज्याणी ज्याणी लबाडी केली होती त्यास शासन करून येथील कामकाज करविले. हाली आता अखेर सालचे दिवस, पर्ज्यन्नकाल समीप आला. गुदस्तां मारवाडांत लोकानी महर्गते-मुळे कर्जे बहुत खादली. च्यार महिने पर्जन्नकाल चालकुचात जाला त्यामुळे डेरे, राहुट्या, जीन, खोगरे आवघी कुजली. लोकास पांघरूण नाही किंवा डेरा राहुटी पागेस आदीकरून नाही. जीन खोगरे पागेची व लोकाची आदीकरून कुजली ती नवी होत नाहीत. दुसरा पर्जन्नकाल आला. आद्यापि लोकास सन सबाची नालबंदी नाही. यास्तव गोसावियासी हे विनतीपत्र लिहिले आहे. तेथ दरबारी गोसावी आमचे मुरबी आहेत हुजूर श्रीमंत राजश्री दादासाहेबास विनती करून नालबंदीची व रवानगीची बेगमी करून पाठविली पाहिजे. रुपये

६००० रवानगी
२५००० नालबंदी
―――――
३१०००

येणेप्रा साल दरसाल पावत आहे त्याप्रा बेगमी करून पाठविली पाहिजे. लोकाचे हाल बहुत जाले आहेत. ही सरदारी गोसावियाचे पदरीची पूर्वीपासून आहे. आम्ही गोसावियाचे पदरीचे आहो. लोकाची वखवख आणि गोसावी आम्हापासून दूर, मार्ग मधे चालत नाही. यासकट तीन पत्रे गोसावियाकडे रवाना केली. त्यापैकी येक कासीद मार्गी मारिला गेला: येक जोडी आद्यापि आलीच नाही. यास्तव ही तिसरी जोडी सेवेसी विनती लेहून पाठविली आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबास विनती करून बेगमी करून पाठविली पाहिजे. हे पथक केवळ घरचे जाणावे. दुसरा आर्थ नाही. वारंवार पत्रे गोसावी याजवळ पोहचत नाहीत यास्तव विनती लिहिली आसे. कळले पाहिजे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो दिल्हा पाहिजे हे विनती.

¶*Jotyaji More informs Sakharam Bapu that his division was sent by Govindpant to check the Bundela Chiefs Amansing and Hindupat and others, who obstructed the collection of dues from the province. He further requests him to sanction the advance of money to be paid to the army.*

3680

No. 175] [21-5-1757

पौ छ १८ रमजान

श्रीशंकर

राजश्री बालाजी पंडित प्रधान

गोसावी यांसी

ꣿ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री हणमंतराऊ निंबालकर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुषललेखन करित गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन बहुत समाधन जाले. तेथें लिहिले कीं श्रीरंगपटणची मामलेत विल्हेस लाऊन सिन्यावरी अलो. पंधरा रोजात तुंगभद्रा व कृष्णा ऊतरोन जाऊ. हिंदुस्थानांत पठाणाचा हंगामा फार जाला आहे. चिरंजीव राजश्री दादा व राजश्री मल्हारजी होलकर यांची पत्रे येतील तदनरूप विचार करावा लागेल. सारांश हिंदुस्तानांत कजिया राहिला तरी जलद जावें लागेल. नवाबांस पूर्वीच लिहिले होते कीं चिरंजीव दादाबराबरी काही फौज तोफखाना पाठवावा. ते समई आबदाली दिली अलीकडे अला नवता. आता जरूर गेले पाहिजे. तुम्हास नवाब पाठवितील व आमचे मतें तुम्ही चलावें. मोठे काम पडल्यास आळस का करावा? यात नवाबाचाहि लोकीक व आमचेहि काम आणि तुम्हांसहि उचितच आहे. आतापासोन तरतूद असावी म्हणून लिहिले.

[शिक्का] यैसियासी आपले कार्य ते आमचे कार्य यात अंतर नाही. आम्ही सर्व प्रकारे आपले स्नेहाची व भाऊपणियाची जोड केली आहे. आपला आमचा किमपि दुसरा अर्थ नाही. श्रीकृपेनें सर्व योग उतमच घडोन येतील. यानंतर इकडील वर्तमान नवाबसाहेब हैदराबादेहून शहरास जावयासी या प्रांते आले. त्यासी धारुरापासोन पुढे शाहनवाजखान आले. त्याची आमची भेटी होऊन येक दिवस येथें राहून दुसरे दिवसी कूच करून शहरास गेले. तदोतर चौ दिवसानी नवाबसाहेबहि धारुरीहून कूच करून आले. त्यांची आमची भेटी जाली. उपरांतिक नवाबसाहेबहि शहरास गेले मग दौलताबादेचा किला हस्तगत केला. शाहानवाजखान याचे पुत्र छ १

रमजानी किल्यांत दाखल जाले. आपणास कलावे म्हणून लिहिले असें. बहुत काय लिहिणे हे विनंती. (शिक्का मोर्तब सूद.)

¶*Hanmantrao Nimbalkar promises the Peshwa that as desired by him he will willingly proceed to the North to help Raghunathrao.*

No. 176] [*7-6-1757*

पौ छ २० रमजान

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामीचे सेवेसी

पो धोंडाजी हरबाजी नवाले कृतानेक सा। नमस्कार विनती. येथील क्षेम स्वामीचे कृपावलोकनेकरून जेष्ट वद्य ६ पावेतो शुकाबादेस सुखरूप असो विशेष. झासीहून स्वार होऊन लस्करास स्वामीचे भेटीस येत होतो. आटेरीपासी वर्तमान आयेकिले की आगरेपासी स्वार फौजसुधा आंतरवेदीत उतरले म्हणौन आम्ही वटेस्वरी येमुना उतरलो आहो. त्यासी कोणते स्थली भेटीस यावे. चेरण द्रिष्टीस स्वामीचे पडतलि तो सेवकास सुदीन आहे. सेवक पदरचा आहे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ दुणाविजे हे विज्ञाति.

¶*Dhondaji Harbaji to Sakharam Bapu from Shukohabad, enquiring where he should meet the addressee.*

No. 177] [*9-6-1757*

छ ९ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सखाराम भगवंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २८ रमजान मुा गंभीरा नजीक सिकंदरा काली नदी स्वामीचे कृपेकरून येथास्थित आसे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र आलें. त्याची उतरे आली तें त्याची उतरे आला(हि)दा पत्री सेवेसी लिहिली आहेत त्यावरून

विदित होईल. जलाली बिलाराम या प्रगणियांत मेडूवाल्याने व दताने मोठा दंगा करून ठाणी घेतली होती ते मोकली केली. दताचे केवल पारपत्यच करावे तरी च्यार दिवस गुंतावे लागेल म्हणून गुंतलो नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sakharam Bhagvant informs Raghunathrao that he has captured certain posts from the rebels.*

No. 178] [*4-7-1757*

छ १२ जिलकाद

श्रीमोरया

शेवेसी विज्ञापना छ २२ रमजानचे पत्र आले ते छ १९ शवाली पावोन लेखनार्थ अवगत जाला. प्रयागच्या किल्याविशई वारंवार लिहितो त्याचे उतरच येत नाही म्हणौन अज्ञा. यैसियासी राजश्री गंगाधरपंत गेलेत. त्यासी येविशी सांगवयाचे ते सांगितले. तिकडील उतरे आलियावर शेवेसी लेखन करूं. दसरा जालियावर पुढे तऱ्ही प्रयागचे काम खामाखा करून घेतो. सविस्तर श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे पत्री लिा त्यावरून श्रुत होईल हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar informs the Peshwa that he is not unmindful of the latter's instructions regarding the occupation of Prayag and would refer the matter to Gangadharpant* (*Chandrachud*).

No. 179] [*25-5-1759*

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ. २७ रमजानपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. आज्ञापत्र सादर जाले, तेथें आज्ञा कीं येक पक्ष धरूनच तुम्ही लिहिता. पाहाडसिंगाकडून प्रतापसा वैद्य राजश्री समसेरबाहादर यांचे विद्यमाने बहुतेक प्रकारे बोलतो तर प्रमाण गोष्ट आसेल. नजराण्यांचा येवज मातबर ठरोन रोख ये आणि साहास न लागता सरकारकाम होऊन ये आसे बहुतेक प्रकारे आज्ञा केली. येसियास सेवकाने येकच पक्ष धरून वर्तणूक केली नाही. परंतु प्रकार सरकारच्याच लोकानी द्वेषे-करून अथवा आपला स्वार्थ पाहून कलह वाढविला येविसी प्रारंभीच विनंती पाच सात वेला लिहिली कीं स्वामीनी ज्याचे स्वाधीन जे कर्म केलें तो त्याचा जिमा. खावंद आज्ञा करितील तेणेप्राा वर्तावे आणि [सेवक खावंदास] विनंती

3683

करील त्याप्रो खावंदानी त्याचे साहित्य करून दुसरे बोलत आसतील त्यांचे न येकतां ज्याचे त्याजवरच सोपून पक्षहि धरिला असला तऱ्ही तो खावंदांचे आज्ञे- वितरितग सेवक धरणार नाही आणि आज्ञेने पक्षहि केला तो सोडिल्याने या लोकात प्रमाणता राहत नाही. या बुंदेलखंडात काही कुवरांस उणे नाही. आम्ही पाहाडसिंगाचा पक्ष सोडून गुमानसिंग खुमानसिंग यांचाच केला नवता. पाहाडसिंग यास जगतराज याने काही दिल्हें नवतें. येक जमलपूर परगणा मात्र दिल्हा होता. याची आई मेली. तिजकडे जागीर होती ते व तिची वस्तभाव सरकारांत राज्याने लाविली. हा मागता बहुत श्रमी जाला. परंतु न दिल्ही. याजला पाच सात लाख रुा कर्ज. परंतु यास त्याणे काही ठिकाणा लागों दिल्हा नाही. सर्व देणे आगर ममता या उभयेता कुवरावर जागीर जाजती जागा चांगली पहिल्यापासून यांचा डौल राज्याचा करीत आला. सरकारांत हरिपंत आसता * * * चे राज्याचे बोलणे बोलून करारमदार हरिपंती सरकारात नजरेचा हती समागमे घेऊन गेले; तो हती सरकारात सेवकाने दिल्हा. त्यावर इकडे आलियावर जो जसा माार होत आला तो तसा सेवेसी लिहीत गेलो. त्यांत काही अंतर केले नाही. प्रस्तुत राजा मेलियावर प्रसंग बहुतच घडला. याचाहि भाव सविस्तर लिहीत गेलो. वारंवार विनंती केली कीं जे ग्रहस्त साहित्ये करितात, त्यांचें बोलणे बोलतात. त्यांस ताकीदपत्रें कीं तुम्हा दुसरियाच्या जिम्यात मन घालावयास प्रयोजन काये ? ते मातबर जाले तर त्याणी आपलेच दिल्हे आसे. विनंती लिहिता स्वामीनी त्यास ताकीदपत्रे पाठविली नाहीत. तेथे बोलणे बोलतात त्यासहि ताकीद न जाली. यामुले त्याणीं इतका प्रकार वाढविला. आम्ही येक पक्ष केला नवता. पाहाडसिंगाकडे त्रिंबकपंत व चिंतामणराव पाठविले कीं राज्याची मालेत तू आटोपून बसला आहेस. त्यास मालेत आनामात राज्याचा पाचाजवल मोजदाद करून ठेवणे. मातबर पाच तुमच्या राज्यातील आसतील हे आम्ही बसोन तुम्हास सांगू. त्याप्राा येकावे आसें सांगितले. बहुत वेल सांगून पाहिले. तो या ग्रहस्तांच्या चढाने (ऐ)केना. दरोबस्त राज्य माझें मजला राज्यानें दिल्हे होते. * * * * * * काही नवते. परंतु लुटून घेतल्याने काही उतम नाही. त्याणेहि सिष्टाईखाले घालून मग साहित्ये बहुतानी केली. जागा जागा कबुलाती जवाहीर हिंदुपतीस व हती दिल्हे. मग तो बलावला. सरकारात रदबदल्या करूं लागले. त्यांची पत्रे येत चाललीं. मग आम्ही हें सोडून राज्याचा मुलुक जत केला. पाहाडसिंगाचे जमलपूरहि जत केले. तेथेहि साहित्ये ग्रहस्तानी बहुत केली. रुपया येऊ न दिल्हा. गव्हार गर्दी जाली. तशात जती राखून थोडा बहुत वसूल जेथवर हात

पावला तेथवर घेतला. हली जमी जेथें जाली आहे तेथें आहेच. गोपालराव व गोविंदपंत याणी आणीक काही स्वार मदतीस चोरून पाठविले. राठेंत सेमोणी-पेलाणीत ठाणियास उपद्रव करून मदतीस गेले. मागती सेवकाने फौज पाठऊन ठाणे राठेचे घेतले. सेमोणीपेलाणीकडीलहि गोपालयांची फौज बुंधेल्याकडील लोकानी व आम्हाकडील पागा हुसेनखान याणी मिलोन ते फौज लाविली. कांही लुटली गेली. जुज न करिता पलाले. आसा मार आजीपर्यंत जाला. बलाबल पक्ष पाहून रुपया रोख हातास यावयाचा मार तर जाण्याने व फौजेने मातबर गुमानसिंग खुमानसिंग हे पहिल्यापा जगतराज याणेच केले. सवाई गुमानसिंग हे हिंदुपत आदिकरून सर्वास व सरकारात सनदापत्रा राज्य किरतसिंगास दिल्हे. लिहिली करारमदार पहिलेच जालेले पाठविले. सर्वानी दाखला * * * हातां राजा आसता हेंच प्रमाण म्हणून—

¶*This is the first long sheet of a letter sent by Sakharam Bapu who had been deputed to adjust the differences between the sons of Jagatraj Bundele and who explains how he is proceeding in the affair. He presents a strong remonstrance to the Peshwa against taking the advice of interested parties.*

No. 180] [*17-6-1757*

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक गंगाधर येशवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागाईत आषाढ शुध १ प्रतिपदा मु॥ कवडागंज काली नदी येथे साहेबाचे प्रतापेकरून स्वस्तिक्षेम आसो विशेष. साहेबाकडून आज्ञापत्र आले त्याजवरोन बहुत संतोष जाहाला. तिकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे म्हणौन आज्ञा. त्यावरोन इकडील सविस्तर वर्तमान राजश्री सखारामपंत बापूनी सेवेसी लिहिले आहे त्याजवरून श्रुत होईल. पुढे दरमजल जात आसो. होईल वर्तमान ते शेवेसी लिहून पाठवीत जाऊं. सांप्रत आपला मुकाम कोणे-ठिकाणी आहे हे सविस्तर ल्याहावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Gangadhar Yashwant makes enquiries about the whereabouts of Raghunathrao.*

No. 181] *[19-1757*

पौ छ ३ शौवाल

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री बापूसाहेब

स्वामीचे शेवेसी

सेवक रावो लक्ष्मण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १ शवाल मुा दर लस्कर नवाब सुज्यायेतदौले स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे. स्वानंदलेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष काल छ ३० रमजानचे पत्र तपसीलवार वर्तमान लिहून पाठविलें तें शेवेसी पावलेंच असल. कालचे वर्तमान नवाबास पुसिलें कीं तुम्ही श्रीमंत राजश्री बापूस व राजश्री तात्यास बोलावयास भवानीदासास पाठविलें; व आमचे मारफतीने पत्रेंहि पाठविलीं आहेत. त्यांची पत्रे आम्हास आलीं कीं आम्हीं दिलीकडेल जात होतो; परंतु नवाबाच्या कार्यामुले फिरलो; दरमजल येतो; आणि तुम्हीं सलुख करितां ये काये आहे, हे गोष्ट परिछिन सांगावी; त्यासारखें आम्ही त्याजला लिहून त्याजवर बोलिले कीं मी सलूख करीत नाही. तुमची फौज येईपावेतो जाबसालाखाले घालून दिवसगत लावितों. मग आम्हीं अर्ज केला कीं येणेंप्रमाणें पत्रे ल्याहावी. मग नवाबानी स्वामीस व राजश्री तात्यास पत्रें खास मोहरनसी येणेंप्राच लिहिलीं आहेत. पूर्वीहि नवाबानी बोलावयानिमित्य पत्रें लिा व भवानीदासास पाठविलें आहे. स्वामीस बोलवावयाचा कांहीं गुंता राहिला नाहीं. जाबसालाची गोष्ट भवानीदासाने सांगितलीच आसल. आम्हांस तर कांही खुलासा सांगितला नाही. स्वामीच्या ध्यानास रदबदल आलीच आसल. स्वामीनी पूर्व पत्रीं लिहिलें होते कीं येक सरदार दाहा हजार फौज देऊन पाठऊन त्यास पठाण व रोहले व गाजुदी मिलोन भारीच आहेत. आपले सामान पोख्त असावे. यावर स्वामीची मर्जी जैसी आसेल तैसें करावें. आम्हीं हे गोष्ट नवाबास सांगितली नाहीं; कारण की ये गोष्टीने नवाबाची खातरजमा येकंदर न होती. भवानीदास जाबसाल करितो हे गोष्ट आमच्या विच्यारेंकरून करते तर येथे प्रतिष्टा आसती. सांप्रत स्वामीसहि कार्यावर द्रिष्टी द्यावी लागते, याजकरिता तेथील प्रसंग श्रवण करावा. स्वामीचें आगमन इकडे जालियावर बहुत कामेंकाजें पडतील. प्रतिष्ठा सर्व स्वामीची आहे. काल पातशाहाचा खास रुका नवाबास आला कीं आम्हीं शाहाजाद्यास व गाजुदीखानास लिहिलें आहे, ते तुम्हासी कजिया करणार नाहींत. रोहल्या [यापुढील बंद गहाळ]

¶*Ragho Lakshman Purandare, the Peshwa's agent at Lucknow, after making enquiries about the attitude of Shuja-ud-daula towards the Marathas, assures Sakharam Bapu of his willingness to co-operate.*

No. 182] *[21-6-1757*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपालराव गणेश कृतानेक सां। नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ३ माहे सेवाल मुकाम कान्हेरा प्रात अंतरवेद येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन राजश्री सखारामपंत बापू बराबर आलो ते मजल दरमजल आगऱ्यापासी यमुना उतरून अंतरवेदीत आलो. साहादाबादेच्या मुकामीहून नवाब गाजदीखानाकडे रा। त्रिंबकपंत दि।। अंताजी माणकेस्वर यास पाठविले आहेत, त्याजवर नवाब सुज्यातदौल याजकडे आम्हास रवाना केले आहे. त्याचे शैन्यात गेलियावर जो विचार होईल तो सेवेसी लिहून पा. छ मजकुरी रा। सखारामपंत बापूचा निरोप घेऊन मुकाम मजकुरास आलो. येथून दरमजल नवाबाच्या लस्करात जातो. नवाब गाजदीखानाचा व नवाब सुज्यायेतदौला याचा सलूक करून द्यावा याजकरिता पाठविले आहे. आपणास कलावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Gopalrao Ganesh who was deputed by Sakharam Bapu to effect a reconciliation between Shuja and Ghaziuddin, reports to Dadasaheb his arrival in the Doab.*

No. 183] *[6-6-1757*

श्री

श्रीमंत राजश्री सखारामपंत बापू
स्वामीचें शेवेसी

पोष्य त्रिंबकराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ १८ रमजान मुकाम मेणपुरी जाणौन स्वकीये कुशेल लेखन केले पाहिजे विशष. स्वामीनी पत्र पाठविले तें छ १७ रमजानी मुकाम मजकुरास पावले. तेथें लिहिले की कोणे ठिकाणी आहा, काये वर्तमान आहे, तें लेहून पाठवणें म्हणौन लिहिलें. त्यास मेणपुरीस शह देऊन आहो. मामलत चुकत नाही व भीवगावचे गढ्या च्यार पांच राज्याकडे आहेत व सकेटीकडील गाव दाबून बसला आहे; सोडीत नाही. वकिलासी जाबसाल लागला आहे. सात आठसें स्वार तालगाव व कनोजेस ठाणे बसवावयासी पाठविले आहेत. वरकड कितेक

व्रत या प्रांतीचे राजश्री बाळाजी गोविंद यानी लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. कळलें पाहिजे. बहुत काये लिहिणे ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶Trimbak Shivdev reports what his detachment in the Doab was doing. Most of the outposts that were lost last year have been reoccupied, adds the writer.

No. 184] [*June 1757*

[पहिला बंद गाहाळ]

तूर्त[+] गंगोबास पुढे पाठविले आहे. ते जूझाचे व पुढील मनसुब्याचे गडबडीत आहेत. सारे करून घेऊन वाजबी वाटणीप्रो रुपये येत ते करितो. पुढे अंतरवेदीचे मामल्यात आम्हास पुरवले तरी जुने कमाविसदार करार करू; नाही तर दुसरे ठेऊ. वकिलात व अंताजीपंतात पेच तूर्त न पडे ते केले आहे. त्याची फिकीर न करावी. पुढे जे होईल ते लिहून. येथे कोणाचा आब तोडीत नाही; परंतु लिहिले तें गुप्त राही ते करणार स्वामी समर्थ आहेत. मग स्वामीचे आज्ञेप्रो ज्यास जसे करावयाचे येईल तसे करू. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Raghoba reports to the Peshwa the arrangements that he has made in the Doab. He also says that the differences between Hingne and Antajipant had been adjusted by him.

No. 185] [*June 1757 ?*

श्रीगजानन

विनंती शेवेसी विज्ञापना ऐसीजे. आजी सुक्रवारी राजे आमच्या डेरियास आले. लस्करात दाटी बहुत, याकरितां त्याचेच डेरे आणून ढाला पुढे जागा केली. तेथें आम्हीं गेलो. तेहि आले. सिष्टाचार आम्ही दोन पोशाक दिल्हे. घोडा व हती नजर केला. वस्त्रें मात्र ठेविले. घोडा व हती न घेतला. त्याजकडील निरोप आजीच घेतला. निरोपाचा गुंता ठेविला नाही. त्यानी वस्त्रें व सिरपेच व १ हती दिल्हा. हती कुंद होता म्हणून माघारा दिल्हा. प्रात:काळी दुसरा येइल. इत:पर रुपये येथेंच घ्यावेसा करार. पैकी काही हुंडिया घ्याव्या लागतील. विनाहुंडी निर्गम होत नाही. वरकड नगदच घेतों. हुंडी थोडीसी घेऊ. त्याची विनंती समक्ष करणें ते करूं. घोला व रुपये यास्तव शनवार

\+ पत्र राघोबाचें पेशव्यास.

रविवार दोन दिवस लागतील. काम करून शेवेसी येऊन पोंहचतो. (या) जकडील पत्रांचा गुंता अंताजीपंताचे पत्र तो कृपा करून पाठविले तैसेच राजश्री दताजी सिंदे याचे पत्र पाठविलें म्हणजे गुंता कोणे गोष्टीचा राहात नाही. दोन्ही पत्रें दिल्हीं म्हणजे रुा व बोला वगैरे काम येथेच करून घेऊ. रा दताजी सिंदे याचें पत्राचा मात्र गुंता आहे; तरी जरूर पत्र पाठवावे म्हणजे सर्व कामकाज दो ती रोजात करून पैका व बोला व कारभारी घेऊन सेवेसी सत्वरच येतो. याउपर रा आंताजी माणकेस्वर व रामराऊ नीलकंठ यानीं दाहा लाख रुा याचा हवाला घेतला, तेव्हा राजियापासून मनोतीचे रुपये पनास हजार याचे खत करून घेतले. ते मशारनिलेजवल आसे. आज्ञा जाली तरी पनास हजार पाचा लाखचे खत घेणे लागते. याजवरी हेहि पनास लेहून घेऊन साडे पाचाचे खत सरकारचे नावे लेहून घेऊ. येविषी आज्ञा करणे ते करावी. बहुत काये लिा विज्ञापना.

याउपर रा सुभेदाराकडील पूर्वी सेवेसी विनंती लिा त्याप्राा ठराव करून कारभारी घेऊन येतो. मग आपले मरजीस येईल ते करावे. कारभारीसमागमे हरीसा वगैरे रजपूत येतील. याची इजत प्रतिष्ठा राखावी. रा सुभेदाराचा राग यासी जडला आहे. येविषी वचन आमचे घेतले. सेवेसी श्रुत व्हावे. वरकड काम वचन समक्ष करून देणार खावंद समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*This appears to be a letter addressed to Raghunathrao about a certain Raja who had been induced to submit to the Marathas ; the Raja had taken offence against Holkar.*

No. 186] [*1-7-1757*

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे-

सेवेसी

विनंती सेवक गोपालराव गणेश कृतानेक साां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १३ माहे सवाल मुकाम मैनपुरीचे मैदानातून कूच करून नबीगंजावर येथास्थित जाणोन स्वकीये कुशल लिही ती आज्ञा केली पाहिजे विशेष. आपण आनुपशाहराकडे गेलेत म्हणौन येकिले; त्यास कोणीकडे फौज आहे, श्रीमंताकडील काय वर्तमान, राजश्री त्रिंबकपंत सुभेदार गाजदीखानाकडे गेले होते त्याजकडील काये वर्तमान तपसीलवार लिहून पाठवायासी आज्ञा केली पाहिजे.

3689

राजश्री रामचंद्र कृष्ण याजबा खजिना महत्पुराहून लाख रुपये येत होते ते पिरोजाबादेस आटकाविले आहेत म्हणौन यैकिले होते त्याजवरून रा विठलराव सिवदेव याचे कासिदाबाार पूर्वी लिा होते व हलीहि लिा जाते. तरी त्या यैवजाचा शोध मनास आणून आणविला पाहिजे. आम्ही दरमजलीने आज्ञापिले कार्यास जात आहो. राय भवानदास यासी पुढे पाठविले आसे. आम्हीहि जातच आहों. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Gopalrao Ganesh to Sakharam Bapu, enquiring about the movements of several sardars in the Doab and about the money sent with Ramchandra Krishna.*

No. 187] [*Recd. 1-7-1757*

पौ छ १३ शौवाल

श्री

राजश्री सखाराम भगवंत स्वामी गो यासी

विनंती उपरी. समसेरबाहादर याजकडील वरातेचा यैवज गोविंद बलाल व गोपालराव बापूजी याजवर आहे. तो यैवज सध्या पावत नाही याजकरिता तुमचे लस्करात सावकार आहे त्याजवल मारनिलेनी करार केला आहे की वराता येऊन निमे यैवज सध्या द्यावा. वरातेचा यैवज झाडून पावेल. यावर निमे यैवज राहिला तो द्यावा, येणेप्रो करार केला आहे. येविसी कमाविसदारास ताकीद होऊन लौकर यैवज सावकारास पाविला पाहिजे. याजकरिता गोविंद बलाल व गोपालरा(व) बापूजी यास ताकीद करऊन सावकारास यैवज पावता करणे. सारांश सावकाराची निशा होऊन त्यास यैवज निमे पावे ते करणे हे+ विनंती.

¶*Sakharam Bhagvant is requested to make arrangements for the payment of money due to Samsher Bahadar.*

No. 188] [*8-7-1757*

पौ छ २२ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

पो जनार्दन राम सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २० सवाल सायंकाल च्यार घटका रात्र मुकाम खानपूर पा शाहाणे स्वामीचे कृपेकरून

+ पत्र राघोबाचें. कारकुनी लेखन रामचंद्र गणेश कानडे याच्या हातचें.

सुखरूप असो विशेष. आज्ञा घेऊन स्वार जालो ते मुकाम मजकुरास आलो. मार्गी प्रज्यन्याने फार हैरान केले ते पत्री कोठपर्यंत ल्याहावे ? जागाजागा दोन च्यार रोज झडीमुले अटकोन राहिलो. परंतु पडत झडत आज्ञेप्रा येथे येऊन पोहचलों. रोहिल्याचे सरदेंत आलो. जमीदारास बलावणे पाठविले आहे. नरसाणे, खानपूर साहाणे वगैरे ठाणी रोहिल्याची आहेत यांचा बंदोबस्त करून गडमुख्तेस्व-रास जातो. जंगबाजखान याची बातमी या प्रांती किमपि लागत नाही. तिकडेच गाजदीखान याजपासीच आहे येसे म्हणतात. फौजा या प्रांती आल्या याउपर त्याचेने इकडे येवते येसे नाही. आम्ही आज्ञेप्रा ताकिदीनेच येथपर्यंत येऊन जमीदार या परगणियाचे हाताखाली घालून ठाणी हस्तगत करीतो. सामदामेकरून हाती लागेल तर बरेच. नाहीतर मोर्चे लाऊन येक दुसरे कापून काढितो. स्वामीचे आगमन या प्रांती लौकरच होईल. आम्हाकडे येक दुसरा परगणा द्यावयाचे मानस खावंदाचे असल्यास आज्ञा करावी. मी पदरचा सेवक. आज्ञे-माफक वर्तावे इतके जाणतो. सर्व चिंता फिकीर स्वामीस मान अभिमान आहे. लोकांचे पोटाविणे हाल फार जाले आहेत. पोटाची बेगमी करावी. खासा स्वारी इकडेच येणार किंवा दुसरा रोख हे ल्याहावे. आम्ही कितेक दिवस राहावे हे सविस्तर आज्ञा करावी त्याप्रा वर्तणूक करू. स्वामीचे पत्र सादर जाले तेथे आज्ञा की कारकून पाठविणे. त्याजपासी या प्रांताचे कामकाज सांगणे आहे म्हणौन आज्ञा. त्यास आम्ही दूर आलो. कारकुनाचा मार्गी निभाव होणार नाही. याजकरिता स्वारी आलीकडे आलियावर सेवेसी पाठवितो. रोजमरेयाची बेगमी करणार स्वामी धणी असेत. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Janardan Ram reports to Sakharam Bapu the efforts that he made in quelling the disturbances of the Rohillas and regaining lost ground. The writer further requests Bapu that his efforts may be rewarded.*

No. 189] [*8-7-1757?*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री बाबूराव स्वामी गो।

पोष्य सखाराम भगवंत नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहिणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. श्रीमंताचे पत्र आले तेथे आज्ञा कीं मीरखान यास फौजसुधा वोडशास ठेऊन तुम्ही प्रतापसा मिश्र यास घेऊन जलदीने येऊन पोहचणें. त्याजप्रा मीरखान यास ठेऊन

आम्ही दरमजल जात असो व बुंदेलखंडच्या मामलतीचा फडशा होणे त्यास माहीतगिरीने निवेदन करावयाचा अर्थ विस्तारे लिहिला तो अवगत जाला. यैशास तुम्ही श्रीमंताचे आज्ञेप्रो जातां ते जाणे. आम्ही या प्रांती आहो. प्रसंगानरूप जे करणे ते केले जाईल. रा। छ २० सवाल.

¶*Sakharampant to Baburao, advising him to act up to the Peshwa's orders regarding Bundelkhand.*

No. 190] [*9-7-1757*

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीजीचे
सेवेसी

सेवक नारो केशव कृतानेक सा। ना। वि। उपरी. येथील क्षेम छ २१ सवाल मुकाम बरेली स्वामीचे कृपेकरून कुशल जाणून स्वकीयानंदलेखानाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण सांभालपत्रे पाठविली ती उ(त)म समई प्रविष्ट होऊन परम समाधान जाहाले. पत्री आज्ञापिले कीं तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. इकडील वर्तमान मामलत फैसल होऊन सुज्यातदौला आपले स्थला गेला. रोहिले सरदार आपले आपले जागा आले. हफीजी छ १६ सवाली मुकाम मजकुरी दाखल जाला. दुसरे रोजी भाशण जाले कीं येका दो रोजी करारमदार यैवजाचा तूर्त पाठवणे तो ठीक करून तुम्हासमागमें येक भला माणूस देऊन श्रीमंताकडेस रुकसत करून जाबसाल उरकोन देणे. दिवाण पाहाड-सिंगासमागमे दोन हजार फौज देऊन आपणाकडेस पाठवणार आहेत. आपले पत्राची प्रतीक्षा करितात कीं पत्र आलिया सेवेसी लि। पाठऊन त्यास बनले तर दिवाण मजकुरी समागमे घेऊन येऊन * * * * न च्यार रोज फौजेकरतां गुंता * * * * * आणखी येक भला माणूस * * * * न सेवेसी येऊन पोहचतों. जे * * * * सर्व वर्तमान निवेदन होईल * * * * यासी सामील करोन घेवयाचे * * * फौजेविशी यासी लिहावे. हे फौज * * * देतील याचाहि मनोद्ये तोच असे. जरकरता यांचे सिष्टकृत्य करणे असिले तर फौज काही न बोलावावी. यानी तर जगहानखान आब(दा)ली वजिरासमागमे होता. त्यास वजीर तों आपणाकडेस आले. आबदालीचे चितास वसवास आला. नित्य वजिराने हपिजा-समागमे करोल दिल्हा की याजला दरबाराचे पासी उतरोन पार करोन देणे. यैसियासी जाहानखान आठा चौहू रोजी कूच करोन जाणार. पांच हजार फौज

3692

आहे त्यामध्ये * * * सलडई आबदाली सातसे आहेत. काही दाहा पाच लक्षांची जागा असें जर करतां विच्यारास आलियासरखे दरबाराचे रोखे दाहापंधरा हजार फौज पाठऊन याचे सिष्टकृत्य सहजात होऊन येईल. आपणास वर्तमान कलावे निमित्य लिहिले आहे. फौजेचा आलीसरी (?) पाहोन योजना कर्तव्य ते करावी. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Naro Keshav informs Sakharam Bapu that the Rohillas have submitted and that the Vazir has dismissed the Abdali's contingents. He suggests that an attempt be made to intercept these troops marching back to Lahore, and defeat them.*

No. 191] [*16-7-1757*

पौ छ २१ जिल्काद

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री **बापूसाहेब**

स्वामीचे शेवेसी

सेवक राघो लक्ष्मण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २८ माहे सवाल मुाा लखणऊ स्वामीच्या कृपावलोकनेंकरून येथास्थित असे. स्वानंद-लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. येथील तपसीलवार वृत पूर्वी पत्री लिाा आहे त्याजवरून ध्यानास आलेंच आसेल. सांप्रत नवाबानी केवल विशयावर चित ठेविले म्हणोन बेगमेजीनी बहुत प्रकारें सांगितलें. त्याजवरून तीस आसामी पात्रा दूर केली. च्यार पांच आहेत. त्या माहालांत दाखल केल्या. चार माहालाचा प्रसंग तूर्त राहिलासा आहे व खोजे तमकिल्यास फिरोन समजाऊन न्याबत ध्याविसी जाली. जागीरदाराचा मुलुक जफ्त करून सरकारात ठेवावा, पुढे लोकांचे हिशेब पाहून पुढील देणे, नख्त खजानी पाहून देत जावे येणेप्रोा ठहरले आहे. पाहावे कैसे करतील. महमद कुलीखान प्रयागास गेले. वरकडहि लोक जाणार. याजपासी राहतां फौज हजार पांच सात राहील. बादबरसात कामकाज लागेल तर बोलावितील. फौज स्वामीनी दोन हजार नवाबाची बोलाविली. त्यास त्याचा जाबसाल अद्याप कांही होत नाहीं. फौज पाठवीत नाहीत यांत गुता नाही. राजश्री गोपालराव जाजमहूस आले आहेत. दोचौ रोजा नवाबा-कडे येतील. ते आलियावर काय जाबसाल होईल तो शेवेसी लिहून. आम्ही येथे आसावें हे कोणास येथें आवश्यक नाहीं. पहिले ग्रहस्त आहेत. मुतसदियास किता याप्रकारें सांगतात कीं याजला निरोपच देवावा. नवाबानी पनासा

स्वाराचा रोजमरा करून देतो म्हणोन मान्य केले होतें. परंतु पुण्य वेचणारानी वेचलें कीं त्याजला काशास भारी करितां. त्याजला निरोपच द्यावा. त्याजवरून आतां कांही जाबसाल करी— (अपूर्ण)

¶*Ragho Lakshman Purandare sends Sakharam Bapu further details of news from the court of Shuja-ud-daula.*

No. 192] [*28-7-1757*

श्रीशंकर

विनंती उपरी. श्रीमंत दादासाहेबाकडून पत्र आले ते पाठविले. पाहावे. उदैक श्रावण कोठ करणार? पटपटगंजावर जावे. येमुनातीर आहे. नाहीतर आम्ही तरी जाऊ. याचा काये तो विचार लिहिणे हे विनंती.

¶*The writer inquires on behalf of Raghunathrao where he should perform his Shravani.*

No. 193] [*30-7-1757*

पौ छ १८ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामी-
चे सेवेसी

पो रामचंद्र गणेश कृतानेक सा नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता छ १३ जिलकाद मु रेवाडी स्वामीचे कृपावलोकने वर्तमान येथास्तित असे विशेष. आपली स्वारी दिलीस आली म्हणौन वर्तमान कलले. यैशास आम्हास काय आज्ञा ते ल्याहावी. श्रीमंतानी श्रीमंत राजश्री बाबा व मानाजी पायगुडे व महिपतराव देखील तोफखाना त्रिंबक खडेराव व विसाजी केशव व हुजरातची फौज पवार, जगथाप, माने, बोरगे, थोरात मिलोन आडीच हजार याप्रो पुढे रवाना केले. रेवाडीची खंडणी करावी व खालशाचा मुलूक असेल तो जफ्त करावा याजकरिता पुढे रवाना केले. आपण व राजश्री मल्हारबावा सुभेदार मागाहून गौतमाबाई येणार याजमुले जैपुराजवल राहिले. त्याचे वर्तमान मनोहरपुराजवल आल्याचे आले. रेवाडीस आलो. ज्याप्रो श्रीमंतानी सांगितले त्याप्रो शोध मनास आणिता खालशाचे परगणे रिकामे नाहींत. तमाम जाटाचा आमल आहे. पाच सातप्रो कामदारखान बलोच याजकडे आहेत. त्यास कामदारखान आपले-कडे आला. सोनपत पाणपत परगणेयात नजीबखानाचे पारपत्याकरिता गेला.

त्यास आपले आज्ञेवरून आला असिला तर त्याचे परगणे जफ्त कसे करावे याजकरिता सेवेसी लिहिले व सिताराम खानानची याचे बाईकोकडे दोन तीन परगणे आहेत त्याचा लेक आपलेपासी आला म्हणौन येकिले. येविसीचा काय मजकूर तो ल्याहावा त्याप्रा वर्तणूक करूं. श्रीमंत मागाहून लौकर येणार. रेवाडीस येक शाहाजादा आला होता तो येथेच लस्करात येऊन राहिला आहे. प्रा दादरी येथे येक शाहाजादा व बहादरखान बलोच दोन हजार फौजनसी आहेत. कलावे वरकड मजकूर (अपूर्ण)

¶*Ramchandra Ganesh reports to Sakharam Bapu his arrival at Rewari and describes the state of things in the province round about there.*

No. 194] [*August 1757*

श्री

शेवेसी विज्ञापना. आम्ही प्राथःकालीच तयार होऊन आलो. त्याजकडील मोरचे उठऊन कसमिरी दरवाजेपावेतो लोक मारीत गेले. तेथे मोरच बसविले आहेत. त्याचा मार वरील व आपल्याकडील मार पोटी पडला. कुरछीयाचा बाग प्राथःकालीच घेतला. हाली बेगमचा बाग घेतला. तेथ रेहकले नेऊन लाविले आहेत. कुरछियाचे बागापासी थोर तोफ लाविली आहे, मार देत आहो. याप्रमाणे चहूकडोन जालें पाहिजे. याजकरिता साहेबी तिकडोन तोफ लाऊन मार द्यावा. मोरचे कायेम बसवावे. रात्रौ निघो नये. वरकडासहि ताकीद करावी. इकडे शहरपन्हियाचा आतरा निपट जवळ राहिला आहे. रात्री बनल तिकडोन कार्य करितो. तिकडेहि घावडाव पाहून होईल तेथवर करावें. आम्हीहि निकड केली. नवाब गाजुदीखानास पाठवितो म्हणून आज्ञा आली होती; परंतु आद्याप येत नाही. मधें मातबर मोरचा येक पाहिजे. रा मानाजी पायगुडे आहेत, परतु थोडी जमियेत आहे; तर नवाबास जलद रवाना केले पाहिजे. आज कामास वेळस न येत; मग कधी येणार? साहेबी ताकीद करावी. राजश्री समसेरबाहादर याजलाहि मानाजी पायगुडे याजपासी पाठवणें. आम्ही रात्रीं मोरच पाठवीत नाही. तिकडेहि मोरचे कायेम करून राहावे. चहूकडोन निकड जालिया झुंजहि वाटले जाईल. नवाबास मोगलपुरियाकडे जलद रवाना करावे. +शेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*The writer describes how Delhi was captured by the Marathas under Raghunathrao.*

+ पत्र कोणाचें ?

No. 195] [August 1757

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
जनार्दनपंत स्वामी गोसावी यासी

पो सखाराम भगवंत नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. सारंगपूर येथील ठाणे फते केलियाचे वर्तमान सविस्तरे लिहिले ते आवगत जाले. यैशास तुम्ही ज्या कार्यास लागाल ते कार्य फते कराल हे निशाच आहे. ठाणे फते जाले हे गोष्ट उतम जाली. याउपरी शहरचा बदोबस्त उतम प्रकारे करावा. नजीबखानाचा लेक जाबतेखान ज्वालापुराआलीकड दाहा हजार फौज घेऊन भागीर्थीचे बेटात आला आहे. त्यास याचे पारपत्य करणे आहे. यैसास आम्ही व राजश्री रेणकोपंत व माणिकराव व निंबाजी खटके मिलोन पारपत्य करितो म्हणौन लिहिलेत, त्यास उतम आहे. रोहिल्याचे पारपत्य जे होईल ते करावेच, यात गुता नाही. (यापुढें कोरी जागा).

¶*Sakharampant congratulates Janardanpant on his success at Sarangpur. This letter should be read after letter No. 196.*

No. 196] [1-8-1757

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामी
चे सेवेसी

पोष्य बाबूराऊ नरसिंह कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल छ १९ माहे जिलकाद जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो. त्यास राजश्री जनार्दनपतासमागमे सारंगपुरास आलो. प्रा मलीपूरचे वर्तमान तर कानगो अद्याप भेटीस आले नाहीत. उदईक येणार आहेत. वर्तमान मनास आणिता कसबियांत चालीस पनास घर आहे. बाकी उज्याड गुजराच्या उपद्रवाकरिता जाले आहे. तेथे जाऊन बसावे तर आपल्या बळे बसावे. सिबंदी फार पाहिजे. परगणियाचे गाव फारकडोन गुजराचे आहेत. काही उज्याड. पाच सात गाव सारंगपुरा आसपास आहेत. खटखटीसी कारण आहे. सुरळीत नाही. बरे. आपण साहेबकार्यास चुकनार नाही. कानगो भेटलियावर सविस्तर लेहून पाठऊ. सारंगपूरचे वर्तमान तर किलियात सेख सरीफ मोगलाचे ठाण आहे. से दोनसे राऊत व पाचसे प्यादे

येसे आहेत. किला भारी आहे. बाहेर आपल्याकडील मोर्चे लागले आहेत. आमदादखान पाहाडाकडे आहे. त्याची आवाई आहे व आणखी जागा जागा रोहिले व गुजर याची आवाई फारसी आहे. राजश्री जनार्दनपंती मोरच्याची तरदूद चांगली केली आहे. मोरचे येका दो रोजानी जवल जातील. छबिना राऊताचा भारी करावा लागत आहे. या प्रांती राजश्री विठल सिवदेव व राजश्री आंताजी माणकेश्वर याची फौज असली तर त्यास लेहून तेहि येऊन पोहचले तर उतम आहे. नाही तर हे जोपरियेंत कस्त करावयाची ते करीतच आहेत. सर्व खावंदाच्या प्रतापे होणे ते होईल. वरकड कमाविसदार तमाम आपलाले माहालात सुखरूप गेले. अमल सुरलीत चालत आहे. सारंगपुरापलीकडे व सनिधमात्र आद्याप कोठे बंदोबस्त नाही. येथील ठाणे निघोन गेले म्हणजे याजला दुसरे काम सुचेल. बंदोबस्त करणे तो करतील. बहुत काये लिहिणे हे विज्ञापि. सारंगपूरच्या किलियात सेख सरीफ भांडत आहे. निमित्य कीं, नजीबखान सला करून रुपये देऊन फिरोन मुल्क आपणाकडे करून घेणार म्हणून भरवसा जाणून किलियांत दम धरून आहे. दुसरे शहरच्या वगैरे लोकासहि पुरता भरवसा येत नाही की, आपला आमल सेवटपरियेत राहेल. नजीबखान निदान येईल यैसा फितव्याच्या गोष्टी सांगतात. या प्रकारे वर्तमान आहे हे विज्ञापि.

¶*Baburao Narsinh reports to Sakharam Bapu the progress of the siege of Sarangpur.*

No. 197] [*7-8-1757*

पौ छ २४ जिलकाद

श्री

राजश्री सखारामपंत बापू
गोसावी यासी

८ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री समशेर-बाहादर सलाम विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले पावोन संतोष जाला. लिहिले वृत कलले. बलोचाच्या मुलकाची ताकीद करवावी म्हणौन लिहिले. यैशास श्रीमंत राजश्री दादासाहेबांची स्वारी रेवाडीच्या मुकामी असतांच आलीबाहादूरखान बलोचाच्या

माहालाची ताकीद होईल. छ २१ जिलकादी झील उतरोन श्रीमंत समेततोफखाना खारवे ताा रेवाडी येथे येऊन मुकाम केला. आपली भेट लौकरीच होईल. कळावे राा छ २१ जिलकाद. बहुत काये लिहिणे? लोभ कीजे हे विनती.

¶*Samsher Bahadar informs Sakharam Bapu that as directed steps will be taken to collect dues from the province of Ali Bahadur Baloch when Raghunathrao arrives at Rewari.*

No. 198] [*13-8-1757*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बापू स्वामी
गोसावी यांसी

सेवक देवजी ताकपीर कृतानेक दंडवत विनंती उपरी. काल शुक्रवारी संध्याकाली राजश्री बाबूराव फडनीस यानी आज्ञा केली जे, तुम्ही गोटसुधा शाहादडियाजवली जाऊन राहावे आणि राजघाटाची बंदोबस्ती करावी. आम्ही आज्ञाधारक. ते समई कूच करोन सडेच उभयेता बंधू च्यार घटिका रात्री घाटावरी येऊन राहिलो. येथील बदोबस्ती येथाज्ञाने करितो; परतु येथून लोणीचा घाट आडीच तीन कोस आहे. तो घाट मोकला आहे. त्याची बंदोबस्ती नाही. येथे तो तुमच्या प्रतापे न्यूनता होणार नाही. नावाडा रोहिल्याच्या स्वाधीन पलायेमान करून जाणार आसला तरी इकडे सामान मातबर असलिया पारपत्य येथास्तित होईल. आम्ही तो आपल्या सामर्थे स्वामिसेवा करोन सुचला पदार्थे विनंती करावी हे खरे. याचा विचार जो कर्तव्य तो करावा. लोणीच्या घाटाची तजवीज करावी. येथून त्या घाटाची बंदोबस्ती आमच्याने कैसी होईल? पूर्वी राऊत आपण चौकीस येथे पाठविले होते. त्यासी येक होडी गहूं भरोन दिलीस जात होती ते चौकीच्या राऊतानी देखिली. येमुनेत उड्या घालोन होडी जबरदस्तीने घाटावरी आणिली. हे वर्तमान काल राजश्री बाबूरायासी सुचऊन तेथून बरकंदाज अणून आजी होडीवरी बसऊन होडी पडपडगंजासी रवाना केली. तेथे गेलिया मालाचा व होडीचा बंदोबस्त करणे तो करावा. आम्ही येथून राजश्री बाबूरायासी चिठी लिहून माणसे पाठविली आहेत. आपणासी कलावे. बहुत काये लिहिणे हे विनंती. श्रावण वद्य १४ शनवार.

¶*Devji Takpir informs Sakharam Bapu that as instructed he is guarding Rajghat.*

No. 199] [23-8-1757

श्री

राजश्री मल्हारजी होलकर
गोसावी यासी

उपरी. गाजदीखान वजीर व अहमदखान याच्या आजी मंगलवारी भेट्या जाल्या. त्यास आलीकडून यावयाची आज्ञा केली आहे. येतील. तुम्हास कलावे म्हणौन लिहिले आसे रा छ ७ जिल्हेज.

¶*Malharrao Holkar is informed of the meeting of Ghaziuddin with Ahmadkhan.*

No. 200] [17-8-1757

पौ छ ७ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामीचे सेवेसी

विज्ञापना सेवक शंकराजी माहादेव सा नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ १ जिल्हेज पा बादड स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित आसे विशेष. साहेबाची आज्ञा घेऊन राजश्री बापूसमागमे आलो. याणी सिकंदराबाज वगैरे च्यार माहाल हवाला केले. प्रस्तुत येथील बंदोबस्त करून श्रीगंगातीरी फरिदाबाज आहे तेथे जाऊन बंदोबस्त करून सिकंदराबाजेस येऊन सेवेसी येऊन सविस्तर वर्तमान निवेदन करू. यानंतर या प्रांती गुजराचा उपद्रव बहुत. त्यास छ ३० जिलकादी सेडू गुजर याचे तुमाऊपूर व मिरपूर या गांवी स्वारी करून तुमाऊपूर जाळून मिरपूरची गढी होती तेथे मोर्चे लाविले. से पनास माणूस गढीत होते. आहोरात्र झुजले. रात्री पलोन गेले. तेथे सरकारचे ठाणे बसविले. गढी पाडून टाकावी तरी फिरोन गुजर गढी बांधोन परगणियास उपसर्ग देणार. तेथे ठाणे राहिल्यास चहू परगणियाचे मध्यभागी सरकारचे उपयोगी आहे. जागीर खानखानाची डासणा परगणा; परंतु गुजर जबरदस्तीने ठाणे घालून बळाऊन बसला जाणोन मेहनत करून सोडविले, याजविसी साहेबापासी कोणी मतलबी गोष्टी विदित करील तरी या प्रकारचे वर्तमान आहे. ठाणे राहिल्या च्यार पाच परगणियास उपयोगी आणि याजखाले दाहा गांव सुटले ते सिबदी खर्चास कार्यास येतील. गावगनाची यादी आलाहिदा पाठविली आहे त्यावरून विदित होईल. डासणा, शाहाणा, सिकंदरा, बारणावद

वगैरे तमाम माहाली गुजर आहेत त्याचे पारपत्य करावे लागेल त्यामुळे सरकारात नालीस होईल जाणौन सेवेसी लिा आहे. सेख आणू पाा खानपूर पाा शाहाणा येथें राहातो. दोनसे राऊत, तीन च्यारसे प्यादे, सामान उतम, मातबर माणूस यास आणून ठेविले. दरमाहा करावा तरी भारी पडतो, याकरिता दोन भाग सरकारचे, तृतीये भाग त्याजला, मवासीचे पारपत्य करून त्यापैकी उत्पन्न होईल. स्वारीसिकारी गुजराचे पारपत्याकरितां केलिया मालपेसबी येईल त्याचा मात्र त्रिभाग त्यास द्यावा. कौली गामचे त्यास प्रयोजन नाही. इतका बखेडा करायाचे प्रयोजन नव्हते परंतु आम्हापासी जमाव आहे तो विदित. जागाजागा स्वार प्यादे ठेविले. समागमे थोडे आहेत. मवासांचे तों पारपत्य केले पाहिजे याकरितां ठेविले. स्वारीसिकारीमुले सरकारचे काम होऊन त्याचे थोडे बहुत चालेल. त्याचा खर्च तो भारी आहे. परंतु सरकार जोडावे जाणोन राहिला आहे. मासपक्ष बाहेर फिरतो. तो आहेत आंगवर पडे येसें नाहीं. याउपरी जे आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करूं. आम्ही इकडील कामकाज मनास आणून सेवेसी सत्वरीच येतो. विदित होय हे विज्ञप्ति

¶*Shankraji Mahadev to Raghunathrao, narrating the difficulties created in the province by Sedu Gujar and describing the efforts that the writer made in stopping their activities and capturing their posts.*

No. 201] [*17-8-1757*

पौ छ ९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामींचे
सेवेसी.

पोष्य सदासिव खंडेराव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १ माहे जिल्हेज पावेतो मुाा कसबे बवरा जाणून स्वकीये कुशल लिहीत आसावे विशेष. प्रगणे मजकुरी हैदरनगर गढी आहे. त्यात ठाणे बाहादरखान बिलोच्याचे आहे म्हणून लिहिले होते. त्याजवरून साहेबी लिहिले की राजश्री रेनकोपंत यास प्रगणे मजकूरचे बंदोबस्ताविसी सांगितल आहे, हे येऊन बंदोबस्त करून देतील. त्यास राजश्री रेनकोपंत सरंजामसुधा येऊन दोन रोज मुकाम केले, परंतु त्याच्यानी हैदरनगर येथील ठाणे बाहादरखान बिलोच याचे ठाणे उठोन न लावले. निघोन हरिद्वारास गेले. ठाणे मजकुराखालीं तीन गाव बदले आहेत. त्याचे जमीदार आम्हास रुजू होऊ देत नाही आणि आम्हासी तो जाबसाला करितो की ठाणे

मजकूरची सनद आणून देतो. तर जोपरयेंत प्रगणे मजकूर येथे बिलोचे मजकुरा(चे) ठाणे आहे तोपरयेंत गावगणा येथील जमीदार वसूल सुरलीतपन देत नाही तर साहेबी काये ती आज्ञा केली पाहिजे. राजश्री जनार्दनराम यासहि पत्र पाठविले होते ते त्याजकडे कासिदाबराबर पाठविले. त्याणीहि उतर पाठविले जे तूर्त यावयास आनकूल पडत नाही. राजश्री रेनकोपंत नव्हते आले तेव्हा त्याजपासी सिबंदी प्यादे शेंभर होते. त्यासहि आमचा दबावहि होता. फौज येणार येस त्याजला पुरते कलल होते की फौज आलियावर आपले पारपत्ये होऊन येईल. त्यास फौजच्यान तो काही पारपत्ये जाहाले नाही. आलीकडे त्याणे सिबंदी तीन च्यारसे प्यादे ठेविले आहेत. आम्हापासून येका कोसावर गडी आहे. हा येथून जात नाही तर आमचा येथे टिकावा होत नाही. आम्ही वरचेवर लिहितो म्हणून स्वामीस वाईट वाटत असेल तर आम्ही सुख लिहीत नाही. दुख करून लिहीत आहो. राजश्री रेनकोपंती हेदरगडवाल्यापासून घासदाणा रुपये १२९ सवासे घेतले. स्वामीस कलावे म्हणऊन लिहिल आसे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Sadashiv Khanderao informs Sakharam Bapu that Renakopant instead of capturing Haidarnagar as directed, proceeded to Haridwar. The writer therefore requests the addressee to make arrangements to capture it and thus make it easy to collect dues from the province.

No. 202] *[25-8-1757*

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामींचे
सेवेसी

पोष्ये गोपालराव गणेश कृतानेक सां विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ९ माहे जिल्हेज मुकाम जाजमऊ आपले कृपेकरून येथास्थित जाणऊन स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. स्वामीकडील वर्तमान सांप्रत कलत नाही तेणेकरून चित सोद्विग्न आहे. तरी कृपा करून लिहिले पाहिजे. आम्हाकडील वर्तमान पूर्वी छ ५ रोजी मुजरत जोडी आपल्याकडे पाठविली त्याजबरोबर सविस्तर वर्तमान लिहिले आसे त्याजवरून विदित होईल. नवाब सुजातदोला आपणाकडे यावयासी सिध जाला आसे. त्यास सांप्रत श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे पत्र आले; त्यांत मजकूर कीं प्रस्तुत घेऊन न येणे. च्यार दिवस जाबसालावरी घालोन दिवस काढणे तो आम्ही दिलीस गेलियानंतर तुम्हास लेहू

त्याप्रमाणे कार्य करणे. त्यास नवाबाने तो करार केला आहे. पुढे आलिबेग-खानास रवाना करून मागाहून आम्ही कूच करितो त्याप्रा करार करून आम्ही निघोन मुकाममजकुरी आलो तो मागून आलिबेगखान कूच करून मोहनेस आला. दो चव रोजानी येथे येतील. आमची त्यांची भेटी जालियानंतर दिलीकडे येईल. नवाबास आम्ही विचाराखाले घालोन च्यार दिवस लांबणिखाले घालितो यैसे करिता आलाच तरी घेऊन येऊं. आम्हीहि जाजमऊ परगणियात नव्या दाहा वीस गढ्या बदल्या आहेत त्याचे पारपत्य करितो आणि दसरा जालियानंतर सत्वरीच स्वार होऊन सेवेसी येतो. श्रीमंतानी आज्ञापत्र पाठविले की रसद इकडे देणे, पुण्यास न देणे, त्यावरून तरतूद करून काही भरणा पाठवितो; मागाहून मी येतो. पण येंदा हगामामुळे सरकारात तीन लाख रुपये फाजील आहेत व राजश्री अंताजीपंत नानास रुपये दिल्हे ते मजुरा येंदाचे सालात आले पाहिजेत व सेवकाचे पतकाची पागेची नालबंदी पाहिजे यैसे आहे; सेवेसी लिा असे. आज्ञ करणार आपण आहेत. तपसी(ल)च लिा म्हणून रागे भराल म्हणून काही ऐवजहि पाठवितो; मग काये आज्ञा करावयाची ते करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Gopalrao Ganesh informs Sakharam Bapu that as instructed by Raghunathrao he is trying to put off his own departure and also that of Shuja-ud-daula from Jajmau until he (Raghunathrao) arrives at Delhi. The writer further says that he will utilise the intervening time in capturing some minor posts.*

No. 203] *[8-9-1757*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
महिपतरावजी गोसावी यासी

स्नेहआभिलासी गोपालराव गणेश कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील ताा छ २३ जिल्हेज स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. सांप्रत आपल्याकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी निरंतर पत्री आपले वृत लेखन तोषवीत जावे. आमचे वर्तमान तरी पूर्वी लखनऊचे मुकामीहून पत्र लिहिले आहे त्याजवरून विदित जाले आसेल. नवाब सुजातदौलाची भेटी जालियावरी आलीबेगखान दिलीस श्रीमंताकडे रवाना केला. आम्ही निरोप घेऊन माहालात आलो. येथील बंदोबस्त आठा पंधरा दिवसी करून दिलीस

श्रीमंताचे सेवेसी जातो. दरबारी सर्व प्रकारे आपला भर्वसा. कलेल त्या रीतीने साहित्य करावे. वारंवार लिहिणे नलगे. बहुत काये लिा. कृपा कीजे हे विनंती.

¶*Gopalrao Ganesh informs Mahipatrao Chitnis that Alibegkhan has already been sent to Raghunathrao and soon he will also follow suit.*

No. 204] [*22-9-1757*

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्र्यंबक कृष्ण व जनार्दन राम निा गंगाधर बाजीराव+ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ ७ मोहरम मुा अहीखा पाा मईनपुरी प्रांत अंतरवेद स्वामीच्या कृपावलोकने वर्तमान येथास्थित आसे विशेष. अंतरवेदींत आल्यावर सविस्तर वर्तमान पूर्वी शेवेसी विनंती लिहिली आहे त्यावरून विदित जाले असेल. सांप्रत आजपर्यंत अंतरवेदीतील दोन तीनशे गढी मवासी हस्तगत जाली; त्यामध्ये काही सरकारी ठाणी ठेविली, काही पाडून टाकिल्या. याप्रमाणे अमल सुरलीत स्वामीच्या प्रतापे अंतरवेदीत होत आहे. फारकरून अमल सुरलीत जाला. काही राहिला आहे तोहि थोडक्याच दिवसांत सुरलीत होईल. विदित असावें. येविसीचा सविस्तर अर्थ राजश्री गोविंद बलाल शेवेसी लिहीत असतील त्यावरून विदित असेल. पथकातील अर्थ आजपर्यंत शंभर माणूस जखमी व मयत वीस पंचवीस याप्राो वर्तमान. पर्जन्यकाल फिरती छावणी लोकास मेहनत भारी पडली. पुणियांत समजावीस भारी निघाली त्याजमुळे नालबंदी कमी पावली. स्वारीत रोजमरा झाडून पावला याजमुळे आदा थोडा जाला. बाकी फार निघत्ये. नेमणूक छावणीस रवानगी जाली ते समई कोती जाली. येविसीचा सविस्तर अर्थ पूर्वपत्रीं विनंती लिहिलीच आहे त्यावरून ज्याजती यैवजाची सनद गोविंदपंतास रवाना जालीच आसेल. हालीहि विनंती ज्याजती यैवज सनद पाठविली पाहिजे म्हणजे लोकांची स्थित राहील. सर्व अर्थ शेवेसी विदित आहे. शेवेसी विदित असावें हे विज्ञापना.

¶*Trimbak Krishna and Janardan Ram inform the Peshwa that order has been restored and the Peshwa's supremacy established in the Doab. Janardan Ram was serving Gangadhar Bajirao Retrekar.*

+ रेठरेकर (?)

No. 205] [About 5-12-1756

होतें करावा. चितास येईल त्यास ठेवावे चितास येईल त्यास दूर करावे इतके पातशाहाच्या चितापासून आहे. बापूजी माहादेव यानीहि पातशाहा बहुत प्रकारें राजी राखोन स्वामीच्या लगामी ठेविला आहे. यांचीहि द्रिष्ट स्वामीकार्यावरीच आहे. दुसरे जाणत नाही. मुख्य पठाणावरी लाहोरास वजीर पांचा सातां दिवसीं निघतात (त्या)जबराबर आम्ही हजीर आहों. हे चाकरी त्यांची कीं ज्यापासी पंचवीस तीस हजार फौज असावी, परंतु स्वामीच्या शेवकानें आपल्या जिवाचा संकल्प करून मान्य केली आणि फौजहि पांच सात हजार स्वामीच्या नांवाप्राच जमा करितो. केवल कुंगारपणें राहणार नाहीं. छ १० रबिलोवली पातशाहा वजीर यांची आज्ञा आली कीं मुलाजमत करणें. त्यावरून आधी वजिराच्या घरास गेलो. वजिरानी ताजीम घेऊन बहुत सन्मान केला, मग पातशाहाजवल नेले. मुलाजमत जाली. पातशाहानी बहुतसी क्रुपा केली कीं तुम्ही माझे विश्वासुक चाकर. बालाजीराऊ आमचे बंधु. मजमध्यें व बालाजीराऊ यामध्यें दोन न जाणावें यैसी आज्ञा केली. ती मस्तकीं वंदिली. मग पंचहजारी मनसबदार करून परवाना करविला. साहेबनौबत व अलंमनकारा दिल्हा. हती, घोडा, समसे, सिरपेंच, कलगी, वस्त्रें दिल्ही. साहेबनौबत सर्व सरंजामसुधा सरकारांतून दिल्ही व अलंमनकारा दिल्हा. त्यासमई आम्ही अर्ज केला की हजरत, आम्ही बालाजीरायांचे बारगीर. हजरतनी क्रुपा करून साहेबनौबत अलंमनकारा पंचहजारी मनसबदार केलें. त्यास जागीर असलियाखेरीज काय करावे. मजला श्रीमंतच नौबत देतील तेव्हां जागीरहि देवितो म्हणऊन आज्ञा केली व साहेबनौबत व मरातिब आणखी दिल्हे. जे मी दिल्हे तेंच बालाजीरायानी दिल्हें. मी व बालाजीराऊ दोन नाही. यैसी आज्ञा केली तेव्हां मस्तकीं वंदून आणिली. पांच रोज रुबरू वाजवावयाचा हुकूम केला. त्याचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक केली; परंतु आम्ही सरकारचे बारगीर, येकवेल आग्रह केलाच होता; परंतु त्यांनी मागती वकिलादेखतां दुराग्रह करून दिल्ही. याची आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून. स्वामीची सनद सादर जाली तरी नौबत वाजेल. नाहीतरी पांच रोज पातशाहाच्या हुकुमाप्रमाणे वाजली. पुढें जैसी आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करून. आज्ञाधारक चाकर आहों. आपले चाकरीची तरीफ आपणच लिहावी तरी वेडेपण तूर्तच पदरास येत आहे; परंतु येंदा आपल्या जिवाहून आधिकच चाकरी करून कर्जदार होऊन स्वामीचा लौकिक जैसा म्हणावा तैसा राखिला आणि पुढें पठाणावरी लाहोरास चालोन सपाजंगाचे लढाईसहि

+ पत्र अंताजी माणकेश्वर याचें.

सिध आहों याजमुळें पातशाहा वजीर लगामी आहेत. जर कुंगारपणे राहिलों तरी कलतच आहे. पातशाहानी मनसबा आणि जागीर दिल्ही अथवा हरयेक दिल्हे तरी आम्ही बारगीर. स्वामी ठेवितील तैसे राहूं. दिलीस दर स्वारा दरमाहे रोजमरा रुा २५ पचवीस लागतो. सरकारची नेमणूक तरी दर स्वारास दरमाहे रुपये १२ बाराप्रमाणे नेमून दिल्हा. आम्ही सरदारास विनंती (के)ली. की दिलींत दर स्वारास निवल च्यारसे रुा वरसास पुर(अपूर्ण)

¶*Antaji Mankeshwar to the Peshwa, giving in detail the honours conferred upon him by the Emperor and asking for the Peshwa's permission to accept them.*

No. 206] [*27-12-1756*

पौा[1] छ ७ रबिलावल

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री बापूसाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कृष्णाजी केशव साष्टाग नमस्कार विनती. येथील कुषल ताा छ ५ रबिलाखर मुाा कसबे जलेसर प्रांत आंतरवेद, स्वामीच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. या प्रांती आलियावर सेवेसी दोन तीन पत्रे पाठविली त्यावरून सर्व श्रुत जाले असेल. काल रविवारी मुकाम मजकुरास आलो. ठाणे जाटाचे होते ते येताच खाले करविले. निशाण स्वामीचे चढविले. वाटेने येतां दताकडील मेवाती स्वार पंनास पाऊणसे कहीवर आले ते निमुद होतांच स्वारी केली, वीस पंचेवीस स्वार मारून घोडी लोकानी अणली. काही पलोन जवलपास ठाणी होती त्यात गेले. स्वामीच्या प्रतापे सर्वांचे पारपत्य होईल. पूर्वी धाकटी अकबराबाद घेतली याविशई विनंती लिहिलींच होती. हाली विनंतीपत्र पावतांच कृपा करून दोनी माहालांच्या सनदा पाठवाव्या. खर्चायासहि मागाहून हुंडी करून सेवेसी पावत्या करितो. कार्यानिमित्य पंधरा दिवस लाग लागोन ठेविला होता तेव्हा सत्वर कार्य होऊन आले. पुढे आणिक कितेक कार्याचे सूचनेत आहो. स्वामीचा आज्ञेचा मार्ग लक्षितो. सर्व स्वामीच्या प्रतापे होऊन येईल. सेवक पदरचा उमेदवार आहे की सेवा करून ऊर्जित करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Keshav reports to Sakharam Bapu having captured Jalesar from the Jats.*

---

१ छ ५ रबिलाखरचें पत्र छ ७ रबिलावली मिळणें शक्य नाहीं; तेव्हां पैवस्ती ७ रबिलाखर पाहिजे.

3705

No. 207] [18-12-1757 ?

श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी

पोष्य विस्वासराव लक्ष्मण कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। मार्गसीर्ष शुद्ध ८ जाणौन स्वकीये कुशल लेखनाज्ञा करीत गेले पाहिजे विशेष. यैलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, येणेकरिता चित सापेक्ष आहे; तरी निरंतर पत्रामृते तोषवीत आसावे. यानंतर आपले येणे दिलीस सार्वभौमाकडे पुढें जाले. श्रीमंत रा। दादासाहेब जयेनगर प्रांते आले म्हणून यैकून संतोषाच्या कोटी जाहाल्या. वजीर आपल्या आगमनाच्या आवाईनेंच दहशत खाऊन भयाभीत होऊन बुनगे व निसबतीचे लोकाचे कबिले बराबर कतवार[1] फार होते फौज पंधरा वीस हाजार होती, परंतु बहुतच जलद दाहा बारा कोसाच्या मोठाल्या मजली करून दरकूच मथुरेवरून आंतर्वेदीतून इटावियाचे रस्त्याने सरकारची जागा सिकंदरा * * या दोनी माहाल रा। गोविंदपंताकडील व आम्हाकडील पा। शापूर वगैरे या मार्गे जाजमऊच्या घाटे गंगा उतरावयासी आला. तीन चार मोकाम करून सर्व सांभाळून तोफखानासमेत गंगापार उतरोन गेला. बलवंतसिंग कासीचा राजा याजवरी जाऊन त्याजपासून पैका पेसजीचा मातबर येणें तो घ्यावा या मनसबेंत आहे. बातमी सेवेसी कळावी म्हणौन लि। आसे. पायेमलींत आंतर्वेदीतील आमची नि। जागां तीन मोकाम जाले यामुलें फार खराबी जाली. खरीब लुटले गेले. रबी पायेमलींत आली यामुले नुकसान जालें. जुजरसीस शाहणे माणूस गांव व गाव पाठविले आहेत ते पाहून आलेवरी रयेतीचे समाधान करावयाचे ते करून पुन: आबादी करूं. आकल्पित विघ्न आले त्यास उपाये नाहीं. वरकड या प्रांतीचे वर्तमान येथास्थित आसे. श्रीमंती पुण्याहून कृपाळु होऊन सनदा व सिरपाव व सुदामदप्रा। बहुमान चौकडा तीर्थश्वरूप रा। नारोपंत नाना यांच्या विद्यमाने पाठविला तो पावोन मस्तकी वंदोन सनाथ जालों. आमची निरवणूक तीर्थरूपी सर्व श्रीमंताचे चरणासी केली आहे तेच कृपापूर्वक पाळण करीतील. सर्व प्रकारें आश्रये श्रीमंताचे चरणाचा आहे. सांप्रत आपले आगमन या प्रांते जाले आहे. आम्हावरी ममता धरून वडीलपणे सांभाळ करावयासी आविस्मर आसावे. कितेक वर्तमान रा। रामभटजी सेवेसी निवेदितील त्याजवरून विदित होईल. रा। रंगरावयासी श्रीमंत रा। दादासाहेबाची आज्ञेपत्रे येक दोन वेळा आली त्याजवरून निकडीचा

[1] सामान व बुणगे.

आज्ञासंकेत जाणून दो चौ रोजा स्वार होऊन दरमजल त्या प्रांते येत आसेत. दर्शनांती सविस्तर निवेदितील. खरिफाचा हंगाम जागजागां मामलतीचा बंदबस्त आंतर्वेदसुधा करून आपले येणे सनिध जालिया आज्ञेप्रा दर्शनास येऊं. सदैव स्वामीच्या दर्शनाचा हेतू लागला आहे. योग घडोन येईल तो सुदीन. आम्हा-योग्य काम व रिजेचा आर्थ लिहावा तेणेप्रां चाकरीस आंतर होणार नाहीं. आम्ही आपले पदरींचे आसो. विस्तरे विनंती काये लिहावी. आश्रई भूतांचे पाळग्रहण करून ऊर्जित करणार आपण आहेत. सदैव कुशलार्थ लिहून संतोषवीत असावे. आम्ही आपले पदरचे असो. कृपालोभ असो दीचे हे विनंती.

सेवसी राघो पुरुषोतम कृतानेक सां नमस्कार विनंती. लिा परिसोन चिरंजीव रा रावजीवरी कृपा करीत आसावी. सर्व प्रकारें पदरीचे आसो. कृपा लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Vishvasrao Lakshman writes to Sakharam Bapu that the Vazir on learning that a Maratha army was advancing upon Delhi left the place and fled beyond the Ganges. The writer says he would meet the addressee immediately after restoring order in his district of Shapur.*

No. 208] *[1757?*

श्री

सेवेसी+ विनती उपरी. काली आम्ही तीन कोस पुढे आलो. आजी खान-पुरावरी जातो. आजी स्वामीची आमची तफावत पाच सात कोस पडेल. रा जनार्दन रामास वरचेवरी ल्याहावें की मेरटचे ठाणे कायेम होये तोवरी आंताजीपंताजवळ राहावे. जरूर ल्याहावे. रा मुरारपंत व त्रिंबकपंतास सत्वर पाठवणे. राजे नागर यानी वकील आपला पाठविला की आम्हास निरोप देवणे आपण जातो. तुम्ही मुलुकाची जपत्ती करिता, आमची सला नाही. वजिराची सला नाही. जेव्हा वजिराच्या आमच्या इतल्याखेरीज कारभार जाला तेव्हा आम्ही काशास राहावे? तेव्हा बहुता प्रकारे समाधान करून लिहिले व सांगितले की तूर्त आमचा तुमचा वैरी नजीबखान आहे. त्याने सर्व जागा दाबिली आहे. त्या जागियास खाली करून सरकारचा आमल करून मग वजीर आलियाउपरी तुमचे विचारे जैसे करणे तैसे करून. वजिराची सोये करून तुमच्या पोटाची सोये करून. आम्ही आपली करून यैसे बहुता प्रकारे सांगितलेंच आहे. स्वामीनीहि बहुत समाधान करून जाऊ न द्यावे. येक दिवस त्याचे डेरियास

+ पत्र अंताजी माणकेश्वराचें.

जरूर जावें. बहुमान जरूर राखावा. रूपराम कटाराहि निरोपास येईल त्याजबाा कारकून दिल्हा आहे. त्यास जी कलमे त्याजकडे आहेत ती सर्व राा तात्यासी रुजू करून दिल्ही आहेत. दफ्तरी यादी आहे. स्वामीनी त्यास सांगावे. वरकड जे सांगणे ते सांगावे. बालाजी गोविंदास काहीतऱ्ही फौज देऊन वाटे लावावे म्हणजे त्याची उबरी राहील ; नाहीतरी माणूसपण राहत नाही. जरूर थोडी बहुत तऱ्ही द्यावी. त्रिबकराऊ, धोंडोपंत यांसहि दोन महिने राहावयाचे करावे. बालाजीपंताची त्याची गाठ घालून द्यावी. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Antaji Mankeshwar writes that Raja Nagar was unwilling that affairs should be conducted in defiance of the wishes of the Vazir his master, but had been prevailed upon to stay, being assured that all would be put right after the capture of the posts held by their common foe, Najib Khan.*

No. 209] [*December 1757?*

श्री+

श्रीमंत राजश्री रघुनाथपंत
दादा यांप्रति

श्रीवाराणशीहून वासुदेव दीक्षित अशीर्वाद उपरी. येथील क्षेम जाणोन स्वक्रिये कुशल लीहावयाशि आज्ञा केली पाहीजे विशेष. राजश्री राजे बलीवंड सींह यानी श्रीक्षेत्राचें पालन पंधरा वर्षें जसें केलें ऐसें मागें कोणी न केलें. पुढेंही होइल. त्यास हे स्छळ तुम्हाकडे वजीरानें परवाणें करून दिल्हे. राजास लिहीत असे. वरचेवर पंचवीस पत्रें दाखविलीं जे अमल न देणें. त्यामध्यें यांचा किमपि अन्याय नाहीं. त्याचें लीहीलें न करी तर प्रस्तुत याजवरच दंगा करणार. यामुळें अमल न दिल्हा. परंतु यांस सांगीतलें जे तुम्हीं युक्तीयुक्तिचा वाटेनें सर्व होईल. त्यास त्यांजकडुनहि ही उतावळी जाहाली. बरें जे बरें वाईट जाहालें तें आपण क्षमा करावी. तेथील स्छाळाचें संरक्षण करावें. यामध्यें तुम्हासही यश आहे. आतां वजीर या प्रांतास येतो प्रयागी वरोवर चौक्या लाहान थोर यांचा येथे बसउन लुट आरंभीली आहे. या स्छळावर मोटा दांत आहे. ती राजाचा चितांत जे आजपर्यंत हें स्छळ रक्षण केलें. आतां काय उपाय करावा ? लोक सर्व भयाभित आहेत. येथे येक गंगा प्रार्थावी. दुसरा उपाय नाही तर तुमचें येथें सत्वर याच्या मागुन येणे होईल तर बरें. नाहींतर

+ सबंध पत्र बालबोधींत.

दाहा पंधर सहस्र स्वार व येक सरदार पत्रदर्शनें पाठउन देणें. ते नजीक आले म्हणजे राजासही पांच सात हजार स्वार घेउन तुम्हास सामील होतील. यांची तुमची भेटी जाहालीयावर जी आज्ञा कराल त्यास हे सीघ्र आहेत परंतु हें स्थळाचें रक्षण करावें. राजाचेंही रक्षण करावें. दीगांतरी आपली कीर्ति होईल. येथील लोकांस कोठे जावयास स्छळ नाही. कदाश्चित उपद्रव जाहाला तर लेंकरेबाळे घेऊन गंगाप्रवेश करीतिल. दुसरा उपाय नाहीं. राजाची बरी वाइट कीतीक गोष्टि तुम्हास कोणी सांगतील व सांगीतल्या असतील तर चीत्तामध्यें न आणावें. हा अनन्यभावें आपले पायांची जोडी इछीतो. त्याचें आमचें सभाषण जाहालें. त्यास यास हाती धरील्याने पुढेही बहुत कार्याचा आहे. शतां पत्री ठांईं हे पत्र लीहीलें आहे तर सत्वर आपले येणे हाइल तर उत्तम. नाहींतर पत्रदर्शने फौज रवाणा करणें. पुढें उत्तर या पत्राचें पाठवणें. जेथें म्हणाल तेथें हे येऊन सामील होतील. राजश्री मल्हारजीचा चितांत विक्षेप बहुत आहे. ते तुम्हास सांगतील तर हा समय विक्षेपाचा नाहीं हो. तुह्माकडेच येतील तेव्हां जें होणें तें होइल. राजाहीं आपली अर्जी पाठविली आहे त्याजवरून कळेल. सुज्ञाप्रति बहुत काय लिहीणें हे आशिर्वाद.

¶*Vasudev Dikshit proposes to Raghunathrao to come to Benares and protect the city and its ruler Balavantsing whom he reports to be entirely loyal to the Peshwa. Dikshit reports that the Vazir was trying to take possession of Benares, which the Peshwa must prevent on the ground of religion. (Balavantsing became independent about the year 1754 and ruled up to 1770.)*

No. 210] [*1757*

श्री

पुा राजश्री बापू स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. आम्ही स्वामीचे आज्ञेप्रों दरकूच पुढें गेलों. आपण रुपराम कटारे यांस निरोप देतील. यैशास रुपरामाचा आमचा भाऊपणा श्नेह आहे. त्यांकडे आमचीं कामें बहुत आहेत, ते स्वामीस सांगत नाही व सांगतां येत नाही, ते आम्ही समजोन घेऊन; व दिढा लाखाचा हवाला व पेशजीची बाकी आमची येणे त्याविसीहि स्वामीस विनंती करीत नाही, ते आम्ही समजोन घेऊन. परंतु येते समईं स्वामीस विनंती केलीच आहे कीं पाा जलालीचा वसूल निवल रुपये २६५०० साडे सवीस हजार घेतले आहेत ते त्यांसीं रुजू केले आहेत ते आपणास मजुरा घ्यावे. याखेरीज हतीबाा पंधरा हजार रुा व जैनगरबाबत

दाहा हजार येकूण पंचवीस हजार रुा बळेंच घेऊन बसला आहे. येकूण साडे येकावन हजार रुा रुपरामाकडे तूर्त येणे. त्यास आपण त्याचे भिडेने हा जाबसाल ठेऊन निरोप देतील तरी सदरहू रुा सरकारातून आम्ही मजुरा घेऊं. किरकोळी कामे स्वामीस सांगतां येत नाहींत व सांगत नाही परंतु दो कलमांची विनंती केलीच आहे. परिछिंन सरकारचे रुपये बुडतील याकरितां रुा बेमुरवत रुपरामापासून घ्यावे. यांचा जाबसाल काही घालमेलीचा नाही. यैसेकरितां समागमे आसिला तरी गुता नाहीं. गोहदकराविसी काही श्रीमंत दादास आपण रुपरामाचे भिडेने न ल्याहावे हे विनंती.

¶*Vithal Shivdev writes to Sakharam Bapu that moneys to the amount of fifty thousand rupees are due from Ruparam Katare who should be made to pay them immediately.*

No. 211] [*1757?*

श्रीमोरया

शेवेसी विज्ञापना. स्वामीनी रविवारचे पत्र पाठविले ते पावले व सोमवारचेहि पत्र मंगळवारी पावले. यैसियासी आम्ही आज्ञांकित शेवक. आज्ञेखेरीज नाही. सारांस गोष्टी स्वामीनी प्रिथ्वीवलयांकित येश संपादिले ते जतन करून सर्वांनी संतोषे खावंदाचे पाये पाहावे म्हणिजे उतम गोष्टी आहे. राजश्री सुबेदार साहेब स्वामीचे आज्ञेखेरीज नाहीत. सर्व विस्तार राजश्री सखारामपंत बापूनी लिा आहे त्यावरून विदित होईल. दिवस सनिध आले. उपयोगी मनसबा करणें. स्वामी समर्थ आहेत. शेवेसी शृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Gangadhar Yeshwant to Raghunathrao, expressing his utmost willingness to carry out the latter's orders.*

No. 212] [*About July 1757*

श्रीसांब

मेल्हारजी[2] होळकर यास पत्र की तुम्हास बरे वाटत (नाही) हें वारंवार ऐकोन चितांस वारंवार दुःख होते यास्तव आपणास पाहावयास रंग जोसी, बापूभट पुराणिक पाठविले आहेत. आपण सत्वर आलियावरी बहुत उपयोग आहेत. आम्हीच येणार होतो परंतु ओडसे दतिये येथील खंडणी तुम्हीच केली होती तिचे

१ पत्र विठ्ठल शिवदेवाचें असून यापुढील मजकूर खुद्द त्याचे हातचा आहे. २ पत्र राघोबाचें.

वसुलास गुंतलो. सेवटी वसूलहि न जाहाला. च्यार हती, घोडे, जवाहीर, सोने, रुपे ऐसे मात्र पाऊण लक्षाचे घेतले. पंचवीस हजाराची सेव्याची निशा केली आहे. येतील तेव्हा खरे. दतियाकडील थोडा बहुत वसूल येणार येईल तेव्हा खरे. आपणास कलावे. येणे प्रा पत्र देणे.

¶*Raghunathrao makes inquiries about Malharrao Halkar's health and describes him his activities in Orcha and Datia.*

No. 213] [*About July 1757*

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री विठलराव सिवदेव यांची चिठी आली तीच बजिनस सेवेसी पाठविली आसे. व वोडशाहून राज्याकडून मुहूर्ताचे पत्र आले आहे तेहि पाठविले असे त्यावरून ध्यानास येईल. सारांश आजच राज्याने येणे; गुता नव्हतासा वाटत होते, परतु मुहूर्तामुलेच आज येणे राहिले. उदैक येतील. उद्याचा दिवस मुकाम करणे प्रात जाले. वोडसेवाले जोतिष्याचे रीतीने रदबदली करितात म्हणोन आजच वोढता न ये; कलावे. सिधाचा सेटीचा कारकून आला तोहि रवाना केला आहे. स्वामीचे प्रतापे सर्व येथास्तित घडोन येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer refers to the negotiations started with the Raja of Orcha.*

No. 214] [*1770*

(पहिला बंद गाहाळ)

करावा. दाहा लाख रुा घ्यावे. इतके आल्याने काही काम होईल व रोहिले गंगापार याजवरहि दबाव बसेल असे समजोन करावयाचे केले. त्यास किसनसिंग येथून गेला. त्यास दिवसगत लागली. आणखी सरदारांकडे येक येक वकील बोलतच आहे. त्यात परस्परे उभयेपक्षी सर्वाचे मते आपल्या हातून व्हावे ही इछा जाणून किसनसिंग लबाड याचे हातून सिधीस जात नाही असे निश्चयांत आले. इतकियात तो डिगेहून निघोन मथुरेस आला. पत्रहि आले. बरोबर भगवंतराव सरकारचा वकील आला; परंतु याणेहि परिणाम नाहीं असे सर्वाचे मते

ठरीन महासिंग मुनसी यास आणावा, त्याचे हातून जे करणें ते करावे, असे सरदाराचे सर्वांचे विचारे जाहाले. त्यावरून त्यास आणावयास येथून कृष्णाजी गणेश परकाले व सरदाराचे दोन कारकून पाठविले आहेत. बरोबर जाटाकडील सुखानंदमिश्र होता तोहि गेला आहे. मुख्यार्थ तूर्त दाहालाख रुो घ्यावे, पंधरा दोन महिनेयानी साहुकारी निशा द्यावीसी होती तेंहि राहून पंधरापैकी दरमाहा पावणेच्यारप्रमाणे त्याणीच द्यावे. साडेसात फालगुन मासी द्यावे; याप्रमाणे कबूल करून दाहा तूर्त द्यावे. पुढे कराराप्रमाणे निभावल्यास सलूख; नाही तर सहजेच बिघाड आहे. दरसालचे अकरा लक्ष रुो सन ईहिदेपासून पासष्ठखेरीज देत जावे असा पहिला करार जाला होता, तोहि आलीकडे पासष्ट ती वर्षांत फिटत तोपर्यंत दरसाल देऊ नये असे जाले तेंहि मान्य केले. रणजितसिंगास पंचवीस लक्षांची जागीर द्यावी ते विसाची केली. इतकेंहि करून सेवटास जाईलसी दिसत नाही. इतके लांबणीवर पडावयास मामलत न होता आंतरवेदीत आले. गंगा येमुना यास पाणी न आले तोपर्यंत बोलत होते. दोनी गंगा भरल्यावर जाबस्वाल लांबणीवर पडिला. गंगापारचे रोहिले पठाण पहिले मुलूक सोडावा, पैका मागो नये, वरकड पाणिपत वगैरे दावे असतील ते माफ करावे असे सूत्र सिंदे याजकडे होते. त्याजवरून येथून सरकारचा येक कारकून नारायणराव मुनसी याचा भाऊ व सिंदे याजकडील बाळाराव व होळकराकडील वासुदेव संभाजी गंगापार पाठविले. त्याची भेट जाली. आहंमदखान पठाण फरोकाबादेस आहे, परंतु तिघे येकसूत्र होते. त्यास वकील गेलियावर कोणीकडून चढ बसिला तो न कळे; परंतु चढोनच मुलूक सोडावयाची गोष्ट बदले. आंम्ही सिपाई मुलूक सोडीत नाहीं, पांच सात लाख रुो करार करून मामलत करावी. पुढे मोठे मनसबे करावे. आपण फौजेनिसी चाकरीस हाजर आहो. नजीबखानाकडे मेरट वगैरे मुलूक आहे तो घेत नाहीं आम्हाजवळच कां मागता? त्यावरून वकील उठोन आणिले. त्यांची फौजहि आलीकडे आंतरवेदीत आली होती. त्यास आम्दखान फरोकाबादवाला याचे व हफीज रहमतखान व दुंदेखान रोहिले याचा बिघाड जाला. रोहिले यानी फरोकाबादचे दोनच्यार गांव मारिले.[1] फौजहि कांही गंगापार नेली. कांही जागां जागां ठाण्यांतून आहे. तिघे येक जाले होते ते बिघडले त्यावरून अमंदखान याणी आपला विचार करून आपणांकडे माहाल आहेत ते सलुखाने सोडून देऊन स्नेह करावा या विचारे वकील येथे पाठविले आहेत. मुलूक सोडावा असी बातमी आली व गणेश विठ्ठल,[2] बाबुराव हरि पंचवीस कोस पुढे आहेत त्याजवळहि बोलिले. त्याणी येथे लिहिले.

---

१ वाघमारे. २ गुप्ते.

3712

वकील पा॥ परंतु वकिलाची भेट जालियावर पाहातां मुलूक सुप्रवृतीने सोडावासे दिसत नाहीं. येथे आलियावर बिघडले. जो मनसबा योजावा त्यास येकाचा चढ बसतच आहे. सेवटास कसे जाईल पाहावे. सारे रांगडे जाटाचे मामलतीकडे पाहात आहेत. अंतस्ते सारे येक जाले आहेत. इकडे सलुखाचे बोलतच आहेत. अशांत बनल्यास सारे येकत्र होऊन झुंज करावे असाहि मजकूर आहे. यास्तव तूर्त जाटासी सलूख करून अंतरवेद पहिली रोहिले यापासून सोडून घेऊन मग जाटाचे पाठीस लागावे असे योजिले आहे. सेवटास जाईल तेव्हा खरे. गुढगे बहुत आहेत. जाहाल्यास पैका थोडाबहुत येऊन पोटास मिळेल. लोकाचे प्रारब्ध पाहावे. नजीबखान समागमे आहेत. सिंदेयाचे त्याचे ठीक नाही. होलकर दरोबस्त त्याचे लगामी, तेव्हां हेहि आहेत. आजपर्यंत त्याचाच मनसबा फारसा आइकिला नव्हता. आतां चौकडून सारे मनसबे फसले. कोठे जावयास जागा नाहीं. खर्चास नाही जाणून त्याचे आइकणे प्राप्त जाले. जाटाची मामलत जाल्यास करावी. न होई तर फौज दिलीस उतरून जाटाचे मुलकात धामधूम करावी त्यावरून सरकारचे आनंदराव गणे (अपूर्ण)

¶*The letter reports affairs in the Doab and advises that an expedition be dispatched against the Rohillas.*

No. 215] [*25-2-1756*

पौ छ २९ जाखर

श्री

राजश्री जनार्दनपंत बाबा
गोसावी यासी

८ अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्नो मानाजी पायगुडे दंडवत विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ २४ रोखरपावेतो मु॥ कुराजाहानाबाद प्रांत अंतरवेद वर्तमान यथास्थित असे विशेष. बहुत दिवस जाहाले परतु आपणाकडून पत्र येऊन सेवकाचा सांभाल होत नाही तरी ऐसे नसावे. सदैव पत्र पाठऊन सांभाल करावा. कुराजाहानाबाद येथील सुभा दूर करून श्रीमंत राजश्री दादासाहेब याणी पातशाहाची सनद घेऊन गोविंद बलाल याजकडे मामलत सांगितली. बकरुलाखान याणे सनद न मानून सवा महिनापर्यत युध्य केले. राजश्री गंगाधर

+ जमादिलावल असावें कारण युद्ध माघ शुद्ध त्रयोदशीस झालें त्यानंतर पत्र लिहिलें गेलें.

बाजीराव याजकडील व आम्हाकडील पथक व गोविंदपत ऐसे मिळोन युध्य करून आविंधाची फौज बुडविली. माघ शुध्ध त्रयोदसीस जरारा तोफखाना सोडून गगापार पळोन गेला. युध्याचा सविस्तर अर्थ श्रीमंताचे पत्री लिहिला आहे त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणे कृपालोभ असो दीजे हे विनंती.

¶Manaji Paygude reports to Janardanpant the defeat of Bakarullakhan and the subsequent occupation of Kurajahanabad by Govind Ballal.

No. 216] *[10-4-1758*

पौ छ ३ सवाल

श्री

सेवेसी विनंती. सेवक महिपतराव लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ३ सवाल मु॥ बारखेडे नजीक भूपाल येथे येथास्थित असे. यानंतर छ २९ रमजानचे आज्ञापत्र सादर जाले; तेथे आज्ञा जे भूपालवाल्याच्या तालुक्यांत फौज आहे, त्यासी राणांत दाणादुणा आहे, तो आणावयाचा तो आणितच आहांत. परंतु गावखेडियास उपद्रव होऊ नये, गुरू ढोर आणू नये गांव नासू नयेत, निक्षूण ताकीद करावी, म्हणोन पत्री आज्ञा; त्यास आज्ञेप्रमाणे लोकास ताकीद केली आहे. सिवारातीलच दाणा वैरण आणितात, गांव खेडी तमाम उज्याड आहेत. कोण्ही जाळणार नाहीत. आज्ञेप्रमाणे वर्तणूक होईल. भूपालवाल्याचे वकील येथे होते त्यास हुजूर कारभार पटला, यास्तव आजी छ मजकुरी उठोन गेले. आम्ही फौजसुधा येथे कितेक दिवस आसावे. हुजूर यावयाची आज्ञा जाली तर हुजूर येऊं; नाहीं तर आरते-परते दाहावीस कोस तळ टाकले (?) जाऊ, येविशीची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. स्वारीत रुपया काही मिळाला नाही. बिलंदखानास आठा हजारांची वरात दिल्ही आहे. नित्य खर्चावीण हैराण आहेत. येथें तो पैसा मिळत नाहीं. लुटीवर मजकूर आहे. दुसरे गाडदी आहेत त्यासहि पोटास नाही. आज्ञा होईल तर हुजूर सेवेसी पाठवीन. दरमाहाकरी सिलेदार आहेत त्यासहि रोजमरा द्यावा लागतो. चांदरात आली. येविशी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶Mahipat Lakshman Panse reports to the Peshwa the condition of affairs near Bhopal whither he had gone for the purpose of collecting supplies.

No. 217] [11-4-1758

श्री

सेवेसी विनंती. सेवक महिपतराव लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ४ सवाल भानुवासर त्रितीये प्रहर मु॥ हणमती नजीक देवीपुरा येथे यथास्थित असे. यानंतर अजी छ मजकुरी आज्ञापत्र सादर जाले, तेथे आज्ञा जे भूपालवाल्यांची मामलत जाली. इतक्यावर त्याच्या मुलकास उपसर्ग द्यावयासी कामास न ये. तुम्ही फौजसुधा उठोन लस्करात येणे म्हणोन आज्ञा. त्याजवरून पत्र येताच कूच आठा कोसाचे करून राजश्री विठल सिवदेव याचे कारकुनानी मार्ग दाखविला, त्या मार्गे मुकाम मजकुरास येऊन दाखल जालो. उदईक लस्करात येऊ. अजीच येत होतो. परंतु मजल लांब पडली; यास्तव येथे मुकाम केला. सेवेसी श्रुत होय. उदईक लस्करचे कूच होणार किंवा मुकाम होणार येविसीची आज्ञा सेवकास जाली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Mahipatrao Lakshman Panse reports his transactions at Bhopal.*

No. 218] [21-4-1758

पौ[१] छ १८ रमजान

श्रीरामचंद्र

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक हरि रघुनाथ भिडे कृतानेक सां। नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता। चैत्र शुध १३ मु॥ लाहोर नदी यैरावती तीरी अनंदरूप जाणून स्वकीये स्वानंदलेखनाज्ञा करीत गेले पाहिजे. यानंतर दोन च्यार पत्रे पूर्वी सेवसी पाठविली परंतु येकहि न आले. याजकरिता चित सापेक्षित असे. तरी यैसे न करिता सदैव अलिया माणसाबा। कृपापत्री सांभाल करीत असावे विशेष. श्रीमंत साहेबी आबदूल संमदखान सरहदेत होता त्याचे पारपत्य करून मुल्क प्रा। मजकूर व दुवब दोन्ही तालुके आदिनाबेग मोगल याजकड खंडणी ठराऊन त्याचे स्वाधीन केले. तदुतर मजल दरमजल ज्याहानखान आबदालीचे पुत्रासहवर्तमान लाहुरी विसा हजारा फौजनसी होता त्याजकड चालिले. तेव्हा विपाशा नदीतिरीहून सड्या फौजा मानाजी पायगुडे व गंगाधर बाजीराव व गोपालराव गणेश पुढे रवाना केले. यासी त्याणी येऊन मारनेलेसी गाठ घातली तेव्हा तो घाबरा होऊन आपले बुणगे व तोफखाना वगैरे कितीक फौज मागे टाकून सडा ती चौ हजाराफौजेनसी चिनाव नदीपार

---

१ पैवस्ती नाना फडणिसाच्या हातची. यावरून पत्र नाना फडणिसास.

उतरोन जीव रक्षणमुळे पळाला. आपले फौजेने नदीपरियंत पाठिलाग करून सर्व फौज तोफखा(ना)देखील लुटिला. पुढे चिनाव पार व्हावें तरी नदीस (पाणी) फार. उपाये नाही म्हणून राहिले नाहीं; तरी तोहि लुटला जाता. भगवंते रक्षिला. येरवी श्रीमंत साहेबाचा प्रताप इकड बहुत विस्तार पावला. त्याचा विस्तार ल्याहावासा नाही. ज्याहानखान व तयेमूरशा सलाबतीनेच पळाले. इतकियाने या प्रांती वर्तमान हिंदुस्थान रजवाड व दिली व जाट वगैरे याजवरी सलाबत भारी पडली. दक्षणी फौज पहिले दिलीआलाकड आली नवती ते चिनाव नदीपरियंत पोहचली. चिनावेस पाणी थोडे आसते तरी आटकपरियंत जाती. सहात (?) मात्र आट(क) पार होऊन गेली. पुढे पूल बांधोन फौजा जाव्या त्यास आटकाव भारी पडेल मग छावणीस मूळ जाले. छावणी दूरदेसी करता न ये. त्याहीवरी लोक कष्टी होतात. येसे आसोन ॥ सहसा विदधीत न क्रिया ॥ म्हणौन लाहूर प्रांतीचा बंदोबस्त करून श्रीमंत साहेब देशोदेशे माघारे फिरतीलसे दिसते. याहीवरी भगवतसता प्रमाण. जाले वर्तमान सेवेसी लिहील. होईल ते लेहून पाठऊ. बहुत काय लिहिणे? कृपा लोभाची वृधि कीजे हे विनती.

राजश्री लक्षुमणपंत कुंटे व माहादाजीपंत खरे यासी नमस्कार. कृपा कीजे हे विनती.

राजश्री नारोपंत दिवेकर व लक्षुमणपंत देसमूख व पाडुरगपंत कापसे यासी नमस्कार. कृपा आसो दीजे हे विनती. पाडुरगपंत कापसे कोठे आहे ते लिहून पाठविले पा। हे विनती.

राजश्री हरीपंत फडके व नारोपंत यासी नमस्कार. समस्त इष्टमित्रास नमस्कार सांगणे हे विनंती.

श्रीमंत राजश्री विश्वासराव साहेबाचे पत्र स्वामीनी प्रविष्ट केले पाहिजे हे विनती.

¶Hari Raghunath Bhide sends Nana Fadnis a detailed report of the activities of Raghunathrao in the Punjab. After advancing upon Sirhind he defeated Abdul Samadkhan and appointed Adinabeg to the district. He then proceeded to Lahore where he was met by the Abdali's forces under his son Taimurshah and Jahankhan. The battle that ensued ended in the complete route of the Abdali's army which fled in great confusion leaving behind its heavy guns. Only the fact that the Chinab was in full flood saved the remnant of the Abdali's forces from complete destruction. Dadasaheb proposes to return to the South after the settlement of the new acquisition. (Hari Bhide, the writer, was later a devoted follower of Raghunathrao).

3716

No. 219] [24-4-1758

श्रीकृष्णौजयेतो

श्रीमंत माहाराज धर्मधुरंधर
राजश्री बाळाजीराव नाना
स्वामी पंडितप्रधान गोसावी
याचे सेवेसी

स्नेहांकित राजा केशवराव व राव बदरीनाथराऊ कृतानेक नमस्कार विनती उपरी. येथील क्षेम ताा छ १९ साबान मुकाम झासी जाणून स्वकुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही दिलीस आबदालीचा उपसर्ग जालियाताा आपले धर्मसंरक्षणार्थ सकुटुंब तो दुष्ट येतांच निघोन आलो. मथुरा आगरियावरून नीट झांसी माहाराजाचे राज्य तेथे येऊन राहिलो. माहाराजाहीहि सर्व साहित्य करून आज्ञापत्रे आमचे विषई सर्वास पाठविली त्याजवरून संपूर्ण येक वरीसपरियेंत पितापुत्र दोन्ही अग्निहोत्रेकरून सकुटुंब कालक्षेप केला व माहाराजाचे प्रतापवृधिचाच आसीर्वादपूर्वक निजध्यास होता त्याप्रमाणेंच दक्षणउतर सर्वत्र दिगविजये माहाराजाचा पाहिला व मनोरथ पूर्ण जाले. झासीत राहून तीर्थे बहुत केली. श्रीप्रयागी माघस्नान संपूर्ण जाले. ब्रह्मावर्ता आदीकरून सर्व तीर्थे जाली व माहाराजास वरचावरी विनतीपत्रेंहि बहुत पाठविली व सर्व वर्तमान लिहिले; परतु माहाराजास वरचेवरीहि वर्तमान कलतच आहे. तथापि आमचें काम आम्ही करावें. आम्हास पूर्ण कलोन चुकले आहे जे, माहाराजाचा आमल काबूल कंधारवरी व्हावा व समुद्रवलयांकित पृथिवीचे राज्य माहाराजास व्हावे. येवनाचा आपकर्ष जाल हे हिंदुमात्रास भूषण जाले. आम्ही तो माहाराजाचे पदरचे त्रिपुरुषापासून आहोत. अमचा निर्वाह किती आसेल राहिले आमचेविषई कोण्ही स्मरण देयास माहाराजाचे दरबारी कोण्ही दिसत नाही. स्वत: महाराज करतील तितकेच होईल. सर्वज्ञाप्रति विशेष किती लिहावे? पत्रोतर कृपापूर्वक लिहावयास आज्ञा करावी हे विनती. श्रीमंत दादासाहेबापासून सदैव पत्रोतरे पावताती. बहुतच लोभ करिताती हे विनंती.

¶*Raja Keshavrao and his son Badrinath send congratulations to the Peshwa on the splendid achievements of his forces in the North.*

Bk Ca 11—28 3717

No. 220] *[May 1758*

श्री

पुा श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे श्रीमंत राजश्री दादासाहेब सरंदेस गेले. तेथे शहरास मोर्चे लाऊन हला करून शहर घेतले. आबदालीकडील सरदार संमतखान व चंगबाजखान वगैरे सरंदेत होते त्यासी जखमा लागल्या आहेत. त्यासी धरून आणिले आहे. वस्त्रे भूशणे देऊन आपल्यापासी ठेविले आहेत. श्रीमंताची फते जाली. सरंद शहर लुटून घेतले. पुढे लाहोरियास जाहानखान आहे पलोन जाईल. त्याच्यानेहि श्रीमंतापुढे टिकाव धरवत नाही. संतोषाचे वर्तमान स्वामीस कलावे म्हणून सेवसी लिा आसे. वजीर श्रीमंतासी फारसा येकलास राखितात आणि बहुतच खुशी आहेत. तैसेच श्रीमंतहि श्नेह करितात. रा विठल सिवदेव यासी श्रीमंतानी पटणियासी रवाना केले आहेत. त्यासी त्यानी आपल्या मार्गे जावे ते दिलीस येऊन सिकंदरियावर मुकाम केले आहेत आणि शहरच्या बाहेर लूट माडली आहे. पातशाहाचा पुत्र सिकारीस बाहेर गेला होता त्यासी धरून आपल्या लस्करात नेले आहे. याजमुले वजिरानी श्रीमंतास लिहिलें आहे. श्रीमंतानीहि वाईट मानिले. त्यासी विठल सिवदेव यांसी कांही म्हणावे तर त्याजला रा सुभेदार यांची पाठ आहे. याजकरिता श्रीमंतानी गोष्ट चितात ठेविली, त्यामुले वजीर श्रमी बहुत आहेत. श्रीमंतासी व वजिरासी श्नेह फार आहे. श्रीमंतासी जीवप्राणे भाऊपणा केला याजमुळे त्याची आदावत सुभेदार व विठलपंत करितात. म्हणतात जे आमचा पक्ष सोडून तिकडील पक्ष कां धरिला? याजमुले आदावत करितात. श्रीमंत वजिरासी बहुत श्नेह राखितात. वजिराची पत्रे स्वामीस आहेत. स्वामीनीहि त्याची उतरे बहुत प्रकारे संतोशाची पाठवावी. त्यामधे सेवकाची मालुमात फारसी ल्याहावी. त्याच्या पत्राची नकल मसुदा सेवकास पाठवावा. मजकूर कळला पाहिजे. वजिराचे आज्ञेत राहाणे म्हणून पत्रे सुरजमल जाटास व माधोसिंगास लिहून आम्हाजवल पाठवावी. सरंदेची फौज दाहा हजार आबदालीची श्रीमंतानी बुडविली. आता लाहोरातील दाहा हजार जाहानखान आहे तो पलोन जाईल आथवा मारिला जाईल. हिंदुस्थानचा सूड आबदालीचा श्रीमंतानी घेतला.

सेवेसी शृत होये. विठ्ठल सिवदेव याचे बुधीस फारच फेर पडला आहे हे विज्ञापना.

¶Antaji Mankeshwar while communicating the news of Raghoba's success at Sirhind remonstrates against the spirit of insubordination lately shown by Vithal Shivdev. Under the instigation of Malharrao Holkar, Vithal Shivdev remained encamped at Sikandra in violation of the orders to proceed to Patna and has kept in confinement the Emperor's son. This has highly incensed the Vazir. Raghoba finds himself helpless in this situation.

No. 221] *[15-5-1758*

पा। छ १७ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे
शेवेसी

विनंती सेवक कृष्णराव बलाल सा। नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। वैशाख सुध ८ सोमवार सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. केसोबा व धर्माजीपंत गुदस्ता जैनगरचे तलावरून रा। दताजी सिंदे याजकडे गेले होते ते येथे आठ दिवस आले आहेत. सोबतीमुळे राहिले आहेत. रा। जनकोजी सिंदे फौजेसहवर्तमान कोट्यानजीक आहे. (आठा) चऊ दिसा जैनगर प्रांतीं येतील येसी खबर दिलीत आहे. मागून सविस्तर लिहून पाठऊ. शाहानवाजखां दौलताबादेवर होता. सलाबतजंग याजपासी फिरंगी होते त्यांसी शाहानवाजखान यासी स्नेह, याजकरितां किला पाहावयासी गेले तेथे दगा करून शाहानवाजखान धरिला आणि किला घेतला येसी खबर सराफी औरंगाबादेहून आली आहे. बंगाल्याहून फिरंगी आले होते ते पुणियास श्रीमंत नाना साहेबाकडे गेले. हे विज्ञापना.

¶Krishnarao Ballal (Kale, later the Peshwa's agent at the Nizam's Court) informs Dadasaheb that Jankoji Sindia is encamped near Kota and is expected to move towards Jainagar.

No. 222] *[25-5-1758*

छ १७ रमजान

श्री

पुरवणी श्रीमंत दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. नजीबखान येकायेकीच दरकूच बुढाणियापावतो दिलीहून तिसा कोसावर आला आणि शोखीच्या गोष्टी सांगू लागला. यांत आर्थ आसा आडला

+ पत्र अंताजी माणकेश्वराचें.

की इशारतीखेरीज नाही आला. प्रस्तुत रा॥ विठलराव याणी वजिरासी करार केले त्यावरून बाहादरखां बलोच व सैद जमिलुदीखान वगैरे रिसालदार सर्व मिळोन नजीबखानावर जावयाचा करार ठहरला आहे. पांच सांत दिवस निघायास लागतील. इतकियांत नजीबखान माघारा जातो की काय हे कलल आगर मामलियेत पेशजी जाहाली आहे त्याप्रा॥ कबूल करील हे विज्ञापना.

¶*The sudden advance of Najibkhan towards Delhi and measures designed to intercept him are communicated to Dadasaheb at Lahore.*

No. 223] [*25-5-1758*

छ १७ रमजान

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री दादासा-
हेब स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. आम्ही दिलीस पावतांच पांच साता दिसां रा॥ विठलपंत याजकडे गेलो. बंगाल्याची मामलियेत व शाहाजाद्याचे बोलीची वालमेल होत होती. त्यासमई त्रिंबकपंत वकिलांकडील कारभारांत होते. त्यासमई ते विठलपंत यासी बोले कीं सुबेदारावर तुम्हावर नजीबखानाचा आभिश्राप आला आहे की नजीबखानास दिलीहून तुम्ही उभयेतानी काढून दिले. याजकरिता प्रस्तुत नजीबखानाने शोखी केली आहे याजकरितां जरद[1] येतात ते कागद देऊन कोणीकडे जातात हें कलत नाहीं तेव्हा आजूर करून पाठवावा लागतो. चौदा (अपूर्ण)

¶*An incomplete letter to Dadasaheb stating that Najibkhan is highly incensed against Holkar and Vithal Shivdev who were chiefly instrumental in ousting him from Delhi.*

No. 224] [*27-5-1758*

छ १९ रमजा(न)

श्री

राजश्रियां विराजित राजमान्ये
राजश्री सखारामपंत बापू
स्वामीचे सेवेसी

पो विठल सिवदेव कृतानेक नमस्कार विनंती उपर येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत गेले पाहिजे विशेष. आपल्याकडील पत्र बहुत दिवस येत नाही

१. यापुढील बराच मजकूर गहाळ असावा. आतां सुरू होत असलेला मजकूर पत्राच्या पाठीवरील होय.

तर सदैव पत्र पाठऊन परामर्ष करीत जावा. इकडील वर्तमान तर सविस्तर श्रीमंताच्या पत्री लिहिले आहे ते पत्र पाहून त्याप्रमाणे निरोतर उतरे पाठवावी. सदेव पत्रद्वारे परामृष करावा हे उचित असे. लाहोराकडे यावे तो दिलीवाल्यासी गाठ. आद्यापवर पुरता नर्गम नाही. शाहाजाद्याची त्याची समजावीस करून दिल्ही. आलादा हवेलीत हजार प्यादा, पाचाशा स्वारानसी राहिला. जागरीत आमील पाठविले. जागरीत लाऊन देत होतो, परंतु याच्याने आमच्या फौजेसी वाटे न जाये कीं जमीदार भारी हर कोठे फजीत पावला तर आब जाईल. त्याचा त्यानेच निकाल काढला की तुम्ही याल तर जागरीत जाईन, नाहीतर हजार स्वार देणे; नाहीतर निखालस समजावीस करून देणे. आम्हास दोन्ही गोष्टी आनकूल नाहीत, सबब समजावीस करून दिल्ही. वजिराने नागरमलास मध्यस्ते देऊन इमानप्रमाण देऊन हवेलीत राहिला. आम्ही देशास गेल्यावर मग काये होणे ते हो; परंतु आम्ही तो आपलेहि काम केले. त्याचे ठीक करून सात लक्ष रुपये मुदतीचे येणे. आम्ही राहिलो छावणीस तर वसुलात आणू. देशास गेलो तर खावंद वसूल ज्यास सांगतील ते करतील. तूर्त नजीबखानाचा मनसबा वजिराने योजिला आहे. दिलेलसिंगाने मामलत सुभेदाराचे आमच्या गुजारतीने केली होती ते राहिली. आमचा तनखा दिल्हा होता तो त्याने न मानला सबब बिघडली. वजीर आम्हास व अंताजीपंतास देखील घेऊन जाणार. आम्हास पांचा लक्षाची जागीर देईन म्हणतो. मुल्क सोडवा. सात तेहि वसूल करून द्यावे हेहि दोन चौ पैकी घ्यावे रबीचे बाकीपैकी. आम्हासहि तुम्हाकडे त्याच मार्गे येणे. तोहि बुढाण्यावर आहे. पाहावे. दिलीची फौज निघणे कठीण. निघाली तर उतम. नाहीतर दोचा निकाल सरून येऊ. मुधोजी भोसले याचा विचार ल्याहावा. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Vithal Shivdev writes to Sakharam Bapu at Lahore that he is being detained in the capital owing to some financial affairs. The Vazir has offered him a jagir of five lakhs in return for his help in occupying Najibkhan's districts.*

No. 225] [*May 1758?*

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. बाबूराव हरी व आयतोले यांचा मजकूर विस्तारे लिहिला आणि रा अंताजीपंत यासहि लिहिला होता. आम्ही आपले पत्र आज्ञेप्रा दाखविले त्यावरून मारनिलेनी सर्व गोष्टी धण्याच्या मर्जीप्रा मान्य केल्या. येवजाची

वाट करून घेणे म्हणून आज्ञा. त्यासी मारनिलेनी मान्य केले. येवजहि देतील. खासी स्वारी माघारी कुरुक्षेत्रास आली म्हणजे भेटीसहि येतील. यानंतर नजिबखानाची मामलियेत पूर्वी सुबेदारानी व रा। विठलपंत याणी केली होती. त्या येवजी चऊ लक्षाच्या हुंड्या मध्ये राजाने आणिल्या होत्या. आलीकडे नजीबखान बुढाणियास आला. त्यासमई * * * * * (ब)दलून गोष्टी सांगू लागला की मी रुा देत नाही. तुम्ही नजीबखानाचे पारपत्य करा, तो मला लिहितो की रुा देऊ नको. त्यावरून बदमामलीसा ठहरला याजकरिता वजिराने मेघराज व त्याचा भाऊ कैद सिलीमगढात केला आहे. बेआबरू नाही केली. उगाच कैद करून चौकी मात्र आहे. नजिबखानाचे काय होते ते पाहोन जे करणे ते करितील. बहुत काये लिहिणे ? लोभ केला पाहिजे हे विज्ञापना.

¶*Dadasaheb is informed that Najibkhan refuses to pay tribute due from him. The Vazir in consequence has kept in confinement his Diwan Megharaj and his brother.*

No. 226] [*May 1758?*

श्री

सेवेसी कृष्णराव बलाल सा। नमस्कार विज्ञापना. सुरजमल जाठ दिलीपासून पंचविसा कोसावर मेरत्यांत आहे. मुलकाचा बंदोबस्त करितो. फौज च्यार पांच हजार आहे. त्याचा लेक जवाहीरमल सुरजमलासी बिगडला आहे. त्याचे आनुसंधान येका ग्रहस्ताचे विद्यमाने आम्हाकडे आले आहे. आम्ही त्यासी लाऊन ठेविले आहे. जर त्याप्रांते स्वामीच्या छावणिया जाहाल्या तर गरीबसा वकील घेऊन येऊ. जर स्वामी इकडे आले तर उतमच जाहाले. सुरजमलाचे आणि नागरमल याचे चित येक आहे. खानखाना किल्यांत कैदेत वजिराचे आहे. बेड्या मात्र नाहीत. प्रतिष्ठेने आहेत. कारण जाठाकडे नजिबखानाकडे काही सूत्राचे कागद पाठवीत होते. आबदूल आह्यादखान याजलाहि आभिप्राय आला होता ; परंतु ते कैदेपासून वाचले परंतु आपले घरी बसले आहेत. वजिराचे सारे येथे दुशमन आहेत. स्वामीच्या आश्रयामुळे वाचले आहेत. जर स्वामीचा आश्रा नसता तर आजपावेतो मोक्षास गेले आस्ते. पाछायासी सुख नाही. याचप्रा। चिरकाल चालायाचे नाहीं तर स्वामींनी पाछायाचा बंदोबस्त बांधोन दिला तर काही उतम आहे. बाकी यैवज येथे काहीच नाही. हे विज्ञापना.

¶*Krishnarao Ballal (Kale) writes to Raghoba that the atmosphere at Delhi is charged with suspicion.*

No. 227] [*3-8-1758*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबकराव सिवदेव कृतानेक साष्टांग नस्कार विनती विज्ञापना. तागायेत छ १८ माहे जिलकाद जाणून स्वामीचे कृपेद्रिस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री दादा स्वामींनी देशास जावयाची आज्ञा केली होती त्यावरून राजश्री गोविंद बलाल याजपासून निरोप जेस्ट वद्य प्रतिपदेस घेऊन निघोन मालवे प्रांती प्रगणे आगरास आलों. येथील बंदोबस्त करून आठा दाहा दिवसानी कूच करून स्वामी दर्शणास येतों. श्रीमंत राजश्री दादा स्वामी लाहूरचा बंदोबस्त करून अबदालीस नतिजा देऊन माघारे जयनगर प्रांतास आले. उमेदसिंग शाहापूरवाला याचे ठिकाणास रा जनकोजी सिंदे लागले आहेत. त्यास मार्गी येतां त्याची मामलत चुकऊन मजल दरमजल उजिनीस सत्वरच येतील. श्रावण अखेर पुणेयासी पोहचावे ऐसा विचार आहे. वरकड व्रत सेवेसी आलियावर निवेदन करू. राजश्री समसेरबाहादर बाबा हिंदुपतची मामलत चुकऊन कूच केले. सत्वरच देशास येतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbak Shivdev announces Raghunathrao's return to the South after briefly referring to his successes in the Punjab. Jankoji Sindia is reported to be investing Shahapur.*

No. 228] [*6-8-1758*

श्री

राजश्री मल्हारजी होलकर यास पत्र जे राजश्री येसवंतराव पवार याजकडे सरकारचा पैका येणे. त्यास सौंस्थान कोटे येथील खंडणीमध्ये मारनिलेचा हिसा येणे व माहालचा सालवारचा ऐवज मारनिलेचा येणे. त्याचे ऐवजी येसवंतराव याणी रुपये १८५००० येक लाख पंच्याअसी हजाराची चिठी दिली. त्याचे वसुलास साल गुा कोटेयास राघो केशव ठेविला होता. त्यास व्यथा होऊन मृत्य पा. सालमजकुरी गणेश अनंत रवाना केला आहेत. तरी सालगुदस्ता जो वसूल जाहाला असेल व सालमजकुरी तुम्हाकडे अगर सिंदे याजकडे जो वसूल होईल त्याचा पत्राराचे हिसेयाचा ऐवज सरकारचे कारकुनाचे पदरी वाढून

बाकीचा ऐवज ज्याचा जसा असेल त्याप्राा घेणे. सरकारचा ऐवज पदरी न पडता कोणी येक पैसा घेईल तरी घेऊ न देणे. येविशी पेशजी येक दोन पत्रे सादर जाहाली आहेत व चिरंजीव दादास लिहिले आहे व राजश्री दताजी सिंदे यासहि आज्ञा करणे ते रुबरू केली आहे; तरी सदरहू ऐवज व्याज्यानसी वसूल होय ते करणे. सालगुदस्ता तुम्हाकडील कमाविसदाराकडे वसूल जाहाला आहे, त्याचा हिसा सरकारचा पोहचला नाही, तरी बेजरब ताकीद करून सालगुदस्ता तुम्हाकडील वसुलास कोण आला होता त्याणे जबरदस्तीने सरकारचा हिसेबाचा ऐवज न देता वसूल नेला. त्याचा शोध करून व्याज्यानसी हाली गणेश अनं(त) कारकून तेथे आहेत त्याचे पदरी घालवणे. सरकारचा लांझ्या[1] न ठेवणे

म्हणून पत्र

पत्र मल्हारबास देणे

छ १ जिल्हेज उर्फ श्रावण सन तिसा

¶*Instructions to Malharrao Holkar that the Pawar's share of the tribute from Kotah be directed to be paid into the Peshwa's treasury in lieu of the debts due from him.*

No. 229] *[10-9-1758*

पो छ २२ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्यांकित आज्ञाधारक माधवराव सिवदेव कृतानेक सां नाा विनंती विज्ञापना. येथील कुशळ ताा छ ६ मोहरम सेवकाचे व परगणे मजकूरचे वर्तमान येथास्थित असे. साहेबाही आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा की श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे स्वारीचे साहित्य उत्तम प्रकारे करणे. त्याजवरून सर्व साहित्य करून पुढें माणसें पाठविली होती. ती माणसे सैन्यांत नवलाईचे मुकामी श्रावण शुध १५ पौर्णिमेस होतीं. वद्य प्रतिपदेस लशकरचा कूच होऊन मजल दरमजल मंडळेश्वराच्या घांटे नजीक चोळीमिश्वर तेथें उतरून सेनासहवर्तमान त्याच मार्गे सेंधवियावरून गेलेत. हे वर्तमान छ ५ मोहरम रोज मंदवासरीं आले हे तथ्य असें. श्रुत होये. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Madhavrao Shivdev Odhekar informs the Peshwa of the help he had rendered to Raghunathrao in crossing the Nerbudda with his troops, on his way to the South.*

---

१ लांझ्या an unclosed business.

No. 230] [September 1758

श्री

श्रीमंते[१] राजश्री नानासाहेबांची पत्रे

१ मल्हारजी होलकर व जनकोजी सिंदे यांच्या भेटी जाल्या. कोट्याचा राजा मेला सबब सुभेदार कोट्यास गेले तों त्यांचे वकील येऊन मामला सिंदे यांजवळ फैसल केला. वसूल मात्र सुभेदार घेतील.

१ नजीबखान रोहिले याणी पातशाहाजादा नवा केला. हंगामा मांडिला आहे. त्याजवरी आपण गेलो. जनकोजी सिंदे याणी दोन हजार फौज आम्हाकडे पाठविली.

१ लाहोरचे व पूर्वेचे काम आहे. त्यास रोहिल्याचें काम जाले म्हणजे जनकोजीबावा व आम्ही मिळोन दोनी कामे आटोपू.

१ हुजूर यावयाविसी आज्ञापत्रें आली. त्यास अगोधर आलीं असतीं तरी येतो. श्रीमंतानी चाकरी नेमिली. चालीस लाखास गुंतलो. फौज ठेविली. पुत्र कोणी जवळ नाहीत. पुत्रांची रवानगी करून पाठवावे म्हणजे आम्ही येऊं. त्यांच्या गळां हे काम घालितों, नाही तरी अखेर-साली येऊ.

१ दंडाराजपुरीचे मसोदे हिंदवी पारसी पाठवावे. त्याप्रो फर्मान सिध करून पाठवितो.

१ मौजे चास घेतली. त्याचे मुबदला गांववाडियाचें काम पडिलें. ते व पारनेर परगणियांत दोन खेडी वतनाची दिल्ही ते देवावी.

१ जनकोजी सिंदे यास ताकीदपत्रे की मारवाडांत तूर्त न जाणे; दि(ली)-कडे जाणे. तुमच्या उपरालियाने रोहिल्याचें काम अंताजीपंत करितील.

१ अदिनाबेग संदीपबेग त्याविसीं सिंदे यास पत्र कीं जो करारनामा वाटा जाला आहे त्याप्रो चालावें.

१ सिंदे यास निक्षूण ल्याहावें कीं पूर्वेची स्वारी व लाहोरची स्वारी त्या-पैकी येक तुम्ही करणे; येक अंताजीपंत, पातशाहा वजीर करितील.

¶*This appears to be a draft summary of the letter despatched by Antaji Mankeshwar to the Peshwa wherein are clearly mentioned the duties assigned to Jankoji Sindia, Malharrao Holkar and Antaji Mankeshwar himself.*

---

१ हा अंताजी माणकेश्वरानें पेशव्यास पाठविलेल्या पत्रांचा सारांश दिसतो.

No. 231] [September 1758

सेवेसी विज्ञापना. आम्ही पंचवीस तिसा लाखाचे कर्जदार म्हणून रान डोईवरी घेतले की देशास जाताच आबरू न राहे व दिवाणचे चालीस लाखाची निशा केली त्याची दाम दाम फडशा व्हावा. नवा मनसबा करावा. आमची खराबी सर्व स्वामीच्या ध्यानांत असतां खावंदापासी लबाडी बहुतानी केली तरी आम्ही स्वामीसंनिध. आता कोठे येक पैशाचे अंतर असिले तरी स्वामीस विदित आहे. इतके करून खावंदाच्या मनात कर्जामुळे काहीतर्‍ही याचे होऊ; परतु यासी दांडे बांधावा तरी मजपासी येक रुपया असेल तरी झाडा क्रिया घ्यावी. से दोनसे उंटे तटे घरची आहेत ती नजर आहेत. मी स्वामीचे आज्ञेनिराळा नाही. येक वस्त्रानसी घराबाहेर निघावयासी तयार आहे, गुंता नाही. हिसेब मुलास पुसतां तरी ते लेकरू त्यास ज्ञान काये? हिसेब वारावयाचा खावंद मी आहे. आसो. आपण माझे मस्तकी हात ठेविला त्यात वरीसभर सर्वप्रकारे आपण सिधीस न्यावे. बोलिलेप्रा सेवा घडोन आली तरी सेवकाचा सेवटच करणार स्वामी समर्थ आहेत. मुलास निरोप द्यावा. सदैव पत्री सेवकास गौरऊन सिंद्यासहि लिहीत जावे. आम्हासहि लिहीत जावे. जनकोजी सिंदे यासी ताकीदपत्र आमच्या कागदाबराबर पाठवावे. त्यात मतलब "तुम्ही पत्रदर्शनी दिलीस जाऊन रोहिल्याचे पारपत्य सत्वर करणे. पुढे आंताजीपत आहे परंतु तुम्ही सत्वर उपरालियास जाणे व लाहोरचा बंदोबस्त अटकपर्यंत खासा जाऊन करणे. बंगालियासी वजिराची अंताजीपताची आधी रवानगी करणे. दिवसगत न लावणे. वजीर पातशाहा याचा निमे वाटा आम्ही करून शफतपूर्वक तहनामा सिकियानसी दिल्हा आहे त्यात आंतर न करणे. कोणाच्या सांगितल्यावरून सरहद, दुवाब, लाहोर येथील हिसा द्यावयासी अंतर न करणे. क्रिया त्याची आमची जाली त्यात आंतर न करावे. आंताजीपताचा जामिनीचा यैवज व फौज वजिराने ठेविली तिचा यैवज वजिराकडे भारी. गुंता अंताजीपताचा जाला आहे याजकरिता वजिराचा हिशियाचा यैवज दिनाबेग संदीपबेग याजकडील अताजीपंताचे मारफातीखेरीज न देणे. काही आपला गळा उगववितील. काही त्यास देऊन त्याचेहि चालवितील. सारांश वजिराच्या हिशात काही खलेल कराल तरी अंताजीपताचा पैका वजिराकडील झाडून देणे होईल व वचनप्रमाण राहणार नाही. मागती बखेडा राहील. तुम्हास कोणी मसलत सांगितली असिली तरी वाईट. आमच्या इमानात अंतर न करणे. वजीर, पातशाहा, अंताजीपत बंगालियास जातील. तो पैका बिनखर्ची आमचा निमे होईल. नाही तरी त्या

+ पत्र अंताजी माणकेश्वराचें. १ दंड.

हिशास खलेल पडेल. मुख्ये तहात अंतर न करावे" म्हणौन पत्र लिहून आम्हाजवल यावयास स्वामी समर्थ आहेत. प्रस्तुत आजी जनकोजीबावाचे येक पत्र आताच कासीद घेऊन या मजलींवरी आला आहे. तेहि त्याच्याच कासिदाबा सेवेसी पाठविले आहे. सारांश आम्हावरी हला आहे. आज्ञेखेरीज वर्तनूक केली नाही. पुढे करणार नाही यैसी क्रिया केलीच आहे. फार काये ल्याहावे ? सेवेसी श्रुत होये हे विज्ञपाना.

¶*Antaji Mankeshwar pleads his innocence against charges of neglect of duty and personal gratification. He advises that Jankoji Sindia be instructed to march into the Punjab while he himself will undertake an expedition into Bengal in concert with the Vazir.*

No. 232] *[Recd. 12-10-1758 ?*

पौ छ ९ सफर सुा तिसा

श्रीपांडुरंग

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामी
माहाराजाचे सेवेसी

विज्ञापना. श्रीमंत राजश्री नानासाहेब याणी वोडस्याकरिता आम्हावर मोठा शह आणिला आहे. त्यास वोडसे आम्हास भारी आहे यैसें नाही. शोध मनास आणितां प्रतापसा व विसाजी बलाल या दोघांवेगळे कोणी पांच हजार रुपये पुरले यैसे सांगत नाहीं. याकरितां प्रतापसा राजश्री समसेरबाहादूर यांजपासी आहे. विसाजी बलाल पुणियास गेलेच आहेत. दोघास पाठऊन द्यावे. त्याचे इजतीचे आबरूचे आपण आभये द्यावे. ते येथे आलियावर वोडस्याची जागा हातभर राहो देत नाही. वोडशातून धन काढून स्वर्गी कुबेरापासी पोंहचविले आसिले तेहि आणवितों. मग मृत्यलोकी जेथे असेल तेथून आणऊ यास आपूर्व काये ? येविसी आपल्याकडे श्रीमंत स्वामीचा शह आहे याकरितां हें कार्य आगत्य केले पाहिजे. प्रतापसा, विसाजी बलाल दोघांवेगळे ती वर्षांचे पोर ठेवीची गोष्ट सांगते तरी खामखा गोष्ट करून घेतो. दोघास आगत्य पाठविले पाहिजे. श्रीमंत् राजश्री नानासाहेबी आम्हांस आज्ञापत्र सादर केले, तेथें लिहिले जे वोडशाकरितां नारो शंकर यांची मामलत तुम्हांस सागितली. तरी मी बारगीर; वरकड कामेकाजें केली ती व्यर्थ गेली. प्रतापसा, विसाजी बलाल खरे जाले. आम्ही रुषवत[1] खाऊन सरकारकामाची नुकसानी केली यैसें जाले आहे. माहाराजानी चितावर धरून येवढी गोष्ट सेवटास नेणार धणी

[1] लांच.

समर्थ आहेत. उभयेतास आभये द्यावे यैसी प्रार्थना लिहिली आहे. परंतु येक शर्त. ते जेथे सांगतील तेथे खाणो. रुपये सांपडले उत्तमच जाले. धण्याचें कार्य जाले. आम्हाकडे लटीकवाद आला, उतम. रुपये न सांपडले तरी त्या खासेत दोवास घालून पुरून टाकीन. ब्राह्मण म्हणार नाहीं. विदित होये. अमर्यादे करून लिहिले यैसे ध्यानात येईल तरी प्रतापसा व विसाजीपंत यास वाकीफ म्हणून माहाराजाही दिल्हे. त्याणी येकेक फितूर केले. अगदी मामलत बुडावी तो विचार पत्री लिहिता येत नाही. समक्ष विनंती करीन. आलो कोणा कार्यास, करितो काये, हे ज्ञान न मिळे. रुपये मेळवावे हे अकल, श्रीमंत् रा नानासाहेबास प्रतापसाने लिहिले जे, येकनिष्ट चाकर म्हणून आमचे न आइकले. अनेक प्रकारे लिहिले त्याची नकल आहे. विसाजीपंत कमरबंदी करून गेले. नाना प्रकारे कल्पना केल्या त्या स्वस्थलास गेलियावर ध्यानास येतील. अतिशये जाला म्हणून लिहिले. आम्हास सर्व राजी, मुल्क फौज वाटसरू, हे दोघे कसे खरे? आम्ही कसे लटके? हे अपूर्व, सर्वजाण धनी समर्थ आहेत हे विज्ञापना.

¶*The writer (Mahadaji Govind Kakde) regrets the unfortunate attitude taken up by the Peshwa in connection with some money matters which were falsely reported to him by Pratap and Visaji Ballal. The writer protests to Raghunathrao against the action of these two.*

No. 233] [*Recd. 19-11-1758*

आनंदराव नारायेण
छ १७ रावल सन
तिसा कार्तिक

श्री

सेवेसी अनंदराव नारायेण विज्ञापना:—

राजश्री माहादाजी गोविंद झासीचे कमाविसदार यासी पत्र जे. अनंदराव नारायेण राजे सवाई जैसिंग यांचे गुरुबंधू श्री पोंडरीक गंगारामजी त्याचे दिवाण मारले दतियाच्या राज्याचा मुतबल्या त्याने वऱ्हाडामधे घोडे मागून नेले. ते मूर्खाही इकडेतिकडे धावडून मारिले. त्याजवरून यानी

वोडश्याचे राज्यास पत्र जे अनंदराव नारायेण यांचे पुतने तीर्थराज पहिलेपासून तुमचे वकिलीचे कामाकाजात आहेत तरी अताहि माल्लेपासून पूर्ववत्प्रमाणे तुमचे तर्फेचा जाबसाल राजश्री माहादाजी गोविंद याजकडे करवीत जावा. कलम १

चोड्या * * रुपये मागितले प्रथम दे * केले होते. त्यासी आजपरियंत यासी रुपये पावले नाहीत. यास्तव यानी हजूर विदित केले तरी वाजेबी मनास अणून यांचे रुपये देवावे. याजउपरी दतियाचे राज्याची वकिली येक वरिशेभर केली होती. मुश्याऱ्याचे यैवजी वरात दिल्ही आहे तरी वाजेबी वरातेप्रमाणे ताकीद करून रुपये देवावे. कलम १

+तुमचे पदरी पहिले वकिली करून होते. हालीहि याचे चालवणे म्हणून पत्र देणे.

येणेप्रमाणे दोन पत्रें द्यावी. देण.

¶*Draft of letters in which the Bhau appoints a new envoy at Orcha and enjoins Mahadji Govind of Jhansi to do justice to the aggrieved party in a dispute referred to him by Anandrao Narayan.*

No. 234] [*1758*

श्री

[1]विनंती उपरी. रात्री श्रीमंताची चिठी आली होती की बापू प्रात:काली जातात. तुम्ही सत्वर तयार होऊन येणे. त्यास श्रीमंताचे राहाणे आज केले की काये? रात्री काय मजकूर जाला तो आपण लिहिलाच नाही. श्रीमंताची आपली भेटी जाली की काये हे लिहिले पाहिजे. माहात राजश्री अंताजीपंती नेले. तैनात भारी केली हे तहकीक आहे. ते तो शेफत वाहतात. याची प्रमाणिकता फौज तो दूर केली त्यानी धरून ग्वालेरसि द्यावे. सर्व खरे. नाही तर हे गोष्ट. हाती दरोबस्त रिकामे. विसा वर्षाचे माहात. पागा सोडून देवकराने जावे यैसे नाही. त्यास गंगाधर गोजाजी रुसले. त्यांची पागा त्यास देऊन त्यास नेले. येथे तो शेफता प्रमाण सर्व दाखवितात. यांचा प्रांत काये करावा? आपल्यास तो आज फार वाईट वाटले आहे. सर्व द्रिष्टीस आपल्यावर आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Vithal Shivdev inquires whether the Shrimant's departure has been postponed, referring probably to Raghunathrao.*

+ या पुढील मजकूर भाऊसाहेबांच्या हातचा. [1] विठ्ठल शिवदेवाचे हस्ताक्षर.

3729

No. 235] [3-10-1758

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

महिपतरावजी गोसावी यासी

श्नेहप्रीतिपूर्वक गोविंद बलाल आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल ताा आस्विन सुध प्रतिपदा जाणून स्वकीये लिहीत आसिले पाहिजे विशेष. या प्रांतीचे सविस्तर वर्तमान श्रीमंताचे पत्रीं लिहिले आहे त्याजवरून कलेल. आम्ही आपले आसो. सदैव कुशल वृत पत्री संतोषवीत आसिले पाहिजे. इकडेहि जमीदारानी मोठासा कजिया आरंभिला. आम्ही इकडे आलियावर येक दोन झुंजे जाली. काही मारिले गेले. काही राहिले त्याचे तलाशात आहो. सदैव आपले कुशल वर्तमान लिहून संतोशवीत आसिले पाहिजे. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ आसो दीजे हे विनंती. राजश्री रामाजीबावास आसीर्वाद लिा परिसीजे. सदैव आपले कुशल वर्तमान लिहून संतोशविले पाहिजे. बहुत काये लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती. समस्त मंडली आसीर्वाद.

¶Govind Ballal to Mahipatrao Chitnis to the effect that he has a hard task before him in putting down the rebels in his district. Govindpant writes this after his return from the Deccan in 1758.

No. 236] [Sept. 1758

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे

पत्रीं जाजती मार

१ सिंदे यांची मामलत जैनगरची केली. च्यार साले छतीस लाख व यंदाचें नव लाख व नजर तीन लाख यो बारा लाख येणेप्रो केले.

१ आमचा बोल उपर राखोन सिंदे यास ल्याहावें.

१ आम्हास पत्रें उलगडून ल्याहावीं म्हणजे उमज पडेल.

+ यादी अंताजी माणकेश्वराची.

१ मुख्य जनकोजी सिंदे यास ल्याहावें की रजपुताणियात न जाणे. आदिनाबेग संदीपबेगास ताकीद करून तहनामियाप्रा वजिराकडील वांटा अंताजीपंताकडे देणे; म्हणजे त्यांचा काल चालवितील व आपला गला मोकला करितील. बंगालियास वजीर पातशाहा व अंताजीपंतास जरूर रवाना करणे म्हणून.

१ श्रीमंत राजश्री नानासाहेब रागे आहेत. त्यास मी कर्जदार आहे. मजपासीं च्यार तटें उंटें आहेत ती श्रीमंतास नजर करावी.

¶*Draft of a letter from Antaji Mankeshwar to Raghunathrao suggesting to the addressee that Sindia's forces be advised to proceed to the Punjab to settle matters with Adinabeg while the writer himself accompanies the Emperor to Bengal to guard Maratha interests in that quarter.*

No. 237] [*26-4-1759*

श्री

बाबूखान खुशवख्त बाशद्

ॐ तहवर व जलादत दस्तगाहा सुा तिसा खमसैन मया व अलफ. किले पायागडची किलेदारी तुम्हाकडून राजश्री जनकोजी सिंदे याणी तगीर करून सेख मूर्तजास किलेदारी सांगून पाठविले ते जाता मार्गी कजिया होऊन धरले गेले. ते किल्यावर न जाता अगोधरच तुम्ही खाली उतरला म्हणून हुजूर वर्तमान आले. ऐशास मारनिलेहि किल्यास न पोहचले व तुम्ही अगोधरच उतरला. किल्याचा बंदोबस्त राहिला पाहिजे. याजकरितां तुम्हास लिहिले असे तरी तुमचे कारभारी किल्यावर आहे(त) (त्यास) लेहून [शिक्का] किल्याचा बंदोबस्त रा(खणे). हुजरून कृष्णाजी अनंत फौज सुधा त्या प्रांते पाठविले आहेत. हे जाऊन बंदोबस्त करितील. तोपावेतो आपले कारभारियापासून बंदोबस्त राखवणे. कृष्णाजी अनंत याचेहि प्रत्ययास आणून दाखवणे. सेख मूर्तजा किल्यास जाऊन सिंद्याचे सनदेप्रा दाखल होत तोपावेतो किल्याचा बरा वाईट कारभार तुमचा जिमा आहे. जाणिजे छ २८ शाबान. दराज काये लिहिणे ?

(लेखन सीमा.)

¶*Babukhan has been reappointed to the command of the fort of Payagad.*

3731

No. 238] [24-1-1736

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

श्रीमंतसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित सटवोजी जाधव कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ २१ रमजान मुाा अलोरी प्रांत भदावर येथास्थित जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीकडून पत्रे येऊन कुशलवृत कलो येत नाही. तरी सदैव आपणाकडील वृत लेहून पाठवीत असिले पाहिजे. आम्हाकडील दोनतीन पत्रे तपशीलवार वर्तमान लेहून पाठविली ती प्रविष्ट होऊन शेवसी श्रुत जाहाले असेल. सांप्रत आम्ही सैन्यसहवर्तमान भदावरचे सरदेस आलो. संस्थानिकाकडून मातबर आले. बहुत स्नेहभावाचा अर्थ सांगोन पाठविला कीं आम्ही आपल्यासी तीन वर्षे स्नेह संपादिला आहे. गतवर्षी ताम्राच्या सैन्यातून द्रव्य रेवातीरी प्रविष्ट केले. सालमजकुरी पर्जन्याची अतिवृष्टि जाहाली. गुदस्ताप्राा मामला करावा त्यास गुदस्ताच घ्यावा येसा अर्थ काये आहे ? जेथवरी दबाव देऊन करार करावयाची ते करून काही अधिकोतर करून विल्हे लाविले. पैका आणावयासी गेले आहेत सत्वरच येऊन पावतील. याउपरी आम्ही सेखाचे महु बुंधेलियाची व भदावरचे सरदेस जाऊन राहातो. बुंधेलियाकडील दिवाण व गोविंद बल्लाळ याचे आगमन जाहालियानंतर जो विचार करणे तो करून. स्वामीचे पुण्यप्रादुर्भावेकडून योजिला मनसबा सिधीस पावेल. तीन मास दिवस आहेत. मुलुक कौली. अगदी पोट भरावयासी जागा येमुनावर नाहीं. स्वामीकडे पत्रे गेली आहेत त्याच्या उत्तराची प्रतीक्षा करितो. आज्ञा येईल त्याप्राा वर्तणूक करून. सविस्तर अर्थ राजश्री भिवराऊ याणी लिाा आहे त्यावरून श्रुत होईल. विशेष काय लिहिणे? कृपा केली पाहिजे+ हे विनंती

¶*Satavoji Jadhav explains to the Peshwa his activities in Bundelkhand and solicits advice from him as regards the recovery of tribute.*

No. 239] [23-5-1759

छ २९ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ २९ रमजान प्रो किराणा अंतरवेद स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित

+ अक्षरे सटवोजी जाधवाचीं.

असें विशेष. सरकारची आज्ञापत्रे छ २९ जमादिलाखरची पाठविली ती छ १९ रमजानी पावली. दुसरें पत्र छ २१ रजेबचे पाठविलें ते छ १६ रमजानी सादर जालें. तेथें अज्ञा मारवाडचा रुपया फार उगवणें होता तो कसकसा उगवला व लाहूर प्रांतीचा बंदोबस्ताविसी व पूर्वेकडे जाऊन मातबर काम करून पैका उदंड मिळऊन सरकारचे कर्ज वारे व रोहिला नजीबखान याचा मजकूर व अंताजी माणकेश्वर यांस हुजूर पाठवावें वगैरे मनसबे बहुता प्रकारचे अज्ञापिले ते सविस्तर कळले. ऐसियास येतद्विशईचा अर्थ अलाहिदा पुरवणीपत्री तपसीलवार विस्तारे सेवेसी विनंती लिहिली आहे त्यावरून विदित होईल. सेवेसी शृत होय हे विज्ञापि.

¶*Jankoji Sindia writes to Raosaheb that a detailed letter, in explanation of the queries regarding the writer's activities in Marwad, Punjab, and his proposed invasion of Bengal, has been despatched herewith.*

No. 240] *[30-7-1759*

पाो छ १२ सफर सितैन

श्रीकृष्णोजयति

श्रीमंत माहाराज धर्मधुरंधर
राजश्री पंडित प्रधान बाळाजी-
राव नाना स्वामी गोसावियाचे
सेवेसी

स्नेहांकित राजा केशवराव कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता छ ९ जिल्हेजे मुकाम झांसी जाणून स्वकुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. हिंदुस्तानचे सकल वर्तमान विनंतपित्रात लिहीत असतां कितेक प्रयाग व कासी व गया हे तीर्थांची स्थलें स्वाधीन असलिया त्रिस्थलीयात्रा सर्वांस निरोपद्रव होईल. येथील तीर्थी यवन संचार राहील आसी वर्तमाने सेवेसी विनंती लिहिली असतां आज्ञा आली की राजश्री जनकोजी व दताजी सिंदे सर्व कार्यानिमित्य ते प्रांती आहेत त्यांस ही सुचावणी वरचेवरी लिहावयाची लिहीत जाणे. मग ते जसे अनुकूल पडेल तसे करितील व आम्हासहि वरचेवरी सर्व लिहीत जाणें. त्याजवरून सरदारास सदैव पत्रे पाठवितो व सर्व वर्तमान सुचावणी लिहायाची ते लिहीत आहो. तेहि मान्य करिताती व त्याजप्रमाणेंच प्रयाग व कासीचा पैगाम वजिरास केला की याची सनद आम्हास करून देणे. त्यास वजिरास सुजाउदौला नाजीम अवंध याचा पक्ष व त्याजअधीन वाराणसी व प्रयाग असे. याजकरि(ता)

सनद देयास अनमान करून उतर देताती. तुम्ही प्रबल आहा. सनदेचे अगत्य नाही. जो देश कबज करायाचा तो कराल व तिकडे सुजायेदौलास त्याचे म्हटले-प्रमाणे आश्वासन लिहिताती व तोहि यास आश्वासन लिहितो की सरदारास इकडे आल्याने मी समजेन. तुम्ही खातीरजमा राखणे. त्याजला आपला सिपाहगरी व फौज व तोपखानियाचा गरवर फार आहे. दुसरे गंगा मधे आहे ते उतरोन जाऊन त्याचे मुलकात जावे लागते. ते पर्जन्यकाल गेलियावाचोन अनकूल पडत नाही व त्याचे म्हणजे सुजाउदौलाचे मुदई रोहिले व अहमदखान बंगश आहेत. आशास रोहिले म्हणताती, आमचा मुलक गंगापार आहे तो तुम्ही रक्षा, आम्ही वाट देतो व अहमदखान बंगशाचा मुलक गंगापार नाही, गगावार आहे. तो म्हणतो की मी तुम्हास आपले मुलकातून गंगा उतरोन देतो व तुमचा रफीक आहे. माझी दस्तगिरी करा असे सर्व रुजू जाले असेती. वरषाकालानंतर जरी सरदारास गंगापार उतरणे तरी उतरतील व प्रयागास जायास तो (अपूर्ण)

¶*Raja Keshavrao writes to the Peshwa that negotiations for the delivery of the three holy places—Benares, Prayag, Gaya—are being uselessly protracted with a view to defeat Sindia's objective.*

No. 241] [*9-11-1759?*

पैवस्ति छ २१ जमादिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक पाराशर दादाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत कार्तिक वद्य ५ पंचमी मुकाम पा। बोले प्रांत आंतरवेद येथें स्वामीचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. यानंतर रुरू पा। फर्फुंद प्रां मा। येथील कुशलसिंग मवासी जमीदार होता. सरकारी आमल सुदामत देत नव्हता म्हणोन त्याचें पारपत्य करणें हुजरून जरूर होतें; त्यावरून त्याजकडील तालुके व मातबर ठाणीं व पेशजी दुंदीत सरकारचीं ठाणीं त्यांणीं लबाडी करून घेतलीं तीं कुल मोर्चेबंदी करून दोन आडीच महिने मेहनत करून घेतलीं. कुल त्याजकडे गढ्या होत्या त्या फत्ते केल्या. भितांडाचें झुंज याजमुळें घोडें माणूस बहुत जायां जाहालें. कुसलसिंग रुरात होता तेथेहि जाऊन त्याजशीं गांठ घातली. तेथें मोर्चेबंदीचें काम न चालें म्हणून घोड्यांवरून तलावे करणें लागलें. अखेरीस येक रोज घोड्यांवरील झुंज मातबर

जाहालें ते समयींहि थोडें माणूस कांहीं ठार जाहालें व जखमीं जाहालें; परंतु त्यांस मोडून गांवांत घातलें. निदान त्यांस दम धरवेनासा जाहला; तेव्हां रात्रीच्या ठायीं कुसलसिंग पळोन गेला; याउपर त्याच्या तालुक्याचें काम कांहीं राहिलें नाहीं. आणखींहि कितेक ढोंग आहेत त्यांचें पारपत्य करावें लागतें. स्वामीच्या प्रतापेंकरून त्यांचेंहि पारपत्य होऊन येईल. तदनंतर समजाविशी नालबंदीच्या ऐवजाचे नेमणुकेविषयीं पेशजी विनंतीपत्र लिहिलें होते; परंतु नेमणूक होऊन सनदपत्र आलीं नाहीं. लोकांनीं तों गवगवा बहुत केला आहे, तरी कृपाळू होऊन राजश्री गोविंदपंतावर समजाविशी नालबंदीची सनद द्यावी. आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Parashar Dadaji reports to the Peshwa the chastisement of Kushalsing of Ruru.*

No. 242] [*26-1-1760*

छ २१ जाखर सुा सितैन
माघ मास

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ ७ जाखर मो कुंजपुरा परयेंत स्वामीचे कृपावलोकनें करून येथास्तित असें विशेष. सरकारची आज्ञापत्रे छ २ सफरची पाठविली ती छ ९ राखरी सादर जालीं. तेथें आज्ञा, कितेक मनसब्याचा अर्थ रोहिले व सुज्या-उदौला याजकडोन माहाक्षेत्रे घ्यावयाचा विचार व पूर्वेकडील वगैरे आर्थ तपासिले आज्ञापिलें ते सविस्तर कललें. ऐसियांस येतद्विशईचा अर्थ तपसीलवार अलाहिदा पुरवणीपत्री सविस्तर सेवेसी लिहिला असें त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Jankoji Sindia to the Peshwa saying that the project for the capture of the holy places from the Rohillas and Shuja-ud-daula as desired by the addressee, is being separately communicated.*

3735

No. 243] [*30-12-1759*

छ २२ जमादिलाखर
माघ मास सुा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री दादा साहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती. शेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ९ जमादिलौ(वल) मुाा नजीक सोनपत स्वामीचे कृपावलोकने-करून येथास्थित असे विशेष. स्वामीनी सदैव कृपा करून पत्री सांभाल केला पाहिजे. इकडील वर्तमान सविस्तर राजश्री दताजी सिंदे व राजश्री जनकोजी सिंदे यानी सेवेसी लिहिले आहे त्यावरून निवेदन होईल. +सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Ramaji Anant, Sindia's Diwan, writes to Dadasaheb from Sonpat where Sindia was encamped.*

No. 244] [*1759 ?*

श्री

चिरंजीव राजश्री रामाजी आनंत यासी विसाजी दादाजी आसीर्वाद उपरी. तुम्हास येक दोन पत्रे पाठविली की लौकर येणे, त्यास अद्याप आलेस नाही. राजश्री राऊ बाहेर निघाल्यास आठ रोज जाले. बुधवारी येथून कूच होईल. आमची तयारी काडीइतकी जाली नाही. ब्राम्हण नाही, चाकर नाही, तरी तुम्ही येक ब्राह्मण कोणता मिलेल तो व थोडी चाकर देखील सारी घेऊन लौकर येणे. तीर्थरूप राजश्री केसोपंत दादा व तुम्ही लौकर येणे. विलंब न लावणें. मग लस्कर आटोपतेसे नाही. यंदाची स्वारी जलद आहे. हे आसीर्वाद. माणसे व रामाजी नसला तरी दुसरा तरी ब्राम्हण मेलऊन घेऊन येणे हे असीर्वाद.

¶*Visaji Dadaji orders Ramaji Anant to come at once, in order to prepare to go into camp with the Rao (Vishvasrao).*

No. 245] [Recd. 7-1-1760

छ १७ जावल

श्री

पु॥[१] श्रीमंत माहाराज राजश्री पंत
प्रधान स्वामींचे शेवेसी

विज्ञेति यैसीजे. दिलीचे वर्तमान आवरंगाबादेस आले. तेथून साहावे दिसी कासद छ ९ जमादिलावली लस्करात आला. आबदाआली छ ६ रबिलाखरी सरहंदस दाखल जाहाला. छ ९ माहे मजकुरी आलमगीर पातशा व फतेआलीखा व खानखाना व कमरुदीखानाचा थोरला लेक यो चौघे जण मारले गेले. नवा बादशा गाजुदीखा वजिराने तख्तावर बसऊन नवा बादशा व गाजुदीखा उभयेतां जनकोजी सिंदे याचे सैन्यात आले. आबदाआली दक्षणेस येणार. त्याजपासी साठ हजार स्वार आहेत. मऱ्हाव्या फौजेच्याने त्यासी मुकाबिला करवतो यैसे नाहीं याप्रमाणे नवाबास आर्जे आली. दुसरे दिवसीं आणिक कासिद आवरंगाबादेहून आला. दरगाकुलीखा व चिमणलाल आकबारनिवीस याचे पत्र दिलीच्या वर्तमानाच आले कीं, आबदाआलीने आलमगीर बादशा वगैरे मारिल्याचे वर्तमान यैकोन थानेसरांत आपले लेकास तख्तावर बसविले. त्याचे नांव तैमूरशा ठेविले. मलिकजमानी आबदाआलीसमागमे आहे. आबदाआलीची पत्रे रोहिल्यास व माधवसिंग वगैरे यांस आली कीं मऱ्हाव्यास तंबी करावयास सत्वरीच येतो. थानेसर दिलीहून पलीकडे असी कोस आहे म्हणून; याप्रमाणे वर्तमान आले होते. आलमगीर पातशा वगैरे आबदाआलीच्या फितुरात होते. गाजुदीखानास जख देणार म्हणून गाजुदीखानास उमजल त्याजवरून त्यानेच बातशा वगैरे युक्तीने विल्हेस लाविले म्हणून येथे चर्चा आली. शेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Dhondo Ram reports to the Peshwa that on the approach of the Abdali the Emperor Alamgir and his advisers were put to the sword and the Vazir with the new puppet Emperor has arrived in Sindia's camp.*

---

१ पेशव्याचा निजामच्या दरबारांतील वकील धोंडो राम यांचें पत्र.

No. 246] [*Recd. 20-1-1760*

छ १ जमादिलाखर

श्री

पुा श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती येसीजे. येथें रा। बाबूराऊ फडणीस याणी सांगितलें जे, श्रीमंत राजश्री नानासाहेबाची मरजी आहे जे, भाऊसाहेबाकडे बापूजी माहादेवास जाणें लागेल. अंताजीपंताकडे मरजी आहेसे दिसते. तुमचे चालणें होणार नाही म्हणून सांगतात. त्यास सेवकाची पत मानपान राहे ते करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी शृत होय. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिा ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Bapuji Mahadev Hingne's letter to Bhausaheb, referring to the inquiry into the conduct of the writer and Antaji Mankeshwar which led to the mismanagement of affairs in the North.*

No. 247] [*16-1-1760*

पौ छ १८ जमादिलाखर
सुा सितैन माघ वद्य
आमवशा मंदवार

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा पौष बहुल त्रयोदसी मुा पनाळी पाा कोटपुतली प्राा जैनगर स्वामीचे कपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान तरी गिलज्या अंतरवेदीत गेलियावर नजीबखान व गंगापारचे रोहिले सादुलाखान व दुंदेखान वगैरे सर्व त्यास सामील होऊन दिली घ्यावी हा इत्यर्थ करून दरकूच दिली संनिध येमुनातीरास पनास हजार फौजेनसी आले. आपल्या सब्या फौजा आलीकडे होत्या. घाट धरून राहिले होते. त्यास पौष वद्य आष्टमी गुरुवारी प्राथ:काल्चे प्रहर दिवसास गिलजे व रोहिले यानी घाटावर चालोन आले.

बंदुखांचा व बाणांचा वगैरे मार करीत दोन धारा येमुनेंच्या उतरोन आले, तेव्हां आपल्या फौजा त्याजवर गेल्या. लढाई जाली. दताजी पाटील लढाईत कामास आलें; मोठी फटकाल गोष्ट जाली. राजश्री जनकोजी सिंदे यांचे उजवे हाताचे दंडास गोली लागोन पार होऊन गेली. स्वामीचे पुण्यप्रतापे खैर जाली. तदनंतर सर्व लस्कर बुलगेंसुधा संभाळून रेवाडीवरून जाटाचे मुलकांतून जैपुरचे सरदेस आलो. येथे राजश्री मल्हारजीबावा होलकर यांची भेट जाली. येकां दो दिवसांत त्यांचे व आमचे बुलगें या मुलकांत ठेऊन सड्या फौजा करून अविलंबे दिलीस गिलजे रोहिले यांचे पारपत्यास जात आसों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Anant Dabholkar to the Peshwa : writing about the engagement between the Gilchis and the Maratha forces, in which Dattaji Sindia lost his life.*

No. 248] [*20-3-1758*

श्रीगजानन

विनंती. सेवक बगाजी गंगाधर कृतानेक साष्टांग नमस्कार विनती. विज्ञापना की फालगुण शुध ११ येकादसी सोमवारी कसबे मेरटस येऊन राजश्री गोपालपंत नानास ठाणे मजकुरी दाखल केले. प्रा जलालाबादेसहि त्याच्या ग्रहस्त ठाणियात बसविला. प्रो बेढात गिरमाजीपंत ठाणियात दाखल केले प्रो बारनावदा व सामली वगैरे माहाली ठाणी बसविली. मेरटच्या बंदोबस्तास * * * गोपालपंत नानास पुसोन पुढे जाऊन * आपले प्रतापे ठाणे बसवितो. राजश्री त्रिंबक भास्कर आद्यापि आले नाहीत. आम्ही आपल्या पतकानसी मात्र आहोत. पुढे शुक्रताल जवल येत चालले. फौजेचा भरणा पाहिजे. सिंदे होलकर याजकडीलहि कोन्ही आद्यापि आले नाही. पूर्वी कागद पाठविला त्यांत लिहिले त्यावरून ध्यानास येईल. सुकुरतालाकडे कासीद पाठविले आहेत. तेथील बातमी आली नाही. आल्यावरी सेवेसी लेहून पाठऊ. बहुत काये लिहिणे. बहुत काये[१] लिहिणे? कृपा लोभ आसू दीजे हे विज्ञापना.

¶*Bagaji Gangadhar mentions the plans which he intends to pursue in restoring order and recapturing the places round about Meerut.*

---

१ मुळांतच दुबार आहे.

+ पत्राच्या पाठीवर ताजाकलमांत बारा ओळी मजकूर आहे तो नकलला नाहीं.

No. 249] *[Recd. 27-2-1760*

पौ छ ९ रजबू

श्री

आसीर्वाद उपरी. दोन लक्ष रुपये येथून पाठवावे त्यास

२५००० चंदेरीच्या रसदपैकी

५२६५० मल्हार कृष्ण यांजकडून

७७६५०

येकूण सत्याहातर हजार सासे पनास रुपये सदरहूप्रा देविले असेत. पावतील. दोन लक्ष पैकी बाकी राहिली तेहि मागाहून पावते होतील. दोन लक्षांहून ज्याजती ऐवज जमा होईल तो तुम्ही खर्च न करणे. त्या यैवजावर येथून वराता होतील त्याप्रमाणे देणे हे आसीर्वाद.

¶*Funds amounting to Rs. 77,650 are despatched to the Bhau.*

No. 250] *[3-3-1760*

पौ छ १५ रजब

सितैन फालगुण

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब

स्वामींचे सेवेसी

आपत्ये येसवंतराव भास्कर दोनी कर जोडून सिरसा़ा ना़ा विज्ञापना. ता़ा छ १४ रजब मु़ा़ा वोझर पा़ा राजणी दुधनानदी स्वामीच्या कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित असो विशेष. स्वामीकडून आज्ञापत्र छ ७ रजबचे घेऊन आले ते छ मजकुरी साइंकाली साहा घटका रात्रीस पावले. जासूद मजकुराची पारपत्ये केली. कालच्या श्रीमंताचा मुकाम रविवारचा कालेगांव पा़ा जालनापूर दुधनेवरी होता. आज सोमवारी कूच करून मुकाम मजकुरास आलो. उदईक कूच करून पडदूरच्या उतरेस कोसावरी दुधनेच्या तीरी मुकाम नेमिला आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Yeshvantrao Bhaskar informs Bhausaheb of details of the Peshwa's marches and halts from Kalegaon to Paddur where they were to meet and decide about sending reinforcements to the North.*

No. 251] [5-3-1760 ?

(पहिला बंद गहाळ)

सर्वास धैर्य जाले. माहाराजाचा अखंडित प्रताप आहे. माहाराजाचे सरदार या अबदाली व रोहिलियास उतम प्रकारे खराब करितील. मोठे युक्तीने सरदारांही बरी तजवीज केली असे माहाराजाचा विजय दक्षणेस आला व पूर्वी आज्ञा लिहिली होती की श्रीमंत रघुनाथराऊ दादासाहेबास हिंदुस्तानाकडे लोकर रा करितो. आता सहजच तिकडील काम तो मानसानुरूप जाले. आतां दादा-साहेबाबा पोख्ता सामान व फौज व तोफखाना व फिरंगी जो सामान देवाचा तो देऊन पाठववे, की ते आलियावरी राजश्री होलकर व सिंदे वगैरे मिलोन उतम प्रकारे पारपत्य अबदालीचे व रोहिलियाचे होईल. मोठा दीर्घ रोग अबदाली आहे. माहाराजे हिंदुस्थान व दक्षण या रोगापासोन सोडविलेसे होईल. पनास लक्ष रुपये प्रतिवरशी माहाराज धर्म करिताती म्हणून येकतो. माझे मते जरी हा रोग माहाराजाचे हाते दूर जाला तरी त्याजपरीस शतगुणधर्म याजमधे आहे. येथार्थ आम्ही लिहिले आहे. आम्ही रात्रीदिवस हेच शुभचिंतन करितो. वरचावरी माहाराजास लिहावयाचे ते लिहितो. सर्वदा सरदारास जे तजवीज सुचते ते लिहितो. तेहि मान्य करोन अखंड वर्तमान लिहिताती. सारांश श्रीमंत दादासाहेब आलियावरी सर्व मिलोन पारपत्य करितील हे विनंती.

सेवेसी राव बद्रीनाथराव सा। नमस्कार.

¶*This appears to be the missing second sheet of Letter No. 118 of Vol. 2 (The Battle of Panipat) from Raja Keshaorao.*

No. 252] [Recd. 25-4-1760

पौ छ ८ रमजान

वैशाख सितैन

श्रीरामचंद्र

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बाबूराऊ स्वामी गोसावी यासी

पोष्य कृष्णराऊ भगवंत आमात्य कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. बहुत दिवस आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं ऐसे नसावे. निरंतर पत्र पाठऊन कुशलोत्तर लेखनें संतोषवीत जावे. यानंतर राजश्री प्रधानपंत यांचा मुकाम नगरावरी होता. प्रस्तुत तेथून कूच करून पुढें गेले. राजश्री सदासिव पंडित

व राजश्री रघुनाथ पंडित याणीं मोगलाकडील तहाचा मजकूर उरकून पुढें हिंदुस्थानांत जात आहेत. इरानी दिलीस येऊन राहिला. आलीकडे येणार येसें वर्तमान परस्पर येकितों परंतु तत्वता कलत नाहीं. आपणाकडे बातमी वरचेवर येतच आसेल तरी राजश्री प्रधानपंत याचा मुकाम कोठे आहे, येंदा छावणी त्या प्रांते होणार किंवा माघारे स्वस्थलास येणार, राजश्री भाऊ याजकडील मनसबा कैसा आहे, मोगलाचा तह कोणे प्रकारें जाहाला, इरानी-कडील मजकूर कोणे प्रकारचा आहे हे सविस्तर लिहिलें पाहिजे. बहुत काये लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Bhagwant Amatya seeks news from Baburao as Sadashivrao and Raghoba are reported to be going north to oppose the Abdali.*

No. 253] [*1750?*

श्री

पुा चिंरजीव राजश्री सदोबा यासी आसीर्वाद उपरी. राजश्री येशवंतराऊ पवार यांजकडे येक लक्ष अठावीस हजार रुपयें येणे त्यापैकी अडसष्ट हजार शहरी, बतीस हजार नासिकास याप्रमाणे लाख रुपये वसूल आला. राजश्री बाबूजी नाईक याजकडील नारायेणजी पुसत होते त्यास उत्तर दिल्हे की, खावंदाची आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करू म्हणून लिहिले ते कलले. ऐशास येथे खर्चाची वोढ यास्तव रुो येथेच पाठवणे म्हणून येशवंतराऊ पवार यास लिहून पाठविले होते परंतु पैका तिकडे येऊ न पावला. त्यास त्या येवजावर विठल सिवदेव याची वरात रुपये ३०००० तीस हजार व चिमणाजी बापूजी रुपये २०००० वीस हजार येकूण पनास हजार रुपयाच्या दोन वराता केल्या आहेत तर सदरहू ऐवजापैकी दोही वरातांचे पनास हजार रुपये देऊन बाकी पनास हजार राहिले ते जमा करून ठेवणे. येथून वराता येतील त्याप्रमाणे देणे. दुसरीकडे येकंदर पैका न देणे. नायकाचा गुंता या रुपयाकडे काही राहिला नाही. मल्हारबा रुपये त्यास जसे देणे तसे देतील. हे रुपये लिहिल्याप्रा पावते वरातदारास लौकर करणे. नालबंदीचा ऐवज लोक येथे चाकरीवर यास्तव रुपयास विलंब न लावणें बहुत काय लिहीणे हे आसीर्वाद.

¶*The Peshwa advises Sadashivrao how to dispose of the amounts received from Yashvantrao Pawar.*

+ येथून नानासाहेब पेशव्याचें हस्ताक्षर.

No. 254] [12-5-1760

श्री

पुा चिरंजीव राजश्री सदोबा यासी आसीर्वाद उपरी. तुम्हास दोन लक्ष रुपये येथून पाठवावे येणेप्रमाणे.

५२६५०	मल्हार कृष्ण यांजकडून
२५०००	बाा चंदेरी निाा कृष्णाजी नाईक रास्ते
२५०००	प्रांत खांडवे निाा बापूजी मेघशाम
७२५००	कर्ज गुाा लक्ष्मण शंकर
२४८५०	गोविंद बलाल यांजकडील येकतालीस हजारपैकी.
२०००००	

येणेप्रमाणे दोन लक्षांचा भरणा करून पाठविला. त्याचा बयाज तुम्ही येणेप्रमाणे लिहिला. रुपये

२२५००	लक्ष्मण शंकर याजकडील यैवजी वसूल
२५०००	चंदेरी निाा कृष्णापा नाईक वसूल
२५०००	प्राा खांडवे निाा बापूजी मेघशाम वसूल
५२५००	मल्हार कृष्ण याजकडील यैवजपैकी
१२५०००	

येकून सवा लक्ष रुपये आले. लक्ष्मण शंकर याजकडील पनास हजार राहिले ते रोख येतां दिसत नाहीं. आठ पंधरा दिवस लागतील. तजविजे तजविजेने येतील ते घेऊं. मल्हार कृष्ण याजकडील दीडशे रुपये राहिले ते तेथें आपण घेतले पाहिजे म्हणून लिहिले. ऐशास

लक्ष्मण शंकर यांजकडील ऐवज इतक्या दिवसात येऊन चुकलाच असेल. तथापि न पावला ऐसे म्हणावे तर मारनिलेनी आपल्या गुमास्तियाची पत्रे आणून दाखविले त्यावरून ऐवज पावला ऐसे दिसते. त्याहीमध्यें पावला नसिला तर तो यैवज पावेलच.

मल्हार कृष्ण याजकडील दीडशे रुपये येणे ते येथें घेतलें. याचा मुबदला गोविंद बलाल यांजकडील यैवजी सदरहू दीडशे तुम्ही घेणे.

गोविंद बलाल याजकडील येकेतालीस हजार पैकी चोवीस हजार

गोविंद बलाल याजकडील येके-ताळीस हजारपैकी येक पंचवीस हजाराची हुंडी व येक सोळाची यैशा दोन आल्या. त्यापैकी सोळाची फिरली. पंचविसाची सही होऊन पैका वसूल आला. बाकी सोळा राहिले त्याचे गोविंद बलाल यास पुसोन काय वर्तमान ते लिहून पाठवावे. ऐशास पंचवीस हजार पावले बाकी सोळा हजार राहिले. मारनिलेचे गुमास्ते वासुदेव सिवाजी येथे होते त्यास पुसिले. त्याणी सांगितले की फिरले हुंडीचा यैवज मागेच करून पाठविला. इतके दिवसात पावलाच असेल यैसे सागितले. तोहि यैवज येऊन पावलाच असेल.

साडे आठशे दोन लक्षाचे भरणियात तुम्ही घेणे म्हणून पेशजी लिहिलेच आहे. त्याप्रा सदरहू रुपये तुम्ही घेणे.

येणेप्रमाणे दोन लक्षांचा भरणा जाला असे. छ २९ रमजान बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*The Peshwa sends funds to the Bhau. It is clear that Bhausaheb was strictly controlled in his exactions by orders from the Peshwa.*

No. 255] *[26-6-1760*

पौ छ १६ जिल्हेज इहिदे
आधिक श्रावण

श्री

शेवेशी विनंती. सन इहिदे शितैनच्या हिंदुस्थान प्रांतीचे मामलेदाराकडे रसदीचा[1] ऐवज येणे. ऐशियास आम्हाकडे ऐवज पाहिजे, यास्तव इकडेच ऐवज घ्यावा लागतो. मामलेदारास ताकीद होऊन इकडेच ऐवजाचा भरणा करावयास आज्ञा केली पाहिजे. आबदालीच्या मसलतीमुळे रसदाचा पैका घ्यावा लागला. शहास गुंतल्याने दुसरा पैका कोठे मिळणे कळतच आहे. वरचा पैका व कर्ज खावे लागले. त्यास येकंदर जमेचा व खर्चाचा अजमास

---

१ रसद, Money paid into the treasury by the कमावीसदार, raised from his district or charge.

3744

करून देशी पैका जमा व्हावा व त्यास खर्च लाऊन तो अजमास व आमचे स्वारीकडील जमेचा व खर्चाचा अजमास करून दोन्ही अजमास पाठविले आहेत. मागील बाक्याचा ऐवज देशी व हिंदुस्तान प्रांते येणे आहे. त्यास हिंदुस्तानात आबदालीचा दंगा जाला यामुळे सालमजकूरचा अमल यथास्थित चालोन ऐवज माहालचा वसूल जाला नाही व गारा व तांडी पडली यामुळे जागा जागा माहालास तोटे आले. नवे जुने मामलतीची घालमेल जाहाली यामुळें बाकीस ठिकाणच नाही. गोविंद बलाल यांजकडील बाकी सालेसाल वोढणीची वोढत आली असे. बहुतच तपशील आहेत. त्याहीमध्यें निकड करावी अगर मागील चौकशी करावी तर गडबडेमुळे चौकशी होत नाही. आबदालीचा पेंच वारल्यावर जे होणे तें होईल. साल मजकूर सन इहिदेचा लाहान मोठे मामलेदाराचा रसदेचा व पुढील अखेर साल तागाईत आम्ही आपणाकडे नेमिला आहे. त्यास खर्च फार, जमा थोडकी. त्याहीमध्यें विचार पाहातां केवळ घरचा पैका जामदारखान्यातील खावा असाच प्रसंग प्राप्त जाहाला. त्यास स्वामीचे प्रतापेंकरून पारपत्य पठाणाचे लौकर जाहाल्यास हिंदुस्तानचे माहालचा ऐवज फारसा आम्हाकडे लागणार नाही. स्वारीशिकारीमुळें खंडणीचा ऐवज आकारेल. पठाणाचें पारपत्य जाहालें तरी दसरापर्यंत बाहेरील कोठील पैसा मिळणें कलतच आहे. दिलीकडे आलों. या प्रांतात फौजा नेहमी आहेत त्यामुळें, मुल्क वैराण बहुत जाला. जाटाकडे खंडणीचा पैका येणे. त्यास यासमई जाटास मागतां येत नाहीं. जयनगरवाले याजकडील पैका येणे कलतच आहे. मसलतीमुळें अडचण पडली. त्यास या प्रांतीचे माहालकरी यांजकडील येकंदर भरणा तेथे रसदेचा न घ्यावा. कदाचित कोणी माहालकरी याचा इकडे भरणा करावयाचा सावकार नसेल त्यास सांगोन उजनी इंदूर या ठिकाणच्या हुंड्या घेऊन पाठवाव्या. देसचा जमेचा व खर्चाचा अजमास करून पाठविला आहे व मागील शितैनची माहालकरी यांकडे बाकी राहिली आहे. त्यास हिंदुस्तानाप्रों तिकडील तपशील नाही. फडशे माहालकरी याचे जालियास काही ऐवज वसुलात येईल. सन इहिदेची जमा व खर्च लिहिला आहे. त्यास सरासरी पाहातां खर्च जाऊन बाकीच राहावी असा अजमास आहे. फौजेचे खर्चाचे दोन प्रकार लिहिले आहेत. त्यास मसलत पडल्यास तीस हजार फौज लागेल. नाहीतर काहीच गुंता नाही. अबदालीचा पेच उलगडलियावर देशी काही मसलत पडणार नाही. पठाणाची मसलत लांबली तर आम्हाकडे खर्च भारी व आपणाकडे खर्च भारी होईल. इकडील स्वारीचे लोकास निजामअलीचे झुंजात घोडी पडली व रोगाने बहुत मेली यास्तव घोडे घ्यावयास थोडें बहुत जरूर द्यावे लागते. शितैनची रवानगी

लोकास द्यावयाची त्यास पोटास रोजमरा पुर्ता मिळत नाही तेव्हा रवानगी व नालबंदी कोठील? दिलीकडे दंगा जाहाला यामुळें इकडील सावकार परागंदा जाहाले. कर्जवाम कोठें पैसा मिळत नाही. स्वामीच्या प्रतापेकडून पठाणाचें पारपत्य लौकर जाहालें म्हणजे सर्व गोष्टी उतम आहेत. जिकडे कामास जावें तिकडे मेळवावे खावें. रड ल्याहावी उतम नाही. परंतु दतबा पडल्यापासून फार रोज कजिया होऊन बखेडे बहुत जाले. सलाबत त्यांची वाढली. त्याचे पारपत्य जालें तर दसरापर्यंत ऐवज कोठील मिळणार? कर्जासहि सावकार सर्व जागाजागाचे निघाले. इकडील रसदा इकडे देविल्या तर देशी कर्ज वारून ऐवज अधिक आहे. च्यार यादी होत्या त्यावरून अजमास इकडील व देसचा जमाखर्चाचा बारमाही लिहिला आहे. दाहा वीस लाख आलीकडे पलीकडे जमा कम तर काही कलमाची जाजती होईल. सर्व अर्थ ध्यानांत आणून रसदाचा ऐवज इकडे द्यावयाविशी मामलेदारास ताकीद करावी. येथून पत्रें पाठविली आहेत. यंदाचा मनसबा विलक्षण यास्तव लिहिलें. नाहीतर घरचा पैका खावा तो फार वाईट वाटतो. इलाज नाही. यास्तव सेवेशी लिहिले आहे. येथेहि मामलेदारास ऐवज इकडेच भरणा करावा म्हणून ताकीद केली. पूर्वी याच मजकुराचें पत्र पाठविले आहे, ते पावेल न पावेल यास्तव दुसरियाने विनंती लिहिली असे. र्‍हा+ छ १२ जिलकाद बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*This is an important letter addressed by Bhausaheb to the Peshwa, describing his financial difficulties as on account of the disturbed condition of the whole of Northern India and the constant presence of the Abdali with his large forces, no regular payments of revenue for the past two years have been received. Bhausaheb therefore proposes that the revenue from the Northern districts be assigned towards meeting the expenditure of his army.*

No. 256] [12-9-1760

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपत पाळंदे स्वामी गोसावी यासी

पोष्य त्रिंबकराऊ सदासिव कृतानेक नमस्कार विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पा। विशेष. बहुता दिवसी पत्र पाठविलेत ते पावोन बहुत संतोष वाटला. याच प्रकारें सदैव कुषलार्थ लेहून सानंदवीत

+ सबंध पत्र नाना फडणविसाच्या हातचें असून यापुढील मजकूर खुद्द भाऊसाहेबांच्या हातचा आहे.

जाणे. इकडील वर्तमान दिली किल्यासहित श्रीमंती घेतली. बंदोबस्त केला. आबदाली फौजसुधा यमुनापार येऊन उतरला आहे. येमुनेस पायाॅब[1] नाहीं. सलुखाचाहि जाबसाल सुज्यातदौला, नजिबखान याजकडून काही आहे. ठहरल विचार तो लेहून पाठऊं. फार करून लडाईच व्हावी असे दिसते. श्रीमंताचे ताले विचित्र आहेत. शत्रूचे पारपत्यच होऊन पराभवातें पावेल. सविस्तर राजश्री बालकोबा व राजश्री बापूजीपंत लिहितील त्याजवरून कलेल रा। छ २ सफर मुकाम दिली. बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Trimbak Sadashiv Purandare writes to Naropant Palande that Delhi has surrendered and negotiations for a treaty have been set on foot with the Abdali, but are not expected to succeed.*

No. 257] *[15-9-1760*

पो छ १४ रबिलावल
सन इहिदे आश्विनमास

श्री

अजमास खेरीज हिंदुस्थान सुर इहिदे सितैन मया व अलफ. स्वामीनी अजमास पाठविला त्याप्रमाणें बेरीज

	रुपये
६७९४४०२	रसदाचा यैवज
२००००००	नवी जागीर पैकी रसद
९०२९०००	किता यैवज बिदनूर वगैरें
८१०००००	कितां यैवज
३००००००	श्रीरंगपटण
२४८७९४०२	

तपसील यैवजांचा सरस नीरस

रसदेंचा यैवज रुपये

६७९४४०२	नेहमी सालाबाद
२००००००	नवें जागीरपो
८७९४४०२	

पैकी यैवज न येणे म्हणोंन स्वामीनी वजा केलां

	रुपये
३३९९३९०	

निका यैवज सरसाल यावयाचा रुपये

१२९००००	दमाजी गायेकवाड
७९००००	सालाबादप्रो
४०००००	नवे माहालचे
१०००००	नवा हिशाबाबंद
१२९००००	

येकून साडे बारा लक्ष गायेकवाडाचा करारमदार येथे होऊन स्वामीस पत्रे

---

१ उतार.

पैकी आमचें मतें कमी व्हावें. रुपये

३००००० आशेरचे मसलतीमुळें जाजती खर्च आपण रुपये ४००००० चार लक्ष लिा आहे. त्यास पेशजी खर्चाचा अजमास केला त्यांत गाडदियाचा खर्च जाला आहे त्यास राऊत व हशमी माणसे वगैरे चार लक्ष पैकीं तीन लाख लागतील.

[वरील कलमाच्या डाव्या हातास असलेला शेरा]

मागील अजमासात गाडदी वगैरे खर्च जाला आहे त्यास मसलतचे छावणीमुळे राउताचा वगैर खर्च होईल यास्तव तीन लक्ष रुपये लागतील

६०००० आकोलें कविजंगाकडे दिल्हे व फाजील मागील आहे यास्तंव वाजबी कमी होंतील.

९०२५० हिंदुस्थांनचें स्वारीकडें पहिलें नेमिले नवतें त्यास हाली आपल्या लिहिल्यावरून रसद

६५०० कुतेंलीकडरायेंल

३४७५० जकात सितेन भेलसे

१२००० मीरखांन डागीर

३७७०० समसेरबाहादर बोदवंड

९०२५०

८००० दादों अनंत व रामाजी कृष्ण येणार नाहीं सा वजा करावें.

[या कलमाचे डावे बाजूस शेरा]

3748

पाठविली आहेत पोहचली असतील. नवा हिशाचा गुता पांडबाकडे आहे खरेच. गायकवाडाचे कारभाराचे मध्यस्त पांडबा आहेत सदरहूप्रो कारभर विल्हे लाऊन देतील.

१००००० कर्जपटीचा यैवज कमबेष होईल

१५००००० चित्रदुर्ग वगैरे

१२००००० सां बिदरूर मुदतीप्रों

६५००००० किता यैवज सन सितैनची बाकी व सालमजकूरची हत्फेबंदी मिलोन दसरापर्यंत यैवज यावा म्हणोन बेरीज पेशजी स्वामीस लिा रुो ८१००००० पैकी वजा येणार नाही म्हणोन स्वामीनी वजा केले.

१०००००० खानदेश गुजरात वगैरे

५००००० कर्नाटकचे

१००००० बाबूजी नाा पाो

१६०००००

पैकी आमचे मते वजा होतील.

६००००० बाा नेमणूक आपली सोळा लाखांची पैकी येणार नाही तें वजा

१००००० बाबूजी नाा पैकीं

९००००० कर्नाटकचे
पाच येणार नाहीं

६००००००
१०००००० नवी जागिरीचे
हत्तेबंदीचा यैवज येईल
म्हणोन लिा होते
रसद सारीच नेमणूक
प्रमाणे घेतल्यावर
येणार नाही खरीच.
रसद घ्यावी यास्तव
हत्फेबंदी वजा केली
असे

१६०००००

कितेक गांव गेले वराडचे
फाजील सा वजां

१६९६०० हुजरातचें माहालचा
यैवज हुजरातीकडे
खर्च नेमून दिल्हा
सा वजा करावें

३३००० रायेपूर व आशेरचें
माहालचा मजकूर
रायपूर भिलानी
खराब केले. आशेर
किलेदाराने गाव
मारिलें सा रसद
येणार नाहीं म्हणौन
स्वामीनी लिहिलें,
त्यास भिलानी व
किलेदाराने दरोबस्त
गाव मारिलें नाहीं
थोडीबहुत खराबी
जाली असेल तर
मामलेदार नेहमी
आहेत च्यार रुा
फाजील जाले तर
पुढील साली उग-
ऊन घ्यावे. असेहि
करिता फारच रद-
बदल जाली तर निमे
रसद घ्यावी निमे उणें
करावें. त्यास रसद
२५००० रायेपूर
४२००० आशेर

६७०००

[या कलमाचे डावे बाजूस शेरा]
गुदस्ता कितेक माहाली अमल
बसला नाही. म्हणोन कमी
येतील.
बाकी पासष्ठ लक्ष येतील
त्याचा तपसील
६०००००० खानदेश गुजराथ
वगैरे माहालचे हत्फेबंदी हली
यैवज पनास लक्ष आम्ही लिा
त्यास दाहा लक्ष येणार नाही
म्हणोन आपण लिहिलें त्यास
कितेक महाल व परगणे आहेत
व गाव फिरकोल आहेत त्याचा
आकार हत्फेबंदीत कोठे आला
यास्तव दाहा लक्ष वजा न
करावे मागे पुढे पनास लाख-
पर्यंत वसूल व्हावा असा अज-
मास आहे यास्तव पनांस लक्ष
रुा लिहिले आहेत

पैकी रसद घ्यावीं
३४०००
बाकी येणार नाही
तें वजा.

१०००० जळगावची गुा रसद घेतली पंधरा हजार त्याप्राो येतील. बाकी वीस हजार येणार नाही म्हणोन लिहिलें त्यास गुा तेथील बंदोबस्त करून दिल्हा. विठल सुंदर यांणी कबूल केलें पेंच पडणार नाही. कदाचित फाजील जालें तर पेस्तर साली उगऊन घ्यावें याप्रमाणें करावें. वीस हजार रसदेपैकी निमें घ्यावें निमे येणार नाही ते वजा

६७०८५०
साहा लक्ष सतर हजार आठसे पनास वजा करावें.
बाकी स्वामीनी वजा केले आहे त्यापैकी आमचे मतें घ्यावे रुाये
२६८८५००
ताा

३००००० बच्याजीपंतापासून आम्ही येते वेळेस घेतले ते रसदेत मजुरा मागतात. त्यास आम्ही त्याचे गुजा-

१००००० सुभेदारी खानदेश गंगथडी गुजराथ

२००००० माहाल निाा बाबूजी नाां राा ३००००० पैकी पायमली येक लक्ष होईल बाकी रसद व हत्फेबंदी मिळोन यैवज येईल. थोडे बहुत फाजील जालें तर पुढील सालांत मजुरा पडेल. सालमजकूर या अजमासे यैवज घ्यावा.

[या कलमाचे डावे बाजूस शेरा]

मागें दोन तीन साला फाजील होते ते माहाली उगवलें तसेच काही फाजील जाले तर माहाली उगवेल. गुा नाइकाचे फौजेचा पैका माहालांत नेमिला होता आं+ता फौज येकंदरात आली तेव्हा वजा पडणार नाही काही फाजील जाले तरी समजून करवावे.

१००००० कर्नाटकचे पंधरापैकी पाच येणार नाहीं म्हणोन आपण लिहिले त्याप्रमाणें वजा केलें बाकी दाहा लक्ष

२००००० प्रांत मिरज

+ येथून अक्षर माऊसाचें.

रतीने कर्ज घेतले आहे तो यैवज आम्ही त्याचा त्यास देऊ आपण मजुरा न द्यावें.

१००००० आशेरचे मसलतीस च्यार लक्ष रुा खर्च लिा आहेत त्यास तीन लक्ष लागतील. कारण हेच की गाडदी वगैरे खर्च पहिल्या अजमासांत आले यास्तव लाख रुा कमी केले तो यैवज

२९०००० गोपालराऊ गोविंद याचे माहालचा मजकूर तर येंदा फार करून त्याचा मुल्क सुरलीत जाला. सिरहटी वगैरे जागें सुटलें यास्तव त्याजपासून रसद घ्यावी. मागील कर्ज आहे म्हणून रसदेस पेच पडतो तर मागील कर्ज येक दोन सालात माहाली फेडून घ्यावें. रसदेच्या यैवजांत मजुरा देऊ नये. रसदेचा यैवज घ्यावा. [या कलमाचे डावे बाजूस शेरा]

६९०००००
पासष्ट लक्ष आफत आगर मोगलासी बिघाड जाला तर यात बहुतच पेच पडेल म्हणोन लिहिलें त्यास तूर्त यैवजाचा अजमास या प्रों आहे. आफत पडली तर काही उणे होईल. बिघाडाचा मजकूर तर मसलत पडल्यास या यैवजांत कमी होईल खर्च जाजती वाढले त्यास तूर्त जमेच्या अजमासे बेरीज

७२९००० भोसल्याकडे यैवज येणे.

१०१०००० गुा फडशा जाला तेव्हा सन इहदेत यैवज घ्यावयाचा करार केला तों

[कलमाचे डावे बाजूचा शेरा]

दसपुरीचे निमे सिवाये सन इहिदेच्या दसरियापासून इसनेचा दसरापर्यंत घ्यावे

३८१००० सन इहिदे सितैन

१३९१०००

नवा मुलुक फार सुटला संस्थानिकाकडे वीस हजाराची जागा राहिली. फाजील जाहाले तर माहाली उगऊन घेतील. रसद घ्यावी.

१००००० जालनापूरचा मजकूर तर मागे दोन लाख फाजील होतें काही फिटले लाख पनास हजार राहिलें असेल ते येक दोन सालात माहाली उगऊन घ्यावे. रसदेच्या यैवजांत मजुरा देऊ नये. करारप्रो रसद घ्यावी.

[कलमाचे डावेबाजूस शेरा]

मामलेदार मातबर आहेत. लाख दोन लाख कर्ज घेतले तरी हलक्या व्याजे देतील रसदेचा यैवज पुढे माहाली उगवेल.

११२५०० भोसल्याकडील वराडचा रसदेचा मजकूर तर दसरियाचे हंगामी त्याजकडील कमाविसदाराने यावें रसदेचा यैवज देऊन मामल्याच्या सनदा घ्याव्या. हे न होये तर सरकारातून दुसरा मामलेदार करावा असा करार गुदस्ता जालाच आहे. दसरियास माहालकरी येऊन भरणा करितील. लेहून पाठवावे.

पैकी सावकाराचें वगैरे

९२५०० विसाजीपंत जोग

६२५०० गोविंद सिवराम

१८०००० सावकार दोघे बाबूजी नाा दुसाला

११२५०० रसदेच्या यैवजात घ्यावें म्हणोन लिहिलें आहेत तें वजा

४४७५००

बाकी रुपये ९४३५००

बाबूजी नाा १००००० जोसी याजबाा यैवज सरकारांत येतों

१०४३५००

येणेंप्रमाणे यैवज येणे आहे त्यास तूर्त येत नाही. गाठ पडेल तेव्हा येईल. जुज भाडण पडले तर येणेंच नाही म्हणोन लिाा त्यास कमपेश साडेदाहा लक्ष रुाये येणें त्यापैकी सवासात लक्ष रुाये लिाा आहेत त्यास मशारनिलेस वरचेवर लेहून पाठवीत जावें

काही दिवस वाट पाहावी नाहीं तर दुसरा मामलेदार उभा करून त्याजपासून रसद घ्यावी. यैवज खराच आहे.

[या कलमाचे डावे बाजूस शेरा]

हंगामी भोसल्याकडील यैवज न आला तर दुसरा मामलेदार नाव ठेऊन उभा करावा त्याजपासून रसद घ्यावी. सेवटी त्याचे ते निकाल करून देतील. व्याज आंगावर पडेल आगर त्याजपासून घ्यावयास कामास येईल.

४४००० आशेर व रायेपूर व जलगाव येथील निमे रसद घ्यावी. फाजील जालें तर पुढे माहाली उगवेल म्हणोन निमे यैवज वजा केला तेथे तपसील लिा आहे त्या प्रों करावें आणि यैवज घ्यावा.

३४००० रायेपूर आशेर
१०००० जलगांव

४४०००

६५००० सुप्याचे फाजील गुााचे होईल. भिलाचा दंगा. आजीच तोटा आला यामुले रसद येणार नाही म्हणोन लिहिले. त्यास मामलेदार बलेच उभे राहून चढ करितात मग सरकारच्या यैवजास तप-

निकाल करिती(ल). कदांचित तूर्त यैवज न आला तर आगेमागे येईल. यैवज खराच आहे.

[या कलमाचे डावे बाजूस शेरा]

दाहा लक्ष साडे त्रेतालीस हजार बाकीपैकी सा सात लिहिले आहेत त्यास या यैवजावर कर्ज घेऊन त्याजकडे वसुलास पाठविले तर काही वसूल होईल न वसूल जा(ला) तर मागे पुढे यैवज येईल. चालीस पनास हजार व्याज पडेल मोबदला कर्ज घेतले तर हा यैवज वसूल करून घ्यावयास जागा आहे.

१०००००० किता यैवज
३०००००० श्रीरंगपटण
२५०००० स्वारी बाबूजी ना

३२५००००

साडेबतीस लक्ष पैकी वजा रुा

१०००००० पटणाचे जवाहिराचे येणार नाहीं

१२५०००० मसलतीमुलें येतील तर येतील नाही तर येणार नाही. मसलतमुले यास्तव वजा केलें.

सील लावितात. त्यास परि-
छिन्न बेमुरवत रसदेचा यैवज
घ्यावा. फाजील होईल ते
पुढील साली मजुरा पडेल.
क्षेप निक्षेप यैवज घ्यावा.
गुंता नाहीं.

४९००० को सुरत येथील ठराव
होणे म्हणोन वजा केले
आहेत त्यास मामला आगे
मागे विल्हेस लागेल. पंचे-
तालीस हजार रसदेस काही
गुंता नाही. कदाचित रसद
न घेतली तरी मागे पुढे
पंचेतालीस हजार रुाये
येतील. यैवज खराच आहे.

[या कलमाचे डावे बाजूस शेरा]

लाख दो लाखाचा मामला.
पंचेतालीस हजार रसदेस
काही गुंता नाहीं.

१७२००० बाबूजी नाा जोसी याचे
माहालात पायेमाली फार
जाली म्हणोन रसद येणार
नाही. यास्तव वजा केले
आहेत. यैसियास माहाल
मोगलाचें दंग्यामध्ये पाय-
मालीखालें आले आहेत
परंतु रसदेच्या यैवजास
काही पेच नाही. दाहा
लाखाचे माहाल. पावणे तीन
लक्ष रसद फार नाहीं.
तिगस्ता रसद घेतली होती
ती येक दोन साले माहाली

साल मजकुरी

१०००००० श्रीरंगपटण

२९०००० स्वारी बाबूजी नाां

१२९००००

२२९००००

बाकी गुदस्ताचे पटणचे
विसोबाने करार केले अस-
तीलच. गुंता दिसत नाही.
यास्तव लिहिलें.

१२२७९०००

तूर्त यैवज येणार नाही
असी बेरीज रुाा

६७०८९० रसदापैकी

१६००००० हफ्तेबंदीपैकी

१००००० बाबूजी नाा

५००००० कर्नाटकचें

१०००००० नवे माहाल झाडून
रसद घ्यावी तेव्हा हफ्ते-
बंदी येणार नाही.

१६०००००

फिटली. सालमजकुरी रसद द्यावी. काही फाजील जाले तर पुढील सालांत मजुरा पडेल. रसदेसिवाये हफ्तेबंदीचा यैवज येणे. त्यास जमेचा अजमास पाहून घेणे तो घ्यावा. रसद कमी करू नये. असे तपसील माहालकरी बहुत सांगतील परंतु याप्रो करावे.

१५०००००० नवे जांगीरचे माहालची रसद वीस लक्ष पैकी पाच कदांचित येतील, पंधरा येणार नाहीं. मलिखडे वगैरे माहाली अमल बसला नाही. फार लढे आहेत म्हणोन लिहिले. त्यास गुदस्तां वीस लक्ष रुा रसद घेतली. सालमजकुरी वीस लक्ष नेमिले आहेत. येकून सालगुाा सालमजकुरी मिळोन चालीस पंचेतालीस लाखाचा भरणा होईल. या खेरीज वराता करून कोणा मामलेदारापासून पैका घेतला नाही. गुदस्ता माहीतगार मेळविले होते त्याचे मारफातीने मनास आणिता साठ लक्ष वसूलपैकी चौथाईचे पंधरा गेले. बाकी पंचेतालीस खरे. त्यास गुदस्ता महालकरी यानी वसूल थोडा बहुत घेतलाच आहे. सालमजकूरचे

२२५०००० स्वारीसिकारी वगैरे जालियास आकारतील तर आकारोंत; यास्तव वजां

१०८०००० पटणाचे जवाहिराचें

१२५०००० स्वारी सिकारी जाली तर मिळतील

१०००००० पटणचें

२५०००० बाबूजी नाा

१२५००००

२२५००००

४५२०८५०

तेरीज येकंदर रुाये

२०३५८५५२ निका यैवज आमचे मते

८०८३५५२ रसदा बाां

१२२७५००० हफ्तेबंदी वगैरे यैवज

२०३५८५५२

४५२०८५० तूर्त यैवज येणार नाही, ती बेरीज जमेच्या तात्याकरिता लिहिलीं.

२४८७९४०२

पैकी वजा यैवज येणार नाही तो वजा बेरीज रुाये ४५२०८५०

तो दरोबस्त साल आहे. मलिखेड वगैरे माहाली अमल बसेल. वीस लक्ष सालमजकुरी रसद द्याव-यास दिकत काही नाही. रसदेसिवाये यैवज द्याव-याचा लिा आहे. त्यास चौकसीकरितां हफ्तेबंदीचा यैवज न निघे तर न द्यावा. रसदेचा यैवज व माहालचा खर्च मिलोन गुाचा वसूल व सालमजकूरचे साल मिलोन बरोबर व्हावे असे आहे. ऐसेहि करितां रसदेपो काही बाकी राहिली तर पुढील सालात मजुरा पडेल. याप्रमाणे आमचे विचारे आहे. स्वामीनी तेथे याच अन्वये माहालकरी याची समजावीस पाडून यैवज द्यावा.

[या कलमाचे डावे बाजूस शेरा]

आम्ही अजमास पेशजी लिहिला तो खराच परंतु मलिखेड वगैरे माहाल येथे अमल बसला नाही म्हणोन काही कमी येईल सालमज-कुरी रसद द्यावयास काही पेंच नाही मो+हाली अमल न जाहाला असे लिहिले आले यास्तव पाच उणे बाकी रसदाचा व हफ्तेबंदी व सरसालचा यैवज रुा

२०३९८९९२

येणेंप्रमाणें दोन क्रोड तीन लाख आठावन हजार पाचसे बावन रुाये यैवज त्यास खर्चाचा अजमास देखील कर्ज फेडावे येक क्रोड सत्तरीचा अजमास आहे. मसलत पड-ल्यास अधिक खर्च लागेल. मसलत पडली नाही तरी खर्चात कसर निघेल; तेव्हा खर्च जाऊन बाकी फारच निघते. आफत आगर बिघाड जाला तरी कर्ज फिटावें असा अजमास आहें. कितेक यैवज आहे तों तूर्त वसुलात याव-याचा नाही, परंतु मागे पुढें येईलच; स्वामीनी पुर्ता अज-मास चितात आणावा. मोठा कारभार आहे अजमासाप्रमा-णेच जमाखर्च होतो असा अर्थ नाही. वडामोडीमुले जमे-तहि काही कमी होईल आगर जाजती चढेल तसेच खर्चात कमज्याजती होईल. सारांष आम्हास दिसोन आले त्याप्रमाणें बेरिजा लिहिल्या आहेत. बिघाड अफत नसल्यास याप्राा व्हावे असे आहे.

+ येथून अक्षर भाऊसाा.

होतील. हफ्तेबंदीस यात पेच
पडेल तो आलाहिदा वजा
केला असे.

२६८८९००

रसदाचा यैवज रुो

९३९९०९२ स्वामीनी निका यैवज
लिा त्याप्रमाणें

२६८८९०० येणार नाही म्हणोन
वजा केले त्यापैकी आमचे
मते घ्यावें

८०८३९९२

येणेप्रमाणें जमेची कलमे स्वामीनी वजा केली. त्यापैकी कमज्याजती करून अजमास करून पाठविला आहे. कोकणप्रांती दंगा आहे यामुळे कोकणची जमा कमी होईल म्हणोन स्वामीनी लिहिलें, त्यास मोठा कारभार आहे. या अजमासास सरासरी दाहा पाच लक्ष कमी होतील आगर ज्याजती होतील. मोठा कारभार आहे, अडसटा ध्यानांत यावा, यास्तव लिहिले आहे. दंग्यामुळे कोकणचे दोन कमी येतील. आणिखहि दाहापंधरा लक्ष घालमेलीमुळें कमी होतील. दोन च्यार कमाविसी खंडगुनेगारी जमा जाजती होईल. त्यास मोठ्या कारभारास कमज्याजती अजमासासिवाये होत आहे, परंतु गुदस्तांचें चालीस लक्ष रुपये कर्ज वारावें म्हणोन लिहिले आहे, त्यास यैवज आहे ऐसें दिसतें. केवल रोकडा यैवज नाही परंतु यैवजास यैवज आहे. थोडेबहुत व्याज मात्र पडेल. सावकाराचा यैवज तोडून वराता द्याव्या. दोहीकडे कालजी लागोन वसूल होईल. छ ९ सफर. +

हिंदुस्थानचे स्वारीचा अजमास पेशजी स्वामीकडे पाठविलाच आहे. त्यास आपण लिहिले की हिंदुस्थानचे माहालच्या रसदापैकी निमे यैवज तिकडे घ्यावा, निमें इकडे देवावा. देसीं मोगलाचा भ्रम आताश्यापासून वाढत चालिला तेव्हां फौजेची समाजावीस केली पाहिजे, जरूर यैवज असावा म्हणोन लिहिले, त्यास इकडील मसलतीचा प्रकार सर्व स्वामीच्या ध्यानात आलाच आहे. स्वारी-सिकारीमुळे पैसा कोठे मिळत नाहीं. फौजेस पोटास जरूर दिल्हेच पाहिजे. लडाईचा प्रसंग समीप आला. माणसास राजी ठेविले पाहिजे. येंदाचा प्रसंग

+ अक्षर नानाफडणिसाचें.

बेंढीचा मोठा पडला. लस्करांत फांके होतात. कर्जवाम कोठे मिलत नाही. दिलीकडील रांगडे साहुकार होते ते पलोन गेले. कमाविसदाराकडील रसदेचा मजकूर तर आद्याप काही कोणाचा भरणा जाला नाहीं. आम्ही यैवजाविसी कमाविसदारास बहुता प्रकारें लिहिलें, त्याचे जाबसाल येतात की यैवज पाठवितों, परंतु कोणाकडील पैसा येत नाहीं. तेहि पाहातांत की मसलत सेवटास गेलियावर पैका द्यावा! असी वाट पाहतांत. या गोष्टी या समई त्याणी कराव्या असें नाहीं! असोत. निमे रसद इकडे देणे, निमे, देसी भरणा करावा असे कमाविसदारास कललियावर इकडे पैसा देणार नाही, देसी भरणा करणार नाही, निमित्य जालें! देसी स्वामीजवल म्हणतील कीं झाडून रसद हिंदुस्थानांत दिली; आम्हाजवल म्हणतील कीं देसी भरणा केला. त्यास तूर्त आज कोणास ताकीद करीत नाहीं. वर्षास रसदाचा यैवज कार्तिक मार्गसीर्षपर्यंत झाडून वसूल होत असतो. त्यास इकडीलहि लडाई आगर जे होणे तें महिना दोन तीन महिन्यांत होईल. तूर्त आम्हास पोटास पाहिजे. बहुतच उपास फौजेस होऊ लागले. त्यास पातशाही किल्यात दिवाणखान्यास रुप्याचें छत होतें, त्यास वजिराने थोडकसे काढिले होतें. बाकी आम्ही काढिलें. नवा लक्षाचे रुपे निघालें, त्यापैकी काही सरदारास दिल्हे बाकी फौजेस वाटले, त्याणी महिनाभर स्थित राहिली. कमावीसदाराकडील यैवज येणार आहे तो आलियावर लस्करात माणसास पोटास मिलेल. यास्तव तूर्त कमाविसदारास निमेचा यैवज देसी भरणा करावयाविसी ताकीद करीत नाहीं. महिन्यां दोन महिन्यांत पेंच उलगडलियावर रसदापोा जी बाकी राहील तों यैवज स्वामीकडे ज्याचा त्याजकडून भरऊं. पेच वारलियावर पोटास माहालचा पैका खाणार नाही. पोटापुर्ते मेलऊं. इकडील वर्तमान तरी कर्जवाम कोठे मिलत असते तर कदापि इकडील माहालची रसद न घेतो. सावकार कर्ज कोणी पैसा देत नाहीं, तरतें बुडतें पाहातात. कमाविसदारहि चाकर असता तेहि दीर्घ दृष्ट देतात. तेव्हा सावकार कर्ज कोठून देणार? मामलेदाराकडील मजकूर तर गोविंदपताकडील दोन लक्ष आले, पाऊण लक्ष असीहजार बाबूराव कोनेर याजकडील आलें. याखेरीज आद्याप कोणाकडील पैसा आला नाही मसलत लवकर जालियावर आम्ही रसदाचा यैवज घेणार नाही. देसी मसलत पडली तरी कर्जवाम कोठे मिलतें? इकडे पैसा मिलणे कठिण. पेशजी इकडील खर्चाचा अजमास पाठविला आहे त्याहून जाजती कलमें चढली. दिलीच्या किल्याचा खर्च व पातशाहाचा जातीचा खर्च, शागीर्दपेशा वगैरे मिलोन खर्च वाढला. मसलतीमुलें जाजती सिबंदी राऊत प्यादे ठेवावे लागले. लाख रुा दरमाहा जाजती खर्च वाढला. पुढे राऊत प्यादे ठेवावे लागतात. मसलत लौकर आटोपली म्हणजे काहीच गुता नाही. लांबली मसलत तर पुढे कोणे प्रकारें

चालावे, काये मनसबा करावा, खर्चवेंच कसा करावा, पैका मेलवावयाची तजवीज कोणे प्रकारे करावी हे लिहून पाठवावे. त्याप्रमाणे वर्तणूक करू. इकडील महालच्या रसदा निमे देसी द्यावयाची मर्जी आहे, त्यास महिन्या दोन महिन्यात इकडे हरकोठे कर्जवाम मेलऊन मोबदला करून यैवज स्वामीकडे रवाना करू. तूर्त मामलेदारास निमेची ताकीद जालियास इकडे तिकडे भरणा करणार नाही, यास्तव तूर्त जो यैवज वसूल होईल तो घेतो. येणेंप्रो[+] मजकूर आहे.

छ[१] ९ सफर भाद्रपदमास

¶*In this extremely valuable document, Bhausaheb submits to the Peshwa for his approval a detailed account of the estimated receipts and expenditure of the Peshwa's territory south of the Nerbudda. The statement is accompanied by explanatory remarks which immensely help the student in grasping the situation in the North during that eventful period. Bhausaheb emphasises the fact that the expedition undertaken by him was of an extraordinary nature and consumed much larger sums of money than in the past, while the sources of income had dwindled almost to a vanishing point. The paper well explains the situation of the Maratha forces at Delhi and illustrates the usual Maratha practice of maintaining the armies in the field by a levy of tributes. It mentions among other things that the silver ceiling of the Diwan-i-am at the Imperial Palace had been already partially removed by Ghazi-ud-din. Bhausaheb removed the rest and realized altogether 9 lacs worth of silver, which was sufficient to defray one month's wages. The situation, though grave, had not then become desperate, and in September Bhausaheb hoped to arrange matters satisfactorily. The remarks are in the handwriting of and the paper is concluded by Bhausaheb himself. It was written just before the Maratha forces moved towards Kunjpura.*

No. 258] [*September 1760*

श्री

पुरवणी. वसुलास ठेवणे आणि विसोबाचे कैदेत वर्तणूक करी ऐसा ठेवणे. यंदा कुरणात गवत होईल. सेदोनसे रुपये खर्च लागला तरी लाऊन काही गात्रगनाचे बिगारी मेलऊन किरकसाल व कालवटीचे झाडून गवत काढणे व न्हावीचे कुरणचे गवत काढणे. याचा बंदोबस्त आधी करणे. घरी राजश्री रामाजी जिवाजी असिले म्हणजे तुम्ही येक घोडी आणऊन येक वेल पागेस जाऊन चौकसी करून बंदोबस्त करून येणे. शाक भाजी मिरच्या भोपले गावगना रोखे करून सरकारात पोहचत म्हणोन हंगामी भोपले आणवावे. गोविंद व धोंड्या आहेत. गोविंदाने आपली बाईको आणून ठेविली आहे. त्यास मात्र सहकुटुंब

+ अक्षर नानाफडणिसाचें. १ अक्षर भाऊसा.

पाळगहण करणे. परंतु कैदेवर हुकूम वर्तवीत जाणे. धोंड्या आपली बाईको आणीत नाही. ती जेथे आहे तेथे बेगमी करून देणे म्हणोन म्हणतो. त्यास जर आपली बाईको आणून ज्याप्रमाणे गोविंद व त्याची बाईको वर्तणूक करितात त्याप्रमाणे राहील तरी ठेवणे. नाहीतरी त्यासहि निरोप देणे. त्याचे बाईकोस पोटास दुसरे जागा येकंदर न देणे. येका वाण्याकडील पैसा येका कुंभाराकडे होता त्याचा हवाला धोंड्याने व संभ्याने घेऊन तीस रुपये वसूल करून घेतले होते त्याचा संभ्याजवळ शोध करून लिहिणे म्हणोन लिहिले. त्यास संभ्याने सांगितले की आम्ही दाहा रुपये मात्र कुंभारापासून घेतले ज्याजती आपणास ठाऊक नाही म्हणून साफ सांगितलेन. धोंड्या जो आहे तो येवज उपटावयास पाहतो. ऐसा चाकर कामाचा नाही. यामागे जाले ते जाले यापुढे त्यास कोणी बंदीखानी नेऊन घातला तरी मरो. परंतु येक पैसा न देणे. बाईको आणलीन तरी आपणाजवळ ठेऊन चाकरी घेऊन सेर देत जाणे नाहीतरी निरोप देणे. गुलामास ढुकल नाही. दुसऱ्या च्यार कुणबिणी घेऊन येतो. सौभाग्यवती वज्र-चुडेमंडित लक्ष्मीस जेष्ठ वद्य दशमीस घरास आणिली; कन्या खुशाल आहे म्हणोन लिहिले. बहुत उतम केले. मुलीची जतन फार करीत जाणे. चिरंजीव बापूची निगा फार करणे. त्याजबराबरी सतत येक माणूस लावणे येविसी हैगै न करणे. गोवर निघोन बरा जाला म्हणोन लिहिले. परम संतोष जाहला. घरात सइपाकास येक बाईको ठेविली तीन रुपये दरमहा केले म्हणोन लिहिले उतम केले. परंतु निर्मळ भली लबाड चोरचाबड नसली तरी ठेवणे सईपाकास पाहिजे नाही तरी चांगली भली पाहोन दुसरी ठेवणे. पागेची बेगमी दीड माहाची दीड माहा करून घेत जाणे. रामाजी नारायेण यास कळू न देणे कळले तरी चिंता नाही. परंतु सूचना लिहिली आहे. पागेस येवज लागला तरी अगत्यागत्य द्यावा. आम्ही तो येका वर्षाची पागेची बंदोबस्ती करून आलो आहो. पुढील सिमग्यापावेतो बेगमी आहे. येवज देणे तरी विसोबाजवळ द्यावा. खर्चावेचाची यादी विसोबाकरवी लिहून आणवीत जावी. जो येवज जमा होतो तो येसावा नाईक धर्म याचे दुकानी ठेवणे म्हणोन पेशजी लिहिले होते त्यावरून तुम्ही त्याचे दुकानी येवज जमा करिता. परंतु कालदेशवर्तमान कळत नाही. याउपरी दुसरे मातबर दीक्षितासारखा सावकार पाहोन चौवाकड येवज तरता ठेवावा. येसोबा नाइकाकडील युक्तीने उडवावा. कृष्णाजी हरीस येकाधी बाज आली तरी संभाळावी. परंतु त्याच्या दुकानी अत:पर येवज न ठेवणे. शास्त्री-बावाकडील हरप्रेत्न करून येवज वसूल करणे. कृष्णाजी हरि मामा म्हणोन विश्वास धराल तरी न धरणे. राजश्री गणेश माहादेव बिवलकर याचा येवज

काही तीर्थरुपानी आणला होता. मुदल किती आहेत त्याचा शोध करून वारून मुदल देणे. तो काही व्याज मागणार नाही. मागो लागला तर देत नाही म्हणोन सांगावे आणि कृष्णाजी हरीचे दुकानपैकी बाकी आहे ते मुदल देऊन कृष्णाजीपंताचे विचारे मग सावकाश खतपत्र असेल ते फाडून टाकणे. कंपवाताचा प्रकार होऊन हात फारच कापतो म्हणोन लिहिले त्यास वैद्य उपाये करून वात दूर होये ते करणे. कृष्णाजीपंत तुम्हावर मेहेरबानी फारच करितात म्हणोन लिहिले. उतम आहे. शाहाणपणे ममता रक्षून आपला हात सापडो देऊं नये. राजश्री आबा मजमदार यास साळदरसाळचे वर्षासन पावले कीं नाही? ते आम्हास मागतात म्हणोन लिहिले. त्यास आम्ही काही त्यास वर्षासन करून दिल्हे नाही. लखबाचे सनदेचे वर्षासन ते देत असतात. ऐशास त्याची चाल जर बरी असली आणि आपल्या कामास येत असे असिले तरी चालीस रुपये त्यास द्यावे. माहलकरी ग्रहस्त अद्याप गेले नाही. चौकीस आहेत म्हणोन लिहिले. उतम. त्याची मनसुबी जालियावरी तुम्हास पत्रावरी साक्षी घालावयास बालाऊ लागले तरी सरकारात जाबसाल पडिला तरी करणे की आम्हास साक्षी घालता न ये. मनसुबी तो वाजबीच जाली. परंतु वडील बंधु लस्करात आहेत. त्याजवळ सर्व तीर्थरुपानी निवेदन केले आहे. ते आल्यावरी साक्षी घालितील आम्हास साक्षी घालावयास अधिकार नाही म्हणोन पष्ट सांगोन साक्षी न घालणे. श्रीमंतानीच आग्रह केल्यास माहादाजी रघुनाथ याणे साक्षी घातली असेल त्याजवरती आपण घालावी. प्रसंग तो आम्हापर्यंत येणार नाही. कदाचित समय पडिला तरी सूचना लिहिली आहे. विना श्रीमंतानी सांगितल्याशिवाय साक्षी घालू नये. +दरबारी वर्तमान लिहिणे म्हणोन लिहिले. त्यास दरबारचे वर्तमान तरी अबदाली नजीबखान रोहिला व सुज्यातदौला दिलीनजीक यमुनेपलीकडे उतरले आहेत. आम्ही आलीकडे सीतारामाचे सराईनजीक आहो. गंगा भरली आहे. उभय पक्षी उपाय नाही. जाट व गाजदीखान आम्हाकडे होते ते रुसोन गेले. त्यास आणावयास महिपतराव चिटणीस व गंगोबा तात्या व रामाजी अनंत गेले आहेत. येतील तेव्हा खरे. खर्चावेचाची तो लस्करात मोठी अडचण आहे. अडीच पाइली धारण आहे. महिन्यात येक रोजमरा आठवडा द्यावयास येवज नाही. कमाविसदार तो तरत्या बुडल्यावरी आहेत. लोकांच्या घोड्यात आवाका राहिला नाही. पोटाकरिता लोकास उपास होतात. कर्ज तो

\+ येथून पानिपतसंबंधीं महत्त्वाची बातमी.

येकंदर मिलत नाही या प्रकारचे लस्करचे हाल आहेत. आम्हाविसी फिकीर न करणे. आम्ही खुशाल आहो. रा बापूजीपंत[1] खुशाल आहेत. त्यांच्या भावास सांगोन पाठवणे. पवारिणीस (?) कोकणात लुगडी चोल्या पाठवणे. आम्ही आपल्या शरीरवेथेस वोखद घेतले. बरे जाहाले. तुम्हास कलावे म्हणून लिहिले आहे. संभ्या व उदाजी व सुलताना व समस्त लाहान थोर खुशाल आहेत. चिरंजीव विसोबा खुशाल आहे. नारोपंतास सांगणे. गिलज्या भारीच आहे. येश देता ईश्वर; परंतु यंदाचा समय परम कठिण आहे. लढाई जालियावर बहुत रण पडेल. यश देता ईश्वर समर्थ आहे. शाह जबरदस्त आहे. दिली शहर व किला आपल्या स्वाधीनच आहे. रा नारो शंकर यास शहरात ठेविला आहे. बालोजी पल्हांडे यास किल्यात ठेविले आहेत. पातशाह देखील कैदेत आहे. खजिना तो किल्यात बहुत आहे परंतु ठिकाण लागत नाही. युक्तीने खेरे+ घातले आहेत. थाक लागला तरी दाहावीस क्रोडी सापडेल. परंतु पातशाई वाड्यात जनानखान्यात जाता न ये. परंतु युक्तीने ठिकाण भाऊसाहेब लावितील. रा कासी मोरेश्वर खुशाल आम्हाजवल आहेत. श्रीमंताची भेट जाली. श्रीमंताची कृपा उतम आहे. काही कामावरीहि ठेविले आहेत. पुढे रोजगारहि उतम लागेल. कांहीं फिकीर न करणे म्हणोन सौ मामीस व मोरोपंतास सांगणे. मामी अन खात नाही म्हणोन ऐकिल त्यास समाधान करोन सांगोन भोजन करीत ते करणे. राजश्री लखजी बोंधे याची पत्रे त्याच्या घरास पावती करून उतर आणून लिहून पाठवणे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे आसीर्वाद. आंधलीचा अपमान न करणे हे आसीर्वाद. दहिवडीस म्हैस व्याली असिली तरी आणणे. दुभत्याविसी आबाल न करणे; विकत घेणे. राजश्री रामाजीपंत करमरकर यास सा नमस्कार विनंती उपरी. रामचंद्रपंत व तुम्ही बहुत शाहाणपणे संसार करणे. बंदोबस्तीने राहणे. विस्तार तुम्हास ल्याहावे ऐसे नाही. चिरंजीव बापूस फार फार जपत जावे. येविसी हैगै न करणे हे विनंती. सहश्रायु चिरंजीव बापस व सगाबाईस आसीर्वाद. चिरंजीव सौ वज्रचुडेमंडित लक्ष्मीबाईस आसीर्वाद. चिरंजीव बापूची व सगाबाईची जतन फार फार करणे. नाही तर मुलाहिजा होणार नाही हे आसीर्वाद.

¶*An important letter from Bhausaheb's headquarters at Delhi describing the condition of the Maratha armies and the difficult situation in which they were placed. The writer writes at length about his private concerns.*

---

१ फडके असावे. याचा भाऊ हरिपंत. + हेर ?

No. 259] [14-11-1760

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अंताजीपंत
सिधये स्वमींचे सेवेसी

पोष्य बापूजी वामन साठे कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ ५ राखर पावेतो मुकाम पाणिपत श्रीमंताच्या लस्करात रा। संभाजी कदम याच्या पथकात येथास्थित असो विशेष. आपणाकडील बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी ऐसे न करावे. हरघडी पत्र पाठऊन सांभाल करीत जावें. इकडील वर्तमान तरी अबदालीची याची गाठ पडली. लढाईस आज पंधरा दिवस प्रारंभ जाहाला. त्याजकडील तोफा व आपणाकडील गोलागोली होत असते. दररोज घोडे पाच च्यार जाया होतात. माणूस आजपर्यंत पाच सातपर्यंत जाया जाहाली. मातबर कोणी जाहाले नाहीत. ईश्वरे आजपर्यंत खैर केली आहे. आबदालीची फौज चालीस हजारपर्यंत आहे. आपली उभयेता सरदार मिलोन साठ हजार पर्यंत आहे. सिवाय गोविंदपंत व मामलेदार वगैरे आले नाहीत. पत्रे गेली आहेत. शह भारीच आहे. ईश्वर निवारण करील तेव्हा खरे. श्रीमंताचे पुण्यप्रतापेकरून सर्व येथास्थित होईल. आमची फौज उत्तरेकडे, रोख दक्षणेकडे, आबदालीची फौज दक्षणेकडे रोख उत्तरेकडे आम्हावर, येणे प्रा। फौजा आहेत. शह भारीच आहे. रा। विनायकपंत वगैरे मंडळी सर्व सुखरूप आहेत. रा। बाबूराव ग्वालरीस आले म्हणोन वर्तमान बाजारी आहे. आम्हास आद्यापि पत्र आले नाही. आबदालीचा गडबडीमुले वाटा बंद जाहल्या आहेत. कलावे आमचे घरचे व आपले सविस्तर वर्तमान लिहून आलिया जासुदासमागमे लिहून पाठवावे. बहुत काय लिहिणे ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*One Bapuji Waman Sathe writes home from the camp of Bhausaheb about the state of affairs at Panipat. He says that the two armies have at last met and desultory fighting is going on. The Abdali's army is estimated to be about forty thousand while the Maratha forces number sixty thousand. The Abdali has blocked the passes leading to the South and has placed the Marathas in an awkward position.*

No. 260] [25-11-1760

श्री

चिरंजीव राजश्री रावोपंत प्रति नारो गंगाधर आसीर्वाद उपरी. येथील कुशल छ १६ रबिलाखर मुकाम सिधटेक वर्तमान येथास्थित असे विशेष. तुम्ही

दोनच्यार पत्रे पाठविली पावोन वर्तमान कळो आले. आम्हाकडून सविस्तर वर्तमान येत नाही याजवरून तुम्ही बहुत श्रमी आहां म्हणौन आइकिले. ऐशास काही विशेष वर्तमान नाही. मर्जीचा प्रकार दिवसेदिवस बहुतच बिघडत चालला आहे. श्रीकृपेने परिणाम लागेल तो खरा. खर्चाच्या यादी तमाम माहालकरी पागा पथके याच्या आणवितात. येकंदर दरबारखर्च कोण्हास किती लागतो हा भाव पाहावा त्याजवरून मुतसदी कारकून याच्या प्राप्ति ठिकाणी लावाव्या, पुढे त्यास तगादे लावावे, पैका घ्यावा हा प्रकार. दुसरे खासा लग्न करणार हा मनसबा साऱ्यापेक्षा वरिष्ट. दुसरे हिंदुस्थानांत जावे, प्रयागास जावे हा परम हेत. देशी चिरंजिवास ठेवावे, कारभारी सखारामपंत, दाहा पाच हजार फौज ठेवावी आपण बंधू जावे. कदाचित बंधू राहिले तर खासा तरी जावेच. हिंदुस्थानचा प्रकार तर कुंजपुरा घेतला. दाहा पाच हजार फौज बुडविली हे वर्तमान पेशजीच आले ते कळले. आलाकडे काही कागदपत्र तो नाही परंतु लौकिकी खबर जुज मातबर जाले. काहीसे हे कसकरले असेहि बोलतात. सत्यमिथ्य श्री जाणे. वरकड तिकडील चिंता यास तो काडी इतकी नाही. त्याचे काहीहि होऊ. याच्या मनात त्याच्या साहित्याचा विचार किम(पि) नाही. सांप्रत सिधटेकी आंगारकी करावी. कूच करून करमलेयास जावे. जानोजीचा लेक आला आहे. करमलेयास हे जाणार. तोफखाना वरकड फौज दुसरे मार्गे सखारामपंताबा धारूरचे सुमारे रवाना करावी. आपण करमलेयाकडे जावे. निजाम आली येणार. हिंदुस्थानांत त्याजला घेऊन जावे असे आहे. परंतु ते मतलबी आहेत. येतील असे नाहीं परंतु यांस लोभास कागदीपत्री गोविले आहे. द्रिष्टी हिंदुस्थानच्या मनसब्यावर आहे. तूर्त यासी कागदीपत्री मा (अपूर्ण)

¶*Naro Gangadhar, in the Peshwa's entourage, writes from Sidhtek to Raghopant. He says the Peshwa's irritability is on the increase. He is looking out for a suitable bride. The writer is at a loss to explain the Peshwa's culpable indifference to the hard straits to which the Bhau's army has been reduced.*

No. 261] [*March 1761?*

श्रीशंकर

यादी

१ मुधोजी भोसले यास की तुम्ही उदईक मुकाम आहे तरी आगाढीस येऊन राहाणे.

१ नारो शंकर यांसी की उदईक मुकाम जाला तरी भोजनउतर येणे. काही बोलावयाचे आहे. परंतु आज फावले नाही. उदईक येणे.

१ सुभेदारास यांसी आनंदराव विनायेकपंत आले. सांगितले की गौतमाबाई जवल आल्यात तरी आपण उजवे बाजूस येऊन राहावे. तीन मुकाम जाले आहेत.

¶*These are probably oral replies given by the Peshwa on his return from the North.*

No. 262] *[10-4-1761*

पौ छ २९ जिलकाद
सन इसने सितैन

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री नानासाहेब
स्वामींचे शेवेसी

विनंती. सेवक आज्ञाधारक लक्ष्मण आपाजी येकबोटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ४ रमजानपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून आलासिंग जाट याजपासी मणुकेस क्षेम असो विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबानी रा लक्ष्मी नारायेण याजबरोबर सरहंदेस पाठविले होते. त्यास फौजेची विपरीत गत जालियावरी लक्ष्मी नारायेण हिंदुस्थानी होता. त्याने स्थळ पाहून बसोन राहिला. मजसमागमे से पनास राऊत दक्षणी व मी तरंगोन राहिलो. कोठे जागा नाही. चोहीकडे गर्दी जाली. यावरी निदान जाणौन आलासिंग जाट याजपासी आलो तेव्हा खावंदाचे नावावरी जाटमजकूर याने जागा देऊन आपणापासी ठेविले ते हा कालपर्यंत क्षेम असो. रा आलासिंग जाट याजला स्वामीनी पत्रे पाठविली होती त्यांची प्रतिउतरे सेवेसी मारनिलेनी लिहिली आहेत त्यावरून विदित होईल. सेवकाने बहुत शोध या प्रांती केला परंतु लागला नाही. आणीखहि करीतच आसो. आबदाली दिलीहून कूच करून आपल्या मुलकास जावयासी रवाना जाला. त्यास सरहंदेस दाखल जाला. दोन च्यार मुकाम करून राहिला आहे. सेवेसी विदित व्हावे. स्वामीचे पाये तो सुदीन आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

आज्ञाधारक भिकाजी हरि चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार.

¶*Laxman Apaji Ekbote writes to the Peshwa from the territory of Alasing Jat that so far his inquiries about the Bhau have proved fruitless.*

No. 263] *[14-5-1761*

पौ छ २१ जिलकाद
सन इसने जेष्ट मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोपालराव गणेश करद्वये जोडून सां नमस्कार विज्ञापना. ता छ ८ सवाल मुकाम कुरी जाहानाबाद स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशष. स्वामीचे आज्ञापत्र छ १३ साबानचे सादर जाले. ते छ १८ रमजानी सेवकास कालपीस पोहचले ते पाऊन आनंद जाला तो पत्री कोठवरी लिहावा. तेथे आज्ञा की आपली फौज व बंधूस ठेऊन हुजूर भेटीस येणे. उजनीस छावणी आहे. त्यास आज्ञेप्रमाणे यावयास सिध जालो होतों तों राजश्री सुभेदाराची पत्रे आली की बुंदलखंडात गव्हारानी गर्दी केली आहे. तुम्ही कालपीसच राहाणे. तेथून कूच न करणे. तुम्ही आल्याने गडबड बहुत होऊन आमल हालवितील. त्याजवरून राजश्री गणेश संभाजी यांजकडे फौज पाठऊन त्यांजपासी दोन च्यार जागा चरखारी वगैरे कामकाजे केली तों राजश्री सुभेदाराचे दुसरे पत्र आले की, नजीबखानाचा व नवाब सुज्यातदौले यांचा वकील आला आहे. त्यांचा व आपला करारमदार ठरला. सलूख जाला. आंतरवेदीतून त्याणी आपला आमल उठवावा, तुम्ही जाऊन आपला आमल काइम करणें. त्याजवरून आंम्ही नवाब सुज्यादौले यांस पत्र लिा की आम्हास राजश्री सुभेदाराची आज्ञा आहे कीं, आंतरवेदींत उतरून आपला आमल काइम करणें. त्याजवरून त्याणी बेणीबाहादर यांस पत्र लिा की तुम्ही आमल सोडून उठून येणे परंतु त्यांस आशा सुटेना निघोन न जात. आपल्या कचेरीत बोलू लागले कीं, कोणी गोपालरायाकडील ग्रहस्त येईल तरी उतम आहे. हे वर्तमान आम्हास कालपिस कलून कारकून व्यंकट कासीराव देशमुख चांभारगोदेकर आम्हापासी होते त्यास कुन्यास रवाना केले आणि चिरंजीव बाजीराव तात्यास आपली फौज रा गणेश संभाजीकडून आणावया पाठविले आणिं आम्ही दोनशा राउतानसी राजश्री बाळाजी गोविद यांजकडे गेलो की तुम्ही आम्ही येमुना उतरून आंतरवेदीत जाऊ. त्यावरून त्याणी कूच करून येमुना उतरून उमरगडास गेलो तों इकड सुज्यातदौला याणी बेणीबाहादरास सजावल पाठविलें. तेव्हां बेणीबाहादराने चौदा माहाल खिचराचे हवाला ठाणीसुधा करून कुरास रुपसिंग चौधरी हवेली कुरामार याचे हवाला केला आणि आपण गंगा उतरून पलीकडे

जाऊ लागला, तेव्हां आम्हास पत्र पा की तुम्ही जागा आपली घेणें, ते पत्र आम्हास उमरगडी साहावे दिवसी आले. तेव्हां आम्ही राजश्री बालाजी गोविंद याजपासी पाचसे राऊत मागितले की आमची फौज गणेश संभाजीकडून यावया दोन दिवस लागतील. आम्हापासी दोनसे राऊत आहेत आणि पाचसे तुम्ही द्या ते त्यांच्या चितास न आले. निदान दोनसे राऊत मागितले की जलदीने जाऊन आमलात दाखल होऊ. लाचार होऊन राऊत मागितले. नाना प्रकारे विनविले परंतु त्यास आनकूल पडले नाही. तेव्हां मागती आम्ही उमरगडाहून कूच करून कालपीस आलो तों चिरंजीवहि आपली फौज गणेश संभाजीकडून घेऊन आले. कालपीहून कूच करून हमीरपूरचे घांटे उतारा लाविला तो येकिले की खिचराने चौदा माहालात आमल करून जमाव केला. सरूपसिंगाने कुऱ्यात आमल केला. वेंकट कासीराव देसमूक बेणीबहादराकडे जावयाकरिता कुऱ्यास आले तो बेणीबहादर जागा सोडून गेला. तेव्हा मारनिलेने कुऱ्यामध्ये ठाणे बसवावयाचा उदेग केला ते समई सरूपसिंगाने सलुखाच्या गोष्टी सांगून दगा करून करून बरसीने व्यंकट कासीरायास जिवे मारिला. हे वर्तमान आम्हास कलून जलदीने उतरून आलो. मारनिले समागमे स्वार प्यादे होते त्यात काही मारिले गेले, काही पलून आले. आम्ही उतरून आलो. हे वर्तमान कुऱ्यास सरूपसिंगास कलून निघोन गेला. छ १९ रमजानी आम्ही कुऱ्यास दाखल जालों. पुढे खिचराने आपली ठाणी बिदकी कुवरपूर हसवा येथे घालून आपण गाजीपुरीच्या किल्यात आहिला आहे. सेवक कुऱ्यास येऊन पोहचताच पुढे फौज व प्यादे दोन हजार रवाना केले. बिदकी कुवरपूर येथील ठाणी मारिली. दाहावीस प्यादा कापून काढिला. दाहा बारा घोड आणिले. पुढे फतेपुरी त्याचे ठाणे तेथील गढी बलकट त्याणी मजबुदी केली होती तेथे मोर्चे लाऊन चौदिवसात जेर केला. तेव्हा कौलास येऊन वाट मागितली. काढून दिल्हे. तैसेच हसव्याचेहि ठाणे उठून गेले. आता गाजीपुरी खिचर तीन हजार प्यादा व पाचसातसे राउतानसी किल्यात आहे. जागा मजबूद आहे. येरवी मैदानी आसता तरी पारपत्यास उसीर नवते, परंतु किल्याचे कामं. मोर्चे लाविले पाहिजेत. गाजीपूर राजश्री बालाजी गोविंद याकडील खर्चवेच सिबंदीचा पडेल. येविसी पंतमारनिलेस लिहिले आहे. उतराचा मार्ग पाहातो आणि जाऊन मोर्चे लाऊन खीचर मजकुरास काढून देतों. जोपर्यंत खीचर आहे तों आमल सुरलीत चालत नाही. वसुलाचा प्रकार काही बेणीबाहादर याणी नेला, काही खिचराने घेतला, काही गव्हारानी लुटला. पुढे यांस काढून देऊन बदोबस्त करून सेवेसी आशाढ श्रावणमासी चरणदर्शनास येऊन पोहचतों. स्वामीच्या

पायाच्या दर्शनाचा हेत बहुत होता की च्यार वर्शे जाली आणि आज्ञाहि आली होती. येक वेळ चेरण द्रिष्टीस पडतील. त्यास राजश्री सुभेदाराचे आज्ञेवरून या बखेड्यामुळें न आलों. याउपरी येथील बंदोबस्त करून सेवेसी हाजर होतो. चेरण द्रिष्टीस पडतील तो सुदीन. प्रस्तत नवाब सुज्यातदौले यांचे पत्र सेवकास आले आहे कीं, आपण लखनऊहून कूच करून शाहाजादे यास आणावया पटण्यास जातो; तुमचा त्यांचा श्नेह निकट आहे, तुम्ही चालावे येसे कितेक प्रकारें पत्र लि॥ आहे. हे बजिनस पत्राची नकल सेवेसी पाठविले आहे. आम्ही जावे. त्यास या येथील बखेड्यामुळें आमचे जाणे न जाले. शाहाजादे पटण्याहून येक मजल फिरंग्यासुधा येक मजल आलाकडे आले आहेत. येसे वर्तमान आहे. वाराणसीचे रोखे येताच आम्ही जाऊन पोहचतो. पेसजी सेवक गंगापासून रेव्यास आला तेसमई शाहाजादे यास पत्रे लिहीली होती त्याजवरून त्याणी कितेक खातरजमेचे पत्र पाठविले आहे त्याची नकल बजिनस सेवेसी पाठविले आहे त्यावरून विदित होय. शाहाजादे याची निष्ठा स्वामीसी बहुतसी आहे. आपली फौज सिकस्त जाली हे वर्तमान येकून बहुत खेदायेमान जाले. त्याची सर्व प्रकारे ममता स्वामीसी आहे. दुसरा विचार धरीत नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Gopalrao Ganesh writes to the Peshwa from Kurha Jahanabad, describing how he recaptured from the Vazir several important places in the Doab lost by the Marathas during the campaign against the Abdali. The letter is significant as regards the after-effects of the battle of Panipat.*

No. 264] [*17-5-1761*

छ १ जिल्हेज इसने

श्री

श्रीमंत माहाराज राजेश्री नाना

साहेबाचे सेवेसी

विनंती चरणरज दादो जनार्दन करद्वंय जोडून सिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता॥ वैशाख शुध १४ मु॥ राजगड नजीक छेत्रपूर संनिध राजे हिंदुपत जाणून माहाराजाचे स्वानंदवैभव लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. विनंती येथील वर्तमान तर माहाराजाची स्वारी भेलश्यावर आली होती, ते समई सर्व वृत्तांत राजे हिंदुपत व राजे पाहाडसिंग व गुमानखुमानसिंग याचा सेवेसी विस्तारेकडून

येक दोन विनतीपत्रें लिहीली होती त्यावरून सकल अर्थ ध्यानास आला असेल. त्यावरी स्वारी माघारी उजेनीकडे गेली ऐसे यासी कललियावर यानी थोडीसी बदमामली केली परंतु माहाजाराचा प्रताप यैसा कीं राजेश्री जानोजी भोसले सागर प्रांतास आले. त्याजला राजश्री विसाजी गोविंद प्रांत मारचे भेटले तेव्हा त्यानी मागती उत्तम प्रकारे सिक्षा करून बदमामलीची अमली उत्तम केली. माहाराजास कलावे. सेवकास पूर्वी श्रीमंत भाऊसाहिबी राजे मार याजकडे पाठविले होते की आले तर घेऊन येणे. नाहीतर त्याजपासी राहोन बारीक मोठी बातमी राखोन सर्व अर्थ लिहीत जाणे. त्याजवर माहाराजाचीहि आज्ञापत्रे येक दोन सेवकास काये आज्ञा? राजियापासी राहावे की सेवेसी यावे? दोहीतून येक आज्ञा आली म्हणजे त्याप्रा वर्तनूक केली जाईल. राजियाची तो नजर बदमामलीची बहुतच आहे. काही माहाराजांच्या प्रतापाची सिक्षा जाली म्हणजे नरमी धरितात आणि मागती हावा बदल जाली म्हणजे नजर बदलितात. यैसा विचार याचा आहे. बाहेत्कार सिष्टाचार मात्र करितात कीं सर्वश्वे राज्ये श्रीमंताचे. त्यास प्रस्तुत तो राजेश्री गणेशपंत अणास राजे गुमानखुमानसिंग जाऊन भेटले आहेत. तमाम जगतराज राजे याची जागा जफ्तीमधें आणिली आहे. जयेतपूर वगैरे ठाणी मातबर जे आहेत ते मात्र राहिली आहेत. तेथे राजे पाहाडसिं(ग) याची सत्ता आहे. पाहाडसिंग राजे हिंदुपत राजे यैसे येकत्र राजगडी आहेत. पुढे ते तजवीज काये करितील ते पाहावी. प्रस्तुत पाहाडसिं(ग) राजेश्री अंणासी मिलाला नाही. कलावे सेवक आज्ञेचा क्षुधित आहे. मार्गप्रतीक्षा च्यातकन्याये करीत बसलो आहे. कृपेची वृधि सेवकावर असावी. अज्ञेसिवाय वर्तनूक करवत नाहीं हे विज्ञापना. सरकारच्या जासूदजोड्या दोन मजपासी होत्या त्यातलि येक जोडी सेवेसी पाठविली आहे. येक जोडी जवल ठेविली आहे. श्रृत होये हे विज्ञप्ति. राजेश्री कृष्णराऊ स्वामीकडून इकडे आले ते परभारे राजे पाहाडसिंग व खुमानगुमानसिंग याजकडे गेले. तेथे राजेश्री गणेशपंत अणासी भांनगड लाविली त्याजकडे उपाये जाला नाही. मग दोन महिणे त्याच्या लस्करात फिरोन परभारे कोणीकडे गेले हे न कले. राजे हिंदुपत याच्या दरशनासदेखील आले नाहीत आणि श्रीमंतानी त्याजला पत्रे व जो जाबसाल सांगितला असेल त्यास कांही सांगोन भेटले नाहीत. सेवक तो याचा दरबार धरून बसलो आहे. याजवर जे आज्ञा येईल ते प्रमाण. विनंती लिहिली आहे की आज्ञेची मार्गप्रतीक्षा करितो. माहाराजाच्या कृपेची छाया सेवकावर असावी. हे विज्ञप्ति.

¶*Dado Janardan's letter to the Peshwa dwelling at length on the unreliable attitude of the Bundela chiefs who submit at the approach of Maratha arms and are ready to rise no sooner have the forces departed.*

No. 265] [21-5-1761 ?

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामींचे शेवेसी

विनंती शेवक मल्हारजी होळकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम छ १९ माहे शवाल स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. साहेबाकडून पत्र आले ते पावोन प्रमोदावाप्ति जाली. राजश्री अपाजी जाधव यासी जरूर भेटीस पाठवावे म्हणून आज्ञा. यैसियासी राजश्री सटवाजी जाधवराव तो नरवर सिप्री कोल्हार या प्रांतात मुलकाच्या बंदोबस्तास गेले. हुजूरचे पत्र त्यासी होते ते त्याजकडे रवाना केले. पावलियावर तेहि स्वार होऊन शेवेसी येतील. शृत होय हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar to the Peshwa, accepting his invitation to meet him along with Satwoji Jadhav.*

No. 266] [May 1761

श्री

पुरवणी. चिरजीव राजश्री बाजीपंत यासी आसीर्वाद उपरी. श्रीमंत गंगातिरा आले. काही दिवस गंगावास करणार. शरीर प्रकृत ठीक नाही. बहुतच ग्लानि आहे. भगवंत काये करितो पाहावे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबाकडील वृत्त तरी पाणपतच्या तालुकियात ठिकाण लागले. जमिदाराच्या घरी आहेत म्हणौन पुरुषोतम माहादेव हिंगण्यानी लि॥ होते. लौकरच दुसरी माणसे पाठविली आहेत ती आली म्हणजे तत्वता लिहून पाठवितो म्हणौन लि॥ ते पत्र श्रीमंती श्रीमंताकडे पुण्यास पाठविले. त्यातील अर्थ या प्रकारे जगनिवास कृपा करील. शीघ्रकालेच थांग येथास्थित लागेल चिंता नाहीं. श्रीमंताची येथास्थित खबर येऊन कागदपत्र येऊ जाऊ लागत तोवर जनाकारणे काही विस्वास पुरोन स्थिरता होत नाही. आवघे विस्व काळजीमध्ये निमग्न जाले आहे. परिणाम लावणार श्रीहरी आहे. खासगत लोकाकडे कर्जवाम येणे त्याविसी वारंवार सूचना करीतच आहो. तुम्हासहि काळजी सर्व प्रकारे आहे जसा कलेल तसा उगावा करावा. हिंदुस्थानचे फौजेवर पैका राहिला. कितेक दोरकाजीराऊ पाटणकर वगैरे इत्यादिक वारलेच राहिले. त्याची आवस्था येक प्रकार जाली. तेव्हा त्या

पैक्याची तूर्त वाट पाहाणे कठीण. काळांतरे श्री कृपा करील तेव्हा करू. सांप्रत कठीण. तेव्हां आमची गत काय? व्यवहार किती आहे, काय प्रकार त्यास सर्व तुम्ही माहीतच आहा. विस्तार काय ल्याहावे. परंतु द्रिष्टोत्पतीने पाहाता कठीण आहे. श्रीसता. दुर्गचे काम जाले असल्यास आमचे पाचशे रुो निघाल्यास द्यावे. कापड पाचशे रुो पावेतो आणावे म्हणौन लिा आहे. त्यास अनकूल पडल्यास आगत्य आणावे. सिरेयास चिरंजीव गोपालपंत आहेत त्याजवल काहीसा ऐवज आहे म्हणौन त्याणी लिा होते. काये असेल तो घेऊन यावे. तुमचे घरची समस्त कुशल आहेत. तुम्हाकडून जासूद आले तेहि सांप्रत घरी गेले आहेत. कागदपत्र घेऊन आले म्हणजे रवानगी तुम्हाकडे करू. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Gangadhar's letter to Bajipant saying that the disaster of Panipat has greatly affected the health of the Peshwa who was already ailing. Inquiries about the Bhau are being vigorously prosecuted.*

No. 267] [*2-6-1761*

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक मलारजी होलकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम छ २७ शवाल मुाा गांगुर्णी येथास्थित असे विशेष. दिवस जाले स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही. इकडील वृत पै दर पै विनंती पत्रे शेवेसी पाठविली. हलीहि श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी विनंतीपत्रे पाठविली त्यावरून सर्व श्रुत होईल. सारांश फौज तूर्त दाहा हजार दसऱ्यापूर्वी पुढे रवाना करावी. तरच इकडील बदोबस्त होऊन स्थित राहील. लोकास दिलदिलासा देऊन हर तऱ्हेने फौजेची रवानगी करावी. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar requests Dadasaheb to succour him with a contingent of ten thousand.*

No. 268]   [Date of receipt 19-6-1761 ?

छ १९ जिलकाद

श्रीमोरया

शेवेसी विज्ञापना. गणेश संभाजी वगैरे कमाविशदार त्या प्रांतीचे गवाराचे काजियाकरिता आपणास बोलावितात. जेथील तेथे सिबंदीची नेमणूक अस्ता सिबंदी ठेवीत नाहीत. मदत करा म्हणतात. इंदूर वगैरे माहालचा बंदोबस्त करून हिशोब घ्याल त्याप्रमाणे घ्यावा. सर्व हिंदुस्थानचा यख्तियार बंदोबस्त करणे तुम्हाकडे असे म्हणून आज्ञा. यैसियासी आम्ही ते प्रांती होतो तेव्हा गणेश संभाजीस बहुता प्रकारे लेहून पाठविले आणि सरकारची पत्रेहि त्यासी गेली परंतु येकंदर न यैकिले. आम्ही जाऊन पारपत्य करावे तो आमचे येणें इकडे जाले आणि फौज येथे आहे नाही ते सर्व श्वामीस श्रुत. रो गोपाळराव गोविंद, सदासिव रामचंद्र, बाबूजी नाा, शाहाजी सुपेकर, निंबालकर वगैरे सरकारची पथके देशी गेली. सदासिव रामचंद्र तो ग्वालेरीहून (न) पुसत उठोन उजनीस जाऊन बसले. बखेडा मांडला ते काही सरकारचे चाकर नाहीत. यैसे बेकैदी, त्यांच्यानी चाकरी होणे कलतच. हुजूरची पत्रे येतात की तुम्हाकडे फौज पाठविली ते आपल्यापासी ठेऊन मुलकाचा बंदोबस्त करणे. फौजाचा प्रकार असा. बंदोबस्त कसा होतो? तथापि प्रसंगानरूप राखिला. गणेश संभाजी वगैरे यासी सरकारची व आमची पत्रे जातात त्याप्रमाणे वर्तत नाहीत यैसे वारंवार स्वामीस काय ल्याहावे? आमच्या माहालापेक्षा सरकारचे माहालचे आगत्य आदिक आहे. हलीहि त्याप्रमाणेच परंतु औंदा गडबडच पुरवली. आमचे येणे इकडे जाले. न येतो तर जित्लो होतो. त्या सरंजामानसी चाकरीस न चुकता अंतरवेदीच्या माहलचा वगैरे तहारहाचा बंदोबस्त व्हावा यास्तव राजश्री गंगाधरपंत ठाकूर सुरजमल याजकडे पाठऊन कारस्तानीनेच यमुनापारचा अमल पूर्ववतप्राा बसविला परंतु तिकडील कमाविशदारापासून लोक उठोन गेले. विना फौज बंदोबस्त होणे कठीण. याजकरितां जरूर पर्जन्यकालातच आगत्याआगत्य पांच सात हजार तऱ्ही निदानी पुढे रवाना कराव्या म्हणजे थोडा बहुत इकडील व अंतरवेदीतील बं:ोबस्त राहेल. शेवेसी+ शृत होय हे विज्ञापना.

¶[*Malharrao Holkar explains his difficulties in recovering the lost ground in Hindustan. He bitterly complains against commanders of the force detached to his assistance by the Peshwa.*

\+ पत्र मल्हारराव होळकराचें.

No. 269] [Recd. 19-6-1761

छ १९ जिल्काद

श्रीमोरेश्वर

शेवेसी विज्ञापना

राजश्री गणेश संभाजी यासी बोलाऊन पाहाडसिंगाकर्डील मामलतीचा गुंता उरकावा म्हणौन आज्ञा. यासी ते भरी पडले. आम्ही तिकडे होतो तेव्हा हुजुरीहून पत्रे आली ते व येथूनहि पंत मारनिलेस पाठविले की पाहाडसिंगास घेऊन येणे. उभये पक्षी तह करून देऊ परतु त्याचे येणे न जाले. बरे, अस्तु. सरकारच्या रुपयाचा निशा व सिबंदी परभारे तेच करितील. प्रस्तुत पर्जन्यकाल सन्निध. बाजत बरसाद ते प्रांतास गेलियावर बंदोबस्त अज्ञेप्रमाणे होऊन येईल.

१

इंदुरास गेलियावरी माधोसिंगाचा वकील येऊन तुमच्या मनोदयानुरूप बोलल तरी उतम. नाहीतरी पेस्तरसाली तुम्ही व बिजेसिंग मिलोन माधोसिंगाचे पारपत्य करावे. चाळीस पनास लक्ष नख्त व इत्काच मुलूक घ्यावा. यासी स्वामीनी लिहिल्याप्रमाणेच मर्जी कायेम असो द्यावी. प्रस्तुत पावसाळा जवळ आला. बाजतबरसात फौजा सरकारच्या व आमच्या व तोफखाना घेऊन माधोसिंगाचे पारपत्य करू. ते कार्य आगाध नाही परंतु आपस्मधे फूट फितूर नसावी. सर्व सरदार व फौजा राणाजीकडे अगोधर राजश्री बाबूजीनास पाठवावे. मागाहून आपणहि वैशाखमासी उदेपुरास जावे. नवे राणाजी स्थापून तेथे दाहा वीस लाखपर्यंत पैका मेळवावा आणि छावणीस इंदुरास यावे म्हणौन. यैसियासी बाबूजीना तो राहीनात. तातड करून देशासी गेले. उदेपुराकडे कोण पाठवावे. आम्ही जावयाचा उद्योग केला तो माळवेप्रांती गांगुर्णीकर आभिसिंगाने परगणियातील आमल उठऊन गढी बळकाऊन बसला. याचे पारपत्य केल्या सर्व फितूर दूर होते असे जाणून गढीस मोर्चे लाविले. इंदुरीहून तोफखाना अणून गढी खाली केली. लागलीच खाणून निसनाबूद केले. येणेकडून तमाम माळवे प्रांती दबा बसला. राणाजीकडे कामदारास पत्रे कारकून पाठविला त्याची उतरे आली की आम्ही येतो. प्रस्तुत येथील कार्य जाले. दरमजल राणाजीचे काकडास (?) जातो. तेथे गेलियावरी कारभारी येतील. प्रसंगानुरूप प्रयेत्न करून साधेल तित्के साधून यैवज घेतो.

१

प्रयाग कासीची सनद गाजुदीखानापासून करून घ्यावी. सुज्यात-

येकदील असल्या साहेबाचे मनोदया-
नरूप घडोन येईल

१

दौलाहि आपल्या दबावानेच दोन्ही स्थले देईल म्हणौन आज्ञा. यैसियासी येविसी राजश्री गंगाधरपंतास येथून वारंवार लिहितो. गाजुदीखान वजीर दिलीदाखल झालियावर दोही स्थलाच्या सनदा करून घेतील. तथापि कागदपत्राने अथवा सोहलतीनेच काम होते यैसे नाही. येविसी आम्ही त्या प्रयेत्नात असो. स्वामीनी चिंता न वागवावी. साहेबाचे तेजप्रतापे कार्ये होईल.

शेवसी शृत होय हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar submits for the information of the Peshwa some of the points regarding Pahadsing, Madhosing, the Rana of Udaipur and the permits for the holy places from Ghaziuddin.*

No. 270] [*28-5-1761*

पौ छ १३ जिलकाद सन
इसने

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेशी

विनंती. सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ २२ सवाल मुाा गांगोरणी प्रांत माळवा स्वामीचे कृपेकरून येथास्तित असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविले तेथें आज्ञा की चकोराचा जोडा तलाश करून पाठवणे व गणेश संभाजीस आणून गोहद घेणे. त्यास चकोराच्या तलाशास गोसावी पाठविले आहेत. तूर्त आम्ही माळव्यांत आलो. तूर्त गोहदेचे काम राहिले. विशेष. स्वामीनी लिहिले की तुमचे पुत्र आजच भेटले. फौज ठेऊन सत्वरच येतील. त्यास तो पुढे देशास गेले. बऱ्हाणपुरास फिरोन घरीहून आले असतील. त्यास स्वामीनी त्यास फौज ठेवावयास यैवज देवावा म्हणजे फौज ठेऊन सत्वरच हिदुस्तानात येतील. तोवर आम्हीहि सत्वरच सेवेसी येतो. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev to the Peshwa, saying that the siege of Gohad has to be postponed owing to his move to Malwa.*

No. 271] [21-5-1761

छ १९ जिलकाद

श्रीगजानन वरद

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसा

सेवक आज्ञाधारक भास्कर बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ सवालपावेतो माहाराजाचे कृपेअवलोकनेकरून कसबे शाहाजापुरी येथे सुखरूप असो विशेष. हे प्रांतीचे वर्तमान श्रीमंत राजेश्री मल्हारराव होळकर ग्वालेर प्रांतीहून माळवे प्रांती आले. रामपुरा चंदरावत याणी घेतला होता. हे जागीर त्यांची होती यास्तव मजल दरमजल आले. त्यासी यांचे आगोधर राजेश्री कृष्णाजी तानदेव कमाविसदार पाा महंतपूर दिमत राजश्री संताजी वाघ हे व त्यांचे पेंडारे यैसे गेले होते. त्याणी रामपुरा घेतला. चंदरावतांचे लोक तीन च्यारसे माणूस कापून काढिले. त्यांचा दिवाण धरला व मीर बकाम कमर-दीखान याचा लेक तेथें होता. चंदरावत याणी तो उदेपुरास हस्तनापुराहू(न) पळोन जात होता तो अवचित मार्गी चंदरावतांची गाठ पडली त्याणी धरून आणिला होता. तोहि रामपुरेयांत होता तोहि हस्तगत जाहाला. रामपुरा घेतलियावर तिसरे दिवसी मल्हारजी होळकर गहूखेडी प्रांत हाडोती येथें येऊन दाखल जाहाले. त्यांसी वर्तमान कळले की रामपुरा फत्ये जाहाला तेव्हां ते येऊन गांगरोण नजीक राजगड पाटण येथे गडी गांगरोणी तेथे अभेसिंग राठोड चाकर कोटेवाले याचा राहात होता त्याणे धामधूम केली होती. याजमुळे मारनुले गडीस मोर्चे लाविले. चवदा पंधरा रोज जाहाले अद्यापि फत्ये जाहाली नाही. तोफा इंदुराहून आणविल्या होत्या. त्याहि हेच मार्गे छ मजकुरी गेल्या. चोहों पाचा रोजी जाऊन पोहचतील. माहाराजाचे पुण्यप्रतापेंकरून फत्ये होईल. फत्ये जाहालियावर अवंतिकेस यावयाचा रोख आहे व एक रोख उदेपुराकडे जावयाचा आहे. मग पाहावें कोणते रोखे जातील. तदनंतरी दुसरे वर्तमान तरी श्रीमंत राजेश्री जनकोजी सिंदे यांचा शोध सुरजमल जाठ व मल्हारजी होळकर व चिंतो-पंत फडणीस दिमत सिंदे याणी फार शोध केला परंतु त्यांचा ठिकाणा कोठे लागला नाही. पूर्वी माहाराज अवंतिके प्रांती होतेत ते समई वर्तमान उडविलें होते कीं जनकोजी सिंदे आहेत म्हणून. त्यासी आपण त्यांचे खजिनियाचे शोधास लागले होतेस यास्तव वर्तमान उडविले होते परंतु तें वर्तमान सारे लटकें. सांप्रत साबाजी सिंदे व खानाजी जाधव व जानराव वाभले यैसे च्यार हजार फऊज पागा सिलेदार दिंमत सिंदे हे होळकर याजबराबर आहे. त्यास मल्हारजीबावानी

अश्वासन दिल्हे आहे की तुमची दोन वरशाची समजाविसी अवंतिकेस गेलियावर देऊ. यास्तव लोक राहिले आहेत. त्यासी अवंतिकेस आलियावर लोक देसी येतील यास्तव माहाराजास विज्ञापना लिहितो की सरदार कोठें दिसत नाही. लोक समागमे मातबर माणूस येका ताटातील जेवांचे ते व लोक सरदारास टाकून पळोन आले त्याची समजाविसी कैसी करावी? ते निमखहराम चाकर जाहाले. त्यांची घरेदारे लुटून घ्यावी की यैसे कोणी सरदारास टाकोन पळोन न येत. हे सरदारास टाकोन पळोन आले. सरकारचे रुपये पांच सा लक्ष खराब करून जातील. आपपलीं घरे करून देसी जातील. हे लुकसानगिरी माहाराजाची आहे व आता सांप्रत सिंदे यांचे मायेचे कोणी हे प्रांती नाही, जे आहेत ते सारे चोर आहेत. कितेक कमाविसदार पैसेयांत तफावत करून जातील. सरकारपागेची घोडी कितेक कमाविसदाराकडे आहेत. त्या तफावत होईल. कितेक पागांवर सरदार आहेत ते घोडी वाचली आहेत त्यांत तफावत करतील. वस्तवानी अवंतिकेंत आहे त्यात तफावत होईल. साहेबास खजिना सात आठ लक्ष्य पोतनिसानी दाखविला परंतु सारा खजिना दाखविला नाही. आज तीन वरशे सिंदे मोहिमेवर गेले त्याजपासून माहालोमाहालचा पैका वसूल होऊन अवंतिकेस पोहचत होता. दरसाल पंचवीस तीस लाख. जादा पण कम नाहीत. यैसे तीन वरशांचे रुपये पंच्याहातर यैसी लाखपावेतो असावे. त्याजपैकी त्याणी हस्तनापुराकडे पंचवीस तीस लाखपावेतो नेले असतील. बाकी राहिले अवंतिकेस असावे. ते माहाराजानी पुसिले ते सात आठ लाख दाखविले. माहाराजांचा माल माहाराजास न दाखविला. याजप्रमाणे निमखावर कायम आहेत! तदनंतरी सालमजकुरी माहालोमाहालचा यैवज पंचवीस तीस लाख पावेतो होईल. त्यासी थोडा बहुत खरिपांत अवंतिकेस पोहचला असेल. बाकी कमाविसदारांकडे तैसाच राहिला असे. गर्दीमुळे कितेका जागा पैसा रयतेने दिल्हा नाही परंतु लुकसानी जाहाली तरी तीन च्यार लाखापावेतो होईल. ज्यादा होणार नाही. परंतु इतकियावर चोर पोर खाऊन जातील ते खरे. माहाराजांचे हाते पैसा टका पुरता हातीं लागणार नाही. त्यासी माहाराजांचे विचारास येईल (तरी) सेवकावर कृपाळु होऊन आज्ञा येईल तरी हे गोस्टीचा बंदोबस्त माहालमाहालाचा व अवंतिकेत खजिना होता त्याचा व पागा पीलखाना वगैरे याचा बंदोबस्त केला जाईल. बंदोबस्त करून खजिना वगैरे जिनस जो असेल तो हजूर माहाराजांजवळ घेऊन येणे परतु माहाराजाचें पुरते अश्वासन असिले तरी दाहा विसा लाखांची किफायत करून दाखऊ. त्यासी माहाराजांचे

विचारास येईल, कृपावंत होऊन आज्ञा कराल तरी माहालोमाहालचे कमाविसदारास ताकीदपत्रे सादर सेवकाकडे करावी. भास्करपंतास माहालोमाहालचा वसूलबाकीचा झाडा दाखऊन जो पैसा तुम्हाकडे साल मजकूरचा खरीफ रबीचा असेल तो खाजिना भरून हुजूर घेऊन त्यांचे समागमे येणे येसी पत्रे कमाविसदारांस व बाबा पोतेनीस व चिंतो कृष्ण फडणीस यासी पत्रे कीं मागील तीन च्यार वरशांचा खाजिना जमा अवंतिकेस जाहाला आहे तो परगणेयात राहिला असेल तो व घोडी, पीलखाना वगैरे जो माल राजश्री जनकोजी सिंदे यांचा असेल तो घेऊन भास्करपंतास दखलगिरी देऊन त्याजसमागमे हुजूर घेऊन येणे येसी ताकीदपत्रें त्यास व दुसरी ताकीदपत्रे साबाजी सिंदे व खानाजी जाधव व जानराव वाभले याचे नावाची की सरकारचे खजिनियाचा व महालोमाहालचा पैसा खर्च कराल बिगरआज्ञा, तरी तुम्हापासून खुद निसपत भरून घेऊ. दुसरे सरकार पागा व सिंद्याच्या घरू पागा ज्या, वाचलें घोडे व हस्ती वगैरे जिनस असेल तो सारा येकत्र करून मारनिले पंताबराबर घेऊन हजूर येणे. येणेप्रमाणे सेवकावर कृपाळु होऊन पत्रे प्रथक प्रथक येतील, आज्ञा येईल तरी बंदोबस्त करून हजूर घेऊन येईन. सेवकाने अवज्ञा करून पत्र लिहिले आहे परंतु सिंदे याचा निमख खातो तो माहाराजाचा आहे. येथील चलण ह्याप्रमाणे पाहिलें कीं सारें चोरावें (असे) आहे यास्तव विज्ञापना लिहिली असे. आणिक कितेक वर्तमान च्यरणाजवल येऊन पोहचू तेव्हां साद्यंत कळो येईल. हे गोस्टीची बं(दो)बस्ती सत्वर होत्ये तरी उतम आहे. माहाराजांचे विचारास येईल तरी फडणीस व पोतेनीस यांचे घरावर देसी चवकी बसावी म्हणजे येथें सारा बंदोबस्त होऊन येईल. बहुत काये लिहिणे ? कृपालोभ असो दीजे हे विज्ञाप्ति. मी माहाराजांचा निमख खातों यास्तव विज्ञापना लिहिली असे. जरी माहारा(जा)स कार्य करणे असेल तरी आमचे नामाविधान घ्यावे. कारण नसेल तरी आमचे नाव गरीब ब्राह्मणावर कृपा करून न घ्यावे कीं आमचा प्राण ! हें वर्तमान कलेल की भास्करपंतानी श्रीमंतास पत्रें लिहिली होती यास्तव प्राण आमचा घेती(ल). प्राण आमचा जाईल यास्तव विज्ञापना सेवेत लिहिली असे हे विज्ञाप्ति.

¶*Bhaskar Ballal in the employ of the Sindias reports to Peshwa Nanasaheb the movements of Holkar and the sardars of the Sindias and suggests that a large amount of treasure accumulated for years by the Sindias can be acquired, if the sardars are properly checked and punished : otherwise they will themselves squander away all the accumulations. The paper is very important.*

No. 272] [26-5-1761

छ २४ जिलकाद इसने
सितैन

श्री

राजश्री मल्हारराव सुभेदार
गोसावी यांसी

॥ ० सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित गोविंद सामराज सुभेदार असीर्वाद विनंती. येथील वर्तमान ताा छ २० सवाल मुाा किले ग्वालियेर जाणून आपले कृपेकरून येथास्थित असे विशेष. आपण गांगोरीचे तलाहून कूच करून गेलियातागाईत येकहि पत्र येऊन परामृष (न)जाला. तरी यैसे न करावे. आपणाकडील वरचेवरी वर्तमान लेहून या स्थलाचा परामृष करीत जावा. राजश्री गंगाधरपंत तात्यासी आम्ही आज्ञा घेऊन आलो ते समई पत्र राजश्री गंगाधरपंत तात्यासी दिल्हे होते. त्याजकडे पत्र पावते करून त्याचे उतर माघेच आम्हाजवल आले ते पाठविले असे त्याजवरून वर्तमान विदित होईल. आपण कूच करून या प्रांतातून गेलियाउपर जमीदारानीं काही मर्यादा ठेविली नाही. सिकरवारानी तमाम सरकारची ठाणीं घेतली. जाठ, गोहदवाला, पछोरवाला गुजरोला सुकलारी हे सर्व येकेठाई होऊन आणभाष केली की पैका सरकारचा न द्यावा. मामलत आपण सालमजकूर तकूब ठेऊन गुदस्ता सन सितैनची मामलत चौथाई सोड देऊन करार केली ते मामलत तिसाची बाकी चौ किस्तीने रुा द्यावेसा करारमदार केला. ब्राह्मण तेथे दीड महिना जाऊन बसले. गोहदकर जाट येक पैसा देत नाही. गडबडेत गाव आमचे गालियेरीचे जगा वरचे(?)घेतले. अंताजी माणकेश्वर याजकडील गाव घेतले ते बलजू सोडीत नाही. सायेर आमचे सीबोली हिंजोलीचे सुदामत बंद केले. गांव घेतले. त्याचे पटा करून द्या म्हणतो अणखी गाव द्या यैसी भाषणे करितो. पैसा देत नाही. साफ भाऊसाहेबाचे दुपट कोणी फौज घेऊन पुढे कोणी पुसमाहांत येईल तेव्हा समजोन घेऊन याप्रमाणे भाषणे त्याची. पछोरकरानी पहिली किस्त लष्करात दिल्ही ते दिल्ही. आपण गेलियावर साफ सालजाब केला की सुभेदारानी आम्हास कौल दिल्हा आहे की पंचमहालात नरवरकरास मुलूक न देऊन तुम्ही परगणा त्यासी दिल्हा. यास्तव आम्ही मामलतीचा रुा देत नाही यैसे साफ सालजाब बचाजी-पंताचे विाा केले. बचाजीपंतानी लिाा की हे रुा या कौलाच्या करारावर देत

+ शिरवळकर.

नाहीत. तुम्हास कार्य त्याचे करणे असेल ते करणें. त्यासी अणखी अमचे मुलकात गावखेडी घ्यावी हे नजर पछोरकराची. रुा देत नाहीत. मामलतीचा नरवरकराचे पंचमहाल दरोबस्त राजश्री विठलराव तात्यानी घेतले होते. सलुखास्तव माहाल येक च्यार रुा त्याजकडे जमा मोकरर करून पवया परगणा दिल्हा तो त्याजपासून घेतला तो त्यासी दिल्हा. पछोरकरांचा मुलूक काही घेतला नव्हता. यैसे असोन पछोरकर लबाडीस चुकत नाहीत. या जाटाचे मजकुराप्रमाणे कोणी लहान मोठा जमीदार पैसा येकंदर देत नाहीत. जागेच राहता सरकारचे मुस्कील जाली आहे. किलियाचे देणे दुसाला पावणेदोन लाख रुा अखेर सवाल सन इहिदे ता बाकी लोकाचे नेबाद देणे, त्याजपैकी पनास हजार रुपये पुढे पाहिजेत. सवा दोन लाख रुा किलियासी बेगमीस सरकारांतून यैवज पंचवीस तीस दिल्हा तो वजा होऊन देणे राहिले आहे. झासीवर वरात श्रीमंत् भाऊसाहेबी पाऊण लाखाची दिल्ही होती. त्याचे ताकीदपत्र नाना पुरंधरे याणी दिल्हेते बाबूराव याणी फिरोन माघारे दिल्हे, वरात कबूल केली नाही. पंधरा हजार रुा बालाजी गोविंद याजकडे वरात नाना पुरंधरे याणी दिल्ही होती ते त्याणी माघारी फिरोन पाठविली. रुा दिल्हा नाही. सवा लाख रुाची वरात आपण राजश्री गणेश संभाजीवर कालपीकडे लेहून दिल्ही. त्याणी उतर पाठविले कीं, अमलाचा बंदोबस्त चाललिया कार्तिक, मार्गशीर्ष मासी रुा देऊन. गोहदचे बरहदचे मामलती-पैकी रुो बचाजीपंताकडून देविले. त्यासी पैसा गोहदकर कोणास देत नाही. येवंच किलियाचे बेगमीस येक पैसा कोणीकडील येत नाहीं. आम्हीं कोणता इलाज करावा? खासा धणी अदिकरून पत्रें लिहिता दमलो. या स्थलाची बेगमी कोणी न केली. पंनास हजार रुा लोकांचे सध्या देणे व पनास हजार रुो पुढे सामाही रोजमरियासी पाहिजेत, तेव्हां येथे अबरू राहील. येथे कर्ज मिळत नाही. मुलकी पैसा येत नाही. लोकाचे समाधान असावे तेव्हा स्थल आपलें. त्यासी हिंदुस्तानचा पाया हे जागा आहे. सर्व जमीदारास याचा अभिलास आहे. याची उपेक्षा करावी यैसे नाहीं. त्यासी राजश्री विठलराव तात्यासीहि पत्र लिहिले आहे. आपणाजवल असतील तरी पत्र द्यावें. नाहीतर तेहि पत्र लाखोटा फोडून वाचून पाहून सर्व मजकूर त्याजलाहि लिहिले आहेत हे ध्यानात आणावे. कागद त्याच्याकडे माणसे जातील तेव्हा रवाना करावे. श्रीमंतास, दादासाहेबास, नाना पुरंधरे, सखारामपंत बापू यासीहि पत्रे लेहून पुणियासी थेट रवाना केली आहेत. किलियाचे बेगमीस्तव त्यासी त्याचे ध्यानात हा अर्थ कोठे येतो? सर्व आपल्यास इकडील विचार कलतो. त्यासी येथील बेगमी सत्वर होऊन ये आणि हे स्थल संरक्षण होये तो अर्थ केला पाहिजे. पत्रे लेहून फौज छावणीस अणवावी. लांबणीवर पडलियावर सरकारच्या गढ्या जागे परिछिन जमीदार राहू देत नाहीत.

येकंदर दबत नाही. यास्तव इकडील विसर पडो न द्यावा. सर्व हिंदुस्तानचा बदोबस्त येश जये पूर्वीपासून आपलेच असे. दुसरियाच्यानें काही होणे नाही. राजश्री गंगाधरपंत तात्यानी सविस्तर वर्तमान लेहून पाठविलेच असेल. हे सुरजमलाकडे मथुरेस गेले तेथे याकुब अलीखान शाहाकडील आला. पातशाहाचे लेकाकडील वकील आला. नजीबखानाकडील वकील, सुजातदौला, रोहिले बंगस सर्वांचे वकील आले. अंतरवेदीची ठाणी सोडून दिल्ही. आपली ठाणी बालाजी गोविंद याणी बसविली. आपलेकडीलहि मामलेदार तात्यानी रवाना केले. कुरा-ज्याहानाबाद येथे गोपाळराव गणेश जाऊन बसले. अंतरवेदीतील बंदोबस्त सर्व आपले प्रतापे करून जाला. तात्यानी आमचे पत्रीं लिहिले की सुभेदार फौजसुधा गेले याजवरून बहुत हालके पडले. आणखी कितेक कामकाज दबावाने होते. त्यासी आम्ही अंतरवेदीत जातो. गंगाश्नान करून देसास जाऊनं यैसे तात्यानी लिहिले. पातशाहा पूर्वेकडून दिलीस येत आहे. विठलराव येथे असता पात-शाहाकडे येते तरी कित्येक बंदोबस्त राहाता यैसे लिहिले होते. आपले पत्री वर्तमान काये लिा असेल त्यावरून कलेल. प्रस्तुत आपला मुकाम कोणे स्थली आहे? रामपुराकडील कैसे जाले? उदेपूर राणा याजकडे जाणें जाले न जाले हे सर्व वर्तमान लेहून पाठवावे. श्रीमंत तो बऱ्हाणपुरीहून कूच करून पुण्यास गेले. दादासाहेबहि पुण्यास आले यैसे वर्तमान देसीहून आले होते. नवलरामाने मामलत केली. किस्तबंदी केली. वकील नवलरामानी पाठविले आहेत. मुलूक दखणीचा घ्यावा, तो तुम्ही आम्ही वाटून घ्यावा, यैसे आपसमध्ये मनसबे करीत आहेत. त्यासी गोहदकर, पछोरकर व नवलराम यांसी ताकीदपत्रे तिवास पाठवावी की मामलतीचा कराप्रमाणे किस्तबंदीप्रा रुा मामलेदारास आपले बरेच (?) माहाल तरी भरोन देणे, फारखती घेणे. याप्रमाणे तिवास ताकीद पत्रे पाठविली पाहिजेत. बरचेबरी वर्तमान लेहून आमचा परामृष करीत जावा. आमचा विसर पडो न द्यावा. बेगमी किलियाची होऊन ये तो अर्थ करावा. तोफा खालत्या पाच बदलगडांत त्या खालत्याच राहू द्याविया किंवा किलियावर ठेवाविया याचे उतर पाठविले पाहिजे. आम्हास नेहमी सिबंदीचे ठाणेठुणियाचे खर्चाचे संकट पडले आहे. सर्व बंदोबस्त आपली स्वारी जलदीने या प्रांते जालिया होऊन येईल. लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Govind Samraj asks immediate succour from Malharrao Holkar for the protection of Gwalior, an important post of the Marathas; he describes the rebellious attitude of the surrounding princes, who taking advantage of the Maratha reverse at Panipat rose in combination and tried to throw off the Peshwa's dominion. The letter clearly describes the condition of the country in those critical times.*

No. 273] [*16-5-1761*

छ २४ जिल्काद इसने
सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक नागो सिवदेव कृतानेक सां। नमस्कार विज्ञापणा. सेवकाचे वर्तमान स्वामी पुण्यप्रतापेकरून ता। छ १० माहे सवाल यथास्थित जाणून स्वानंदवैभवलेखनआज्ञा करून आनाथास सनाथ केले पाहिजे विशष. या प्रांतीचे वर्तमान तर दतियेवाले यानी सेवढ्याचा किला घेतला त्यास तीन च्यार महिणे जाले. त्या परगणियांत सरकारचा आमल नाही व ठहरोली बुंधेले यानी झासी गीर्दचे व महु राणीपुरा इकडील परगणेयांतील दाहा पंधरा गाव मारून मुलकांत धामधूम मांडली. मुलकाचा माल नेतात. सरकारची ठाणी व गढ्या घेतल्या. मार्ग चालो देत नाहीत. भदावर प्रांतीचे वर्तमान तर सरदारानीच आपले समक्ष भदोरियास प्रांत भदावर दिल्हे. भिंडेच्या किल्यांत मात्र सरकारचे ठाणे आहे. कछवाघार प्रांतांतील ठाणी जमीदार भूमिये यानी ढुंडीचे समई घेतली. तेथील कमावीसदार गोहदेस जाऊन बसले आहेत. झांसीचे आसपास काही आमल आहे. त्याहिमधे कितेक गुजर व धंदरे वगैरे जमीदार आहेत ते बदमामली करितात. जोरतलबी आहेत त्याचे पारपत्य होत नाही. ग्रहस्तास मामालिइती दिल्या आहेत त्याजवर सखती करून आमल करितात. ब्राम्हणाची आबरू घेतात. येक दोन आतत्याईमुळे दुरनिमित्य देईल यैसे दिसते. ग्रहस्तांची आबरू घेतल्याने काही मामला उगवत नाही. झांसीचे किल्यांत सिबंदी व कन्हेरा वगैरे किल्यांत नेमणुकीप्रमाणे सिबंदी नाही. थोडीबहुत आहे त्यासहि रोजमुरा मिलत नाही. किल्यातील जकिरा होता तो सिबंदीचे लोकास दिल्हा. फौजेस रोजमुरा मिलत नाही. कितेक देसचे सिलेदार भले लोक होते ते उठोन गेले. रा। गोपालराऊ बापूजी खर्चावीन हैरान बहुत आहेत. उदास होऊन जातात. छ ११ माहे मजकुरी कूच करून कुरवाई, भवरोशास जाणार आहेत. परगणे उचाडचे वर्तमान तर जोरतलबी जमीदार आहेत. जागा जागा गढिया बांधोन दुसाला आमल दाबून बदमामली करितात त्यांचे पारपत्य केल्याखेरीज बंदोबस्त होत नाही. या प्रांतांत मातबर फौज आसलियाखेरीज सुरलीतपणे आमल होनार नाही. सेवकास पूर्वी आज्ञा केली होती की त्या प्रांतीचे वर्तमान सविस्तर लिहीत जाणे. त्यावरून

सेवेसी शृ (त) केले आहे. आनि आम्हास आज्ञा केली होती की तुम्ही तेथेच राहाणे त्यावरून येथे आहो. पुढे जैसी आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तनूक करू. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Nago Shivdeo reports that Bhadawar, Jhansi and Datia have revolted against Maratha rule.*

No. 274] [*23-5-1761*

छ २६ जिल्का(द) इसने

श्री

श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो बलाल भुसकुटे कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ १७ सवालपर्यंत सेवकाचे व प्राामजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंताची आज्ञा घेऊन बुराणपुराहून बिदा जालो ते खरगोणास आलो तों चोरानी दंगा करून दाहा वीस गाव मारिले. गुरे बदमवेसी करून नेली. मग सेवकाने कदीम सिबंदी व काही नवी सिबंदी ठेऊन वैशाख शुध्ध येकादसीस जांबली मवास असेरीचे व बतिसीचे सरदेवर आहे तेथें गेलो. तों चोरानी आगोधर मुले माणसें लांबऊन सडे राहिले होते त्यांची गाठ पडली. बारीचे तोंडी झुंझ दिल्हे. त्याची दाहा बारा माणसे मारिली. कांही जखमी केलीं. आपलेकडील येक जमादार पडला. परंतु स्वामीचे प्रतापेकरून चोराचे पारपत्य उतम केले. आणखी जागोजाग आहेत त्याचेहि पारपत्य होईल. नर्मदेपलीकडील मांडवचे तलेटीचे केसरीसिंग व झुंझारसिंग याणी से सवासे राऊत व पाचसें बरकंदाज चाकर ठेऊन तमाम मुलुकात दंगा मांडिला आहे. त्यांचे मिळणीस आणखी कितेक आहेत. दिवसास गाव मारून नेतात. मंडळेश्वर वैशाख शुध्ध सप्तमीस रात्रीस येऊन बाजारपेठ लुटिली यैसी धूम मांडिली आहे. मौजे ढालखेड पाा कसरावद हा गांव मारून नेला. कसबे आकबरपूरचे घाटे पायेउतारा आहे ते वाटेने येऊन आलीकडे धूम करणार यैसी बातमी आली त्यावरून तिकडे ठाणीठुणी ठेऊन थोडा बहुत बंदोबस्त केला आहे. यैसा दंगा मांडिला आहे व सरकार हांडे येथील मकडाईकर गोंड धाडशाराजा याणे गडाखाले उतरून मातबर मातबर पाटिलास आणून सें दोनसे रुपये मागूं लागला. देणे नाही तर तुम्हांस धरून मारीन यैसी दबावणी देऊन चाळे करूं लागला होता. इतकियांत

